ॐ भूयानसि महानसि.

# लेखनदीपिका

---

लेखक

क्रु. पां. कुळकर्णी, एम्. ए., बी. टी.

हायस्कूल, सातारा.

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
087429

क

प्र. क. अत्रे, बी. ए., बी. टी., टी. डी. (लंडन)

कॅंप एज्युकेशन सोसायटी, पुणें.

---

महाराष्ट्र पब्लिशिंग हाउस लि.,

१२ बुधवार पुणें, २.

---

किंमत १ रुपाया.] १९२९ [आवृत्ति पहिली.

प्रकाशक—
विश्वनाथ गणेश ताम्हणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर,
महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस, लि.,
८१५ सदाशिव पेठ, पुणें २.

( सर्व हक्क स्वाधीन. )

मुद्रक—
वामन वासुदेव अतीतकर, बी. ए.,
नवीन समर्थ विद्यालयाचा
' समर्थ भारत ' छापखाना,
९४७ सदाशिव, पुणें २.

# प्रस्तावना

प्राथमिक व दुय्यम शाळांतून मराठी भाषेच्या शिक्षणाची जितकी अनास्था होत आहे, तितकी दुसऱ्या विषयांची क्वचितच होत असेल, हें नव्यानें सांगायास नको. या विधानाला एकच पुरावा म्हटला म्हणजे आजकाल इतिहास, गणित इत्यादि विषयांचीं अनेक नवीन शालेय पुस्तकें निर्माण होत असतांना क्रमिक मराठी वाचन पुस्तकांमध्यें, जवळजवळ पंचवीस वर्षें होत आलीं तरी, अद्यापि फारसा फरक झाल्याचें आढळून येत नाहीं व होईल असा रंगहि दिसत नाहीं. खुद्द क्रमिक पुस्तकांची जर ही दशा तर इतर भाषाविषयक पुस्तक-लेखनाच्या बाबतींत काय परिस्थिति आहे हें विचारावयासच नको. यामुळें, मराठी भाषा शिकविणें याचा अर्थ निवळ क्रमिक पुस्तकें मुलांकडून वाचून घेणें असाच झालेला आहे. 'ग्रंथावरून व्याकरण' शिकविणें जरी अभ्यासक्रमांत असलें तरी 'ग्रंथां'ची व 'व्याकरणा' ची क्वचितच गांठ पडत असल्यानें भाषेच्या अभ्यासाला व्याकरणाचा मुळींच उपयोग होत नाहीं. लेखनांत 'निबंध' लिहिण्यापेक्षां 'खर्डे' लिहिण्याचाच अधिक अंतर्भाव होत असल्यानें भाषाशिक्षणांत लेखनाचें काय महत्त्व आहे हें अद्यापि कोणाला कळलेंसें दिसत नाहीं.

गेल्या २५ वर्षांत सामाजिक व्यवहाराचें व त्याच्या अनुषंगानें भाषेचें स्वरूप झपाट्यानें बदललें आहे. आयुष्यक्रम इंग्रजी वळणावर जात चालल्यानें स्वाभाविकपणें भाषेची ठेवण अधिकाधिक इंग्रजीच्या धर्तीवर होत चालली आहे. नवीन विचारांचा व नवीन कल्पनांचा आविष्कार करण्यासाठीं नूतन भाषा-पद्धतींचा व विचार संकेतांचा अवलंब करावा लागत आहे. भाषेच्या बाह्य स्वरूपांत होणारा हा बदल इष्ट आहे किंवा नाहीं हा प्रश्न निराळा. तथापि भाषाशिक्षणाचा एक हेतु भाषेच्या सद्यःस्थितींतील स्वरूपाची यथार्थ ओळख पटवून देणें हा आहे. तेव्हां 'राजश्रिया विराजित सकलगुणालंकार' असले दीर्घसूत्री मायने मुलांना शिकवीत बसण्यापेक्षां प्रचलित पद्धतीचेंच पत्रलेखन त्यांना आतां शिकविणें अधिक आवश्यक झालें आहे. पूर्वी व अजूनहि पुष्कळ ठिकाणीं 'निबंधलेखन' हा भाषालेखनाचा एकमेव भाग आहे, असें समजण्यांत

येतें. निबंधाची कल्पना आतां फार व्यापक झालेली आहे. गंभीर विषयावरील लिखाणालाच पूर्वी निबंध असें नांव देण्यांत येत असे. पण आतां त्यांत गोष्टी कथन, पत्रलेखन, कल्पनासंकोच व विस्तार, नाट्यरूप संवाद इत्यादि प्रकारांचा-ही समावेश झालेला आहे. दुय्यम शाळांतील वरच्या वर्गांत याच नवीन वळणावर निबंधलेखन शिकविण्यांत येत असतांना खालच्या वर्गांतून मराठी भाषेचें शिक्षण मात्र अस्सल हेमाडपंती पद्धतीनें चालावें हें आश्चर्य आहे. या दोषाला एकच कारण आहे तें हें कीं, मराठी भाषा कोठल्या पद्धतीनें व कोणत्या क्रमानें शिकवावी यासंबंधीं चर्चा व अभ्यास कोठें होत नाहीं. त्यासंबंधीं वाङ्मयहि निर्माण होत नाहीं. ' अतिपरिचयादवज्ञा " या वचनांतील कटु सत्य मराठी भाषेला अजूनहि भोंवतेंच आहे. काळ बदलतो आहे, सुधारणा होत आहे, अशासारख्याच विचारानें समाधान मानून घेतल्याशिवाय मार्ग नाहीं.

अशा असमाधानकारक परिस्थितींत आमचे विद्वान् मित्र प्रो. कृ. पां. कुळकर्णी, एम्. ए., बी. टी., यांनीं ' लेखनदीपिका ' हें पुस्तक निबंध-लेखनाच्या नवीन कल्पनांना अनुसरून लिहून फारच मोठी कामगिरी केली आहे याबद्दल त्यांचें अभिनंदन करावयास पाहिजे. भाषापंडित व विद्वान् ग्रंथकार असा प्रो. कुळकर्णी यांचा सर्वत्र लौकिक आहेच. या गुणांच्या जोडीला त्यांचा शिक्षणशास्त्राचा व्यासंग असल्यानें अशा तऱ्हेचें पुस्तक लिहिण्यास ते किती सर्वतोपरी लायक आहेत हें निराळें सांगावयास नको. सदर पुस्तकाचा आरंभ ' वाक्यविचार ' या प्रकरणानें झालेला आहे सदर प्रकरण व लेखन-खंड, कल्पनासंकोच विस्तार, गोष्टीकथन, संवाद व पत्रलेखन हीं पुढील प्रकरणें जरी इंग्रजी धर्तीवर लिहिलेलीं असलीं तरी त्यांमधील नमुने व उदाहरणें मराठी स्वरूपाचींच आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या आरंभीं त्या त्या लेखन प्रकाराची तात्त्विक माहिती अगदी सोप्या भाषेत दिलेली असून कोठल्या पद्धतीनें गेलें असतां मुलांना सदर प्रकार सहज आत्मसात् करतां येतील याविषयीं मार्मिक सूचना केलेल्या आहेत. प्रत्येक प्रकरणांत नमुन्यादाखल कांहीं ठिकाणीं स्वकृत व कांहीं ठिकाणीं आधुनिक मराठी लेखकांच्या नामांकित ग्रंथांतील उतारे दिले असल्यानें या पुस्तकास निव्वळ ' शालेय ' घडण न येतां वाङ्मयात्मक घडणहि आलेली आहे. स्वतंत्र लेखनाचा मुलांना सराव व्हावा एतदर्थ भरपूर विषय ' अभ्यास ' या सदराखालीं जागोजाग दिलेले आहेत.

पुस्तकाचीं जवळ जवळ शंभर पानें ' निबंध–लेखना ' वरील प्रकरणांनीं व्यापलेलीं आहेत. अर्थात् हा भाग प्रो. कुलकर्णी यांनीं काळजीपूर्वक व मेहनतीनें लिहिलेला आहे, हें उघड आहे. या भागांत जुन्या सांप्रदायास अनुसरून केवळ चिंतनविषयक निबंधाचीच चर्चा केलेली नसून वर्णनात्मक, कथनात्मक, कल्पनाविषयक व चर्चात्मक इत्यादि सर्व प्रकारच्या निबंधांचें विस्तृत विवरण केलेलें आहे. कांहीं निबंधांचे नुसते आराखडे दिले आहेत तर पुष्कळसे प्रत्यक्ष लिहून किंवा उतारे घेऊन कसें लिहावें हें दाखविलें आहे. तसेंच निबंध परिणामकारक करण्यासाठीं काय युक्त्या योजाव्यात हेंहि सुचविलेलें आहे. हा भाग एकंदरींत इतका व्यापक स्वरूपाचा झालेला आहे कीं त्यांत अमूक एक गोष्ट असावयास पाहिजे असें म्हणण्यास मुळींच जागा नाहीं.

एकंदरींत पुस्तक नमुनेदार झालेलें असून त्या योगें मुलांना नवीन लेखनप्रकारांचें शास्त्रीय ज्ञान सुलभतेनें होईल यांत शंका नाहीं. पूर्वींच्या ठराविक पद्धतीच्या निबंधलेखनानें जखडलेल्या मुलांच्या कल्पनाशक्तीला या पुस्तकांत पुष्कळच विचार व विषयस्वातंत्र्य मिळणार असल्यानें तिचा योग्य विकास होईल, हें निःसंशय आहे. या पुस्तकाचा फायदा प्रत्यक्ष प्राथमिक शाळेतील शालान्त-(व्हर्नॅक्युलर फायनल) परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांस व ट्रेनिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांस तर होईलच, पण इंग्रजी ५ ते ७ इयत्तांना मराठी भाषेच्या अभ्यासांत त्याचा बहुमोल उपयोग होईल. सदर इयत्तांतून वापरण्यास योग्य असें मराठी निबंधलेखनावरील एकहि पुस्तक आतांपर्यंत उपलब्ध नव्हतें.

कोणत्याहि भाषेच्या शुद्ध स्वरूपाचें ज्ञान प्रत्यक्ष व्याकरणाच्या द्वारां करून घेण्यापेक्षां तें विविधप्रकारच्या निबंधलेखनाच्या द्वारें करून घेणें हा मार्ग मुलांना मनोरंजक तर आहेच पण तो शिक्षणशास्त्रसंमत आहे. व याच शास्त्रीय तत्त्वावर या पुस्तकाची उभारणी झाली असल्यानें त्याचें विशेष महत्त्व आहे.

ता. ३ सप्टेंबर, १९२९. प्रल्हाद केशव अत्रे.

# पुस्तकपरिचय

प्रचलित शिक्षणक्रमांत देशी भाषांच्या अध्यापनाकडे विशेष लक्ष दिलें जात आहे ही एक समाधानाची गोष्ट आहे. वाङ्मयासंबंधीं निरनिराळीं पुस्तकें नेमलीं जातात व अभ्यासिलीं जातात, हें खरें. परंतु भाषाविषयाचें प्रधान अंग जें निबंधलेखन त्याकडे ज्या प्रमाणानें लक्ष जावयास पाहिजे त्या प्रमाणानें जात नाहीं. निबंधलेखन हा विषय तर स्वतंत्र रीतीनें फारच क्वचित् ठिकाणीं शिकविला जातो. शिवाय ह्या विषयावर लेखनाचा शास्त्र आणि कला ह्या दोन्ही दृष्टीनें विचार करणारें आणि नवीन शैक्षणिक तत्त्वांवरहुकुम लिहिलेलें असें मराठांत पुस्तक नाहीं. ही मराठी भाषेंतील उणीव प्रस्तुत पुस्तकानें नाहींशी होईल अशी कल्पना आशा आहे.

प्रस्तुत पुस्तकांत एकंदर बारा पाठ आहेत. सर्व पाठांत निबंधलेखनाचा शास्त्र आणि कला ह्या दोन्ही दृष्टींनीं विचार केला आहे. लेखनांत रचना आणि शैली ह्या दोन गोष्टी येतात. शैलीशिवाय रचना असूं शकते परंतु रचनेशिवाय शैली असूं शकत नाहीं. तेव्हां लेखनशैली चांगली साधण्यास लेखनरचनेसंबंधींच्या नियमांची माहिती पाहिजे आणि ही माहिती पहिल्या दोन वाक्य व पॅरिग्राफ ह्यांवरील पाठांत दिली आहे. कल्पनाविस्तार, कल्पनासंकोच व गोष्टीकथन ह्यांवर तीन पाठ दिले आहेत.

निबंधाची पूर्वतयारी कशी करावी, त्याचा आदि, मध्य, अंत, हे कसे योग्य रीतीनें साधावे ह्याचा विचार एका पाठांत करून नंतरच्या पाठांत निबंधाचे जे पांच प्रकार—वर्णनविषयक, वृत्तांत अथवा कथनविषयक, चिन्तनविषयक, चर्चात्मक, कल्पनाविषयक निबंध व संवाद, त्यांचें स्वरूप व विस्तार ह्यांविषयीं सांगोपांग माहिती दिली आहे. पत्रव्यवहारासंबंधींहि एक पाठ घातला आहे. त्यांत पत्रलेखनाचे सामान्य प्रकाराचा विचार करून प्रत्येक प्रकाराचे कांहीं नमुने दिले आहेत. शेवटीं लेखनास शुद्धत्व व स्पष्टत्व येण्यासाठीं विरामचिन्हें व शुद्धलेखन ह्यांसंबंधीं नियम शेवटीं परिशिष्टांत दिले आहेत. प्रत्येक पाठांत प्रथम सामान्य चर्चा, नंतर निबंधाच्या विषयांची वर्गवारी व रूपरेषा, त्याच्यापुढें मोठे तयार असे निबंध, त्यापुढें

कांहीं विषयांचे स्थूल आराखडे व शेवटीं अभ्यास असा क्रम ठेविला आहे. तात्त्विक चर्चा रूक्ष न होऊं देण्याविषयीं खबरदारी घेतली आहे. ठिकठिकाणीं व्यावहारिक स्वरूपाच्या उपयुक्त सूचना दिल्या आहेत. चर्चेतील तत्त्वें पडताळून पाहण्यासाठीं मुबलक उदाहरणें दिलीं आहेत.

असें ह्या पुस्तकाचें स्वरूप आहे. त्यांत आह्मीं आमचा लेखनशिक्षणाचा शाळेंतील अनुभव एकवटून घालण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत पुस्तक माध्यमिक शाळांतील पांचव्या ईयत्तेपासून सातव्या ईयत्तेपर्यंतच्या व प्राथमिक शाळांतील व्हर्नॅक्युलर फायनल परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांस व ट्रेनिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांस उपयुक्त व्हावें अशी त्यांत योजना आहे. पॅरिग्राफविस्तार, कल्पना-विस्तार, लहान लहान वर्णनात्मक निबंध, गोष्टींच्या मुद्यांवरून गोष्ट लिहिणें ही निबंधलेखनाची प्राथमिक अवस्था आहे व ती त्या त्या पाठावरून इंग्रजी पांचव्या ईयत्तेसाठीं उपयोगांत आणावी. ह्याचा पुढचा भाग—म्हणजे कठीण वर्णनात्मक व कथनात्मक निबंध आणि पत्रें लिहिणें हा सहाव्या ईयत्तेसाठीं व व्ह. फा. परीक्षेसाठीं उपयोगांत आणावा. बाकीचा भाग इंग्रजी सातव्या ईयत्तेसाठीं व ट्रेनिंग कॉलेजसाठीं उपयोगांत आणावा.

प्रत्येक पाठांत उदाहरणादाखल कांहीं सर्वमान्य लेखकांच्या ग्रंथांतील विषय-संबद्ध असे लहान लहान उतारे दिले आहेत. त्या लेखकांचा व्यक्तिशः प्रस्तुत ग्रंथकर्ता अत्यंत ऋणी आहे. 'पॅरिग्राफ' साठीं लेखनखंड, परिच्छेद संवाक, रकाना, इत्यादि प्रतिशब्द आहेत. परंतु तो शब्द मराठींत आत्मसात् झाल्यामुळें त्या शब्दाचें मराठी उच्चारांतील स्वरूपच ह्या पुस्तकांत कायम ठेविलें आहे.

कॅ. ए. सो.च्या हायस्कूलचे हेडमास्तर श्रीयुत प्र. के. अत्रे यांनीं वेळांत वेळ काढून प्रस्तावना लिहिल्याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे.

पुस्तकप्रकाशनाच्या बाबतींत म. प. हा. चे चालक रा. वि. ग. ताम्हणकर, व समर्थ भारत प्रेसचे चालक, रा. अतीतकर व सरदेसाई यांचे आभार मानणें जरूर आहे.

दुरुस्ती—पान १३ ओळ ११ मध्यें १८४५ च्या ऐवजीं १८६४ वाचावें.

कृ. पां. कुलकर्णी.

# अनुक्रमणिका


पाठ १

वाक्यविचार ... ... ... ... १–१६

व्याख्या–प्रकार: शुद्ध, मिश्र, संयुक्त-वाक्यरचनेच्या सूचना ३, वाक्यसंयोग ४, संयोगाचे प्रकार ६, केवल वाक्यांचें केवल वाक्य, अभ्यास ६, केवल वाक्यांचें मिश्रवाक्य, अभ्यास ९, केवल वाक्यांचें संयुक्त-वाक्य, अभ्यास ११.

पाठ २

लेखन-खंड ( पॅरिग्राफ ) विचार ... ... १७–२५

व्याख्या १७, जरूरी, वाक्यक्रम १८, पहिलें वाक्य, वाह्य संबंध, सूचना १९, वाक्यें जोडण्याचे मार्ग, पॅरिग्राफचे नमुने २०, गहूं, स्टेशन, शिवाजीची आग्र्याहून सुटका २१, ग्रामोफोन, विमानें २२, घड्याळें, अकबर धार्मिक पुरुष ह्या नात्यानें २३, एक प्रसादयुक्त पॅरिग्राफ, अभ्यास २४.

पाठ ३

कल्पनाविस्तार ... ... ... ... २६–२९

सूचना २६, उदाहरणें, अभ्यास २८.

पाठ ४

कल्पनासंकोच ... ... ... ... ३०–३९

सारांश काढण्याचा उद्देश ३०, सूचना, अभ्यास ३३.

पाठ ५

गोष्टीकथन ... ... ... ... ३९–४६

गोष्टी सांगण्याची पद्धत ३९, तीन अवस्था ४०, गोष्टींचे प्रकार, गोष्टींचा उपयोग ४१, उदाहरणें, अभ्यास ४४.

पाठ ६

निबंधलेखन ... ... ... ... ४६–५५

व्याख्या ४६, उपाय-पूर्व तयारी ४७, चर्चा ४८, रूपरेषेसंबंधीं

सूचना ४९, निबंधाचा आरंभ ५०, निबंधाचा मध्य ५२, शेवट ५४, निबंधाचे प्रकार, अभ्यास ५५.

पाठ ७

वर्णनात्मक निबंध ... ... ... ... ५६–७७

साहित्यमांडणीच्या दोन अवस्था ५६, वर्णनाबद्दल सूचना ५८, स्थूल रूपरेषा ५९, वनस्पति ६०, खनिज धातु, प्राणी, इमारती, किल्ले, शहर, गांव, समाज, उत्सव, यात्रा ६१, खेळ, यंत्र, कारखाना ६२, कला, सृष्टिचमत्कार ६३, प्रवास, प्रत्येकाचीं उदाहरणें ६४, निबंधः–कोळी ६६, हत्ती ६८, आट्यापाट्यांचा खेळ ६९, दिवाळीचा सण, मोहरमचा सण ७३, धरणीकंप ७४, अभ्यास ७६.

पाठ ८

कथनात्मक अथवा वृत्तान्तात्मक निबंध ... ... ७७–९७

सामान्य विवेचन व सूचना ७८, आराखडे ७९, चरित्रें, युद्ध, ऐतिहासिक प्रसंग, राजवट-कांहीं निबंधांचे आराखडे ८०, देवी अहल्याबाई, रामदास, विष्णुशास्त्री, सिंहगडची लढाई निबंधः- उत्तरध्रुवाची सफर ८२, जादूचा खेळ ८३, श्रीशिवछत्रपति, सम्राट अशोक ८७, आमच्या शाळेचें संमेलन ८८, जत्रा ९१, स्यमंतक मण्याची कथा ९३, अभिमन्युवध ९४, आगीचें वर्णन ९५, अभ्यास ९७.

पाठ ९

चिन्तनविषयक निबंध ... ... ... ९८–१३७

आरंभ, विस्तार, शेवट, सामान्य स्वरूपाचे मुद्दे. ४६ विषय– ९८ ते १११ निबंध–स्वावलंबन १११, विमा कंपनी ११३, सेव्हिंग्ज बँक ११५, अतिपरिचयादवज्ञा ११८, शीलं परं भूषणम् ११९, पोष्टखातें १२१, पोषाख १२२, पुस्तकें १२४, खानेसुमारी १२५, दुष्काळ १२७, रोजनिशी १२८, धंद्याची निवड १३०, चरित्रें १३२, झोंप १४३, अभ्यास १३५, निबंधाचे विषय व म्हणी १३७.

पाठ १०

वादविवादविषयक अथवा चर्चात्मक निबंध ... १३८-१४५

प्रकार १३९, सूचना, उदाहरणें १४०, खेळामध्यें चढाओढ असावी किंवा नाहीं ? बालविवाह इष्ट कां अनिष्ट ? शाळेमध्यें धार्मिक शिक्षण असावें काय ? १४१, शहरांत राहणें चांगलें कीं खेडेगांवांत रहाणें चांगलें ? हक्क कीं कर्तव्य १४२, राष्ट्रांच्या प्रगतीसाठीं युद्ध हें आवश्यक आहे कां ? १४३, अभ्यास १४५.

पाठ ११

कल्पनाविषयक निबंध व संवाद ... ... १४७-१६०

सामान्य विवेचन, प्रकार १४७, कांहीं नमुने १४८, एका जुन्या रुपायाचें आत्मचरित्र १४८, म्हाताऱ्या बैलाचें आत्मचरित्र १४९, कल्पनाविषयक संवाद-सूचना १५०, संवादाचे नमुने, देशी खेळ व विदेशी खेळ १५१, खेडेगांवांतील रहाणी विरुद्ध शहरांतील रहाणी १५१, दानधर्मपद्धति १५४, इनॉक्युलेशन १५५, पुढील शिक्षणासंबंधीं १५६, अभ्यास १५८.

पाठ १२

पत्रव्यवहार ... ... ... १६१-१७८

उद्देश १६१, प्रकार, आरंभ १६२, शेवट, कांहीं नमुने १६३, भाडेचिठी, प्रॉमिसरी नोट १६४, इनॉक्युलेशनचा अर्ज १६५, पाण्याबद्दल अर्ज, पोस्ट ऑफिसबद्दल अर्ज, १६६, व्यापारी मालाबद्दल पत्र १६७, मित्रास पत्र १६८, पावसाळ्याचें, सर्कसचें वर्णन १६९, शिष्यवृत्तीसंबंधीं अर्ज १७०, लहान भावास पत्र १७१, शिक्षकांस पत्र १७२, वर्तमानपत्रास रिपोर्ट १७४, वडिलांस पत्र १७५.

परिशिष्ट-१. विरामचिन्हें. परिशिष्ट-२. शुद्धलेखन, अनुस्वार, ऱ्हस्वदीर्घ. १७९-१८२

# लेखनदीपिका

## पाठ १

## वाक्य-विचार.

**वाक्यः**—बोलतांना अथवा लिहितांना ज्या शब्दांचा एकमेकांशीं योग्य संबंध जुळून अर्थ पूर्णपणानें समजतो त्या शब्दांच्या जुळणीस वाक्य असें म्हणतात. उ.:— सूर्य उगवतो, सूर्य प्रकाश देतो.

वाक्यामध्यें कर्ता आणि क्रियापद ( आणि क्रियापद सकर्मक असेल तर त्याचें कर्म ) हे शब्द मुख्य होत. कर्त्याला उद्देश्य आणि क्रियापदाला विधेय असें म्हणतात.

ह्यांशिवाय कर्ता,कर्म यांचीं विशेषणें व क्रियाविशेषणें हे शब्द असतात.

**संबंधः**—वाक्यांतील शब्द एकमेकांशीं विभक्तींच्या प्रत्ययानें बांधलेले असतात. कर्ता आणि क्रियापद ह्यांच्यामध्यें प्रयोगसंबंध असतो.

**प्रकार**—वाक्याचे प्रकार तीन आहेत—

(१) शुद्ध अथवा केवल वाक्य, (२) मिश्र वाक्य, (३) संयुक्त वाक्य.

**१. शुद्ध अथवा केवल वाक्य**—ज्या वाक्यांत एकच उद्देश्य व पूर्ण अर्थाचें एकच विधेय अथवा क्रियापद असतें त्यास शुद्ध अथवा केवल वाक्य म्हणतात.

उ.:—त्वां काम करावें. चंद्राला सूर्यापासून प्रकाश मिळतो. विद्यार्थी अभ्यास करतो.

**२. मिश्र वाक्यः**—एकापेक्षां जास्त साधीं वाक्यें एकत्र येऊन जर त्यांपैकीं एक वाक्य प्रधान असलें व त्यावर इतर वाक्यें अवलंबून असलीं तर त्या वाक्यास मिश्र वाक्य म्हणतात.

मुख्य वाक्यास प्रधान वाक्य म्हणतात व अवलंबून असलेल्या इतर वाक्यांस गौण वाक्यें म्हणतात.

उ.:—तूं जेव्हां येशील ( गौण ) त्या वेळीं मी तयार होईन. ( प्रधान )

तूं जो मनुष्य पाहिलास ( गौण ) तो हा. (प्रधान)

**३. संयुक्त वाक्यः**—ज्या वाक्यांत एकापेक्षां जास्त साधीं, स्वतंत्र व अर्थपूर्ण अशीं प्रधान वाक्यें असतात त्यास संयुक्त वाक्य म्हणतात.

हीं सर्व वाक्यें परस्परांशीं आणि, व, पण, परंतु ह्यांसारख्या अव्ययांनीं जोडलेलीं असतात.

संयुक्त वाक्यांत जीं स्वतंत्र, साधीं वाक्यें येतात त्यांस समान वाक्यें म्हणतात.

उ.:—वारा आला आणि पाऊस गेला. त्यानें मुंबईस रहावें व धंदा करावा. तुम्हीं स्वतां या अथवा तुमचा भाऊ आला तरी चालेल.

मिश्र वाक्यांत कधीं प्रधान वाक्य आरंभीं घालून गौण वाक्यें मागाहून घालतात.

उ.:—असा कोण मायचा पूत आहे कीं, तो अशा धूमधडाक्याच्या वेळीं आपली पूर्वकृति विसरून सर्व शत्रूंच्या हवालीं करील ? ( पहिलें वाक्य प्रधान आहे. )

किंवा कधीं गौण वाक्यें अगोदर घालून प्रधान वाक्य मागाहून घालतात.

उ.:—ज्याच्या गांठीस पैसा नाहीं, ज्याला कांहीं रोजमुरा मिळविण्याची शक्ति नाहीं व ज्याला दुसऱ्याचे पैसे घेववत नाहींत अशा मनुष्यानें व्यापाराचें धाडस करूं नये. ( पहिलीं तीन वाक्यें गौण आहेत. )

ज्या संयुक्त वाक्यांत सर्व वाक्यें सारख्या पदांचीं अथवा तोलाचीं असतात त्या वाक्यास समान अवयवांचें संयुक्त वाक्य म्हणावें.

उ.:—विंचू इतरांना नांगी मारतो पण पालीपुढें तो नांगी टाकतो.

इतरांना तो वाघ पण आम्हांला तो गाय.

कांहीं पुस्तकें वाचावयाचीं असतात; कांहीं चाळावयाचीं असतात; तर त्यांतून फार थोडीं वाचून पचनीं पाडावयाचीं असतात.

साधीं शुद्ध वाक्यें लहान असतात. मिश्र व संयुक्त वाक्यें मोठीं व लांब असतात. लिहिणारा आपल्या शक्तीप्रमाणें लहान अथवा मोठीं वाक्यें वापरतो. लहान वाक्यें योग्य रीतीनें वापरलीं तर परिणामकारक असतात. परंतु तीं जर एकसारखीं आलीं तर वाचणारास कंटाळा येतो. योग्य अशीं मोठीं वाक्यें घातल्यानें आंतील विचार चांगला दिसतो. परंतु तींही जर एकसारखीं आलीं तर मुद्दा लवकर ध्यानांत येत नाहीं.

पोट वाक्य म्हणून आणखी एक वाक्याचा प्रकार आहे. एकादा शब्द अथवा विचार जास्त स्पष्ट करावयाचा असेल तर पोट वाक्य घालतात.

उ.:–प्राणिमात्रांविषयीं अनुकंपा–मग तो ब्राह्मण असो, अंत्यज असो किंवा गर्दभ असो–हीच खरी ईश्वरभक्ति.

**वाक्यरचना करतांना खालील सूचना ध्यानांत धराव्या.**

१. वाक्यांतील कर्ता, कर्म, क्रियापद, व त्यांचीं विशेषणें योग्य ठिकाणीं घालावीं. त्यांचे संबंध ध्यानांत ठेवावे. ते व्याकरणशुद्ध असावे.

२. एका वाक्यांत एकच विचार घालावा. एकाच वाक्यांत अनेक विचारांचा घोंटाळा करूं नये.

३. वाक्यांचा क्रम योग्य असावा. जो मुद्द्यांचा क्रम तोच वाक्यांचा क्रम असावा.

४. मिश्र वाक्यांत कर्तृपद विनाकारण बदलूं नये. गौण वाक्यें व प्रधान वाक्य ह्यांचा संबंध योग्य असावा. गौण वाक्यें सरळ असावीं.

५. वाक्याचा आरंभ आणि शेवट हीं दोन स्थानें महत्त्वाचीं असल्यामुळें महत्त्वाचे शब्द आरंभीं अथवा शेवटीं घालावे.

६. योग्य शब्दांची निवड करावी.

७. शब्दांच्या व वाक्यांच्या संबंधाप्रमाणें विरामचिन्हें वापरावीं.

## वाक्यसंयोग

वाक्यसंयोगांमध्यें तीन प्रकार येतात. १. शुद्ध (केवल) वाक्यांचें शुद्ध (केवल) वाक्य करणें. २. शुद्ध (केवल) वाक्यांचें मिश्र वाक्य करणें. ३. शुद्ध वाक्यांचें संयुक्त वाक्य करणें.

**(अ) शुद्ध ( केवल ) वाक्यांचें शुद्ध ( केवल ) वाक्य खालीं दिलेल्या प्रकारांनीं करतां येतें.**

**१ विशेषण अथवा कृदन्तविशेषण** योजून.

उ.:–त्याचे घोडे पुष्कळ आहेत. ते त्याला विकावयाचे आहेत.

त्याच्याजवळ पुष्कळ **विकाऊ** घोडे आहेत.

त्यानें अरण्यांत वाघ पाहिला. तो त्याच्याकडे येत होता.

त्यानें अरण्यांत आपल्याकडे **येणारा** वाघ पाहिला.

तो मुलगा गाणारा आहे. रामा त्याला चाहतो.

रामा त्या **गाणाऱ्या** मुलास चाहतो.

चोर सारखा पळत सुटला. शिपायास तो सांपडला नाहीं.

तो सारखा **पळणारा** चोर शिपायास सांपडला नाहीं.

**२. समानाधिकरण पद** योजून.

उ.:–कृष्ण सज्जनांचा हितकर्ता होता, तो भक्तांचा कल्पद्रुम होता, पांडवांचा स्नेही होता, त्यास धर्मराजानें बोलाविलें.

धर्मराजानें सज्जनांचा **हितकर्ता**, भक्तांचा **कल्पद्रुम,** पाण्डवांचा **स्नेही** अशा कृष्णास बोलाविलें.

**३. नाम अथवा धातुसाधित नाम** ह्याची तृतीया अथवा षष्ठी विभक्ति योजून.

उ.:–पानिपतास कांहीं सरदारांनीं फितुरी केली. त्यामुळें मराठ्यांस अपयश आलें.

पानिपतास कांहीं सरदारांच्या **फितुरीनें ( फितूर होण्यानें )** मराठ्यांस अपयश आलें. ( तृ. )

कलुषानें संभाजीस मसलत दिली. तीमुळें महाराष्ट्राचा अधःपात झाला.

कलुषाच्या **मसलतीमुळें** संभाजीकडून महाराष्ट्राचा अधःपात झाला. (तृ.)

त्याला तीन मुली आहेत. त्यांचीं त्याला लग्नें कर्तव्य आहेत.

त्याला **लग्नाच्या** तीन मुली आहेत. ( ष. )

**४. कृदन्त अव्यय योजून.**

( १ ) ऊन कृदन्त–तो मेला. पांच वर्षें झालीं.
तो **मरून** पांच वर्षें झालीं.

( २ ) तां, तांना कृदन्त–तो रात्रीं गात होता. मीं ऐकिलें.
तो ( त्याला ) रात्रीं **गातांना** मीं ऐकिलें.
मूल रस्त्यानें जात होतें. तें खात होतें.
मूल रस्त्यानें **जातां जातां** खात होतें.

( ३ ) ला कृदन्त–तो देशांतरीं गेला. ह्या गोष्टीला वर्ष होऊन गेलें.
तो देशांतरीं **गेल्याला** वर्ष होऊन गेलें.

**५. शब्दयोगी अव्ययान्त शब्द योजून.**

उ.:–त्याच्या वडिलांनीं त्याला घालवून दिलें. त्याच्या अंगावर फक्त कपडे होते.
त्याला त्याच्या वडिलांनीं अंगावरील कपड्यांनिशीं घालवून दिलें.

**६. क्रियाविशेषण योजून.**

उ.:–त्यानें व्यवस्थापकांना एक कडक पत्र पाठविलें. हा त्याचा उद्देश होता.
त्यानें **मुद्दाम** व्यवस्थापकांकडे एक कडक पत्र पाठविलें.
त्यानें अभ्यासांत चांगली प्रगति केली. ही त्याची प्रगति सावकाश चालली होती.

त्यानें अभ्यासांत **हळुहळू** चांगली प्रगति केली.

**७. वाक्याचा संक्षेप करून.**

उ.:–तुमचें अंगण आट्यापाट्यांस योग्य आहे. आमचें तसें नाहीं.
तुमच्या **अंगणासारखें आमचें अंगण** आट्यापाट्यांस योग्य नाहीं.

## अभ्यास

खालील वाक्यांचीं साधीं वाक्यें बनवा.

त्यानें शत्रूस पाठ दाखविली. हें मोठें नामर्दपणाचें कृत्य केलें.
तो दुष्ट रीतीनें वागला. त्यामुळें कुटुंबांत मोठा घोंटाळा झाला.
औरंगजेबाची राजवट संपली. मोंगल साम्राज्याचे तुकडे झाले.
सूर्य वर उगवत होता. श्रीमारुतीचा जन्म झाला.
सूर्य उगवला. अंधःकार पार नाहींसा झाला.
तो देशांतरास गेला. ह्या गोष्टीस वर्षे होऊन गेलें.
त्यानें वाघ मारिला. ही बातमी खोटी आहे.
संभाजीनें आपले जुने मंत्री बडतर्फ केले. हा त्याचा अविचारीपणा होता.
आपण सकुटुंब कार्यास यावें. कार्यास शोभा येईल.
तो जेवला. त्यानें तुझें पोट कसें भरेल ?
तो लिहीत आहे. पण तुझें अक्षर कसें वळेल ?
तो सर्वांत हुशार आहे. हें सर्वांना माहीत आहे.
पृथ्वी गोलाकार आहे. शास्त्रज्ञांनीं ही गोष्ट सिद्ध केली आहे.
आमच्या शाळेस जय मिळाला. खेळाचा अशा रीतीनें शेवट झाला.
बाजी देशपांड्याचें नांव अजरामर होईल. त्यानें रांगणा खिंडींत जय मिळविला. शत्रूंच्या शक्तीची घमेंड उतरवली.
तो माझ्याशीं भांडला. तेव्हांपासून मी त्याच्याकडे जात नाहीं.
श्रीराम धनुष्यासह आला. असुर पळाले.
रामा हुशार आहे. तितका हुशार गोविंदा नाहीं.
मी कुशल आहें. त्यापेक्षां जास्त कुशल तो आहे.
आंबा सडला आहे. पण फेंकून देऊं नये.

**( आ ) केवल वाक्यांचें मिश्र वाक्य खालीं दिलेल्या प्रकारांनीं करतां येतें.**

१. गौण वाक्याच्यापुढें "हें" हें दर्शक सर्वनाम घालून किंवा "असें" हें सर्वनाम घालून. येथें गौण वाक्य "नाम-गौण" असतें.

उ.:–तुम्हीं आलांत. चांगलें झालें. मिश्र–तुम्हीं आलांत **हें** चांगलें झालें.

सातवे एडवर्ड एकाएकीं परलोकवासी झाले. हिंदुस्थानांतील लोकांस वाईट वाटलें.

मिश्र–सातवे एडवर्ड एकाएकीं परलोकवासी झाले **हें ऐकून** हिंदुस्थानांतील लोकांस फार वाईट वाटलें.

प्रत्येक मनुष्यानें खरें बोलावें. त्यास इहपरलोकीं पुण्यकारक आहे.

मिश्र—प्रत्येक मनुष्यानें खरें बोलावें **हें** त्यास इहपरलोकीं पुण्यकारक आहे.

त्यास उद्यां फाशीं देणार. लोक म्हणतात.

मिश्र–त्यास उद्यां फाशीं देणार **असें** लोक म्हणतात.

२. 'जो' हें संबंधी सर्वनाम व 'तो' हें अनुबंधी सर्वनाम योजून. येथें गौणवाक्य 'विशेषण–गौण' असतें.

उ.:—त्याजपाशीं संपत्ति आहे. ती त्यानें आपल्या स्वतःच्या पराक्रमावर मिळविली.

आज **जी** संपत्ति त्याजपाशीं आहे **ती** त्यानें स्वतःच्या पराक्रमावर मिळविली.

रामचंद्राच्या नामस्मरणानें पातकांचा नाश होतो. तो रामचंद्रसुद्धां राज्य सोडून वनवासास गेला.

**ज्याच्या** नामस्मरणानें पातकांचा नाश होतो **तो** रामचंद्रसुद्धां राज्य सोडून वनवासास गेला.

३. संबंधी व अनुबंधी क्रियाविशेषणें वापरून. येथें गौण वाक्य 'क्रियाविशेषण-गौण' असतें.

(१) स्थलवाचकः—जेथें, तेथें; जिकडे, तिकडे; जेथून, तेथून;

(२) कालवाचकः—जेव्हां, तेव्हां; जों, तों; जोंपर्यंत, तोंपर्यंत; ज्यावेळीं, त्यावेळीं;

(३) रीतिवाचकः—जसें, तसें; ज्याप्रमाणें, त्याप्रमाणें; ज्याप्रकारें, त्याप्रकारें; ज्यारीतीनें, त्यारीतीनें;

(४) संख्यावाचकः—जसजसें, तसतसें; ज्यामानानें, त्यामानानें;

(५) कार्यकारणदर्शकः—ज्यामुळें, त्यामुळें; ज्याअर्थी, त्याअर्थी; ज्यापक्षीं त्यापक्षीं; ज्याकरितां, त्याकरितां;

( ह्यावरील वाक्यें पुढें अभ्यासांत दिलीं आहेत. )

मिश्र वाक्यें तयार करितांना खालीं दिलेलीं अव्ययें उपयोगांत (जरूर तेथें ) आणावीं.

**कारणदर्शक**—कारण, कीं, कां कीं, कारण कीं.

उ.:—तो यंदा नापास झाला. तो परीक्षेच्या पूर्वी चार महिने बहुतेक आजारी होता. मिश्र–तो यंदा नापास झाला, **कारण** (**कां कीं**, **कारण कीं**) तो परीक्षेच्या पूर्वी चार महिने बहुतेक आजारी होता.

**उद्देशदर्शकः**—सबब, म्हणून, यास्तव, याकरितां.

उ.:—तो परदेशास जाणार आहे. विद्यार्जनास जाण्याचा त्याचा उद्देश आहे. मिश्र–विद्यार्जन करावें **म्हणून** (**यास्तव**, **याकरितां**, **सबब**) तो परदेशास जाणार आहे.

**संकेतदर्शकः**—तथापि, यद्यपि, अजून, जर, तर, जरी, तरी.

उ.:—तो श्रीमंत होता. तो मनाचा उदार नव्हता.

मिश्र–तो श्रीमंत होता **तरी** ( **तथापि** ) मनाचा उदार नव्हता.

तो धनधाकट आहे. तो काम करण्याचें नाकारतो.

मिश्र–तो धनधाकट आहे **तथापि** काम करण्याचें नाकारतो.

**स्वरूपदर्शकः**—म्हणून, म्हणजे, कीं.

उ.:—प्रत्येक ग्रंथाचा एक विशिष्ट उद्देश असतो. तो सिद्ध झाला. नंतर त्याची समाप्ति होते. मिश्र–प्रत्येक ग्रंथाचा एक जो विशिष्ट उद्देश असतो तो सिद्ध झाला **म्हणजे** त्याची समाप्ति होते.

# अभ्यास.

मिश्र वाक्यें करा. कंसांत दिलेलीं अव्ययें वापरा.

मृत्यु हा सर्वांना ठेविलेलाच आहे. मनुष्यानें तरी संपत्तीच्या आणि कीर्तीच्या मागें कां लागावें ? ( ज्याअर्थी, त्याअर्थी )

तूं आपली सही अगोदर केली पाहिजे. नंतर तो त्या अटीस कबुली देईल. ( जर, तर )

तो सारखा कणाकणानें विद्या व संपत्ति मिळवित होता. त्याचें समाधान म्हणून होईना. ( जरी, तरी )

ब्रिटिशांच्या अंमलाखालीं हिंदुस्थान देश आला. नंतर मात्र यादवीपासून त्याची सुटका झाली. ( जेव्हां, तेव्हांपासून )

शाळेची घंटा वाजली. सर्वत्र पांगापांग झालेलीं मुलें आपल्या जागेवर लागलींच आलीं. ( तोंच )

मनुष्य अधिक श्रीमंत होतो. त्याला जास्त संपत्ति मिळविण्याची हांव सुटते. ( जसजसा, तसतसा )

आयुष्य क्षणभंगुर आहे. तें स्वाधीन असे तोंपर्यंत परमार्थाची तळमळ ठेवावी. ( ज्याअर्थी, त्याअर्थी )

सावकाराजवळ पुष्कळ धन असतें. त्याला कांहीं मनाचें समाधान नसतें. त्याला नेहमीं काळजी असते. ( जरी, तरीसुद्धां )

त्या भिकाऱ्यानें कुत्र्याला एक काठी मारली. त्या भिकाऱ्याला घरच्या मालकानें एक काठी मारिली. ( जशी, तशी )

तो संस्कृत फार झपाट्यानें शिकला. त्याच्या शिक्षकासही आश्चर्य वाटलें. ( इतक्या झपाट्यानें, कीं )

कथेकऱ्यानें गोष्ट सांगितली. तिचें त्यानें स्पष्टीकरण केलें. ती गोष्ट सर्व श्रोत्यांस पटल्यासारखी दिसली. ( विशेषण—गौण वाक्य. )

या मालेंतील व्याख्यानें मराठींत होतात. मला तिचा आरंभ इंग्रजींत करावा लागत आहे. दिलगिरीची गोष्ट आहे. ( नाम–गौण. )

त्यानें मनांत धरिलेला उद्देश क्षुल्लक होता. तो सिद्धीस जाईपर्यंत त्याचें दुसऱ्या कोणत्याही कामांत लक्ष लागावयाचें नाहीं. ( क्रियाविशेषण गौणवाक्य ).

## ( इ ) केवल वाक्यांचें संयुक्त वाक्य करणें.

खालीं दिलेलीं अव्ययें वापरून निरनिराळीं वाक्यें त्यांच्या संबंधाप्रमाणें जोडावीं.

१. **समुच्चयबोधकः**—आणि, आणखी, व.

उ.:—राम दण्डकारण्यांत गेला. सुग्रीवाशीं मैत्री संपादिली. हनुमानाशीं मैत्री संपादिली.

संयुक्त—राम दण्डकारण्यांत गेला **आणि ( आणखी, व )** त्यानें सुग्रीव व हनुमान ह्यांशीं मैत्री संपादिली.

२. **विकल्पबोधकः**—वा, किंवा, अथवा, अगर, कीं.

उः—अश्वत्थामा मारला गेला. त्या नांवाचा मनुष्य किंवा हत्ती होता.

संयुक्त—अश्वत्थामा मारला गेला; नरो **वा** कुंजरो **वा.**

३. **न्यूनत्वबोधकः**—पण, परंतु, किंतु, बाकी.

उः—वैद्यानें औषध दिलें. त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

संयुक्त—वैद्यानें औषध दिलें **परंतु** त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

४. **परिणामबोधकः**—म्हणून, सबब, अतएव.

उः—माशास फुप्फुसें नाहींत. त्यास शब्द नाहीं.

संयुक्त—माशास फुप्फुसें नाहींत म्हणून त्यास शब्द नाहीं.

यत्नाशिवाय दैव पंगु आहे. प्रयत्नच प्रधान होय.

संयुक्त—यत्नाशिवाय दैव पंगु आहे **सबब** प्रयत्नच प्रधान होय.

## अभ्यास.

खालीं दिलेल्या वाक्यांचें एक एक वाक्य करा (केवळ अथवा मिश्र).

त्यानें कसून प्रयत्न केला. त्याला जय मात्र मिळाला नाहीं.

माझ्या मित्रानें एक पुस्तक लिहिलें. त्याचा विषय नीतिधर्म हा होता. त्यामध्यें त्यानें कर्तव्यकर्म, ब्रह्मचर्य, आज्ञावंदन, इत्यादि गुणांचा विचार केला आहे.

तो चांगल्या शीलाचा मनुष्य आहे. तो कधींहि असलें हलकें कृत्य करणार नाहीं.

क्षमा लोकोत्तर पुरुषांत मात्र आढळते. ते क्षमेनें मोठे अपराध पोटांत घालतात.

सहनशीलता हा गुण जीवितयाला सुखावह होण्यास आवश्यक आहे. क्षमाशीलता हाहि गुण तसा आहे.

स्वार्थत्याग ही वीरत्वाची कसोटी आहे. ही कसोटी लावून पाहिली असतां जॉन कॉक्रनचें चरित्र वीरत्वाचें बावनकशी सोनें आहे. हें आढळून येतें.

तुझ्या ठिकाणीं दर्प वास करतो. तुझ्या ठिकाणीं सौजन्याहि वास करतें. (जसा, तसें, वापरा).

राघोबानें नारायणरावाचा वध करविला. नानांनीं हें सांगितलें. रामशास्त्र्यांनीं हेंच सांगितलें.

मनुष्यें वाळवंटाच्या प्रदेशांत उंटावरून प्रवास करतात. दुसरें त्यांना साधन नाहीं.

त्याची प्रकृति ढांसळली. अनेक संकटांत आणखी हें एक जास्त संकट उद्भवलें.

त्याची परीक्षेची तयारी नीट झाली नाहीं. त्याला वेळच पुरेसा मिळाला नाहीं.

हिंदूंचे कायदे हिंदूंना आहेत. मुसलमानांचे मुसलमानांना आहेत. ते दोन्ही कायदे एकस्वरूपी नाहींत.

तूं माझा पक्ष घेत आहेस. तूं आपला स्वत:चा पक्ष निर्बल करीत आहेस.

तो पलीकडचा मनुष्य दरोडेखोर आहे. त्याचा पोषाख मात्र साधूचा आहे.

मोठा दुष्काळ पडला. दुष्काळानें लोकांमध्यें अस्वस्थता माजली.

समुद्र खोल आहे. पर्वत उत्तुंग आहेत. अशा रीतीनें उंची व खोली सारखी आहे.

त्याला कर्जाचा फार त्रास झाला. त्याच्या वडिलांनी सर्व कर्ज काढिलें होतें. त्याचे वडील फार खर्चिक होते.

पावतीवर अद्याप सही नाहीं. ह्याशिवाय पैसे मिळणार नाहींत.

तो खरें बोलतो आहे. हें त्याच्या वर्तनावरून दिसतें.

सिलोन हें बेट आहे. त्याच्याजवळ हिंदुस्थानचा दक्षिण किनारा आहे.

त्यानें कोट घातला. टोपी घातली. चालता झाला.

गोविंद नेहमीं वर्गांत पहिला असतो. तो वर्गांत सर्वांत हुशार मुलगा आहे. त्याला बक्षीस खात्रीनें मिळेल.

परीक्षा जवळ येत चालली. अभ्यास अद्याप पुष्कळ आहे. आतां खूब मेहनत केली पाहिजे.

मुलांना आपले पेपर्स पहावयाचे होते. तीं शिक्षकांभोंवतीं गोळा झालीं. त्यांनीं त्यांना जागेवर बसावयास सांगितलें.

तो नेहमीं सकाळीं फिरावयास जात असे. त्याचें फिरणें डोंगरावर असे. त्यानें त्याला चांगली क्षुधा लागत असे.

मुंबईची हवा मला मानवत नाहीं. ती फार सर्द आहे. मी कोठेंतरी दुसरीकडे रहाण्याचा विचार करीत आहें.

तो आट्यापाट्या खेळ फार उत्तम खेळला. त्याच्या शाळेचा जय झाला. खेळ परवां खेळण्यांत आला.

तो पुण्यास गेला. त्याला आपल्या भावास भेटावयाचें होतें. त्याचें आणखी कांहीं काम होतें.

पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते. हें तुला माहीत नाहीं. मला खरोखर आश्चर्य वाटलें.

दोन बोकड एका फळीवर समोरासमोर आले. ती फळी फार अरुंद होती. एकाच्या बाजूनें जाण्यापुरती दुसऱ्याला जागा नव्हती.

प्लासीची लढाई १७५७ मध्यें झाली. क्लाईव्हचा एक व सुजाउद्दौल्याचा एक असे त्यांत दोन पक्ष होते. त्या लढाईंत इंग्रजांचा जय झाला.

वर्षप्रतिपदेस बक्षीससमारंभ झाला. विद्यार्थ्यांनीं ऐतिहासिक प्रसंग उत्तम करून दाखविले. ते पाहून सर्व लोक खूष झाले.

सूर्य मावळला. गुरें घरीं आलीं. शाळा सुटून चहूंकडे गडबड उडाली.

लॉर्ड हॉर्डिंज हा नामांकित व्हाइसरॉय होऊन गेला. त्यानें हिंदुस्थानावर फार उपकार केले. त्यांची येथील लोकांना चांगली आठवण आहे.

कालिदास हा हिंदुस्थानांतील मुख्य कवि होय. तो विक्रम राजाच्या दरबारीं होता. तो इसवीसनाच्या आरंभीं होऊन गेला. असें विद्वान् लोक म्हणतात.

हरिभाऊ हे "गड आला पण सिंह गेला" ह्या कादंबरीचे कर्ते होत. त्यांचा जन्म पुण्यास झाला. ते १८४५ सालीं जन्मले.

पुढें दिलेल्या चार चार वाक्यांचें एक वाक्य करा—(मिश्र अथवा संयुक्त)

कांहीं लोक अद्याप तेव्हांच विस्तव करितात. ते चकमकीनें विस्तव करितात. दोन गारगोट्या एकमेकींवर घांसतात. चकमक तयार होते.

त्याची वर्तणूक चांगली आहे. त्याचा अभ्यासही चांगला आहे. त्याच्यावर शिक्षकाची मर्जी आहे. वर्गांत त्याचा नेहमीं पहिला नंबर असतो.

कांहीं कुत्र्यांनीं हरिणाचा पाठलाग केला. कुत्रे चांगले तयार होते. हरीण बिचारें उपाशी होतें. तें पकडलें गेलें.

शहरांत प्लेग झाला. त्यानें तें शहर सोडलें. तो खेडेगांवीं निघून गेला. तेथें प्लेगचा मागमूसही नव्हता.

पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत असते. हा तिचा फेरा वर्षामध्यें पुरा होतो. ही गोष्ट पूर्वी कोणास माहीत नव्हती. ह्याचा शोध आधुनिक शास्त्रज्ञांनीं लाविला.

अशोक हा हिंदुस्थानचा पहिला सम्राट होय. तो मोठा धर्मप्रवर्तक होता. त्यानें बुद्धधर्माचीं मतें पुष्कळांना पटविलीं. धर्मप्रसाराचें मुख्य साधन समिति किंवा संघ हें होतें.

पाऊस उत्तम झाला. सूर्यप्रकाशहि चांगला पडला. थोड्याच काळांत पिकें मोहरूं लागलीं. शेतकऱ्यांना आनंद झाला.

लेसेप्सनें सुएजचा कालवा तयार केला. स्थापत्यशास्त्रांतील कौशल्याचा तो एक नमुना आहे. तो जातीनें फ्रेंच होता. त्यानें वाहतुकीच्या साधनांत क्रांति केली.

शिवाजीराजाचे पदरीं आरमार होतें. त्याचे सरदार जहाजें घेऊन समुद्रांत फिरत. त्यांत सावळ्या तांडेल नांवाचा सरदार होता. कांहीं जुने बखरकार लिहितात.

तो मृग खरोखरीचा हरीण नव्हता. मारीच नांवाचा राक्षस होता. रावणानें त्यास त्या रूपानें रामलक्ष्मणास दूर नेण्यासाठीं पाठविलें होतें. सीतेचें हरण करण्याचा त्याचा उद्देश होता.

ईश्वरभक्तिपरायण साधु सर्व देशांत होऊन गेले आहेत. ते सारे असेंच म्हणतात. दुराचरणानें देवास क्रोध येतो. सदाचरणानें देव प्रसन्न होतो. हीच गोष्ट प्रमाण. ( संयुक्त वाक्य )

दुष्टापासून अपकार होतो, हें नेहमींचें आहे ! अशा साधूपासूनही अन्यायाची गोष्ट झाली. हें किती आश्चर्याचें आहे ! ( संयुक्त वाक्य )

**पुढें दिलेल्या पांच पांच वाक्यांचें एकेक वाक्य करा:—**

अनिष्ट गोष्टी वारंवार घडत असतात. त्या शांततेनें सहन कराव्या लागतात. त्यानें आपल्या मनाच्या यातना कमी होतात. त्यानें मनास गांभीर्य येतें. त्यानें आपली मानसिक उन्नति होते.

माझ्या मातापितरांनीं मला एक पत्नी करून दिली. ती मला जन्मभर सोबतीण होती. ती माझ्या अज्ञानदशेंत दिली. त्यांनीं माझ्या आवडीनिवडीची परवा बाळगिली नाहीं. तिच्या संबंधानें अथवा त्यांच्या निवडीसंबंधानें मला कुरकूर करण्यास जागा राहिली नाहीं.

तो प्रामाणिक आहे. तो सच्चा आहे. तो उद्योगी आहे. तो दुर्दैवी आहे. तो अशक्त आहे.

मी पहांटेस उठलों. मीं पाहिलें. माझ्या खोलींतील ट्रंक मला उघडी दिसली. कांहीं दागिने नाहींसे झालेले दिसले. मला पोलिसला वर्दी द्यावयाची आहे.

खालील सहा सहा वाक्यांचें एकेक वाक्य करा.(केवल,मिश्र अथवा संयुक्त)

पांडवांचा अज्ञातवास संपला. त्यांनीं कृष्णास शिष्ट केलें. त्याला हास्तिना-पुरास पाठविलें. राज्याचा हिस्सा आपणांस मिळावा. दुर्योधनाशीं आपला सलोखा व्हावा. हा त्यांचा उद्देश होता.

सावित्रीनें सत्यवानास वरिलें. सत्यवान् अल्पायुषी होता. यम स्वतः त्याचे प्राण घेऊन चालिला. सावित्रीनें त्याला भाषणानें संतुष्ट केलें. त्याच्या-पासून तिनें तीन वर मिळविले. शेवटीं सत्यवानाचा प्राणही तिनें परत आणला.

मोरोपंताला लहानपणापासून कविता करण्याचा नाद असे. त्यानें पुष्कळ कविता केली. कांहीं संस्कृत. बाकी सर्व प्राकृत. त्याच्या आर्या फार आहेत. श्लोक फार थोडे आहेत. त्यानें कांहीं साक्या व कांहीं पदें केलीं आहेत.

कृष्णाचा सखा सुदामा त्याच्या भेटीकरतां द्वारकेंत गेला. तो अत्यंत दरिद्री ब्राह्मण होता. त्यानें गरिबीमुळें नुसते पोहे त्याला देण्यासाठीं घेतले. श्रीकृष्णानें ते मोठ्या आदरानें स्वीकारले. सुदाम्याला सोन्याची नगरी दिली. हें ह्या आख्यानांत सांगितलें आहे.

द्रोणाचार्यांचें आणि पांडवांचें युद्ध झालें. चक्रव्यूह द्रोणानें रचिला. त्या व्यूहाचा भेद करण्याकरतां अर्जुनाचा मुलगा अभिमन्यु हा झटत होता. त्यानें पुष्कळ पराक्रम केला. दुःशासनाच्या मुलानें त्याच्या मस्तकावर गदा घातली. तो त्यावेळीं सावध नव्हता.

एकनाथ मोठा परोपकारी होता. त्याचें आचरण फार पवित्र असे, दया, शांति, क्षमा, हे लोकोत्तर गुण त्याच्या ठायीं होते. पितरांच्या उद्देशानें त्यानें अन्न तयार केलें होतें. तें त्यानें अंत्यजास दिलें. हें कृत्य त्याच्या अंतः-करणांतील प्रेमभाव दाखवितें.

एकेवेळीं रामजोशी सरदार घोरपडे यांच्या घरीं कथा करीत होते. घोरपडे ह्यांचे कारकून विचारांत पडले. रामजोशांच्या बिदागीबद्दल त्यांचा विचार चालला होता. त्यांच्यांत कुजबुज सुरू झाली. ती जोशीबोवांच्या कानावर आली. त्यांनीं तत्काळ एक आर्या केली.

उत्तानपाद राजास दोन बायका होत्या. थोरलीचें नांव सुनीति आणि धाकटीचें नांव सुरुचि होतें. सुरुचि राजास फार प्रिय होती. थोरलीचा मुलगा ध्रुव एकदा बापाच्या मांडीवर जाऊन बसला. तें धाकटीस सहन झालें नाहीं. तिनें त्यास पायानें मांडीवरून खालीं लोटलें.

ईश्वराची भक्ति मनानें करावी. मनाचें अर्पण करावें. नुसत्या द्रव्याचें अर्पण करूं नये. त्यानें देव प्रसन्न होत नाहीं. अशीं महंतांचीं वाक्यें आहेत. त्यांचा लोक अगदीं विचार करीत नाहींत. ( मिश्र संयुक्त )

गौतम बुद्धानें आपल्या भार्येचा त्याग केला. त्यानें आपल्या मुलाचा त्याग केला. ती भार्या तरुण आणि सुशील होती. मूल अत्यंत गोजिरवाणें होतें. त्यानें राज्यवैभवाचा त्याग केला. त्यानें आमरण भिक्षाव्रत स्वीकारलें. त्यानें नवा धर्म प्रचलित केला. त्याचा हेतु लोकांचें कल्याण करणें हा होता. ( एक संयुक्त वाक्य करा ).

१. दोन मांजरांनीं संगनमतानें एक लोण्याचा गोळा लांबविला. त्याचे दोन भाग बरोबर करण्याबद्दल त्यांचें एकमत होईना. योग्य निवाडा मिळण्यासाठीं एका माकडाकडे जाण्याचें त्यांनीं ठरविलें. त्याप्रमाणें ते माकडाकडे गेले. ( दोन वाक्यें करा ).

२. सर्व पुरावा ऐकल्यानंतर निवाडा करण्याचें माकडानें कबूल केलें. माकडानें त्या दोघां मांजरांस आपणांसमोर जबाबास बोलाविलें. त्यानें एक ताजवा आणविला. त्यानें एका तागड्यांत एक भाग आणि दुसऱ्यांत दुसरा भाग ठेविला. त्यानें दोन्ही भाग वजन केले. ( दोन वाक्यें करा ).

३. दोन्ही भाग सारख्या वजनाचे आणि सारख्या आकाराचे करण्याचें त्यानें ठरविलें. जास्त वजनाच्या भागांतील तुकडा तोडून वजन कमी करण्याचें त्यानें सारखें चालविलें. अशा रीतीनें कमी करतां करतां दोन्ही भाग संपून गेले. एवढ्यासाठीं मध्यस्थाकडे कधीं धांव घेऊं नये.

खालील गोष्टींत वाक्यें तुटक आहेत. तीं योग्य तऱ्हेनें जोडून सुंदर वाक्यांत गोष्ट पुनः लिहा.

एके दिवशीं कडक उन्ह पडलें. एक कावळा तहानेनें व्याकूळ झाला. त्याला पाणी कोठेंही दिसेना. तो ह्या झाडावरून त्या झाडावर सारखा हिंडूं लागला.

शेवटीं तो एका बागेत आला. त्याला तेथें एक भांडें दिसलें. तें भांडें पाण्यानें भरलेलें होतें. त्याबरोबर त्याला फार आनंद झाला. परंतु पाणी भांड्याच्या तळाशीं होतें. तें त्याला पितां येईना. त्यानें तें भांडें ढकलण्याचा खूप प्रयत्न केला. भांडें त्याला हलेना. तें फार जड होतें. तो हताश होऊन बसला. थोड्याच वेळांत त्याच्या डोक्यांत एक विचार आला. तो आनंदून गेला. त्यानें आपल्या चोंचीनें लहान लहान खडे आणिले. ते त्या भांड्यांत टाकले. पाणी हळु हळू वर चढलें. कांठापर्यंत आलें. तो पाणी प्याला. त्याचें समाधान झालें.

---

पाठ २

## लेखनखंड (पॅरिग्राफ)—विचार

**व्याख्या**—पॅरिग्राफ म्हणजे वाक्यांचा समूह. वाक्याचे घटक जसे शब्द तसे पॅरिग्राफचे घटक वाक्यें होत.

**जरूरी**—वाचणारांची लवकर समजूत पडावी म्हणून निबंधांतील विषयाची मुद्द्यांप्रमाणें विभागणी करावी लागते. पॅरिग्राफमध्यें एकच मुद्दा असावा. जास्त असूं नयेत. व त्या मुद्द्यासंबंधीं किती मजकूर घातला तर कंटाळवाणें होणार नाहीं हें पहावें. पॅरिग्राफमध्यें लिहिलेलें मुद्द्या-संबंधीं विवेचन सहजगत्या बुद्धीच्या आटोक्यांत यावें इतकी त्याची लांबी असावी.

**वाक्यक्रम**—केवळ एकापुढें एक वाक्य ठेवून पॅरिग्राफ तयार होत नाहीं. त्या वाक्यांत एक कोणता तरी क्रम पाहिजे. प्रत्येक गोष्टींत कार्य-कारण संबंध असतो. तद्वत् विचारांत एकापासून दुसरा, दुसऱ्यापासून तिसरा असा क्रम साधावा व त्याप्रमाणें वाक्यें घालावीं. किंवा ज्या कालाप्रमाणें व स्थलाप्रमाणें क्रिया घडल्या असतील त्या क्रमानें पॅरिग्राफमध्यें त्यांचा उल्लेख यावा. किंवा अगोदर सामान्य नियम घालून त्यावर दृष्टांत द्यावे. किंवा उलट अगोदर दृष्टांत देऊन त्यांपासून सामान्य सिद्धांत द्यावा.

**पॅरिग्राफचें पहिलें वाक्य:**—पॅरिग्राफच्या पहिल्या वाक्यासंबंधीं विशेष काळजी घ्यावी. त्यांत.—

( १ ) व्याख्या द्यावी. उदा०—इतिहास म्हणजे काय—
( इति + ह + आस=असें झालें. )

( २ ) सामान्य सिद्धांताला पोषक असा दृष्टांत असावा—
उदा०—सेव्हिंग बँकवरील निबंधांत मुंगीच्या संग्रहीपणाचें उदाहरण द्यावें.

( ३ ) किंवा सामान्य स्वरूपाचें विधान करावें—
उदा०—पोषाखावरील निबंधांत "पोषाखानें सौंदर्य वाढतें" हें वाक्य द्यावें व खालीं त्याचें स्पष्टीकरण करावें.

**बाह्य संबंध**—पहिला पॅरिग्राफ तयार झाल्यावर पुढें त्या त्या मुद्द्या-प्रमाणें निरनिराळे पॅरिग्राफ करावे, आणि ते एकमेकांशीं योग्य रीतीनें जोडावे. प्रत्येक पॅरिग्राफ स्वतंत्र असावा हें जरी खरें असलें तरी तो सर्व निबंधाचा एक घटक आहे हें विसरतां कामा नये. सर्व निबंधांत तो कसा दिसेल हें पहावें. पॅरिग्राफचा निबंधाशीं योग्य संबंध जोडण्याचे दोन उपाय खालीं दिले आहेत.

( १ ) जें विवेचन करावयाचें त्याची रूपरेखा अगोदर पुढें मांडून ठेवावी. त्यांत आलेले मुद्दे एकेक पॅरिग्राफमध्यें घालावे.

( २ ) मुद्दयांचा आराखडा तयार झाल्यानंतर प्रत्येक मुद्दयाचें स्थान ठरवावें. एका पॅरिग्राफमधून दुसरा निघावा. एक संपतो तोंच शेवटीं असें एकादें सूचक वाक्य घालावें कीं त्याच्या योगानें पुढील पॅरिग्राफसंबंधीं कल्पना यावी.

**शेवट:**—शेवटीं एक सारांशाचा पॅरिग्राफ जोडावा. त्यामध्यें नवीन मुद्दा असूं नये. ज्या ज्या मुद्दयांचें विवेचन झालें असेल त्यांचा फक्त गोषवारा द्यावा.

**पॅरिग्राफसंबंधीं सूचना:—**

१. पॅरिग्राफमध्यें विचारांचें ऐक्य साधावें. तें साधण्याचे प्रकार:-

( अ ) एकापेक्षां जास्त मुद्दे एका पॅरिग्राफमध्यें घालूं नयेत.

( ब ) उलट एकच मुद्दा अनेक पॅरिग्राफमध्यें घालूं नये.

( क ) असंबद्ध माहिती घालूं नये.

**२. पॅरिग्राफमधील वाक्यें** परस्पर जोडण्याचे मार्ग:—

(अ) ज्या स्वरूपाचें वाक्य असेल त्या स्वरूपाचें उभयान्वयी अव्यय घालावें. उदाहरणार्थ:—म्हणून, अतएव, ज्यापक्षीं, ज्याअर्थीं, जेणेंकरून, यद्यपि, जर इत्यादि.

(ब) पुनरुक्ति करून संबंध दाखवावा. ही पुनरुक्ति निरनिराळ्या प्रकारची असावी. वरचेवर वाचकांना आपण काय लिहितों ह्याची आठवण द्यावी. संबंध त्यांचे समोर ठेवावा.

(क) मुद्दयाचा उल्लेख प्रथम यावा व नंतर त्याचें विवरण, उदाहरण एकापुढें एक देऊन विस्तार करावा.

नमुन्यासाठीं कांहीं पॅरिग्राफ खालीं लिहून दाखविले आहेत. त्यांशिवाय कल्पनासंकोच ह्या पाठांत कांहीं प्रसिद्ध लेखकांचे पॅरिग्राफ दिले आहेत ते उदाहरणादाखल पहावे.

**१. गहूं**

आपल्या इकडील लोकांचें तांदूळ किंवा ज्वारी हें जसें मुख्य धान्य-रोजचें अन्न आहे, तसें तिकडील पाश्चात्य राष्ट्रांचें मुख्य धान्य गहूं हें आहे. गहूं हा त्या लोकांचा धान्यांचा राजा आहे. आपल्या इकडेही कांहीं श्रीमंत लोक गहूं खातात; नाहीं असें नाहीं. गव्हास साधारणपणें थंड हवा लागते. दमसर जमीन गव्हाला चालत नाहीं. फार पाऊस तर गव्हाचा शत्रू म्हटला तरी चालेल. पावसाळ्यानंतर हें पीक पेरतात व हिंवाळ्यानंतर काढून घेतात. पीक काढल्यानंतर कांडून त्याचें धान्य एकीकडे व भुसा एकीकडे करतात. भुसा फारसा उपयोगी पडत नाहीं. कांहीं जिनसा भरण्याचे कामीं भुसा उपयोगी पडतो. धान्य मात्र दळून त्याच्या पिठाची पोळी करतात. इतर धान्यांपेक्षा गव्हांत सत्त्व जास्त असतें. रशिया, अमेरिका, पंजाब वगैरे प्रांतांत गहूं बराच पिकतो.

**२. गाडीच्या वेळीं स्टेशनवरील देखावा**

गाडी स्टेशनवर येण्याचे वेळीं स्टेशनवर लोकांचा किती गोंधळ उडून जातो. उतारू लोक तिकिटें काढण्याकरितां सारखें एकमेकांपुढें जाण्याची खटपट करतात. तिकिटें देणारा मनुष्य तर एकटाच. ज्या खिडकींतून तिकिटें घ्यावयाचीं ती खिडकीही अगदीं लहान असते. त्यांतून पैसे देऊन तिकिटें घेऊन बाकीचे पैसे बरोबर परत मिळाले म्हणजे प्रत्येकास धन्यता वाटते. कारण प्रत्येकजण अगोदर तिकीट मिळविण्याच्या इच्छेनें दुसऱ्यास रेटीत असतो. कोणाचे पैसे पडतात तर कोणाचीं तिकिटें नाहींशीं होतात. तर कोणाचें डोक्याचें खालीं पडतें. तिकीट मिळाल्याबरोबर आपआपलें सामान घेऊन मुलें माणसें बरोबर घेऊन जो तो धक्याकडे धांव घेतो. मास्तर, पोर्टर, हमाल, उतारू ह्या सर्वांची एकच गडबड उडून जाते. गाडी कांहीं तरी थोडा वेळ थांबत असल्यामुळें जो तो आपलें काम झटपट करण्याच्या घाईंत असतो. सामान टाकून माणसें बसलीं म्हणजे जिवांत जीव येतो. चढणाऱ्या व उतरणाऱ्यांची एकच धांदल उडते. निरोप देण्यासाठीं जे लोक येतात त्यांना विषण्ण मनानें परत जावें लागतें. गाडी एकदांची गेल्यानंतर स्टेशनवर फार शांतता असते.

## ३. शिवाजीची आग्र्याहून सुटका

शिवाजीचा सारखा अव्याहत व अखंड रीतीनें चाललेला अभ्युदय सहन न होऊन औरंगजेबानें त्याचा कायमचा बीमोड करण्याच्या उद्देशानें जयसिंग व दिलीरखान यांना बरोबर मोठें सैन्य देऊन पाठविलें. मोंगल सैन्याच्या ह्या अफाट समुद्रापुढें आपल्या मावळी बारगिरांचा कांहीं टिकाव लागणार नाहीं हें जाणून मुकाट्यानें मोंगलांच्या हवालीं होणें हाच शहाणपणाचा मार्ग हें शिवाजीनें पूर्णपणें ओळखलें, व जयसिंगाच्या वचनावर भिस्त ठेवून तो मोंगलांच्या स्वाधीन झाला. स्वाधीन होतांना मात्र एक दोन अटी घालण्यांत आल्या होत्या. एक अट जिंकलेल्या प्रदेशापैकीं कांहीं भाग त्याच्या ताब्यांत ठेवणें ही व दुसरी अट त्याला मोंगल सैन्यांत सेनापतीचा मोठा हुद्दा देणें ही होय. परंतु तो दिल्लीस जातो तों त्याचा बादशहानें मोठा अपमान करून त्याला कैदेंत टाकिलें. कैदेंत असतांना आपण आजारी असल्याचा बहाणा करून त्यानें आपला वाडा सोडून जाण्याचें बंद केलें. त्या वाड्यावर मोंगल शिपायांचा कडक पहारा होता. परंतु कांहीं लोकांनीं शिवाजीस एका पेटाऱ्यांत सुरक्षित बसवून त्यांत मेवामिठाई आहे अशी पहारेकऱ्यांची समजूत करून देऊन एका ठिकाणीं पळविलें. नंतर आपणास कोणीं ओळखूं नये म्हणून बैराग्याचा वेष घेऊन त्यानें अंगास राख फासिली व अशा रीतीनें सुटका करून घेतली.

## ४. ग्रामोफोन

गेल्या शतकांत जे कांहीं शास्त्रीय शोध लागले त्यांमध्यें ह्या ध्वनियंत्राचा शोध फारच महत्त्वाचा आहे. हा शोध एडिसन नांवाच्या एका अमेरिकन शास्त्रज्ञानें लावला. त्यानें एक मेणाची तबकडी प्रथम तयार केली. ह्या तबकडीवर ध्वनीच्या लाटा आदळल्या म्हणजे तीवर आपला ठसा उठवीत. हे त्या तबकडीवरील ठसे दुसऱ्या एका कठीण अशा द्रव्यावर उठविण्याची युक्ति त्यानें शोधून काढिली. त्यावरून एक अणकुचीदार अशी सुई फिरवून घर्षण उत्पन्न केलें म्हणजे ज्या मूळ ध्वनींच्या लाटांनीं त्यावर आपला ठसा उठवलेला असतो त्या ध्वनीचा बरोबर प्रतिध्वनी निघतो. अशा तऱ्हेनें हजारों मैल दूर असलेल्या व कित्येक वर्षांनीं दूर असलेल्या गवयाचें गाणें आपणास ह्या यंत्राच्या साहाय्यानें ऐकतां येतें.

## ५. विमानें

पक्ष्यांची हवेंत उडण्याची शक्ति पाहून मनुष्यास विमानें तयार करण्याची युक्ति सुचली असावी. चेंडूसारखी वाटोळी एक पिशवी करून तिच्यांत गॅस भरतात. गॅस हलका असल्यामुळें ती पिशवी हवेंत वाऱ्याच्या झोतासरशीं बरीच उंच जाऊं शकते. विमानाच्या प्रथम प्रथमच्या स्थितींत वाऱ्याच्या एका विशिष्ट दिशेवरच लोकांना अवलंबून रहावें लागत असे. विमानांना आपल्या इच्छेप्रमाणें विशिष्ट दिशा देतां येत नसे. विमान वर चढवावयाचें असेल तर आंत बरोबर घेतलेल्या वाळूच्या पिशव्या हळू हळु खालीं फेंकून द्याव्या लागत. विमान खालीं न्यावयाचें झालें म्हणजे तार ओढून खालील एक छिद्र खुलें ठेऊन आंतील गॅस थोडा थोडा कमी करीत असत. परंतु हल्लीं विमानविद्येंत फार सुधारणा झाली आहे. गलबतांना ज्याप्रमाणें वाटेल तिकडे वळविण्यासाठीं एक सुकाणूं असतें तसें विमानास एक सुकाणूं असतें. हें सुकाणूं पंख्यासारखें असून विजेच्या साहाय्यानें चालतें. व आपणांस वाटेल ती दिशा विमानास देतां येते. आतां हें खरें कीं वारा जर फार तुफान असला तर ह्या सुकाणूंचेंही कांहीं चालत नाहीं.

## ६. घड्याळें

काळ मोजण्याचें मुख्य साधन घड्याळ हें आहे. पूर्वी सूर्याच्या प्रकाशामुळें पडणाऱ्या सावलीच्या हालचालींवरून काळ किती झाला हें सांगत असत. त्यानंतर वाळूचें घड्याळ शोधून काढलें. त्यामध्यें एकावर एक दोन अशीं कांचेचीं लहान दालनें असून त्यांपैकीं एकांत वाळू असते त्यांतून वाळू हळू हळू खालीं दालनांत जाते. सर्व वाळू खालच्या दालनांत गेली म्हणजे एक तास होतो. नंतर तें यंत्र पुन्हा उपडें ठेवावयाचें. आपल्या इकडे वेळ मोजण्याचें घटियंत्र असे. त्यामध्यें एका वाटीसारख्या लहान भांड्याला खालून छिद्र असतें. तें भांडें नंतर पाण्यानें भरलेल्या गंगाळांत ठेवतात. त्या छिद्रांतून पाणी येऊन तें पात्र भरलें म्हणजे एक घटिका झाली असें समजतात. सध्यां जीं घड्याळें शोधून काढिलीं आहेत त्यामध्यें एक तार असते. तिला स्प्रिंग असें म्हणतात. ती स्प्रिंग प्रथम गुंडाळून ठेवतात. ती सुटून पुन्हा पूर्ववत् येईपर्यंत एक दिवस होतो. लहान घड्याळास रोज किल्ली द्यावी लागते. मोठ्या घड्याळास आठ दिवसांनीं किल्ली देतात. घड्याळाच्या किंमतीहि हल्लीं फारशा नाहींत. तीं अल्प किंमतींत मिळूं शकतात. घड्याळानें वक्तशीरपणा अंगीं येतो.

## ७. अकबर-धार्मिक पुरुष या नात्यानें

अकबर बादशहा जरी धर्मानें मुसलमान होता व जरी त्याचें शिक्षण मुसलमानी धर्माप्रमाणें झालें होतें, तरी इतर धर्मांच्या दृष्टीनें त्याच्यामध्यें बरीच सहिष्णुता वसत होती. प्रत्येक धर्मांत चांगलीं तत्त्वें आहेत हा सिद्धांत तो मानीत असे. ज्याची परमेश्वराचे ठिकाणीं खरी प्रेमबुद्धि आहे त्यास परमेश्वर सर्वत्र आढळेल ह्याविषयीं तर त्याची ठाम निष्ठा होती. त्याची धर्मबुद्धि किती उच्च दर्जाची होती हें त्याच्या नाण्यांवरील पुढील लेखावरून कळण्यासारखें आहे. " पुण्यकृत्य करणें हाच परमेश्वरास संतुष्ट करण्याचा मार्ग होय. सरळ मार्गानें जाणाऱ्या कोणाही मनुष्याचा नाश झालेला मीं पाहिला नाहीं. " अशा उच्च धार्मिक वृत्तीच्या बादशहाच्या दरबारीं शिया, सुन्नी, ब्राह्मण, पारशी, ख्रिस्ती, यहुदी असे भिन्न भिन्न धर्मांचे लोक सनातन स्वरूपाच्या धर्मतत्त्वांवर वादविवाद करीत. खुद्द बादशहाहि पण त्या सनातन तत्त्वांचें मनन करीत असे. व ह्या मननाचाच परिणाम म्हणजे त्यानें स्थापिलेला 'दिन-इ-इलाइ' नांवाचा धर्म होय.

## ८. एक प्रसादयुक्त पॅरिग्राफ

ज्या लढाईचें वर्णन पुढल्या चौकांत गोंधळी एकतारीवर गात असेल, अंगेजणीनें चढाई करून चढविलेल्या हल्ल्याचें वर्णन शाहीर अंगणांत म्हणत असेल, त्या लढाईंत माझा भाऊ होता, ही कल्पना कोणत्या बहिणीस मोहून टाकणार नाहीं ! त्या स्वारींत माझा बाप होता हा अभिमान कोणत्या मुलाला वाटणार नाहीं ! त्याच लढाईंतील लुटींत आणिलेल्या मोत्यांचा कंठा आज माझ्या गळ्यांत आहे, तेथेंच मिळालेल्या बक्षिशींतील तरवार माझ्या समोर खुंटीवर ठेवलेली आहे, हें मनांत येतांच कोणती बायको द्रव्यलोभ पार विसरून जाऊन अंगावरचा शालू माडीवरून त्या शाहीराच्या अंगावर फेंकणार नाहीं ! आणि हें पाहून गळ्यांतील शेरभर सोन्याचा गोफ कोणता धनी त्या शाहीराच्या गळ्यांत घालणार नाहीं !

( भावे—महाराष्ट्रसारस्वत )

## अभ्यास

१. खालील निबंधांतील प्रत्येक मुद्दा एकेक पॅरिग्राफमध्यें लिहा:—

(१) लोखंड:—धातु—कोठें सांपडतें—शुद्ध अशुद्ध—शोधण्याचा प्रकार—उपयोग—वर्तमान कालांत महत्त्व.

(२) सोनें:—धातु—सापडण्याचीं स्थळें—शोधण्याचा प्रकार—जातीप्रकार—उपयोग—महत्त्व.

(३) भात:—मनुष्याच्या उपजीविकेचें मुख्य धान्य—उपकारी हवामान, जाती, प्रकार—बंगाल, ब्रह्मदेश, कोंकण—पीक, उत्पन्न करण्याची तऱ्हा—उपयोग.

२. खालील प्रसंगांवर एकेक पॅरिग्राफ लिहा:—

(१) गलबत बंदरांत आल्यावर लोकांचा उडालेला गोंधळ. (२) आगीचें वर्णन. (३) दसऱ्याचें सीमोल्लंघन.

३. (१) ससा व कासव ह्या गोष्टीवरचे मुद्दे काढून त्यांवर एकेक रकाना लिहा.

(२) एका गोष्टीचा आराखडा खालीलप्रमाणें आहे. त्याचा रकान्यांत विस्तार करा.

१. एक मुलगा गलबत फुटून ओसाड बेटावर लागतो. २. तेथें तो मांसावर राहतो. ३. येणाऱ्या जाणाऱ्या गलबतांना तो खुणा करतो.

४. पुढें दिलेल्या म्हणींवर अर्थविस्तारक एकेक पॅरिग्राफ लिहा:—

तापल्या तव्यावर भाजणें. दृष्टीबाहेर तें मनाबाहेर. आपत्कालीं जो मित्र तो खरा मित्र. दगडापेक्षां वीट मऊ. चुकला पीर मशिदींत. गंगेंत घोडे न्हाले. उथळ पाण्यास खळखळ फार. समानशीले व्यसनेषु सख्यम्.

५. एकेक रकाना लिहा:—शिवाजी—वीर म्हणून, राजकारणी पुरुष म्हणून.

६. पुढें दिलेल्या पदार्थांचें वर्णन एकेक पॅरिग्राफमध्यें लिहा:—

छत्री, रुपाया, बाहुली, चाकू, सुरी, खुर्ची, साखर, लोहचुंबक, फुटबॉल, बॅट, गुलाब.

१५७२९
आ. २०४



आ २०४

७. " जलप्रवास " यावरील निबंधाच्या आरंभींच्या पॅरिग्राफचें वाक्य पुढील प्रमाणें आहे. " आपल्या धर्मग्रंथांमध्यें जलप्रवास निषिद्ध मानला आहे; परंतु सध्यांच्या सुधारणेच्या काळांत त्याच्या निषिद्धतेकडे कोणी विशेषसें लक्ष देत नाहीं." हा पॅरिग्राफ पूर्ण करा. लेखनदीपिका / अत्रे प्र. के.

" जन्मभूमि " वरील निबंधामधील एका पॅरिग्राफचें पहिलें वाक्य पुढील प्रमाणें आहे. " जन्मभूमीमध्यें रहात असतांना नाना प्रकारचीं संकटें जरी आलीं, नाना प्रकारच्या यातना जरी भोगाव्या लागल्या तरी त्या संकटांनीं त्या यातनांनीं न डगमगतां मनुष्याचें तिजविषयींचें प्रेम, अभिमान, भक्ति द्विगुणितच होते. " हा पॅरिग्राफ पूर्ण करा.

' विमान ' वरील निबंधाच्या पहिल्या पॅरिग्राफचें पहिलें वाक्य " प्रवासाच्या साधनांत झालेल्या उत्क्रांतीकडे जर पाहिलें तर मानवी बुद्धीच्या अचाट सामर्थ्याबद्दल अचंबा वाटल्यावाचून रहाणार नाहीं. " असें आहे. तो पॅरा पूर्ण करा.

" कुत्र्याचा इमानीपणा " ह्यावरील निबंधाचें पहिलें वाक्य " मांजर दुष्ट म्हणून घरांत पाळूं नये असें नाहीं " असें आहे—ह्या पुढील वाक्यें लिहून पॅरिग्राफ पूर्ण करा.

आ २०४

८. वसंत ऋतूंतील सकाळ व संध्याकाळ ह्यांची गुणदोष—तुलना एका पॅरिग्राफांत करा.

काव्याच्या निरनिराळ्या व्याख्या खालीं दिल्या आहेत. प्रत्येकीवर एक एक रकाना लिहा.

आ २०४

( १ ) छन्दोबद्ध पद्यरचना म्हणजे कविता. ( २ ) ज्या पद्यांत यमक, प्रास पुष्कळ असतात ती कविता. ( ३ ) रस ज्या वाक्यांत असतात तें वाक्य काव्य. ( ४ ) जें वाचून अथवा ऐकून मन प्रसन्न होतें तें खरें काव्य.

११९
३०४

## पाठ ३

# कल्पना–विस्तार

पॅरिग्राफरचनेचा आणखी एक प्रकार ह्या पाठांत सांगितला आहे. पॅरिग्राफमध्यें आपण एका मुद्दयाचा विस्तार करतों. तो मुद्दा व त्याच्या अंगभूत व त्याला पोषक असणारी माहिती आपण त्या पॅरिग्राफमध्यें घालतों. तो पॅरिग्राफ म्हणजे त्या मुद्दयाचा विस्तार असतो. त्याचप्रमाणें एका वाक्यांत जर एकादी सुंदर कल्पना अथवा एकादा सुंदर विचार असला, तर त्याचाही विस्तार करतांना पॅरिग्राफच्या बाबतींत ज्या सूचना केल्या आहेत त्या पाळाव्या. विस्तारास उपयोगीं पडणाऱ्या सूचना खालीलप्रमाणें—

१. दिलेलें वाक्य वाचून त्याचा अर्थ पूर्णपणें लक्षांत घ्या. नंतर त्याच्या अर्थाचा विस्तार करा. विस्तार करतांना अवास्तव मजकूर येऊं देऊं नका; व जरूरीचा मजकूर कमी होऊं देऊं नका.

२. अर्थविस्तारक असा एकच पॅरिग्राफ लिहा. तो लिहितांना त्याचा आरंभ, मध्य, शेवट, योग्य साधण्यासंबंधीं दिलेल्या सूचना पाळा. पॅरिग्राफमधील वाक्यें योग्य रीतीनें जोडा.

३. विस्तार जो करावयाचा तो त्या वाक्यावरील एक लहानसा निबंधच असावा. मात्र त्याची मर्यादा एका पॅरिग्राफपुरती असावी.

कल्पनाविस्ताराचीं कांहीं उदाहरणें खालीं देतों.

१. जे कां ज्ञानें लाधले सद्विचारा। संपत्तीचा त्यांपुढें काय तोरा।

जगाच्या व्यवहारांत आपण नेहमीं पाहतों कीं जेथें तेथें संपत्तीला मान मिळतो. द्रव्येण सर्वे वशाः, अशा प्रकारचें सर्वांना वश करून घेण्याचें सामर्थ्य द्रव्यांत आहे. परंतु द्रव्यांत मोठेपणा आहे असें समजण्याची दृष्टि कोणाची?

सर्वांची दृष्टि द्रव्यमय खास नसते. क्षुद्रवृत्ति लोकच द्रव्यासाठीं हपापलेले असतात. ज्यांच्या बुद्धीचा क्षुद्रपणा ज्ञानाच्या योगानें नाहींसा झाला आहे व ज्यांच्या बुद्धीला सद्विचारानें वळण लागलें आहे त्यांच्यापुढें संपत्तीचा तोरा थोडा सुद्धां नसतो. सुविचारी मनुष्य संपत्तीला फारसें महत्त्व देत नाहीं.

२. नाहीं निर्मळ जीवन। काय करील सावण ?।

सावणानें स्वच्छता आणतां येते ही गोष्ट खरी. पण त्याला पाणी स्वच्छ असावें लागतें. पाणीच जेथें दुर्गंधयुक्त, तेथें साबण तरी बिचारा काय करणार? एकाद्याच्या अंगांत पुष्कळ गुण चांगले असतात. त्याचें सामर्थ्य इतकें असतें कीं त्याचा आणि दुसऱ्याचा संपर्क येण्याचा अवकाश कीं त्याच्या सद्वर्तनाचा परिणाम दुसऱ्यावर झाल्याशिवाय रहात नाहीं. पण त्याला एक विशिष्ट प्रकारची परिस्थिति असावी लागते. परिस्थितीच जर उलट तर तो तरी काय करणार ? त्याला संधि प्राप्त करून दिली पाहिजे.

३. " नशिबावर हवाला ठेवणें हें वाईट, उद्योगावर विश्वास ठेवून सतत उद्योग करीत रहावें हें चांगलें."

ज्याला उद्योग करावयाची इच्छा नसते तोच मनुष्य नशिबावर विसंबतो. उद्योगच करावयाचा नाहीं आणि कार्य साधलें नाहीं तर त्याचा दोष नशिबावर टाकावयाचा. त्याला बिचारें नशीब काय करणार ? प्रयत्न जर केला तर अपयश सहसा येत नाहीं. आणि यदाकदाचित् जर आलें तर त्याचा मनुष्याकडे दोष येत नाहीं. आपण प्रयत्न केला येवढें तरी त्यास समाधान असतें. नशिब अगदींच नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. त्याच्यावर विसंबून प्रयत्न सोडणें हें बरें नाहीं. विश्वास नशिबावर न ठेवतां उद्योगावर ठेविला पाहिजे. सतत उद्योग करीत राहणें हेंच यशप्राप्तीचें साधन आहे. उद्योगप्रिय मनुष्याकडे लक्ष्मी आपण होऊन येते. नशिबावर हवाला ठेवून आळसांत काळ कंठणाऱ्या माणसापासून लक्ष्मी पराङ्मुख झाली तर त्यांत काय नवल ?

४. गुरूनें दिलेला मार पित्याच्या लाडापेक्षां जास्त हितकर असतो.

आपल्या मुलांवर आईबापांचें प्रेम असणारच. त्या प्रेमामध्येंच मुलाच्या ज्या इच्छा असतात त्या आईबापांकडून भागविल्या जातात. अशा तऱ्हेनें हळू हळू मुलें हट्टी होत जातात व त्यांचे हट्ट पुरविले जातात. त्यांना शिक्षा करून

मार्गावर आणण्याचें काम एकादाच पिता करूं शकतो. त्या वेळेस तें कडू वाटतें पण परिणामीं त्यापासूनच हित होतें. गुरूला जी मुलास एकाद्या वेळेस शिक्षा करावी लागते ती तो त्याचें वैर म्हणून करीत नाहीं. त्या मुलाचें कल्याण व्हावें, त्याला कांहीं विद्येचे दोन शब्द यावेत व ते त्याच्या पुढील आयुष्यक्रमांत उपयोगीं पडावे ह्या इच्छेनेंच त्याला कधीं कधीं निर्दय बनावें लागतें. आई-बापांच्या लाडापासून बिघडलेलीं मुलें लाखों सांपडतील. सध्यां जे जे विद्येंत पुढें आहेत त्यांना जर विचारलें तर ते असेंच सांगतील कीं योग्य वेळीं आम्हांस शासन करून योग्य मार्ग दाखविला त्यामुळेंच आम्हांला विद्या प्राप्त झाली.

५. वाहत्या गंगेंत हात धुणें.

अनायासें जर एकादें कृत्य होत असेल तर तें करून घेणें, हा ह्या म्हणीचा अर्थ उघड दिसतो. हात धुण्याचें तर काम उरकून घ्यावयाचें आहे, आणि त्याकरितां पाणी आणण्याचे विशेष श्रम तर करावयाचे नाहींत. मग हात धुण्याचें कसें साधावें ? गंगा आयतीच वहात आहे. तिच्या प्रवाहांत शुद्ध, निर्मळ व पवित्र असें पाणी वहात आहे, तर त्याचा फायदा कां न करून घ्या ? आयतीच जर संधी प्राप्त झाली तर तिचा योग्य उपयोग करून घेणें हितावह आहे. श्रम न करतां जर आपणास जरूर ती वस्तु प्राप्त झाली आणि आपलें इष्ट कार्य साध्य झालें तर चांगलेंच; व अशा प्रकारची प्रत्येकाची अपेक्षा असणें अगदीं साहजिक आहे.

## अभ्यास.

खालीं दिलेल्या वाक्यांतील कल्पनांचा विस्तार करा.

१.अति तेथें माती, २.कर्मणो गहना गतिः, ३.द्रव्येण सर्वे वशाः, ४.धर्मस्य त्वरिता गतिः, ५. परोपदेशे पाण्डित्यम् , ६. आकारें रंगती चेष्टा, ७. गरज सरो वैद्य मरो, ८.द्यावें तसें घ्यावें,करावें तसें भोगावें, ९. ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी, १०. जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे, ११. पुराणमित्येव न साधु सर्वम्, १२. पांचा मुखीं परमेश्वर, १३. पिंडीं तें ब्रह्मांडीं, १४. पुढच्यास ठेंच मागला शहाणा, १५. मूर्ति तितक्या प्रकृति, १६. व्याप तितका संताप, १७. साखरेचें खाणार त्याला देव देणार.

वाचनालय, सातारा

१८. स्वतोक पितरां रुचे जरिहि कर्दमीं रांगलें,

१९. चपलपण मनाचें मोडितां मोडवेना,

२०. असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा,

२१. आतां दया ने ऐसी । पूर्ण चंद्रिमा जैसी । निववितां न कडसी । सान थोर,

२२. आशा नाहीं ज्याला । देव कां मारी तयाला,

२३. पीक पीकलें प्रेमाचें । सांठविलें गगन टांचे,

२४. माता कापी गळा । तेथें कोण राखी बाळा,

२५. जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा,

२६. कावळ्याच्या गळा । मुक्ताफळमाळा । तरी काय त्याला । भूषण शोभे,

२७. सुख पाहतां जवा पाडे । दुःख पर्वता येवढें,

२८. बसोनि थिल्लरी । बेडुक सागरा धिक्कारी । नाहीं देखिला ना ठावा । तोंड पिटी करी हावा,

२९. मोलें घातलें रडाया । नाहीं असूं नाहीं माया,

३०. कठिण समय येतां कोण कामास येतो,

३१. लोककल्याणार्थ देह झिजविण्याचें व्रत एकदां स्वीकारलें कीं मनुष्याचें शील अधिकाधिक चोख होऊं लागतें,

३२. निष्कर्मात राहण्यापेक्षां उपयुक्त कर्म करून प्रकाशमान व्हावें हें बरें,

३३. कां न सदन बांधावें कीं त्यांत बिळें पुढें करिल घूस,

३४. मुदलांत सूट घाली ही कोण्या सावकाराची रीत?

# पाठ ४

## कल्पनासंकोच

**सारांश काढणें:**--सारांश काढण्यांत अथवा संक्षेप करण्यांत दोन क्रिया मुख्य असतात. प्रथम दिलेल्या उताऱ्याचें पृथक्करण करून त्यांतील मुद्दे बाहेर काढून लिहून ठेवावे लागतात. नंतर ते मुद्दे आपल्या भाषेंत थोडक्यांत विस्तारावे लागतात.

**सारांश काढण्याचा उद्देशः**—मूळ उताऱ्यांत कल्पना किंवा विचार विस्तारानें मांडलेला असतो. मूळामध्यें भाषा अलंकारिक असते. अप्रासंगिक विचारांचें एक प्रकारचें जाळें माजलेलें असतें व त्यामुळें त्यांतील मुख्य विचार स्पष्टपणें दिसत नाहींत. अप्रासंगिक सर्व बाजूस सारून मुख्य मुद्दे वाचकांचे समोर मांडले म्हणजे त्याला तें बरोबर समजतें.

### सूचना

१. दिलेल्या उताऱ्यांतील मुख्य मुद्दे मांडून ठेवा.

२. ते मुख्य मुद्दे तुम्ही आपल्या भाषेंत थोडक्यांत सांगा.

३. तुमची भाषा अलंकारिक होऊं देऊं नका.

ह्यासंबंधीं कांहीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

१. पृथ्वीच्या पाठीवरील विजिगीषु लोकांनो ! सर्व पृथ्वी पादाक्रांत केल्याची विनाकारण वढाई कां मारतां ? आकाशाला गवसणी घालण्याचा खटाटोप कां करतां ? तुमच्या सामर्थ्याचा विस्तार अफाट आहे हें आह्मांस माहीत आहे. शिकंदरा ! सर्व जग जिंकिल्यावर जिंकावयास जग उरलें नाहीं ह्मणून रडण्यापर्यंत तुझ्या पराक्रमाची मजल गेली ! चेंगिजखान, तैमुरलंग, तुह्मी तर मनमुराद माणसांची कत्तल करून आपल्या विजिगीषुपणाचें समाधान करून घेतलें. नेपोलियनानें सर्व युरोपखंडास भीतीनें थरथर कांपावयास लावलें व आपल्या पराक्रमाची हौस फेडून घेतली. हे शूर पराक्रमी वीरांनो ! तुमच्या पराक्रमाची कीर्ति दिगंत गेली आहे. तरी पण हें तुम्हांस पूर्णपणें ठाऊक असूं द्या

कीं तुमची आणि य:कश्चित् माणसाची अंतिम स्थिति सारखी आहे. यमाचें बोलावणें आलें ह्मणजे सर्व पराक्रम मावळतो. सर्व सोडून जावें लागतें! राव आणि रंक हे दोघेहि मृत्यूस सारखेच! दोघांची गति एकच. दोघेहि कांहीं भेदभाव न ठेवितां मातीप्रत मिळून जातात.

ह्या उताऱ्यांतील मध्यवर्ती कल्पना खालीलप्रमाणें आहेत:—

(१) विजिगीषु लोकांनीं वढाई मारूं नये.

(२) त्यांच्या हयातींत त्यांच्या कीर्तीचा दरारा फार असतो.

(३) मृत्यूस रंक आणि राव सारखेच.

ह्यांचा थोडक्यांत विस्तार असा:—

विजिगीषु लोकांनीं बढाई मारूं नये, कारण त्यांनीं कितीही जिंकलें तरी न जिंकिलेलें असें कांहीं तरी शिल्लक राहणारच. आजपर्यंत शिकंदर, तैमुरलंग वगैरे जे जेते होऊन गेले त्यांचा दरारा त्यांच्या हयातींतच असल्याचें इतिहास सांगतो. त्यांच्या पश्चात् त्यांना कोण विचारतो? मृत्यूस रंक आणि राव सारखेच.

२. शब्द म्हणजे विचाराचें मूर्त प्रतिबिंब आहे. विचार हा जनक आणि शब्द त्याचा पुत्र असें रूपक केलें तर तें विशेष युक्त दिसेल. आत्मा वै पुत्र नामासि, या उक्तीप्रमाणें पुत्र हा पित्याचेंच प्रतिबिंब असतो. इतकेंच नाहीं तर पित्यानें अपूर्ण टाकलेलें काम पुढें चालवून पूर्ण करणें व अशा प्रकारें सातत्य कायम ठेवणें हा आपला धर्म समजून धर्मशील पुत्र जसा आपलें कर्तव्य करीत असतो त्याप्रमाणें शब्दहि त्याला अस्तित्वांत आणणाऱ्या विचाराला व्यक्त करण्याची कामगिरी करूनच थांबत नाहीं तर पुष्कळ वेळां नव्या नव्या विचाराची प्रेरणा करून त्या त्या विचाराचे नवे नवे शब्द बनविण्याची व त्यांना प्रचारांत आणण्याची आवश्यकता उत्पन्न करून ठेवतो. अशा रीतीनें विचाराच्या सातत्याबरोबर शब्दांचेंहि सातत्य चालून दोहोंच्या योगानें भाषेच्या संपन्नतेंत भर पडत जाते. (आपटे—शब्द-रत्नाकर)

ह्यांतील मध्यवर्ती कल्पना:—

(१) शब्द आणि विचार ह्यांचा पितापुत्रांसारखा संबंध.

(२) विचाराची वाढ.

(३) विचारवृद्धि व शब्दवृद्धि ह्यांमध्यें उत्कृष्ट सांगड.

ह्या कल्पनांचा थोडक्यांत विस्तार:—

विचार आणि तदन्वर्थक शब्द ह्यांमध्यें पितापुत्रांचा संबंध आहे. विचार तद्दर्शक शब्दाला जन्म देतो. विचार जसजसे वाढतात तसतसे तदन्वर्थक शब्दहि जास्त तयार होतात व अशा रीतीनें शब्द वाढल्यावर भाषाहि संपन्न झाल्याशिवाय रहात नाहीं.

३. "मनुष्याच्या मागें असंख्य यातना आणि दुःखें लागलीं आहेत. असें मनुष्याचें जीवितसार दुःखमय असून देखील आपण आपला जास्त जास्त दुःखें उकरून काढण्याचा सपाटा कमी करीत नाहीं. ईश्वरानें जशीं कांहीं कमीच दुःखें पैदा केलीं आहेत म्हणून आपण आपल्या बांधवांना छळीत असतों. प्रत्येकाचा त्याचा प्रारब्ध म्हणून दुःखाचा वाटा असतोंच व तो त्याला भोगून काढल्याशिवाय गत्यंतर नसतें. त्यांतच पुन्हा त्याच्या भोंवतालच्या बांधवांचे दोष, क्रोध, ईर्षा, असूया, गैरविश्वास, अन्याय, बेइमानपणा ह्या सर्वांची भर पडते. हें सर्व ओळखून प्रत्येक मनुष्यानें चांगल्या सुजाणतेनें जर इतरांशीं व्यवहार केला, दया कांहीं थोडीशी दाखविली, माणुसकीची जर थोडीशी आठवण ठेविली तर सर्व मानवजातीला सारख्या रीतीनें रगडणारा हा जो दुःखमय जीविताचा वरवंटा, त्याचा निम्मा तरी जोर कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. जीवित सुखमय, आनंदमय करण्याला एकच उपाय आहे आणि तो म्हणजे ज्याला आपण अभिजातपणा, सुस्वभाव अथवा मनौदार्य म्हणूं तो गुण अंगीं बाणून घेणें हा होय."

मुख्य कल्पना:—

(१) मनुष्याचें दुःखमय जीवित.

(२) आपल्या वर्तनानें त्यांत पडणारी भर.

(३) दुःखें कमी करण्याचा उपाय.

विस्तार:—मनुष्याच्या आयुष्यांत त्याच्या मागें असंख्य दुःखें लागलीं असूनहि तो आपल्या वर्तनानें त्यांमध्यें सारखी भर टाकीत असतो. परस्परांबद्दल क्रोध, ईर्षा, असूया वगैरे दोषांमुळें दुःखें जास्त होतात. हे दोष नाहींसे किंवा कमी करून परस्परांबद्दल मनाचें औदार्य दाखविण्यानेंच दुःखें कांहीं कमीं झालीं तर होतील. हाच एक उपाय दिसतो.

[library stamp]

# अभ्यास.

पुढें कांहीं सर्वमान्य लेखकांचे उतारे दिले आहेत. त्यांतील कल्पना संक्षिप्त रूपानें लिहा.

## चित्र व चरित्र

' जगांतील चित्रें आणि चरित्रें हीं पराक्रमाचीं फळें आहेत. कांहीं विलक्षण गुणांच्या योगानें महत्कृत्य केल्यावांचून कोणाचें चित्र किंवा चरित्र उत्पन्न होत नाहीं. त्यांतही क्रम पाहिला तर आधीं चरित्र आणि मग चित्र, असा दृष्टोत्पत्तीस येतो. चरित्र चांगलें असलें म्हणजे त्याचें चित्र सिद्ध करण्याची इच्छा होत असते. देवादिकांचे किंवा माणसांचे जे पुतळे आपण पाहतों, त्या सर्वांचा प्रकार असा झालेला आहे. चित्र हीं हाताची कृति आहे, आणि चरित्र ही मनाची कृति आहे. चित्र ही मूर्तिपूजा आहे, चरित्र ही मानसपूजा आहे. चित्र हें सगुण भक्तीचें साधन आहे तर चरित्र हें निर्गुण भक्तीचें साधन आहे. जगांतील चित्रें नाहींतशीं झालीं तर फारसें कोणाचें अडावयाचें नाहीं, परंतु चरित्रें नाहींतशीं झालीं तर फारच अडेल. म्हणजे चरित्र हें प्रधान आणि चित्र हें गौण आहे. चरित्राच्या योगानें चित्रास मोठेपण येत असतें. नामसुधेंत वामनांनीं म्हटलें आहे: " हरिपण हरिनामें धातुमूर्तीस आलें ". आपण माणसें मूर्तीस नांव ठेविल्यावर म्हणजे तिची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर–तिला भजूं लागतों. ह्याचा अर्थ हा कीं, चित्रास मोठेपण येण्यास चरित्र कारणीभूत होतें. म्हणून चरित्र श्रेष्ठ होय. "

## शहाजीकालीन परिस्थिति

त्याच्या ( शहाजीच्या ) आधीं व त्याच्या कालीं राष्ट्र सुधारण्याचे प्रयत्न करणारे शेख महंमद थोडे थोडके झाले नव्हते. कली मातला, सबब समाजाला दैन्य आलें व तें भोगिल्याखेरीज गत्यंतर नाहीं असें रडगाणें गाऊन स्वस्थ बसणारे ऐदी किती तरी होते. विठोबा सर्व कांहीं योग्य वेळीं सर्व नीट करील, त्याला जनतेची काळजी आहे, असें समाधान करून घेणारे भक्तिमार्गी तर असंख्य होते. यज्ञयागांचा व देवदेवालयांचा जीर्णोद्धार करून धर्मसंरक्षण करण्यांत कित्येकांनीं सर्वस्व खर्चिलें. गोरक्षण करून प्रजेंत जोम उत्पन्न करूं पाहणारे गोरखनाथी देशांत वावरत होते. कथा, कीर्तनें व

रामायणभारतें देशभाषेंत बनवून देशांतील लोकांच्या आंगीं स्फुरण चढवूं पाहाणारे कीर्तनकार व ग्रंथकार तर त्या काळीं शेंकडय़ानें मोजावे लागत. असे नानाप्रकारचे बरेवुरे उपाय जो तो आपापल्यापरी करीतच होता. परंतु असले हे सर्व उपाय तीनशें वर्षें करूनहि शत्रूचें कांहीमात्र कोणी नुकसान करूं शकले नाहींत तेव्हां जो तो समाधान असें करून घेई कीं, बीं रुजत घातलें आहे, तें योग्य वेळीं रुजून त्याला फळें आल्याशिवाय राहाणार नाहींत. ही भविष्यवादी विचारसरणी निरुत्तर करणारी असल्यामुळें व भविष्यकाळाला अंत नसल्यामुळें ह्या आशेची निराशा तीनशें वर्षें निघून गेलीं तरीहि कधींच झाली नाहीं. अशां-तला आशावादी शहाजी नव्हता. —राजवाडे-रा. चंपू, प्रस्ता.

## संसार कीं सोहळा

सोहाळ्यांचें जळमट चिकार पसरल्यामुळें आंत गुरफटलेला धार्मिक संस्कार कोणालाच दिसेनासा झाला आहे. विवाह हा संस्कार आहे हें ज्ञान असणारा जाडा विद्वान् मानला जातो अशी स्थिति येऊन ठेपली आहे. मिरवणुकी व मेजवान्या यांच्या दंगलींत बिचाऱ्या अग्नीची वास्तपुस्त कोण करणार ? " विचित्रा: खलु वासना: । " धर्मप्रवणतेची जागा सुखलोलुपतेनें पटकाविली म्हणजे दुःखांत पर्यवसान होणार हें ठरलेलेंच. म्हणून अनवश्यक आचारांना फांटा देऊन धर्मविधि पाळण्याचा प्रयत्न केला तर त्रिवर्णसाधनाचें यश संपादितां येतें. विवाह म्हणजे काय ह्याचा उद्बोध झाला म्हणजे अवश्यक व आनुषंगिक विधि ह्यांची विभागणी करणें फारसें अवघड नाहीं. वाग्दान, कन्यादान, आणि होम हीं विवाहाचीं मुख्य अंगें होत.

—चाफेकर—गच्चीवरील गप्पा.

मरणाला मारून उरलेले व काळाच्या माथां पाय देऊन जगत्कल्याणाच्या वेच्छेनें या भूलोकीं संचारणारे महात्मे त्यांना जन्म कोठचा ? मुक्त कोटींतले महात्मे जगत्कल्याणाची सूक्ष्म विमल वासना चित्तीं ठेऊन वेळोवेळीं मृत्युलोकीं अवतरतात. व कांहीं सभाग्य जीवांना संगलाभ देऊन ठायींच्या ठायींच विराम पावतात. त्यांच्यावर आम्हीं जन्ममृत्यूचे मिथ्या आरोप करीत असतों. उदया-स्ताचें प्रमाण मानून स्वस्थानीं स्थिर असलेल्या सूर्यावर आम्हीं आकाशगमनाचा आरोप करितों आणि त्यांतहीं आमच्या माजघरांत त्याच्या प्रकाशाचा कवडासा

पडला व तो चढत उतरत नाहींसा झाला, ह्यावरून दिवसाच्या गतीचें मान मोजीत असतो. त्यांतलाच प्रकार रामकृष्णादि भगवदवतारांच्या व तत्तुल्य विभूतींच्या चरित्रांचा होय. त्यांचें अजतें जन्मणें, आक्रियता कर्म करणें व न मरतां मरणें हेंच त्याचें खरें चरित्र होय. —पांगारकर—तु. च.

जुन्या कवींचीं काव्यें उत्कृष्ट उतरण्याचीं कारणें एक तर त्या काळीं कल्पनेचें मोठें प्राबल्य असल्यामुळें तें त्यांच्या कवित्वास फार पोषक झालें. दुसरें, बाह्यसृष्टीचें व अन्तःसृष्टीचें मूळचें शुद्ध स्वरूप त्यांच्या नेहेमीं दृष्टीस पडल्यामुळें त्यांच्या कृत्रिम संस्काररहित शुद्ध मनावर " रंगः शुक्लपटे यथा " या न्यायानें त्यांचा ठसा पूर्णपणें उमटला. तसेंच तिसरेंही कारण अर्थात् हें कीं, त्या कवींच्या मनोवृत्ति व हृदयवृत्ति केवळ स्वानुभूत असल्यामुळें त्यांचा आविर्भाव तसाच यथास्थित व स्पष्ट त्यांच्या ग्रंथांत झाला. पदार्थविज्ञानांत सांगितलेला पाण्याचा धर्म सर्वांस माहिती असेल कीं, तें जितक्या उंचीवर मूळचें असतें तेथपर्यंतच तें चढतें. हाच नियम अन्तःकरणवृत्तींस लागतो. ज्या वृत्ति हृदयासच अगोदर भासल्या नाहींत त्यांचें वाग्द्वारां वर्णनहि अगदीं रसहीन उतरल्यास काय नवल! ज्यानें वियोगदुःख कधीं अनुभविलें नाहीं त्यानें पुत्रशोकादिकांचें वर्णन केल्यास, ज्याचा काळ नेहमीं ऐषआरामांत जाणार, त्यानें युद्धादि प्रसंग वर्णिल्यास, वसंतांतील गार झुळुक घेणारानें समुद्रावरील तुफानाचें वर्णन करूं गेल्यास तें किती उत्कृष्ट उतरेल हें कोणी सांगेल! ज्यानें पर्वताहून मोठा डोंगर पाहिला नाहीं, त्यानें हिमालयाचें वर्णन करूं जाणें, ज्यानें मुळामुठाच काय त्या मोठ्या नद्या पाहिल्या त्यानें गंगायमुनासारख्या महानद्यांच्या वर्णनास हात घालणें म्हणजे भांबुर्ड्यावरून लंडन शहराची कल्पना बांधणें होय! असो. तेव्हां वर्णावयाच्या गोष्टीचा साक्षात् अनुभव कवीस अगदीं अवश्य आहे. —निबंधमाला.

" मराठी भाषा मुमूर्षु अवस्थेपर्यंत येऊन पोहोंचली आहे काय ? " ह्या प्रश्नास उत्तर—

हल्लीं साहित्यपरिषदेमार्फत मराठी भाषेसंबंधानें होणाऱ्या अन्यायांविरुद्ध जी ओरड सुरू आहे ती त्या भाषेस लागलेली शेवटची घरघर आहे काय ? पुण्यासारख्या शहरांत मराठी वाङ्मयाच्या सेवेप्रीत्यर्थ जें अनेक संस्थांचें जाळें

तयार होत आहे तें त्याचा मरूं घातलेल्या मराठीस मृत्युशय्या म्हणून कांबळ्या-सारखा उपयोग व्हावा म्हणूनच कीं काय? मराठी वाङ्मयाच्या अभिवृध्यर्थ जीं अनेक बक्षिसें देण्यांत येतात, त्यांची किंमत अंतकाळीं द्यावयाच्या दाना-इतकीच समजावयाची कीं काय? प्रतिवर्षी अधिकाधिक जोमानें वाहणाऱ्या काव्यगंगेचा उपयोग मराठी भाषेला अखेरचें गंगोदक घालण्याकरतांच व्हाव-याचा आहे काय? गीतारहस्यासारख्या पवित्र ग्रंथाची निर्मिति मुमूर्षु मराठीच्या मुखानें भगवंतांच्या नांवाचा उच्चार व्हावा म्हणूनच कीं काय? सुरस, सरस, भारतगौरव, कुटुंबशिक्षण, विजयसाहित्य या मालांचा उपयोग मराठी भाषेच्या शवावर सन्मानार्थ रचावयाच्या पुष्पमाला इतकाच होणार कीं काय? जे अनेक खंदे लेखक मराठी भाषेस आधार देण्याकरितां उभे आहेत, त्यांच्या खांद्यांचा उपयोग तिच्या शवास वाहून नेण्याकरितांच व्हावयाचा आहे काय? आणि ज्ञानकोशाच्या खंडांचा विनियोग मराठीच्या सरणावर इंधन म्हणून रचण्या-कडेच व्हावयाचा कीं काय? अखेरीस असाही प्रश्न उद्भवतो कीं, राजवाड्यांनीं स्वभाषेच्या अंताबद्दल जें अशुभ भविष्य वर्तविलें तें अचुक भविष्यवादी म्हणून किंवा महाराष्ट्रीयांच्या स्वभाषाभिमानावर सांचलेल्या औदासीन्याचा धुरळा झाडून टाकण्याकरितां ! !

—श्री. कृ. कोल्हटकर–भाषण १२ वें, सा. सं.

मुलें आनंदलीं ह्मणजे त्यांच्या मनांतला भाव गद्यानेंच सांगतांना तीं तें गद्य तालावर ह्मणतात. “हरली-हरली,” “भ्याली भ्याली,” “सु-ऊ-टलो” वगैरे शब्द सुरेल रीतीनें ह्मटलेले मुलांच्या तोंडचे पुष्कळांनीं ऐकिले असतील. आपण डाव जिंकिला आणि उलट पक्ष हरला याचा आनंद आणि हरलेल्या पक्षाला हिणविण्याची इच्छा ह्या दोन मनोविकारांचा येथें प्रकर्ष होतो; आणि तो तालसुरांवर बाहेर पडणाऱ्या या शब्दांनीं व्यक्त होतो. मनोविकारांचा प्रकर्ष आणि तालसूर यांचा संबंध जोडून जोडिलेला नाहीं, आपोआप जोडलेला आहे, स्वाभाविक आहे, आणि सार्वत्रिक आहे. मुलें ह्मणजे बाल्यावस्थेंतील मनुष्यजाती. तेव्हां मनुष्यजातीच्या बाल्यापासून आतांपर्यंत हा संबंध चालत आलेला आहे हें उघड आहे. मनोविकार, मनोभाव, हृदयोद्गार यांचा अपूर्व प्रकर्ष हा जर काव्याचा जीव, तर त्यांशीं मुळापासून संलग्न असलेल्या तालसूर-बद्ध शब्दांचा प्रकर्ष हाच त्याचा देह असला पाहिजे. मुलांच्या साध्या-ऊजु-क्षणभर टिकणाऱ्या मनोभावांचा अनुकूल प्रसंगानें झालेला उन्नत उद्गार हा जर

काव्यविषय, तर त्याची भाषा-शब्दरचना तालसुरांनीं बांधिलेल्या शब्दसंगमाच्या अत्यंत परिपक्व स्वरूपाचीच असली पाहिजे.

—वा. ब. पटवर्धन- काव्य आणि काव्योदर, पान ६५-६६

## ज्ञानाचीं सदावर्तें

जशी वासना तसें फल देणारें ग्रंथाशिवाय दुसरें साधन नाहीं. इतकें असूनही त्यांना जसें वागवून घ्याल तसें वागण्याइतकी लीनता ग्रंथांच्या अंगीं असते हें वेगळेंच. अहर्निश अष्टौप्रहर तुमच्या सेवेला अविश्रांत सादर होणारा ग्रंथाशिवाय दुसरा सेवक तुह्मांला मिळणार नाहीं ! तुम्ही स्नेही या नात्यानें त्यांना जवळ ओढलें तर ते स्नेह्याप्रमाणें गोड वागतील व सर्वस्वीं निस्पृह असाच सल्ला देतील. शिष्य ह्या नात्यानें तुम्ही त्यांचा आदर केला तरी मानवी गुरुप्रमाणें ते तुह्मांस न शिणवितां व न सतावितां विद्या देतील. प्रतिपक्षी ह्या नात्यानें तुम्हीं त्यांशीं वाद आरंभिला तर तुमच्या जड बुद्धीवर आपली कानस घालून ती सतेज करण्यास किंवा युक्तिवादानें तुह्मांस निरुत्तर करून तुमचा गर्वपरिहार करण्यासहि त्यांची तयारी आहेच. तुमचें अज्ञान कितीही ढोबळ असलें तरी ते तुह्मांला हसून खिजविणार नाहींत; किंवा फजीत करून तुमचा पाणउताराहि करणार नाहींत ! प्रत्येक मानवी गुरूंत आपल्या प्रियशिष्यापासूनहि थोडीबहुत विद्या किंवा एकादी तरी गुरुकिल्ली लपवून ठेवण्याची खोड आढळेल, पण ग्रंथांइतका प्रांजल व निष्कपटी गुरु दुसरा मिळणारच नाहीं. तुम्ही त्यांजपासून शिकलां तर ते तुमच्याजवळ गुरुदक्षिणा मागणार नाहींत; तुम्ही त्यांजविषयीं गुणग्राहकता दाखविली नाहीं तर ते रंजीस होणार नाहींत; किंवा त्यांचे गुण शिकूनहि तुम्हीं कृतघ्न बनलां तरी ते एका शब्दानें तुमची कागाळी करणार नाहींत. जगाच्या इतिहासांत आजवर धर्म, नीति व राजकारण ह्या तिहींच्याहि कल्पनांत मतभेद माजलेला आढळून येतो. परंतु सर्व जगाचें मतैक्य एका बाबतींत आहे, व ती बाब म्हटली म्हणजे ग्रंथ, त्यांचें महत्त्व व त्यांचा उपयोग ही होय.

—केळकर—लेखसंग्रह.

पूर्वपश्चिम समुद्रांचें वेष्टण, सह्य, विंध्य व हिमालय अशा पर्वतांच्या रांगा, कृष्णा, नर्मदा, सिंधु, भागीरथी व ब्रह्मपुत्रा अशा नद्यांचे प्रवाह, वसंत-ग्रीष्मादि ऋतूंची अस्खलित परंपरा, सर्व प्रकारच्या धातूंचें, पाषाणांचें व वनस्पतींचें अस्तित्व, प्रचंड अरण्यें, विस्तृत व सपाट मैदानें, शीत, उष्ण व समशीतोष्ण

हवांचे प्रदेश—इत्यादि कारणांनीं कलांच्या उत्पत्तीस व अभिवृद्धीस अत्यंत अनुकूल अशा ह्या भरतखंडांत त्यांचा आरंभ केव्हां झाला आणि हिंदुस्थानचा इतर देशांशीं व्यापार किती वर्षें सुरू आहे याचा निर्णय करणें बऱ्याच अंशीं अशक्य आहे. जितकें मागें जावें तितकें कमीच गेलों असें वाटतें. तात्पर्य, भारतीय कलांच्या उत्पत्तीचा कालनिर्णय कल्पनाबाह्य व शोधातीत आहे असें मानून, ज्या साधनांनीं ही आपली वडिलोपार्जित कमाई आपणांस व इतरांस अत्यंत हितकारक होईल अशांची योजना करावयास लागणें हेंच आपलें आज मितीस मुख्य कर्तव्य आहे, हें ध्यानांत धरणें फार अवश्य आहे. तसें आपण केलें नाहीं तर काळाच्या झपाट्यांतून इतकीं सहस्र वर्षें तगून राहिलेल्या आमच्या कलांचा मागमूस नाहींसा होऊन, आपण अन्नास मोताद होऊं, व अखेरीस त्यांच्याप्रमाणें आमचीहि दशा होईल. हें रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेवून जें करणें असेल तें समंजस व सुशिक्षित लोकांनीं करावें.

—भारतीय कालांचें पुराणत्व,—आगरकर—निबंध.

मूर्तिपूजा तीन प्रकारची आहे. जड वस्तूंची पूजा, वनस्पतींची पूजा, व प्राण्यांची पूजा. नर्मदेंतले दगड, वृंदावनांतील तुळस व गोठ्यांतली गाय या तिन्हींही वस्तु आपल्या देवता होत. या तीन वस्तूंस तीन प्रकारच्या मूर्तींचे प्रतिनिधि मानून त्यांचे तीन वर्ग अथवा गण मानले तरी चालेल. दगडाच्या गणांत किंवा दृषदादिवर्गांत चंद्रसूर्यांपासून मातीच्या पार्थिवापर्यंत पाहिजे त्या जड वस्तूंचा समावेश करण्यास हरकत नाहीं. प्राणिगणांत हवेंत उडणाऱ्या, पृथ्वीवर चालणाऱ्या व पाण्यांत पोहणाऱ्या पाहिजे त्या पक्ष्यांचा, जनावरांच्या अथवा माशांच्या जातीचा अंतर्भाव करतां येईल. वनस्पतिवर्ग तर अमर्यादच आहे. याचा वैद्यशास्त्राशीं संबंध असल्यामुळें प्रत्येक झाडाला देवपण आलें आहे असें म्हटलें तरी चालेल. अशा रीतीनें विकास पावलेल्या त्रिविधात्मक मूर्तिपूजेचा उगम कोठें आहे हें निश्चयानें समजेल तर मोठी मौज वाटणार नाहीं काय ? अर्थात् वाटेल.

—मूर्तिपूजेचा उद्भव—आगरकर.

तात्पर्य, लोकांनीं आपल्याशीं जसें वागावें असें आपणांस वाटतें, तसेंच आपणही दुसऱ्याशीं वागण्यास तयार व्हावयाचें. त्यापासून हित असो वा अहित

असो, त्याविषयीं विचार करीत बसावयाचें नाहीं. खरें बोलण्यापासून नफा होवो, नुकसान होवो; परंतु तसें करणें हें आपलें कर्तव्य होय, म्हणून जसें खरें बोलावयाचें किंवा नीतीनें वागलें असतां तोटा होईल अशी भीति असूनहि जसें नीत्याचरण सोडावयाचें नाहीं, तसेंच कोणतीही गोष्ट असो, त्यापासून न्याय होत आहे, किंवा ती करणें आपलें कर्तव्य आहे, एवढ्या विचारावरच तिच्या मागें लागावयाचें. त्यापासून होणाऱ्या सुखदुःखाची भवति न भवति करीत बसावयाची नाहीं. असा पूर्ण निश्चय करून जर लोक सुधारणेची कास धरतील तर ही सुधारणा पाहिजे व ती नको हा तंटा मिटणार आहे, व सर्वच सुधारणा एकसमयावच्छेदेंकरून होऊं लागतील.

—मूळ पाया चांगला पाहिजे—आगरकर-निबंध.

---

## पाठ ५

# गोष्टीकथन

शब्दजोडणी अथवा वाक्यजोडणी ह्या दृष्टीनें जर पाहिलें तर गोष्ट सांगतां येणें ही लेखनांतील पहिली अवस्था म्हणावयास हरकत नाहीं. कोणत्याहि पदार्थाचें वर्णन करतां येण्याच्या अगोदर लहानशी गोष्ट सांगतां येणें हें लहान मुलांना साधतें व त्यांना तें मनापासून आवडतेंहि.

**गोष्ट सांगण्याची पद्धतः**—गोष्ट सांगतांना सांगण्याची पद्धत ठरविणें जरूर असतें. कारण एकच गोष्ट, तीमध्यें भाग घेतला म्हणून, घटक म्हणून, निरीक्षक, त्रयस्थ म्हणून, अशा निरनिराळ्या रीतींनीं सांगतां येणें शक्य आहे, ह्यांपैकीं आपण कोणती स्वीकारावयाची हें नक्की ठरवावें. गोष्ट सांगतां सांगतां सांगणाऱ्यानें आपल्या मगदुरीप्रमाणें तिजमध्यें फेरबदल केला तरी चालेल. परंतु त्यानें आपली पद्धति मुकर

करावी हें चांगलें. गोष्टीकथनामध्यें कांहीं विशेष पद्धतीनें मुलांनीं जर आपली प्रगति केली तर ती कला लवकर साध्य होते. गोष्टीकथनांतील कांहीं अवस्था खालीं देतों.

**अवस्था**

१. प्रथमावस्था–( १ ) गोष्ट वाचणें अथवा सांगणें.
( २ ) गोष्टींतील मुख्य मुद्दे मांडून ठेवणें. आराखडा देणें.
( ३ ) नंतर तो आराखडा माहिती भरून पूर्ण करणें.

२. द्वितीयावस्था–( १ ) गोष्ट मोठ्यानें एकदां दोनदां वाचणें.
( २ ) नंतर ती आपण स्वतः सांगणें.
( ३ ) कांहीं वेळ गेल्यानंतर ती गोष्ट लिहिणें.

३. तृतीयावस्था–( १ ) दोन गोष्टी वाचणें.
( २ ) त्या दोन गोष्टींचा गोषवारा थोडक्यांत मांडणें.
( ३ ) नंतर त्यांपैकीं कोणतीही एक गोष्ट लिहिणें. ह्यामुळें गोष्टींतील शब्द ध्यानांत ठेवण्याकडे प्रवृत्ति न होतां प्रसंगच जास्त ध्यानांत ठेवण्याकडे प्रवृत्ति होईल.

गोष्टींतील प्रसंगच तेवढे घेऊन नंतर गोष्ट पुरी करावी.

**प्रकारः**–गोष्टींचे मुख्य तीन प्रकार आहेतः (१) पौराणिक, (२) ऐतिहासिक. (३) कल्पित. कल्पित गोष्टींमध्यें इसापनीति, पंचतंत्र, हितोपदेश ह्यांतील गोष्टींचा अंतर्भाव होतो. जेव्हां केवळ गोष्ट सांगावयाची असेल तेव्हां तात्पर्य सांगण्याचा प्रयत्न करूं नये. निबंधांतील विषयाला पोषक म्हणून जर गोष्ट सांगावयाची असेल तर मात्र गोष्टीचें तात्पर्य थोडक्यांत सांगावें.

**गोष्टींचा उपयोगः**—गोष्टींचा उपयोग गोष्टीकथन कला म्हणून आहेच, परंतु त्याशिवाय दुसराहि एक त्यांचा उपयोग आहे. वर्णन-विषयक, चिन्तनविषयक, कल्पनाविषयक किंवा इतर कसलाहि निबंध लिहितांना विषयास उपयोगीं अशा प्रकारचें तत्त्व सांगणारी एकादी तरी गोष्ट असतेच. अशा तत्त्व-प्रतिपादक गोष्टींचा उल्लेख विशेषत चिन्तनविषयक किंवा चर्चात्मक निबंधाच्या आरंभीं केला तर निबंधाला चांगली शोभा येते. मात्र गोष्ट जी सांगावयाची ती थोडक्यांत व चटक-दार भाषेंत सांगावी. उदाहरणार्थ, स्वार्थबुद्धि ह्या विषयावरच्या निबं-धांत गवाणींतील कुत्र्याचा किंवा खोट्या बढाईपासून होणारें नुकसान दाखविण्यासाठीं शेख महंमदाचा थोडक्यांत जर उल्लेख केला तर निबं-धांत गोडी उत्पन्न होईल. अशा इतर निबंधांत उपयोगीं पडणाऱ्या कांहीं गोष्टींची याद पुढें अभ्यासांत दिली आहे. खालीं कांहीं गोष्टींचे मुद्दे देऊन ते विस्तारून दाखविले आहेत.

## तहानलेला कावळा

उन्हाळ्याचे दिवस—बागेंतील पाण्याचें भांडें—कावळ्याचे प्रयत्न—त्याचा युक्ति.

एकदां उन्हाळा फार कडक पडला होता. एक कावळा उन्हामुळें तहानेनें अगदीं व्याकूळ होऊन गेला. इकडे तिकडे तो पुष्कळ हिंडला, परंतु त्याला पाण्याचा थेंबहि कोठें दिसेना. अखेर तो एका बागेकडे गेला आणि सुदैवानें त्याला एक भांडें दिसलें. त्याबरोबर तो हर्षभरित होऊन पाणी मिळालें म्हणून नाचूं लागला. लगेंच डहाळीवरून खालीं येऊन तो त्या भांड्यांत आपली चोंच घालून पिण्याचा प्रयत्न करूं लागला. परंतु चोंच कांहीं पाण्यापर्यंत पोहोंचेना. त्यानें खूप धडपड केली. भांडें ढकलून पाहिलें, परंतु सर्व व्यर्थ. पाणी कांहीं मिळेना. अखेर विचार करून त्यानें एक युक्ति योजली. जवळ लहान लहान दगड पडले होते. ते एक एक आणून त्यानें त्या भांड्यांत टाकले. त्यासरशीं पाणीहि हळुहळू वर चढूं लागलें. थोडक्यांतच भांड्याच्या काठाबरोबर पाणी आलें. अशा रीतीनें पाणी पिऊन त्यानें आपली तहान भागविली.

शक्तीचा जेथें कांहीं उपयोग होत नाहीं तेथें युक्तीच कामाला येते व कामांत चिकाटी दाखविली तर त्यांत यश म्हणून ठरलेलेंच.

## नामी युक्ति

मुलगा आणि दोन नारिंगें—बहिणीस फसवतो—एक व दोन मिळून तीन. त्याचे वडील त्याची युक्ति त्याच्यावरच उलटावितात.

एक होता मुलगा. त्यानें कोठून तरी दोन नारिंगें मिळविलीं आणि तीं घेऊन तो मोठ्या आनंदानें आपल्या बहिणीकडे आला. तिला हांक मारून तो म्हणाला " हें पहा, मजजवळ तीन नारिंगें आहेत. हें एक, आणि हें दुसरें, आणि एक व दोन मिळून तीन होतात हें तुला माहित आहेच."

बहीण:—मला तर दोनच दिसतात. तीन कशीं ?

भाऊ:—बरोबर आहे. तुला दोन दिसतात त्याचें कारण तूं लहान मुलगी आहेस.

बहीण विचारी रडूं लागली. त्यांचे वडील जवळच होते. त्यांनीं त्या बहीण-भावंडाचा संवाद ऐकला. त्यांनीं मुलीची समजूत घातली आणि मुलाला विचारलें " काय म्हणतोस ? नारिंगें तीन आहेत. खरेंच तीन आहेत.

" हें पहा, पहिलें नारिंग मी घेतों आणि हें दुसरें नारिंग ही तुझी विचारी बहीण रडते आहे तिला देतों, आणि ह्या तुझ्या शहाणपणाबद्दल तूं तिसरें नारिंग घे म्हणजे झालें ! "

## आधाशीपणा

मुलगा आणि बोरें—एक लहान भांडें—सर्व बोरें घेण्याचा प्रयत्न—त्याचा हात भांड्यांत अडकतो.

एक होता मुलगा. तो मोठा आधाशी होता. कोणताहि जिन्नस पाहिला कीं तो एकदम घेण्यासाठीं तो हपापलेला असे. एकदां त्याच्या घरांत त्याच्या वडिलांनीं बोरें आणिलीं आणि एका भांड्यांत ठेविलीं. त्या भांड्याचें तोंड लहान होतें. तीं बोरें त्या मुलाच्या नजरेसमोर पडल्याबरोबर नेहमींप्रमाणें त्यानें तीं एकदम घेण्यासाठीं आपला हात त्या भांड्यांत घातला. जातांना हात आंत गेला. परंतु बोरें घेऊन तो हात कांहीं भांड्याच्या बाहेर निघेना. त्यानें पुष्कळ प्रयत्न केला. वांकडातिकडा केला, हात म्हणून निघेना. तेव्हां तो रडूं

लागला. तें त्याच्या वडिलांच्या कानावर गेल्यावर ते तेथें आले आणि त्यांनीं मोठ्या कष्टानें त्याचा हात भांड्याच्या बाहेर कसा तरी काढून घेतला; नंतर ते मुलाला ह्मणाले, " सर्व बोरें एकदम घेण्याच्या ऐवजीं जर एक एक बोर काढून घेतास तर तुझा हात अडकता ना व तुला इतका त्रासहि होता ना."

## आंधळा व लंगडा

दोन भिकारी–एक आंधळा, दुसरा लंगडा–परस्परांस साहाय्य–एक दुसऱ्यास डोक्यावर घेतो–आणि दुसरा वाट सांगतो.

दोन भिकारी होते. ते दोघेहि आपआपल्यापरीनें व्यंगी असल्यामुळें त्यांना नीटशी भिक्षा मिळत नसे. त्यांपैकीं एक आंधळा असल्यामुळें त्याला रस्ता दिसत नसे व दुसरा लंगडा असल्यामुळें त्याला चालतां येत नसे. दोघेही उपाशी मरूं लागले. तेव्हां त्यांनीं एक तोड काढली. आंधळ्याचे पाय शाबूत होते व लंगड्याची दृष्टि शाबूत होती. तेव्हां त्यांनीं आपआपसांत असें ठरविलें कीं, आंधळ्यानें लंगड्याला खांद्यावर घ्यावें व लंगड्यानें वाट सांगावी. अशा रीतीनें त्यांनीं परस्परांस साहाय्य करण्याचें ठरविल्यानें त्यांचा दोघांचाहि उपासमार वांचला.

## गजेंद्रमोक्ष

" त्रिकूट नांवाच्या पर्वताच्या खालच्या बाजूला असलेल्या सरोवरांत एक गजेंद्र पाणी पिण्यासाठीं उतरला. पाणी पिऊन तो बाहेर येणार इतक्यांत त्याच्या पायाला सरोवरांतील सुसरीनें मिठी मारिली. गजेन्द्रानें सुसरीची मिठी सोडविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. शेवटीं त्यानें श्रीविष्णूंचा धांवा केला आणि ते प्रगट होतांच त्यानें एक कमळ उपटून त्यांना अर्पण केलें. लगेच श्रीविष्णु गरुडावरून खालीं उतरले आणि त्यांनीं नक्राचें तोंड कापून गजेन्द्राचा पाय मोकळा केला. इतकेंच काय पण त्यांनीं त्याला मुक्ति देऊन आपल्या विमानांत बसवून त्याला वैकुंठाला घेऊन गेले. ह्या कथेंतला गजेन्द्र पूर्वजन्मीं इंद्रद्युम्न नांवाचा राजा होता. एकदां चुकून अगस्त्यमुनींचें स्वागत त्याला करतां आलें नाहीं म्हणून मुनींनी त्याला " गज हो " असा शाप दिला. राजानें प्रार्थना केल्यावर उच्छाप दिला कीं " विष्णु तुझा उद्धार करील " ज्या नक्रानें गजेन्द्राचा पाय धरला होता तो नक्र पूर्वजन्मीं हुहूनामक गंधर्व होता. देवल मुनीच्या शापानें त्याला नक्राचा जन्म घ्यावा लागला. "

## अभ्यास

खालीं दिलेल्या गोष्टी संपूर्ण लिहा. वाक्यरचनेच्या नियमांकडे लक्ष द्या.

१. कुऱ्हाड—वनदेवता—मोळीविक्या—सत्य बोलणें—बक्षिस ह्या शब्दांनीं युक्त अशी गोष्ट तयार करा.

२. जंगल, लाकडाचे ओंडके—नदीचा प्रवाह—हत्ती, धबधबा—करवत—हे शब्द घालून एक गोष्ट बनवा.

३. उंदीर, मांजर, घांट, सभा, व्याख्यान, युक्ति त्या शब्दांचा उपयोग करून एक गोष्ट लिहा.

४. तेल, निरांजन, तूप, वाणी, मुलगा हे शब्द घालून एक गोष्ट सांगा.

### ५ कुत्रा आणि त्याची पडछाया

१ कुत्रा. २ त्याला सांपडलेला मांसाचा तुकडा. ३ तो ओढ्यावरून जातो. ४. त्याची पडछाया. ५ पाण्यांतील कुत्र्यावर झडप.

### ६ सिंह आणि उंदीर

१ सिंहाच्या अंगावर उंदराचें खेळणें. २ तो त्याला पकडतो. ३ त्याची त्याला विनवणी. ४ सिंहाला व्याधांनीं पकडलें असतांना तो त्याला कसा सोडवितो.

### ७ हुशार न्यायाधीश

१ एका बाईचें मूल दुसरी बाई चोरून नेते. २ खटला न्यायाधिशापुढें जातो. ३ न्यायाधिशाचा निकाल—मुलाला मारण्याबद्दलचा. ४ त्याबरोबर खऱ्या आईचा झालेला गोंधळ.

### ८ चोर सांपडला

१ एका लांबीच्या काठ्या. २ जो चोर असेल त्याची काठी एक इंच लांब होईल. ३ खरा चोर आपली काठी इंचभर कापतो.

### ९ कोल्हा आणि करकोचा

१ कोल्ह्याचा झालेला अपमान. २ त्यानें योजलेली युक्ती—उथळ भांड्यांत खीर करकोचापुढें ठेविली. ३ करकोचानें योजलेली उलट युक्ति.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

## १० म्हातारा आणि त्याचें गाढव

१ प्रथम तो किंवा त्याचा मुलगा कोणीच गाढवावर बसलें नाहीं. २ नंतर तो स्वतः बसतो. नंतर त्याचा मुलगा—नंतर दोघे—नंतर गाढव खांद्यावर घेतात—गाढव बुजतें आणि पुलावरून खालीं पडून मरतें.

## ११ वेडें कोंकरूं

१ मेंढवाड्यांतील पारतंत्र्य. २ स्वातंत्र्याची त्याची इच्छा. ३ आपल्या आईला त्यानें विचारलेली परवानगी. ४ आईला न कळत तें जातें. ५ लांडगा त्याला खाऊन टाकतो.

## १२ कोळी आणि राजा

१ राजाचे प्रयत्न—अपयश व निराशा. २ कोपऱ्यांतील कोळी जाळें बांधतांना सातदां पडतो व चढतो. ३ राजानें ह्यावरून घेतलेला बोध. ४ त्याच्या कार्यांत त्याला मिळालेलें यश.

## १३ हत्तीनें घेतलेला सूड

१ शिंप्याच्या दुकानावरून पाणी पिण्यासाठीं हत्ती जातो. २ शिंपी त्याला रोज कांहीं खावयास देतो. एके दिवशीं त्याऐवजीं सुई टोंचतो. ३ हत्ती आपल्या सोंडेंत घाणेरडें गटारांतील पाणी भरून त्याच्या अंगावर ओततो.

## १४ हुशार चोर

१ सुतार—तेल रोज चोरलें जातें—चोर सांपडत नाहीं—दाराच्या फटींतून बघतो. २ उंदिर आपलें शेंपूट बुडवून चाटतांना दिसतो. सापळयांत तो पकडला जातो.

## १५ प्राप्तीचा अर्धा वाटा

१ एक कोळी—राजवाड्यांत मेजवानी—कोळी मासे आणतो. २ देवडीवाल्यास निम्मी पाती. ३ कोळयाची १०० फटक्यांची चमत्कारिक मागणी-५० फटके घेतो व थांबतो. ४ सर्व उघडकीस येतें.

खालील गोष्टींतील मुद्दे काढून ते विस्तारून लिहा.

१ गवाणींतील कुत्रा.
२ कोल्हा आणि आंबट द्राक्षें.
३ शेंपूट तुटलेला कोल्हा.
४ कुत्रा आणि भिकारी.
५ घोडा आणि त्याचा स्वार.
६ महमुद आणि घुबड.
७ महमुद आणि फरदोसी.
८ अहल्याबाईचें राघोबास उत्तर.
९ माकडानें केलेली वांटणी.
१० म्हातारा आणि त्याचीं मुलें.
११ सिंह आणि उंदीर.
१२ ससा आणि कांसव.
१३ जशास तसें.
१४ पोट आणि अवयव.
१५ कोल्हा आणि बोकड.
१६ वाघ आणि ब्राह्मण.
१७ म्हातारी आणि वाघ.
१८ दारूचें घर आणि दिवटी.
१९ लांडगा आला रे आला.
२० इमानी कुत्रा.
२१ लबाड मुलगा आणि त्याची आई.
२२ तीन धूर्त.
२३ पिवळा झालेला कोल्हा.
२४ पशूंचा दरबार.
२५ आलिबाबा व ४० चोर.
२६ हंस आणि कावळा.
२७ कोल्हा आणि कावळा.
२८ सहा आंधळे आणि हत्ती.
२९ गर्विष्ठ हरीण.
३० शेख महंमद.

---

## पाठ ६

# निबंधलेखन

**व्याख्याः**—निबंध हा शब्द निबंध् ह्या धातूपासून आला आहे. ह्याचा अर्थ चांगल्या तऱ्हेनें, घट्ट रीतीनें बांधणें असा आहे. विषयासंबंधीं आपण आपले विचार चांगल्या शब्दांत व वाक्यांत गोवतों त्याला निबंध म्हणतात. निबंधांमध्यें विचार व शब्दयोजना ह्या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात. विचार चांगले, उच्च, प्रौढ व तेजस्वी असावेत व ते विचार प्रदर्शित करणारी भाषाहि तितकीच प्रौढ, उच्च, तेजस्वी असावी.

**उपाय**—आपला निबंध चांगला होण्यास वाचन, चिंतन, अनुकरण, निरीक्षण हे उपाय योजावे. दुसरे जे ग्रंथकार होऊन गेले असतील त्यांच्या ग्रंथांचें परिशीलन करावें. त्यांनीं विषयाची मांडणी कशी केली आहे, त्यांत पद्धति कशी आहे, त्यांची लेखनशैली कशी आहे, इत्यादि गोष्टी पहाव्या. त्याचा अभ्यास करावा. मन लावून पाहून, त्यापासून बोध घेणें व त्याचा उपयोग करणें ह्याला निरीक्षण म्हणतात. निरीक्षणशक्ति योग्य असल्याखेरीज योग्य कोणतें, अयोग्य कोणतें, साधक कोणतें, बाधक कोणतें हें ठरवितां येत नाहीं.

**पूर्वतयारीः**—निबंधलेखनाची पूर्वतयारी करतांना दोन तीन गोष्टी पहाव्या. लिहिण्याची घाई करूं नये. घाई केल्यानें लिहिणें चांगलें होत नाहीं. पूर्वतयारीच्या तीन अवस्था आहेत.

( १ ) विषयासंबंधीं जें जें आपणास उपयोगी पडेल तें साहित्य गोळा करणें ही पहिली अवस्था होय. माहिती गोळा केल्याखेरीज लिहिणारा तरी काय लिहील? माहिती गोळा करणें हें डोळे उघडे असतील तरच साधेल. योग्य निरीक्षणानें जें जें दृष्टीच्या टप्प्यांत येईल त्याची चौकस बुद्धीनें छाननी करून आपल्या संग्रहीं ठेवा. ह्यासाठीं टिप्पणी करून ठेवण्यासाठीं एक लहानशी वही असूं द्यावी. तीवर निरीक्षणांत येणारी माहिती, वाचनांत येणारे उत्तम शब्द व विचार, चांगलीं परिणामकारक वाक्यें उतरून ठेवावीं; व त्या माहितीचा शब्दांचा, वाक्यांचा, योग्य प्रसंगीं उपयोग करावा. टिप्पणें करून घेतांना सुद्धां तीं सूचक अशीं करण्याकडे रोख असावा. उगाच भरताड करून त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. तीं छोटीं छोटींच असावींत. एकाद्या शब्दानच सर्व वाक्याची कल्पना डोळ्यासमोर यावी किंवा एकाद्या वाक्यानें सर्व पॅरिग्राफ सुचावा.

(२) **चर्चा**—कधीं कधीं वर्गांतील आपल्या सवंगड्यांशीं ज्या विषयावर आपणास लिहावयाचें असेल त्याबद्दल चर्चा करण्यानेंहि आपणांस पुष्कळ फायदा मिळतो. असल्या चर्चेनें आपल्या स्वताच्या विचारांत कांहीं घोटाळा असेल तर तो नाहींसा होतो आणि दुसऱ्यास आपले विचार सांगतांना भाषेंत जर कोठें संदिग्धता आढळली तर ती नाहींशी होते. अशा रीतीनें भाषेंत आणि विचारांत स्पष्टता व असंदिग्धता ह्या चर्चेनें येऊं शकते.

(३) **आराखडा**—तिसरी गोष्ट निबंधाचा स्थूल असा आराखडा अथवा रुपरेखा आखणें ही होय. लेखनामध्यें कोणती पद्धति स्वीकारावयाची हें अगोदर ठरवावें. कारण कोणत्याही विषयास प्रतिपादनाच्या पुष्कळ पद्धति असूं शकतात. उदाहरणार्थ, 'बाग अथवा उद्यान' ह्यावर निबंध जर लिहावयाचा असेल तर खालीं दिलेल्या ४-५ पद्धतींपैकीं कोणतीहि एक स्वीकारतां येईल.

१. सर्वसाधारण पद्धति. बागेच्या सौन्दर्यावरून. तिच्या उपयुक्ततेवरून. जे लोक बागेचा उपभोग घेतात त्यांच्यावर तिचा काय परिणाम होतो त्यावरून. बाग जर नसती तर काय झालें असतें? इत्यादि इत्यादि.

२. निरनिराळ्या बागा, उद्यानें पाहून सुचलेलीं वर्णनें व त्यांपासून निघणारीं अनुमानें.

३. आपणास आवडणारी अशी एकादि बाग घेऊन तिचें वर्णन करणें.

४. माळ्याच्या दृष्टिकोनाप्रमाणें कोणत्या प्रकारच्या मशागतीची बागेस जरूरी असते. मशागत करण्यामध्यें गोडी.

५. एखाद्या आदर्शभूत काल्पनिक बागेचें वर्णन करणें. निरनिराळ्या ऋतूंमध्यें बागेचीं जीं जीं रूपांतरें दिसतात त्यांचें वर्णन करणें.

नगर वाचनालय, सातारा.

अशा रीतीनें प्रत्येक निबंधास हात घालण्याच्या पद्धति असतात. त्यांपैकीं एक ठरवावी व एकदां ठरविली म्हणजे शेवटपर्यंत ती कायम ठेवावी. एकीचा संबंध दुसरींत आणूं नये. जी सोपी असेल ती घ्यावी.

प्राथमिक आंखणी झाल्यावर ती लिहून काढावी. लिहून काढतां काढतां स्मरणशक्तीला जास्त वाव सापडतो, निरनिराळ्या नव्या कल्पना सुचतात, स्पष्ट आणि स्वच्छ असे विचार बाहेर येतात. ते येतील तसे लिहून ठेवावे. जातां जातां मूळच्या रूपरेषेंत फेरफार योग्य दिसतील तर करावे. पॅरिग्राफमधील मुद्दा लिहून ठेवावा आणि त्याच्या खालीं दोन तीन पोटमुद्दे लिहून ठेवावे. उदाहरणार्थ, बाग ह्या वरील निबंधाचा एक पॅरा वसंतोद्यान हा जर धरला तर त्याचे पोटमुद्दे हे होतील—

(१) स्थळ, (२) देखावा—बाहेरील, आंतील, (३) उपयोग.

आराखडा लिहून झाल्यानंतर पुनः पुनः वाचावा. शक्य असेल तर दुसऱ्यास वाचून दाखवावा. तो बरोबर झाला आहे कीं नाहीं हें पाहण्याकरतां आपले आपणासच कांहीं प्रश्न विचारावे. उदाहरणार्थ—

१. आरंभ आणि शेवट ह्यांमध्यें संबंध आहे कीं नाहीं ?
२. एका मुद्द्यापासून दुसरा मुद्दा निघतो कीं नाहीं ? एका पॅरिग्राफमधून दुसरा पॅरिग्राफ निघतो कीं नाहीं ? पहिल्याचा आणि दुसऱ्याचा संबंध आहे का ?
३. असा कोणता मुद्दा आहे कीं, ज्याच्या विवेचनानें मुख्य विवेचनास जोर येत नाहीं ? तसा असल्यास तो काढून टाकावा.
४. सर्व विवेचनांत कोठें, कांहीं उणें आहे का ?
५. अमुक एका ठिकाणीं जास्त पॅरिग्राफ घालणें सोयीस्कर होईल काय ? तसा घालण्यानें विषयावर जास्त प्रकाश पडण्यासारखा आहे काय ?

## सामान्य सूचना

इतकी पूर्व तयारी झाल्यावर निबंध लिहिण्यास हात घालावा. निबंधास आरंभ करण्यापूर्वी कांहीं सामान्य सूचना देतों त्यांकडे लक्ष द्यावें.

१. चांगला कागद घ्यावा. $8\frac{1}{2} \times 13$ इंच इतका न आंखलेला असा कागद असावा. त्यापैकीं सुमारें दोन इंच समास सोडावा. समास आंखलेला नसावा. वर दोन इंच जागा सोडावी. नंतर विषयाचें नांव आणि पुढें २ ओळींची जागा सोडून पहिली ओळ लिहावी. ती अर्धी असावी.

२. विषयाचें नांव मोठ्या जाड अक्षरांत असावें. त्याला अवतरण चिन्हें करावीं.

३. प्रत्येक पॅरिग्राफच्या पहिल्या ओळीपूर्वी १-१॥ इंच जागा सोडावी. शेवटची ओळ तशीच सोडावी.

४. अशुद्धें शेवटच्या मसुद्यांत राहिलीं तर चांगल्या नीट रीतीनें शोधितें घालावीं. अशुद्धाला कांट मारावा. शुद्ध शब्द काकपदानें दाखवावे.

५. विषयाचें नांव प्रामुख्यानें दिसेल किंवा पुढें राहील अशी कागदाची घडी घालावी.

ह्या सामान्य सूचना ध्यानांत ठेवाव्या व नंतर निबंधास आरंभ करावा.

**निबंधाचा आरंभः**—निबंधाचा आरंभ कसा करावा ही विद्यार्थ्यांस नेहमीं अडचण भासते; व त्याचा विचार करण्यांत त्यांचा थोडा थोडका वेळ जातो असें नाहीं. एक प्रकारानें आरंभ केला आणि तो पसंत पडला नाहीं कीं खोडावा व दुसऱ्या प्रकारानें आरंभ करावा; तोहि न आवडला कीं, तिसऱ्या प्रकारानें करावा, असें कित्येक वेळां होतें. अंधारांत ज्याप्रमाणें एकादा मनुष्य चांचपडत चांचपडत आपला मार्ग काढतो त्याप्रमाणें विद्यार्थी चांचपडतांना दिसतात. विषयाची संपूर्ण

८५७२९

माहिती नसली म्हणजे असा प्रकार होतो. विषयाचा विस्तार कसा करावयाचा हें पूर्णपणें समजलें म्हणजे असें अंधारांत चाचपडण्याचें कारण नाहीं. विषयास हात कसा घालावयाचा ह्यासंबंधीं ठाम विचार करावा व तोच अंमलांत आणावा. आरंभ जो करावयाचा त्यामध्यें दोन तीन गोष्टींकडे लक्ष द्यावें. त्या गोष्टी ह्या—

१. आरंभ करतांना पाल्हाळ लावूं नये. विषयास एकदम हात घालावा. विषयासंबंधीं इतर भाकडकथा सांगूं नयेत.

२. त्यानंतर आपण जो विस्तार करणार त्याची थोडीशी कल्पना वाचकाला देतां आली तर द्यावी. पण ती अगदीं थोडक्यांत द्यावी. असें करण्यानें पुढें काय येणार याची अटकळ त्याला बांधतां येईल; व तो त्या तयारीनें राहील. आणि लेखकासहि आपण जें कांहीं लिहिणार त्याचा विसर पडावयाचा नाहीं.

३. तिसरी गोष्ट आरंभींच्या वाक्याच्या रचनेसंबंधीं. आरंभींचीं वाक्यें जोरदार असावींत. तीं सुंदर असावींत. तीं लक्षवेधक असावींत. आरंभ लक्षवेधक करण्याचे खालीलप्रमाणें उपाय आहेत.

(१) साधुसंतांचें वचन अथवा सर्वमान्य लेखकाचें अवतरण देणें. "मोठेपणापासून तोटे" ह्यावरील निबंधांत "लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा॥" हें तुकारामाचें वचन आरंभीं योग्य दिसेल.

(२) निबंधाच्या विषयाशीं संबद्ध अशी एकादी म्हण, श्लोकांश, पौराणिक अथवा ऐतिहासिक प्रसंग, आख्यायिका, लहानसा संवाद किंवा वाचकाचें चटकन् लक्ष वेधील असा प्रश्न विचारून जिज्ञासा उत्पन्न करणें. उ. 'स्वावलंबना'वर लिहितांना "जो दुसऱ्यावरी विश्वासिला, त्याचा कार्यभाग बुडाला" हा श्लोक द्यावा. किंवा 'लावी पक्षीण आणि तिचीं पिलें' ही गोष्ट

द्यावी. ‘ झोंपे ’ वरील निबंधांत झोंप हा काय चमत्कार आहे हें सांगावें.

(३) खुद्द वाचकांनाच एखादें कोडें घालून तें आपण आतां सोडून दाखविणार आहों असें सूचित करणें. “ शीलं परं भूषणं ” ह्यावरील निबंधांत शील व इतर भूषणें ह्यांतील साम्य द्यावें. ‘ पुस्तकें ’ ह्यावरील निबंधांत तीं स्नेही कशीं आहेत हें कोडें सांगून उकलून दाखवावें.

(४) रूपक अथवा दुसरा एखादा अलंकार ह्याचा उपयोग करणें. विषयास आरंभ केल्यानंतर त्याच्या मध्याचा विचार येतो.

## निबंधाचा मध्य

विषयाची मुख्य मांडणी ह्यांतच येते. विस्तार करावयाचा तो ह्यांतच. ह्या भागांत लिहिणाराचें ज्ञान, माहिती, कौशल्य दाखविण्यास जागा असते. ह्यांतील विवेचनावरूनच लिहिणाराची योग्यता अजमावितां येते. निबंधाचें हें शरीर आहे.

ह्या मध्यभागांत विषयाच्यासंबंधीं सामान्य विचार, विषयास उपयोगी उदाहरणें इत्यादींचा अन्तर्भाव होतो व अशा दृष्टीनें हा भाग अमर्यादित असतो. अमर्यादित लेखन टाळण्यासाठीं विषयाच्या स्पष्टीकरणाला उपयोगी अशाच तेवढ्या ठळक ठळक बाबी घेऊन त्यांचा ऊहापोह करावा. त्यांमधीलसुद्धां मनांत भरणाऱ्या तेवढ्याच मुद्यांचा उल्लेख करावा.

विवेचनांत जे कांहीं पोटमुद्दे निघतील, त्यांच्या महत्त्वाच्या मानानें त्यांच्याविषयीं थोडें किंवा फार लिहावें. विषय ज्या प्रकारचा असेल त्या प्रकारचें विवेचन असावें. विषय शास्त्रीय तर विवेचन शास्त्रीय, विषय भावनेचा तर विवेचन भावनेचें असावें. विवेचनाकरतां सहसा, कांहीं सबळ कारणाशिवाय विषयांतर करूं नये. विवेचनांत विसंगतपणा येऊं नये. ह्यांशिवाय आणखी सूचना खालीं देतों.

१. क्षुद्र गोष्टींची याद विनाकारण देऊं नका. त्यानें लेखन त्रासदायक व कंटाळवाणें होईल.

२. जी गोष्ट तुमच्यावर जास्त परिणाम करील, जास्त ठसेल, तीच प्रथम हातांत घ्या आणि तीसंबंधीं वर्णन अगोदर द्या व पदोपदीं तिच्याकडे संबंध जाईल अशा रीतीनें लेखनयोजना असूं द्या. ताजमहालाचें वर्णन असेल तर त्यासंबंधीं ऐतिहासिक आख्यायिका तुमच्या मनावर ठसली असेल तर ती प्रथम द्या. ऐतिहासिक किल्ल्यासंबंधीं वर्णन असेल तर बांधण्याचा काळ, वेळ, प्रसंग, खर्च, श्रम, ऐतिहासिक प्रसंग वगैरे द्या.

३. निबंधांत आपले स्वतःचेच फक्त अनुभव देऊं नका. कांहीं वेळेस एकाद्या प्रसंगांत आपणास मजा वाटते, परंतु दुसऱ्यास वाटत नाहीं. दुसऱ्यास कंटाळा येऊं नये म्हणून आपण अनुभविलेल्या प्रसंगांशिवाय इतर भोंवतालच्या प्रसंगांच्या वर्णनाची छटा त्यांत मिसळावी. स्वतःचे वैयक्तिक अनुभव दुसऱ्याचे म्हणून सांगण्यांत कांहीं खोटेपणा येत नाहीं. उलट मीं, मी, माझें, माझें, म्हणण्यांत जें अहंकारयुक्त स्तोम माजलेलें दिसतें तें नाहींसें होऊन आपला विनयहि दाखविला जातो.

४. असें जरी असलें तरी योग्य ठिकाणीं स्वतःची आवडनिवड, किंवा कल्पना सांगण्यांत भीति व कमीपणाहि पण कधीं वाटूं देऊं नये. एकाद्या सर्वमान्य गोष्टीबद्दल आपणांस प्रामाणिकपणानें किळस वाटली असल्यास ती दाखविण्यास कचरूं नये.

५. एकादी अत्यंत मजेदार गोष्ट सांगावयाची असल्यास ती सांगण्याची वेळ व जागा पहाण्याबद्दल योग्य खबरदारी घ्यावी. एकंदर वर्णनाशीं कोणत्या विवक्षित स्थलीं ती जमेल व तिच्या योगानें वर्णनास शोभा येईल कीं नाहीं हें पहावें.

६. कधीं कधीं कथनामध्यें संवादपद्धति अवलंबावी लागते आणि हिचा अवलंब करणें ही कांहीं साधी गोष्ट नव्हे. मी म्हणालों आणि तो म्हणाला असलींच वाक्यें त्यामध्यें येतात. संभाषण थोडक्यांत आणि योग्य तेथें भावनादर्शक आवेशयुक्त अशा रीतीनें जर सांगितलें तर चटकदार होतें.

## निबंधाचा शेवट

शेवट होतां होईल तों परिणामकारक असावा. परिणामकारक करण्याच्या युक्तया खालीं देतों.

१. आपल्या विषयाशीं संबंध येईल असें एकाद्या साधुसंताचें वचन किंवा एकाद्या सर्वमान्य ग्रंथांतील उतारा किंवा त्याच अर्थाच्या कांहीं म्हणी, सुभाषितें, कवीची कविता दिल्यास शेवट चांगला दिसतो. उ० " कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढें बिळें करिल घूस " ही ओळ सत्कार्यावरील निबंधाच्या शेवटीं योग्य दिसेल.

२. शेवटच्या पॅरिग्राफमध्यें अशी शब्दयोजना करावी कीं वाचकाच्या हृदयास जाऊन ती भिडावी, त्याच्या अंतःकरणास पीळ पडावा, त्याला आळवावें, प्रार्थना करावी, त्याला मोठेपणा द्यावा. आपण आपलें मत मांडलें आहे त्याचा निर्णय देण्याचें त्याच्यावरच सोंपवावें.

**निबंधाचे प्रकार**—निबंधाचे पांच प्रकार आहेत.

(१) वर्णनात्मक निबंध, (२) कथनात्मक अथवा वृत्तान्तात्मक निबंध, (३) चिन्तनविषयक अथवा विमर्शात्मक निबंध, (४) कल्पनाविषयक निबंध, (५) चर्चात्मक निबंध.

ह्या निबंधाच्या पांच पायऱ्या आहेत. वर्णनांतून कथनांत, कथनांतून चिन्तनांत, चिंतनांतून कल्पनेंत व शेवटीं चर्चेंत असा लेखनाच्या प्रगतीचा क्रम आहे. नवीन शिकाऊ लेखकास ह्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. ह्या क्रमानें प्रगति होत होत लेखकाला स्वतंत्र वाङ्मय निर्माण

सार्वजनिक वाचनालय, 

करण्याचें सामर्थ्य खात्रीनें येईल. वर जे पांच प्रकार सांगितले त्यांचा विचार पुढें क्रमानें केला आहे.

## अभ्यास

१. खालील निबंधांत कोणती पद्धति स्वीकाराल?

बाजारांतील दुकान, शाळा, वर्तमानपत्रें, पैसा, राजा, प्रवास, बाजारचा दिवस, सुट्टीचा दिवस, लवकर उठणें. (प्रत्येक निबंधाचा आराखडा द्या. कमींत कमी पांच पॅरे आणि एक पोटमुद्दा पाहिजे.)

२. खालील निबंधांची तयारी कशी कराल?

ओसाड गांव, पार्लमेंट सभा, रेलवे प्रवास, कुत्रीं, चित्रें, रस्त्यांतील दंगल, दया, बाजार.

३. निबंधांचीं आरंभींचीं वाक्यें खालीलप्रमाणें आहेत; त्यांवरून निबंधांत काय मांडणी येणार त्याचा अदमास बांधा.

"कौटुंबिक मनुष्याला जरूरी म्हणून, आवड म्हणून, किंवा संवय म्हणून इतरांची संगति पत्करावी लागते."

"दुसऱ्याला देणें आणि दुसऱ्यांचें घेणें अशा दोन प्रकारच्या वृत्तींच्या लोकांचा भरणा मानवी समाजांत आहे."

४. खालीं दिलेल्या निबंधांची मांडणी कोणत्या प्रकारानें कराल?

(१) भात, गहूं अथवा कापूस ह्यांची लागवड.

(२) मुंबई, कलकत्ता, पुणें, सातारा वगैरे सारखें एकादें शहर.

(३) चहाचा मळा अथवा दगडी कोळशाची खाण.

(४) हिमालय, विंध्य, सातपुडा, आजिमतारा.

(५) शीख, भिल्ल, कोलाटी, ब्राह्मण, मराठा वगैरे जाती.

प्रत्येकाची रूपरेषा दाखवून परिग्राफचे मुद्दे सांगून सुरुवात कशी कराल?

# पाठ ७

# वर्णनात्मक निबंध

वर्णनामध्यें चांगलें कौशल्य प्राप्त होण्यास दोन गोष्टींची जरूरी असते:-( १ ) काळजीपूर्वक निरीक्षण; ( २ ) त्या निरीक्षणाप्रमाणें जी माहिती मिळाली तिची योग्य व स्पष्ट अशा रीतीनें मांडणी. निरीक्षणासंबंधीं मागें सांगितलें आहे. साहित्यमांडणीमध्यें दोन अवस्था आहेत.

## साहित्यमांडणीच्या २ अवस्था

१. पहिल्या अवस्थेंत साध्या पदार्थांचीं, साध्या देखाव्यांचीं वर्णनें येतात. हे पदार्थ चांगले सांगोपांग, विशेष माहिती न सोडतां वर्णन करतां येतात. आपल्या दृष्टीला जसा विषय दिसेल, त्याचे निरनिराळे अवयव जसे दिसतील, तसें त्यांचें वर्णन करणें. प्रथम वर्ण्य पदार्थावर दृष्टि खिळवून जें वर्णन करतां येईल तें करावें आणि नंतर त्या पदार्थासंबंधीं जें कांहीं स्मरणशक्तीच्या साहाय्यानें वर्णन करतां येईल तें करावें. " हत्ती, मांजर, घोडा, कुत्रा, दुकान, ट्रॅमगाडी, खेळणें, भावली, " इत्यादिसारख्या विषयांत वर सांगितलेला क्रम ठेवावा.

२. ह्यानंतरची अवस्था जरा थोड्या मिश्र प्रसंगाच्या वर्णनासंबंधाची होय. असल्या प्रकारच्या वर्णनांत वरीलप्रमाणें दृष्टि वर्ण्य विषयाला अगदीं खिळून चालत नाहीं. तिला जरा सैल ठेवावी लागते. पदार्थाच्या वर्णनांत इतर बऱ्याच गोष्टींची भेसळ असल्यामुळें त्यांत निवडानिवड करण्याचा प्रश्न येतो. मिश्र वर्णनांत कोणत्या बाबी सांगाव्या, कोणत्या टाळाव्या, कोणत्यांवर विशेष भर द्यावा हें ठरविणें हिताचें असतें. निवड योग्य करण्यासंबंधीं खालीं सूचना देतों.

(१) वर्ण्य पदार्थाचें योग्य निरीक्षण करावें. कोणत्या बाबी घ्यावयाच्या, व कोणत्या सोडावयाच्या हें त्याशिवाय समजणार नाहीं.
(२) निरीक्षण झाल्यावर पदार्थाचे विशेष गुण सांगावे. सामान्य गुणांवर इतकेंसें लक्ष नसलें तरी चालेल. दोन्ही गुण सांगावयाचे असतील तर सामान्य गुण अगोदर सांगावे. बागेचें वर्णन करावयाचें असेल तर सामान्य स्वरूप-चर्चा अगोदर करावी व नंतर आपल्या विशिष्ट बागेचा संबंध आणावा.
(३) स्वयंसिद्ध अशा बाबींचा उल्लेख करूं नये. माणसाला दोन पाय असतात, दोन डोळे असतात, मांजराला चार पाय असतात अशा सहज सर्वांना माहिती असणाऱ्या गोष्टी सांगितल्यानें पाल्हाळ होतो.
(४) ह्याशिवाय वर्ण्य पदार्थाचेच केवळ व इतर पदार्थांत आढळून न येणारे असे जे विशेष गुण असतील ते सांगावे.

**वर्णनाचे प्रकार**—वर्णनांत दोन प्रकार असतात. एक सांगोपांग वर्णन व दुसरें मुख्यांग वर्णन. पैकीं पहिलें म्हणजे फोटो काढण्यासारखें आहे. फोटोमध्यें ज्याप्रमाणें देखाव्याचीं बारीक सारीक सर्व अंगें उपांगें उठतात त्याप्रमाणें वर्णनांत वर्ण्य पदार्थांचीं सर्व अंगें उपांगें उठवावयाचीं. एकाद्या खोलीचें वर्णन करावयाचें झालें तर तींतील सारी माहिती देणें. उदाहरणार्थ लांब रुंद खिडक्या, तावदानें, लाकडाची जात, फरशी, दगड, कोनाडे, खुंट्या, भिंत, भिंतीवरील चित्रें, बैठक इ. इ. ह्यांची माहिती देणें ह्याला सांगोपांग वर्णन म्हणतात. असलीं वर्णनें कादंबऱ्या, लांब निबंध ह्यांमध्यें दिसतात. विद्यार्थ्यांच्या निबंधांत हीं वर्णनें येऊं नयेत.

दुसरें मुख्यांग वर्णन. ज्या ज्या पदार्थाचा मनावर परिणाम होईल त्याचा क्रमानें उल्लेख करावयाचा. देखाव्याचें वर्णन असेल तर लांबच्या

भागाचें वर्णन अगोदर द्यावयाचें. नंतर क्रमानें हळू हळू जवळच्या पदार्थावर यावयाचें.

वर्णनात्मक निबंधामध्यें वरील दोहोंपैकीं योग्य दिसेल ती कोणतीही पद्धत उचला. पण वर्णनांत प्रथम एक परिणामकारक वाक्य, नंतर निवडलेल्या साहित्याचें यथाक्रम वर्णन आणि शेवटीं एक पहिल्या-सारखें परिणामकारक वाक्य इतकें साधण्याची खबरदारी ठेवा.

## वर्णनाबद्दल सूचना

१. बारीक सारीक गोष्टींचें वर्णन करूं नये, निवडक गोष्टींचें करावें, म्हणजे निबंधांत गोडी उत्पन्न होते.

२. निरनिराळ्या गोष्टींत कोणती मुख्य, कोणती गौण हें ठरवावें. कोणती गोष्ट कोणत्या स्थळीं योग्य दिसेल हें पहावें.

३. देश, काल, ह्यांकडे दृष्टि ठेवावी. नाहीं तर औचित्य साधत नाहीं. वर्ण्य वस्तूचा आणि देश, काल ह्यांचा मेळ बसला पाहिजे.

४. वर्ण्य वस्तूस बाधक असें कांहीं आणूं नये. पोषक असेल तेवढेंच आणावें.

५. वर्ण्य वस्तूच्या अवयवांचें प्रमाणशीर वर्णन करावें. त्याच-प्रमाणें वस्तू व वर्णनाची भाषा ह्यांत संबंध असावा.

ज्या प्रकारचा विषय त्या प्रकारची भाषा असावी. मृदु, कोमल प्रसंगाचें वर्णन मृदु कोमल शब्दांनीं करावें. राक्षसी भेसूर प्रसंगाचें वर्णन कठोर रूक्ष शब्दांनीं करावें.

६. भाषेंत अलंकार योजावे. परंतु फार योजूं नये. अलंकारांनीं भाषेला सौंदर्य येतें. परंतु फार अवास्तव वापरल्यानें भाषेंतील सोपेपणा नाहींसा होतो.

वर्णनाचे विषय साधारणपणें जे नेहमीं येतात ते प्रथम देऊन नंतर त्यांच्या वर्णनाची स्थूल अशी रूपरेषा देतों.

वर्णनाचे विषय:–वनस्पति, खनिज पदार्थ, पशुपक्षी, इमारती, किल्ले, शहरें, समारंभ, यात्रा, उत्सव, खेळ इ. इ.

## स्थूल रूपरेषा

**१. वनस्पति:––**

१. वर्ग.

२. वर्णन–विस्तार, उंची, जाडी, खांद्या, पानें, फुलें, फळें, इ०

३. मूलस्थान–इतिहास, उत्पत्ति, स्थलांतर कसें झालें ? कधीं झालें ?

४. लागवड–प्रांत, हवामान ( उपकारी व अपकारी ).

५. उपयोग–निरनिराळ्या भागांचे उपयोग.

**२. खनिज धातु:––**

१. वर्ग–मूल्यवान्.

२. वर्णन–रंग, स्वरूप, फरक, त्यामध्यें कशानें पडतो ?

३. गुणधर्म–मृदु, कठीण, ठिसूळ.

४. उत्पत्ति–संपादन कसा होतो ? मूळचें अशुद्ध रूप.

५. उपयोग.

**३. प्राणी:––**

१. वर्ग–सस्तन, अण्डज, रानटी अथवा माणसाळलेला.

२. शरीररचना–प्रत्येक भागाचें वर्णन, स्वरूप, आकार, बांधा.

३. मूलस्थान–हवा, प्रांत.

४. स्वभाव गुण, चाली–संवयी, क्रूर, रागीट, इमानी, प्रामाणिक, मायाळू, आळशी.

५. भक्ष्य मिळविण्याची पद्धत–त्यावरून स्वभाव.
६. उपयोग–जिवंतपणीं, मेल्यावर, निरनिराळ्या भागांचे.
७. माहिती–मनोरंजक, चमत्कारिक, एकादी गोष्ट.

**४. इमारती, किल्लेः—**

१. स्थल–कोणत्या शहरीं, कोणत्या भागांत.
२. बांधल्याचा काळ–आख्यायिका, कोणीं, कोणासाठीं, कोणाच्या हस्तें, खर्च.
३. वर्णन–आंतील भागाचें, आजूबाजूचें.
४. त्याचा इतिहास व वर्तमानकालीन स्थिति.
५. सामाजिक व राजकीय महत्त्व.
६. इमारत पाहून मनावर होणारा परिणाम. सुचलेले विचार.

**५. शहर अथवा गांवः—**

१. नामनिर्देश–कांहीं आख्यायिका असेल तर.
२. स्थल–अक्षांश, रेखांश, जिल्हा, नदी.
३. स्वाभाविक रचना–उंच, सखल, डोंगराळ.
४. हवापाणी–उष्ण, शीत इ.
५. शहराची मांडणी–पेठा, रस्ते.
६. प्रेक्षणीय स्थळें–समाजोपयोगी, शालागृह, कचेरी, पोष्ट.
७. लोक–जाती, आचारविचार, धंदे, धर्म, भाषा.
८. सुधारणा–शिक्षण, धर्म, समाज ह्या बाबतींत.
९. ऐतिहासिक माहिती–उत्पन्न झालेले पुरुष.

**६. समारंभ अथवा उत्सवः—**

१. उपोद्घात–समारंभाचें महत्त्व, जरूरी.
२. अर्थ व स्पष्टीकरण.
३. शास्त्रोक्त विधी व रूढी.

... वाचनालय, ...

४. उत्पत्ति.
५. हेतु व बोध.
६. उपसंहार.

७. यात्राः--
१. हेतु.
२. स्थलवर्णन–स्थल, प्रांत, जाण्याचे मार्ग व सोयी.
३. यात्रेचा काल.
४. देखावा–वेश, रस्ते, दुकानें, देऊळ.
५. प्रकार–विधि, उपपत्ति, कशी करावी.
६. फायदे–आप्तेष्टांच्या भेटी, व्यापारवृद्धि, दळणवळण.
७. आवश्यकता–पारमार्थिक व ऐहिक.
८. उपसंहार–स्वतःचे विचार, महत्त्व.

८. खेळः--
१. हेतु–करमणूक, व्यायाम.
२. साधनें–साहित्य,खेळाडू संख्या, सामर्थ्य, कौशल्य, वेग, वजन.
३. पद्धति–खेळण्याचा प्रकार, खेळाबद्दल नियम.
४. योग्य स्थळ व वेळ.
५. फायदे–शारीरिक, नैतिक गुण.
६. उपसंहार–महत्त्व.

९. यंत्रः—
१. उद्देश.
२. वर्णन–कोणत्या पदार्थापासून कसें तयार करतात. त्याचे वेगळे भाग, त्यांची रचना, जुळणी.
३. उपयोग–लोकांना पूर्वीपेक्षां काय सोय जास्त झाली.

४. इतिहास–उत्पादक, प्रसार, तयार कसें करण्यांत आलें, त्यापासून अनर्थ, अपघात होण्याचा संभव.

५. स्वतःचे विचार.

**१०. कारखानाः—**

१. उपोद्धात, संस्थापक, स्थळ, विस्तार.

२. द्रव्य, सामग्री.

३. कृति, मालाची कृति, द्रव्याचें प्रमाण.

४. इतिहास.

५. आवश्यकता, कारखान्याची जरूरी.

६. फायदे–व्यक्तीस व राष्ट्रास.

**११. साखर, कागद, कांच वगैरेंचे कारखानेः—**

१. वर्णन–इतिहास, प्रथम कोठें तयार झाला.

२. सामग्री.

३. कृति–कच्चा पदार्थ, निरनिराळ्या अवस्था.

४. गुणधर्म.

५. उपयोग.

६. उपसंहार.

**१२. कलाः—**

१. उत्पत्ति–कोणत्या देशांत कशी सुरू झाली ?

२. कोणी शोधून काढिली. कोणत्या परिस्थितींत ?

३. तिचा प्रसार कोणाकडून केला गेला व कसा ?

४. पूर्वीपेक्षां कोणत्या सोयी अथवा फायदा झाला आहे ? इतर बाजूनें काय तोटा होत आहे ? व त्या दृष्टीनें कोणत्या सुधारणा होणें इष्ट आहे ?

१३. सृष्टिचमत्कार—ईश्वरनिर्मित वस्तू ( ढग, वारा, पाऊस, नदी, चंद्र, सूर्य इत्यादि)

१. व्याख्या, उत्पत्ति, तो कोठें व कोणत्या परिस्थितींत आढळतो ?

२. स्वरूप अथवा देखावा. सामान्य वर्णन, लक्षणें.

३. स्थित्यंतर, रूपांतर, मूळचें स्वरूप कोणतें, व तें कसें बदलतें ?

४. फायदे व तोटे.

५. उपसंहार–लोकांचे समज, ईश्वराची कर्तृत्वशक्ति.

१४. प्रवास:—

१. हेतु.

२. बरोबर लागणारे जिन्नस, सामान.

३. साधनें–आगगाडी, मोटार, टांगा, पायीं.

४. देखावे–निसर्ग, मनुष्यनिर्मित.

५. नाविन्य, प्रवासांतील कांहीं अनुभव, चालीरीति.

६. पूर्णता, मुक्काम.

७. फायदे–ज्ञानसंपादन, प्रकृतीस आराम, मानसिक आनंद.

८. उपसंहार–ज्या हेतूनें केला तो सफल झाला किंवा नाहीं.

## १. धान्यें व वनस्पती

१. गहूं—१ मनुष्याच्या उपजीविकेचें साधन. २ कोणकोणत्या प्रांतांत उत्पन्न होतो. त्याला लागणारी सुकी जमीन व थंड हवा. ( पंजाब, सिंध, ईजिप्त ). ३ निरनिराळे प्रकार–अवयव, लोंब्या, बक्षी, खपले. ४ गुणदोष. शक्तिदायकत्व. कोणास सोसत नाहीं. ५ उपयोग–भुसा, कोंडा, पीठ, कणीक, कोणते जिन्नस होतात ?

२. कापूस—१ स्थान. उपकारी हवामान. अमेरिका, ईजिप्त, हिंदुस्थान. २ लहान रोपटें. मऊ, पांढरें, पिवळें फूल. बोंड. ३ तयार करण्याची कृती. गोळा करणें; जीनमध्यें सरकी काढणें, गठ्ठे बांधणें; सूत कातणें, विणणें.

४ उपयोग–मानवजातीला वस्त्रप्रावरण मिळतें. ५ वस्त्राची उत्क्रांति–वल्कलें, कातडी, कापसाचें कापड.

३. लोंकर––१ वस्त्राची उत्क्रांति. २ मेंढयापासून–दक्षिण आफ्रिका, आस्ट्रेलिया, न्यूझीलंड. ३ तयार करण्याची रीति–लोकर कांपणें, गोळा करणें, कातणें, धागे काढून विणणें. ४ कपड्याचे प्रकार–घोंगडी, शाल, फ्लानेल, गालिचे. ५ रंग.

४. आंबा—१ वर्णन, स्वरूप, अवयव, पानें, लाकूड, मोहोर, फळें. २ प्रकार–हापुस, पायरी, कलमी, देशी, कोंकणी. ३ कलम कसें करतात? ४ उपयोग–गुणधर्म, औषधी म्हणून. ५ एकादी अन्योक्ति पाठ येत असेल तर द्यावी.

५. केळीचें झाड—१ झाड आहे कां रोपटें आहे? २ फळांचे प्रकार. गांवठी, रायाळी, वसईचीं, मोठीं, लहान. ३ लागवडीचा प्रकार–पाणी, खत, मेहनत. ४ गुणदोष–मेंदूस चांगलें. पचनास कठीण इ. इ.

६. गुलाब—१ उत्पत्ति–हिंदुस्थानांत कोणीं व कसें आणलें. २ वर्णन–रोपटें, काटेरी, फूल. ३ लागवडीची तऱ्हा. लोकांना त्याची आवड. ४ प्रकार–पांढरा, तांबडा, पिवळा. गुलाबी. ५ उपयोग–अत्तर, रोजवॉटर, गुलकंद, हारतुरे. ६ गुणधर्म–थंड, शांत, सुवासिक.

७. नारळ—१ ताड आणि त्याचे प्रकार. २ स्वरूप–वर्णन. निरनिराळे अवयव, नारळ, पानें, साल, रस. ३ उपयोग–निरनिराळया अवयवांचा. औषधीप्रमाणें.

## २. खनिज धातु

१. लोखंड—१ अत्यंत उपयुक्त धातु. २ कशी प्राप्त होते. शुद्ध करण्याची रीति. ३ लोखंडाची खाण, तिचें वर्णन. ४ निरनिराळे प्रकार–अशुद्ध, पोलाद. ५ गुणधर्म–गंज चढणें. ६ उपयोग–एकाद्या सुईपासून तों इंजिनपर्यंत.

२. तांबें–१ प्राचीन काळीं उपयोग. २ गुणधर्म–गंज चढत नाहीं, विष. ३ उपयोग–भांडीं वगैरे.

३. रुपें–१ कोठें सांपडतें? हिंदुस्थान, अमेरिका, चिली, पेरू, रशिया. २ प्रकार–स्वरूप, गुण. ३ उपयोग–डागिने, नाणीं.

४. दगडी कोळसा—१ महत्त्व–लोखंड व कोळसा ह्यानें इंग्लंड, अमेरिका वगैरे राष्ट्रांस महत्त्व आलें. २ कसा बनतो ? धरणीकंप, त्यावर सांपडणारे पानाचे अवशेष. ३ खाणीचें वर्णन. कोलगॅस, डेव्हीज कंदिल. ४ खाणींतून काढण्याचा प्रकार. ५ उपयोग.

## ३. प्राणि–पक्षी

१. मयूर–१ प्राण्याचें पावित्र्य, सरस्वतीचें वाहन म्हणून. २ त्याची उपयुक्तता ( सापाला मारतो. ) तोटे–पिकाची नासाडी. ३ स्वभाव व संवयी–पावसाचें आगमन सुचवितो. ४ कवींची कल्पना.

२. पोपट– १ वर्णन–आकार चोंच, पंजे, शेप. २ कोठें आढळतात ? ३ प्रकार–उत्तम कोणते ? ४ पाळीव म्हणून ठेवण्याचीं कारणें–बोलणारा पक्षी. ५ कांहीं मजेदार गोष्टी, गुप्त कारस्थान फोडल्याबद्दल.

३. कावळा– १ जात, वर्ण, आकार, स्वरूप. २ प्रकार–हंसाशीं साम्य. ३ उपयुक्तता–घाण नाहींशी करतात. ४ स्वभाव–चोरी करणारा, त्रास देणारा, उचलणारा. ५ धार्मिक व इतर समजुती–आडवा जाणें, ओरडला तर पाहुणा येणें. ६ कावळयाची संध्याकाळची सभा.

## ४. कीटक

१ डांसः—कोठें उद्भवतात ? विहिरी, डबकीं, खांचा, मोऱ्या, गटारें. २ अवस्था, आकार, प्रकार–खालीं डोकें घालून बसणारा, आवाज न करणारा, ताप आणणारा. ३ प्रकृतीस अपायकारक कसे ? तापाची सांथ कशी आणतात ? ४ परिहार करण्याचे उपाय–फिनेल, राकेल, मच्छरदाण्या.

## ५. प्राणी–पशु

१. उंट–१ सर्वांत अतिशय कुरूप व बेडौल प्राणी–लांब मान, बेडौल वशिंड, लांब वाकडे, पाय, इ. २ त्याची सोशिकता, पाण्याशिवाय राहण्याची शक्ति, त्याच्या पोटांतील स्नायूंची रचना, पाण्याची पिशवी. ३ वैराण व वाळवंटी प्रदेशांत त्याची उपयुक्तता, वाहतुकीचें साधन.

२. सिंह– १ स्थान–आशिया, आफ्रिका. २ वर्णन–मांजराच्या जातींपैकीं, भव्य स्वरूप, प्राण्यांचा राजा, चार फूट उंची, पिंगट रंग, वाटोळें केसाळ डोकें, उतरती आयाळ, मिशा, कल्ले, पाणीदार डोळे, तीक्ष्ण सुळे. ३ स्वभाव–दिवसा निद्रा, रात्रीं संचार, गुरगुरणें, डुरकणें, विस्तवाला भिणें. ४ भक्ष्य–सर्व प्रकारचे प्राणी, हल्ला करतो. ५ उपयोग–कातडीचे उपयोग करतात.

३. मांजर—१ वर्णन–उंची ९ इंच. लांबट आकार, मऊ दाट केस, वाटोळें डोकें, तीक्ष्ण पाणीदार डोळे, मिशा, तीक्ष्ण दांत. २ जात–वाघ, सिंह, चित्ता ह्या प्राण्यांशीं साम्य. ३ स्वभाव–दिवसा झोंप, रात्रीं पारध, फार जागरूक. ४ संवयी–स्वच्छता, जलद व आवाज न करितां पळणें, ऊबेची आवड, अंगाला चिकटणें, स्थलाबद्दल प्रीति, माणसाबद्दल प्रीति नाहीं. ५ भक्ष्य–उंदीर, मासे, पक्षी, दूध व दुधाचे पदार्थ. ६ उपयोग–उंदीर, घुशी धरणें. ७ धर्मसमजुती–काशीस जाणें, मांजर आडवें जाणें.

४. घोडा—१ वसतिस्थान–अरबस्थान, कानडा. २ वर्णन–अवयव, लांब पाय, कमानदार मान, आयाळ, लांब शेंपूट, खूर कठीण. ३ जाती–अरबी–उमदा चपल. शेटलंडपोनी, प्रकार–खेंचर, गाढव. ४ संवयी व स्वभाव–तुरतुर करणें, संथ, निरुपद्रवी, चतुर, प्रामाणिक, आज्ञाधारक. ५ भक्ष्य–भाज्या, गवत, हरबरा, अन्न. ६ उपयोग–वाहतुकीचें साधन, ट्रॅम, टांगे, लढाई. कातडीं कमावतात. केस–उशा. खूर–चिकट पदार्थ.

५. गाय—१ वसतिस्थान सर्व जगावर. २ वर्णन–पाळीव, जाड कातडी, राठ केस, लांबट मान, शिंगें, शेपूट, खूर. ३ प्रकार–गाय, बैल, कालवड, खोंड. ४ संवयी व स्वभाव. रवंथ करणें, निरुपद्रवी, शिंगानें झुंजते. ५ भक्ष्य–गवत, कडबा, पेंड. ६ उपयोग–दूध, शेती, शिंगांचीं वटणें. ७ धार्मिक समजुती–पावित्र्य, पोटांतील देव.

खालीं कांहीं वर्णनात्मक निबंध लिहून दाखविले आहेत. ते नमुन्यासाठीं पहावे.

## कोळी

( १ ) सामान्य सिद्धांत.
( २ ) शरीररचना–पाय, धागे, इ.
( ३ ) त्याची जाळें तयार करण्याची क्लृप्ती.
( ४ ) त्याच्या संवयी.
( ५ ) त्याजविषयीं इतर माहिती.

कोळ्याची शरीररचनाच अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, तिचा उपयोग त्याला परकी प्राण्याशीं झगडून आपलें रक्षण करण्याकडे करतां येतो. त्याचें डोकें आणि छाती ह्यांजवरील कातडी भक्कम असते. परंतु पोटावरची कातडी गुळगुळीत असते. त्याचे पाय लांब असून शेवटीं नखें असतात. त्याला डोळे पुष्कळ असून त्यावर कठीण परंतु पारदर्शक आच्छादन असतें. त्याच्या तोंडाच्या पुढच्या भागास एक चिमटा असतो. त्यानें तो आपलें भक्ष्य धरतो, मारतो व पकडून जाळ्यांत ठेवितो.

लहानसान किड्यांस पकडण्याचें त्याचें उत्तम साधन म्हणजे त्याचें जाळें होय. व तें तो उत्कृष्ट साधतो. त्याच्या शरीरामध्यें एक चिकट पदार्थ आहे. जाळें विणण्याच्या वेळीं तो पदार्थ बाहेर काढून त्याचे जाड किंवा बारीक धागे तो काढितो. पहिला धागा चांगला चिकटावा म्हणून त्याच्यावर तो पुष्कळ चीक घालतो. जाळें बांधतां बांधतां जर तो खालीं पडला तर त्याच्या पोटां-तून निघणाऱ्या धाग्याला तो लोंबकळत असतो. धागे ओलसर असल्यामुळें एकमेकांस तेव्हांच चिकटतात. जेथें ताण पडून जाळें तुटण्याची भीति असते तेथें हा सहासहापट धागे घालून भरभक्कम करतो. त्याच्या जाळ्याची वीण पाहिली म्हणजे ह्याच्या शिल्पकलेचें आश्चर्य वाटल्यावांचून रहात नाहीं.

हा आपल्या जाळ्यांत लहान मा या, माशासारखे प्राणी धरतो. कीटक धरतांना तो आपला धागा त्याला चिक ष्टी तो आणि नंतर तो सुटून जाऊं नये म्हणून त्याच्याभोंवतीं सारखे धागे गुं पर न त्याला जखडतो. जर प्राणी त्याच्यापेक्षां जास्त सशक्त असेल तर जाळ खेर धागे सोडून आपण दुसरीकडे पळून जातो. हा नेहमीं जागरूक असतो. जरा कोठें जाळ्यास धक्का लागावयाचा अवकाश कीं तो एकदम खालीं उतरतो. जाळें तुटलें तर पुन्हां बांधतो. धैर्य खचूं देत नाहीं. शत्रु फारच सामर्थ्यवान् असला तर आपले पाय पोटाशीं गुंडाळून लहानशा गोळीसारखा निश्चेष्ट पडतो. हा लवकर माणसाळतो. आपल्या हाता-वरून माशा खुशाल उचलून नेतो. ह्या प्राण्याचे अंगाची कातडी आणि पाय हे दर वर्षास जुने जाऊन नवे येतात.

ह्या प्राण्यांत नरांपेक्षां माद्या फार असतात. त्या अंडीं घालतात. पोर अंड्याबाहेर पडलें कीं धागे काढून आपलें भक्ष्य मिळवूं लागतें. त्याची वाढ

फार होते. म्हातारपणीं ह्याचें सामर्थ्य कमी होतें. नंतर उपास काढतां काढतां तो मरून जातो. ( मधुमक्षिकेवरून ).

## हत्ती

( १ ) वर्णन. अवयव.

( २ ) वसतिस्थान, भक्ष्य, स्वभाव.

( ३ ) त्याचा उपयोग, प्राचीन काळीं, अर्वाचीन काळीं.

सर्व प्राण्यांत अतिशय मोठा अजस्र प्राणी म्हणजे हत्ती होय. ह्याचें शरीर अगदीं ओबडधोबड, राकट, कातडी राठ, असें असतें. ह्याचीं पावलें वाटोळीं, मऊ असल्यामुळें हा चालला असतांना त्यांचा आवाज फारसा होत नाहीं. ह्याचा विशेष चमत्कारिक अवयव म्हणजे सोंड. ही पांच सहा फूट लांब असून फार लवचिक असते. हिच्या टोंकास एक ओंठ असतो व तो वरच्या बाजूस दुमटलेला असतो. ह्याच्या योगानें तो जमिनीवरचा टांचणीसुईसारखा लहान पदार्थहि उचलूं शकतो. गवताचा कवळा एकत्र करून सोंडेनें तो एकदम तोंडांत घालतो. नर हत्तीला दोन तीन फूट लांबीचे दोन सुळे असतात. ह्या प्राण्याची उंची ११ फूट असते.

हा प्राणी फारकरून थंड प्रदेशांत सांपडत नाहीं. आफ्रिका खंडाच्या मध्यभागीं, ब्रह्मदेशांत, हिमालयाच्या पायथ्याशीं हा आढळतो. अरण्यामध्यें हा रानटी स्थितींत कळप करून राहतो. हा अजस्र प्राणी सहजासहजीं पकडला जात नाहीं. त्याला पकडण्यासाठीं एक माणसाळलेला हत्ती वन्य हत्तींच्या कळपाकडे सोडतात व त्याच्या नादानें वन्य हत्ती करच्या बरोबर येतात. वाटेंत मोठे खड्डे खणून त्यावर गवत टाकून त्यांचीं तोंडें झाकून टाकतात. त्यांवरून रानटी हत्ती जाऊं लागला कीं त्याला खड्डा न समजतां तो एकदम खालीं पडतो. नंतर त्याला उपाशी ठेऊन ताळ्यावर आणतात.

झाडाच्या साली, पानें, कंद, गवत हें त्याचें भक्ष्य होय. माणसाळलेल्या हत्तीस पानें, ऊस, धान्य, गव्हाचे रोट खावयास घालतात. हा फार रागीट व खुनशी प्राणी आहे. एक शिंपी रोज एका हत्तीस कांहीं खावयास देत असे. असा क्रम चालला असतां एकदां त्याला कांहीं खावयास न देतां त्यानें त्याच्या सोंडेस सुई टोंचली. हें हत्तीनें ध्यानांत ठेवून, पाणी पिऊन परत येतांना

आपल्या सोंडेनें गटारांतील घाण पाणी घेऊन तें सर्व त्यानें त्या शिंप्यावर ओतलें व सूड घेतला जो कोणी त्यावर ममता करतो त्याच्यावर तोहि ममता करतो. त्याचा महात त्याच्या मानेवर बसून त्याला अंकुशाच्या सहाय्यानें हांकतो.

प्राचीन काळीं हत्तींचा लढाईच्या कामीं उपयोग करीत असत. चतुरंग सेनेमध्यें हत्ती हें सेनेच्या चार अंगांपैकीं एक अंग असे. भारतीय युद्धामध्यें हत्तींचा उपयोग केला होता. पौरस राजानेंहि अलेक्झांडरशीं झालेल्या युद्धांत पांचशें हत्ती आणले होते असें म्हणतात. हत्ती शत्रूच्या सैन्याची दाणादाण करीत. गाड्या ओढणें, किल्ल्याचे दरवाजे फोडणें हीं कामें हत्तीच करीत. मिरवणुकींमध्यें हत्ती आणितात. त्याला चांगला रंगवून त्यावर हौदा अथवा अंबारी घालून शोभेनें राजेरजवाडे मिरवणूक काढतात. हत्ती मेल्यावर त्याचे हस्तिदंत वगैरेंचा उपयोग कांहीं जिन्नस करण्याकडे करतात.

## आट्यापाट्याचा खेळ

१. खेळाची आवड—खेळणाऱ्यांत, पाहणाऱ्यांत;
२. खेळाचें वर्णन—ध्येय, संख्या, पद्धत, नियम;
३. खेळासाठीं लागणारे गुण—व्यक्ति, सामर्थ्य, कौशल्य;
४. खेळाचा शेवट;
५. उपसंहार—गुण–शारीरिक, नैतिक.

फार प्राचीन काळापासन ह्या खेळाबद्दल महाराष्ट्रांतील लोकांस गोडी आहे. महाराष्ट्रापुरतें तरी ह्याला राष्ट्रीय खेळ हें नांव देण्यास हरकत नाहीं. हा खेळ खेळण्यांत मजा तर आहेच, परंतु पाहण्यांतहि मजा आहे. हा खेळ साधा, बिनखर्चाचा, उघड्या हवेंत खेळण्याजोगा असा आहे. ह्याला फक्त सपाट जमीन लागते. त्यांत पाट्या काढतात.

हा एक सांघिक स्वरूपाचा खेळ आहे. ह्यामध्यें प्रत्येक खेळगड्यास स्वतः वैयक्तिक कौशल्य दाखवावें लागतेंच. परंतु सर्वांनीं मिळून एकदिलानें खेळावेंहि लागतें. खेळांत दोन बाजू असून प्रत्येक बाजूस अजमासें दहा गडी असतात. त्यांपैकीं सर्वांत उंच, चलाख, चपळ असा जो मुलगा तो त्यांचा मुख्य नायक होऊन सूर नांवाची पाटी सांभाळतो. बाकीचे गडी एकेका पाटीवर एक असे उभे असतात. प्रत्येक पाटी सुमारें २० फूट लांबीची असून तिच्या दोन्हीं बाजूंस दोन मर्यादा

असतात; आणि त्यांना समांतर व त्यांच्या बरोबर मध्यावर एक तिसरी लांब उभी अशी रेषा काढितात. तिला सूर अथवा मृदंग म्हणतात. मुख्य गड्यानें ह्या पाटीचें रक्षण करावयाचें असतें. तिच्यावर सारखें हिंडून तावडींत जो प्रतिस्पर्धी सांपडेल त्याला बाद करावयाचा प्रयत्न त्याला करावा लागतो. ह्या मुख्य सुरास आडव्या अशा दहा पाट्या असतात. त्यांपैकीं पहिली पाटी 'चांभार पाटी' आणि शेवटची पाटी ' लोणाची पाटी ' असें म्हणतात.

प्रथम सर्व गडी 'चांभार पाटी' चे बाहेर उभे राहतात. नंतर मृदंग्याच्या हातावर टाळी देऊन खेळास सुरुवात होते. टाळी दिल्याबरोबर गड्यांची खालीं ' लोणा'कडे बाद न होतां जाण्याची गडबड सुरू होते. दुसरे गडी त्यांना अडविण्याची पराकाष्ठा करितात. मृदंग्या कांडें चिरून लगेच पुष्कळ गडी एका कांड्यांत अडवून धरतो. कांडें फोडून खालीं जाणें म्हणजे एक कौशल्याचें काम आहे, पण त्यांत पडून जाणें तर फारच बहारीचें आहे. पाय तेवढे आंत व शरीर पाटीच्या बाहेर फेंकून देऊन पाटीवरच्या गड्याचा स्पर्श चुकवून जाणें म्हणजे पडून जाणें होय. अशा रीतीनें हुलकावणी दाखवून कुशलतेनें, चपलतेनें, शेवटपर्यंत जाऊन ' लोण' आणून तें वरच्या 'चांभार पाटी'पर्यंत पोचविलें म्हणजे डाव संपतो.

प्रत्येक डावाला कांहीं मिनिटांची मर्यादा घालतात. तेवढ्या वेळांत 'लोण' तरी आणलें पाहिजे किंवा दुसऱ्या पक्षानें सर्व गडी बाद तरी केले पाहिजेत. 'लोण' येणें शक्य न झालें तरीहि डाव संपल्याची कबुली देतात. जितक्या पाट्या ओलांडिल्या त्याच्या दुप्पट गुण व जितके गडी उरले असतील त्यांच्या दुप्पट गुण मिळतात. 'लोण' जर वेळेंत आणलें तर सर्व गुण मिळून राहिलेल्या मिनिटांच्या दुप्पट गुण मिळतात. प्रत्येक पाटीवर एक पंच असून मृदंग्याबरोबर एक पंच सारखा पळत असतो.

ह्या खेळानें व्यायाम चांगला पूर्ण होऊन आंगीं चापल्य, चाणाक्षपणा येतो. संघश: काम केल्यानें वर्तनास शिस्तीचें वळण लागतें. शारीरिक, नैतिक असे फायदे असल्यानें हा बिनखर्चाचा महाराष्ट्रीय खेळ सर्वांनीं खेळावा. अलीकडे ह्या खेळाचे सामने होत असल्यामुळें जे कौशल्य दाखविलें जातें त्याची योग्य संभावनाहि होते.

## दिवाळीचा सण

१. सामान्य विवेचन—सणाची आवश्यकता.
२. काळ-मर्यादा ३. पौराणिक कथा,
४. प्रचलित रूढी ५. त्याचा हेतु व बोध
६. सणाचा होत असलेला दुरुपयोग ७. त्याचा योग्य उपयोग कसा करावा?

मनुष्य हा उत्सवप्रिय प्राणी आहे. उत्सव करून आनंद करण्यांत त्याला मजा वाटते. मानवी आयुष्य म्हणजे सर्व कष्टमयच असतें. सुखाचा भाग असा फार थोडा. तेव्हां अशा कष्टपूर्ण आयुष्यामध्यें मनुष्य सुखाचे क्षण शोधीत असतो. अन्धःकारव्याप्त प्रदेशांत प्रकाशाच्या किरणांनीं मन उल्हसित होतें. उत्सवांनीं त्रस्त मनाला थोडेंसें समाधान होतें. दीपावली हा अशा प्रकारचा सण आहे.

हा सण आश्विन महिन्याच्या शेवटीं येतो. ह्याची मर्यादा वद्य १३ पासून कार्तिक शुद्ध २ पर्यंत म्हणजे सहा दिवसांची असते. शास्त्रोक्त रीत्या पाहूं गेलें तर हा सण तीन दिवसांचा आहे. तथापि बलिप्रतिपदा आणि यमद्वितीया यांत समाविष्ट केल्या आहेत. धनतेरस, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज हे दिवस ह्यांतील मुख्य होत.

ह्या सणासंबंधीं दोन कथा प्रचलित आहेत. एक हैमराजाच्या मुलाच्या अपमृत्यूसंबंधीं व दुसरी नरकासुराच्या वधासंबंधीं. हैमराजाचा मुलगा लग्नानंतर चौथ्या दिवशीं सर्पदंशानें मरावयाचा होता. परंतु यमदूतांना त्याची दया येऊन त्यांनीं त्याचें प्राणहरण केलें नाहीं; आणि हें आश्विन वद्य १३ स घडलें. तेव्हांपासून प्रदोषकालीं जो पांच दिवस दीपोत्सव करील त्याला अपमृत्यु येणार नाहीं असा यमराजानें वर दिला. प्राग्ज्योतिषपूरचा राजा नरकासूर फार उन्मत्त झाला. त्यानें सोळा सहस्र उपवर कन्या कैद करून त्यांच्याशीं विवाह करण्याचा निश्चय केला. श्रीकृष्णाला हें कळलें आणि त्यानें त्याचा वध आश्विन वद्य १४ स केला. त्या युद्धाचें स्मारक म्हणून हा उत्सव करतात.

ह्या सणांत अभ्यंगस्नान, दीपोत्सव, गोक्रीडन, लक्ष्मी—सरस्वतींचें पूजन, भाऊबीज इत्यादि विधि होतात. गोड, मिष्ट पदार्थांचें सेवन करितात. लहान मुलें संध्याकाळीं फटाके, चंद्रज्योती, बाण इत्यादि दारू उडविण्यांत गर्क अस-

तात. लहान-थोरांचे, स्त्रीपुरुषांचे अड्डे पडून निरनिराळे खेळ चाललेले असतात. व्यापारी लोक आपला वार्षिक आढावा काढून नवीन हिशेबाच्या वह्यांस आरंभ करितात. स्त्रिया रांगोळ्या काढून आपापल्या घरांचीं प्रवेशद्वारें सुशोभित करितात. स्त्रीपुरुष, लहानथोर सर्व मंडळी आनंदानें उत्सव साजरा करतात.

ह्या सणापासून लक्ष्मीचें व सरस्वतीचें पूजन, भावाबहिणींचें प्रेम, लवकर स्नान करण्याची संवय, सर्वांनीं मिळून इतर व्यवसायांतून वेळ काढून करावयाचा आनंद इत्यादि गोष्टी मनावर ठसल्याखेरीज रहात नाहींत. लहाना-थोरांत असणाऱ्या वयांच्या अंतरामुळें आचारविचारांमध्यें होणारी फारकत ह्या सणांतील परस्परांच्या वर्तनानें कमी होते. बंधुभाव, आप्तेष्ट—प्रेम वाढतें.

कांहीं लोक ह्या सणांत खाण्यापिण्याचा सुमार ठेवीत नाहींत. त्याचप्रमाणें द्यूतखेळांतहि मर्यादा न घातल्यानें आपलें धन गमावितात. तेव्हां सणाचा अतिरेक होऊं देऊं नये. ज्या उद्देशानें सण प्रचारांत आला त्याकडे दृष्टी ठेवावी आणि समाजांत ऐक्य वाढेल अशा रीतीनें त्याचा उपयोग करून घ्यावा.

खालीं दिलेल्या निबंधांचे आराखडे पूर्ण करा.

## होलिकोत्सव

१. उपोद्घात—सामान्य विवेचन; २. काळ—फाल्गुन पौर्णिमा, धूलिवंदन, रंगपंचमी. ३. ऐतिहासिक—ढुंढा राक्षसीचा वध, मदनदाह. ४. धार्मिक विधि—होलिकापूजन; एरंड, ऊस, नैवेद्य, धूलिवंदन. ५. अनिष्ट प्रकार—शिविगाळी, बीभत्स शब्द इ. इ. ६. योग्य उपयोग—होलिकासंमेलन, मुलांचे खेळ, सामने.

## दसरा, विजयादशमी

१. काळ—नवरात्राचा शेवटचा दिवस, आश्विन शुद्ध १०. २. ऐतिहासिक—असुरयुद्धाचा शेवट, देवांचा जय. मराठेशाहींत युद्धाला प्रस्थान ठेवण्याचा दिवस. ३. धार्मिक—सरस्वतीपूजन, हत्यारपूजा, आपटापूजन, सोनें वांटणें, सीमोल्लंघन. ४. उपयोग—बंधुभाववर्धन इ. इ.

## पाडवा ( वर्षप्रतिपदा )

१. काळ—चैत्रप्रतिपदा, वर्षारंभ. २. ऐतिहासिक—रामाराज्योत्सव, अभिषेक, श्रीराम दक्षिणेहून परत आले. ३ धार्मिक—पूजा, गुडीतोरणें, लिंब खाणें, पूजन. ४ उपयोग.

## मोहरमचा सण

१. सणाचा अर्थ.
२. ऐतिहासिक आख्या, सणाबद्दल.
३. सणाबद्दल सध्यां प्रचारांत असलेली रूढी.
४. ताबूत.
५. फायदे.

हा मुसलमानी लोकांचा मुख्य सण आहे. ज्या मोहरम महिन्यांत हा सण पाळला जातो त्या महिन्याच्या नांवावरून ह्या सणालाहि मोहरम म्हणतात. त्या महिन्यांतील दहावी तारीख ह्या सणांतील मुख्य दिवस होय.

ही मोहरमची दहावी तारीख म्हणजे अलीचा सर्वांत लहान मुलगा जो हुसेन त्याची पुण्यतिथि होय. ह्याच दिवशीं तो मारला गेला. त्याच्या मृत्यूची हकीकत मोठी हृदयद्रावक आहे. इ. स. ६६१ सालीं तो आपलें कुटुंब आणि अनुयायी ह्यांच्यासह खलीफतबद्दल आपला हक्क सांगण्याकरितां ज्या वेळीं दमास्कस शहरीं जाण्यास निघाला त्या वेळीं त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या सैन्यानें त्याला वेढा दिला आणि तो व त्याचे साथीदार ह्यांचे खून केले. शिया मताचे मुसलमान हुसेन याला पहिला खलिफा मानतात. सुनी मताचे मुसलमान त्याला चौथा खलिफा मानतात. महंमद जो धर्मसंस्थापक त्याच्या मागाहून हा आला. त्याचा अमानुष रीतीनें बळी पडला. तेव्हां त्याच्या स्वार्थत्यागाच्या आहुतीबद्दल मोठ्या सन्मानानें हा दिवस पाळला जातो.

हा सण दहा दिवस पाळतात. पहिल्या दिवशीं कत्तलकी रात असते. त्या रात्रीं कुदळ मोठ्या धार्मिक विधीनें टाकून खळगा खणतात व त्यामध्यें अग्नि टाकतात. दहा दिवस नाना प्रकारचे खेळ खेळतात. पुष्कळ लोक नाना प्रकारचीं सोंगें घेतात. त्या सर्वांत वाघाचें सोंग पहाण्यासारखें असतें. कांहीं लोक आपला नवस फेडण्याकरितां वाघाचीं सोंगें घेतात. वाघाचें शेंपूट दुसराच धरतो व तो मनुष्य मोठा आविर्भाव आणून वाघासारखीं पाऊलें टाकीत टाकीत चालत जातो. पुष्कळ लोकांना पीर देव नवसाला पावत असल्यामुळें ते भक्तीनें भजतात. कोणी लिंबू, कोणी मलिदा, कोणी नारळ, कोणी नाल असे नाना प्रकारचे जिन्नस देवाला वाहतात. लहानथोर सर्व हातागळ्यामध्यें रंगीत सूत बांधून फकीर होतात व गांवांतून फकिरी मागतात त्या दिवशीं जें कांहीं मिळेल त्याचा संध्याकाळीं मलिदा तयार करतात व सर्व एकत्र मिळून

खातात. मुसलमान लोकांचा हा सण असल्यामुळें ते उत्तम कपडे घालून प्रार्थना करण्यास जातात.

ह्या सणांतील मुख्य कार्य ताबूत तयार करणें होय. सर्व कौशल्य ह्या ताबुतामध्यें दिसून येते. पुष्कळ रंगांचे कागद, कांचा, नाना प्रकारची नक्षी ह्यावर दिसते. ह्याला आकार त्यांच्या मशिदीचा असतो. आंतमध्यें पीर असून बाहेर शोभादायक मनोरे वगैरे असतात. असे ताबूत पुष्कळ करतात. त्यांपैकीं जो मुख्य असेल त्याच्याकडे सर्व ताबूत येतात आणि नंतर तेथून मोठी मिरवणूक निघते. सर्व मिरवणूक कोठें तरी नदीतळयावर नेतात आणि तेथें ते ताबूत पाण्यांत बुडवितात व नंतर त्यांचे अवशेष घेऊन कांहीं धार्मिक गाणीं म्हणत लोक परत येतात. अशा रीतीनें हा सण समाप्त होतो.

मनाला आल्हाद होणें, दुःखपूर्ण जगामध्यें कांहीं सुखाचा क्षण मिळणें, धर्मभावना जागृत होणें, बंधुभाव वाढणें इत्यादि ह्या सणापासून फायदे आहेतच. परंतु हिंदु लोकहि ह्या सणांत मुसलमानांच्या बरोबरीनें मोठ्या धर्मश्रद्धेनें भाग घेतात. हिंदुस्थानांत हिंदुमुसलमानांची एकी होण्याच्या दृष्टीनें ह्याचा उपयोग करून घेतां येण्यासारखा आहे.

## धरणीकंप

१. धरणीकंपाचा भयंकरपणा दाखविणारीं कांहीं उदाहरणें. २. त्याचीं कारणें व इतर स्वरूपें. ३. त्याचे इतर परिणाम. ४. दगडी कोळसा.

धरणीकंप हा एक अतिशय भयंकर स्वरूपाचा ईश्वरी उत्पात आहे. लाखों माणसें, जनावरें, हजारों वर्षांचें मानवी कौशल्य सर्व एका क्षणांत नाहींसें होतें. आतां आहे आणि एका घटकेनें नाहीं अशी एकदम स्थिति होऊन जाते. याकोहामा शहरीं असाच एक भूकंपाचा धक्का बसला आणि सर्व रहिवासी एकदम रसातळाला गेले. लिस्बन शहरच्या शहर सर्व एकदम भूकंपानें गडप झालें. हा धक्का सर्व जगभर थोड्या अधिक प्रमाणानें जाणवला. कलकत्ता शहरीं एकदां सूक्ष्म प्रमाणावर रात्रीं दहाच्या सुमारास धक्का बसला. त्या वेळीं सर्व लोक हवालदील झाले. सर्वजण निजण्याच्या बेतांत असतांना एकदम भिंति वांकडया कललेल्या दिसूं लागल्या; जिन्नस वस्तू एकमेकांवर आदळूं लागल्या; भिंतीवरच्या तसबिरी वांकडया झाल्या; खुंट्या तिरकस दिसूं लागल्या. लोक एकदम घराचे बाहेर

८५०२९ आभा २०४

पडून प्राण वाचविण्यासाठीं रस्त्यावर पळत सुटले. एकच गोंधळ झाला. धक्का अगदीं थोडा वेळ, कांहीं सेकंदच टिकला. परंतु त्याने लोकांची इतकी तिरपीट उडाली. मग भयंकर उत्पाताच्या वेळीं लोकांची काय स्थिति होत असेल ?

धरणीकंपाचें कारण पृथ्वीच्या पोटांत असलेली उष्णता होय. त्या उष्णतेनें पृथ्वीच्या पृष्ठभागाला भेगा पडतात. समुद्राच्या पाण्यावर ज्याप्रमाणें लाटा उत्पन्न होतात त्याप्रमाणें जमिनीच्या पृष्ठभागावरहि उष्णतेमुळें लाटा उत्पन्न होतात. ज्वालामुखी पर्वतांचीं जीं कारणें तींच भूकंपांचीं कारणें होत. ज्या महासागराची खोली जास्त त्या महासागराभोंवतीं ज्वालामुखीचें वलय असतें. कारण पाण्याखालील जमिनीची जाडी फार नसल्यामुळें तिला भेगा तेव्हांच पडतात. भेगा पडल्या कीं समुद्राचें पाणी आंत जातें. त्याची नंतर वाफ बनते. ती वाफ बाहेर वाट फोडूं पहाते व भूकंप अथवा ज्वालामुखी ह्याच्या मार्गानें बाहेर येते. ज्वालामुखीच्या आसपास धरणीकंपाचे धक्के बसतात.

जपानांतील लोकांवर हें अरिष्ट फार वेळ ओढवतें. बिचाऱ्यांना सारखे धरणीकंपाचे धक्के बसून हाल सोसावे लागतात. टोकियो शहरीं असाच एक धक्का बसून सर्व शहराची नासाडी झाली. असले उत्पात सारखे उद्भवतात म्हणून तेथील लोक घरें सुद्धां दगडाविटांचीं बांधत नाहींत. घरांच्या भिंती कागदाच्या जाड पुष्टापत्राच्या उभारतात. कांहीं ठिकाणीं उन्ह पाण्याचे झरे असतात तेहि पण ह्या उष्णतेचे परिणाम होत. ज्वालामुखी, भूकंप, उन्हाळीं, हे तिन्हीं चमत्कार पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेमुळें घडून येतात.

धरणीकंपानें अरण्येंच्या अरण्यें गडप होऊन जातात. झाडें, वनस्पती, जनावरें, जीवजंतु पार सर्व एकदम नाहींशीं होतात. पृथ्वीच्या पोटांत जास्त उष्णता असल्यामुळें जीं झाडें व वनस्पती गडप होतात त्यांच्यावर परिणाम होऊन त्यांचा कोळसा बनतो व त्यांच्यावर सर्व बाजूंनीं इतकें दडपण बसतें कीं, त्या कोळशाला दगडासारखा कठीणपणा येतो. ह्यालाच दगडी कोळसा म्हणतात. हा येवढाच काय तो फायदा म्हणावयाचा असेल तर म्हणावा. नाहीं तर ह्या उत्पातापासून मनुष्याला संकटेंच जास्त ! जीविताची, वित्ताची, त्याच्या एकंदर कमाईची खराबीच होते. त्यापासून फायदा तो काय असणार ? आपल्या हिंदुस्थान देशाला धरणीकंपाचे फारसे धक्के बसत नाहींत ह्यांत

ईश्वराचे उपकार मानले पाहिजेत. नाहींतर जपानसारखी स्थिति झाली असती तर काय करावयाचें ?

## अभ्यास ३

१. सविस्तर वर्णन करा.

१. शालागृह, क्रीडांगण.

२. घोडा, कुत्रें, उंट, मयूर, सिंह, कावळा, सावण, मधमाशी, चिमणी.

३. ओक, सागवान, गुलाब, देवदार, कापूस, लिंब.

४. टपालशिपाई, पोलीस, बालवीर ह्यांचा पोषाख.

५. कोळसा, हिरा, पाणी, समुद्र, मेघ, पाऊस, वादळ, भरती, ज्वालामुखी.

६. गंगा, कृष्णा, मुंबई, पुणें, अंजठा, नाशीक, माझी जन्मभूमी.

७. खोखो, क्रिकेट, फुटबॉल, हुतुतु.

८. नाताळ, रामनवमी, कृष्णजन्म.

२. वर्णन करा.

१. तुमचा बाग. शालागृहापर्यंतचा प्रवास, नदींतून प्रवास.

२. सहलीची, फिरण्याची जागा, चौपाटी, पुण्यांतील बागा.

३. आकाशाचे देखावे ( रात्रीं, दिवसा, पाऊस पडतांना. )

४. तुम्हीं पाहिलेली एखादी भव्य इमारत. उ. ताजमहाल.

५. तुमच्या खोलीच्या खिडकींतून दिसणारा बाहेरचा देखावा.

६. किनाऱ्यावरून दिसणारा समुद्राचा देखावा.

३. वर्णनात्मक निबंध लिहा.

१. तुमच्या घरांतील तान्हें मूल, पावसाळ्यांतील दिवस.

२. तुम्हीं पाहिलेली एकादी सुंदर वस्तू.

३. तुमची भावली ( मुलीकरितां ).

४. चिकार भरलेला रेल्वेचा डबा, पडीक घर, सायंकाळ, सूर्यास्त.

५. अमेरिकेचा शोध, छापण्याच्या कलेचा शोध.

६. तुम्हीं पाहिलेला नाटकाचा खेळ, गायनाचा जलसा.

७. हिंवाळा अथवा उन्हाळा ह्यांमधील एक दिवस.

८. आयुष्यांतील अतीशय महत्त्वाचा दिवस.

९. तुमचें आवडतें मासिक पुस्तक, तुमचा आवडता खेळ.

४. वर्णनास योग्य विषय.

कारखान्यास भेट, आगींतून सुटका, सणाचा अथवा जत्रेचा बाजार, मार्केट, भाजीबाजार, खेडेगांवांतील जत्रा, मर्दुमकीचे सामने, दिवाळीची सुटी—पहिला दिवस, चित्रपट, प्रसिद्ध स्मारक, देवालय, सुंदर चित्र, हिरवेंगार मैदान, चांदणी रात्र, पावसाची संध्याकाळ, खेडेगांवांतील एक दिवस, ग्रामोफोन, ट्रॅम, विमान.

---

## पाठ ८

# कथनात्मक अथवा वृत्तांतात्मक निबंध

आतां कथनात्मक अथवा वृतांतात्मक निबंधाचा विचार करूं. गोष्टी सांगतां येणें, वर्णनात्मक निबंध लिहितां येणें, ही ह्या निबंधाची पूर्वतयारी ह्मणावयास हरकत नाहीं. कारण कथनात्मक निबंध ह्या दोहोंचा मिळून झाला आहे. कथनात्मक निबंधांत प्रथम एक कांहीं तरी कथासूत्र असतें आणि दुसरें त्या कथासूत्राच्या भोंवतीं बराचसा भाग वर्णनाच्या स्वरूपाचा असतो. वर्णन तीन प्रकारचें असतें:—१. वस्तुवर्णन. २. क्रियावर्णन. ३. प्रसंगवर्णन. मागील वर्णनात्मक निबंधाचें प्रकरण केवळ वस्तुवर्णनापुरतेंच आहे असें समजावें. त्यामध्यें वस्तूच्या योग्य वर्णनाकडेच निव्वळ दृष्टि ठेवली होती. येथें क्रियावर्णन आणि प्रसंगवर्णन ह्यांचा विचार करावयाचा आहे. ह्या कथनात्मक निबंधांत विषय केवळ वस्तूच असतील असें नाहीं; तर वस्तूंची हालचाल, त्याच्या मार्फत होणारीं कामें, त्यामुळें घडून येणारे प्रसंग इत्यादिकांचें वर्णन येतें. त्या निरनिराळ्या क्रियांच्या प्रसंगांचें क्रमानें वर्णन व सर्वांचें मिळून प्रमाणशीर एकीकरण हें ह्या निबंधांत साधावें लागतें. सर्व प्रसंग जसा कांहीं प्रत्यक्ष घडत आहे, कोणी तरी त्यांतून जात आहे, तो अनुभवीत आहे, हें मनाला पटण्याइतकें सत्य त्यांत उतरलें पाहिजे.

कथासूत्र जें सांगावयाचें त्याचे दोन प्रकार पडतात. पहिल्या प्रकारांत लेखक आपल्या स्वतांचे अनुभव नमूद करतो. स्वतः त्या प्रसंगांत जसा कांहीं भाग घेतला आहे व जें कांहीं घडलें तें सर्व प्रथम पुरुषांत सांगतो.

दुसऱ्या प्रकारांत लेखक त्या प्रसंगाबद्दल दुसऱ्याचें अनुभव नमूद करतो. त्यांत लेखकाचा कांहीं संबंध नसतो. त्रयस्थ म्हणून जें कांहीं दिसेल तें तो सांगतो.

कथनविषयक निबंधांत पहिल्या पॅरिग्राफमध्यें खालीलपैकीं एक गोष्ट द्यावी:—

१. जेथें प्रसंग घडला असेल त्या स्थानचें वर्णन. पानिपतच्या लढाईच्या वर्णनांत पानिपतचें वर्णन द्यावें.
२. त्या प्रसंगामध्यें ज्यांनीं मुख्य भाग घेतला त्या व्यक्तींचें वर्णन. उः—सदाशिवराव, विश्वासराव, अबदाली, इ. पैकीं कोणाचें तरी वर्णन द्यावें.
३. ज्या प्रसंगामुळें पुढील हकीगत घडून आली, त्या मूळ प्रसंगाचें वर्णन. उदाः—अबदालीशीं झालेलीं पूर्वीचीं युद्धें थोडक्यांत द्यावीं.
४. कांहीं तरी चमत्कारिक, चित्ताकर्षक तऱ्हेनें आरंभ करावा. उः—दिल्लीचें तख्त फोडल्याचा परिणाम काय भयंकर झाला? त्याचें वर्णन द्यावें.

शेवटचा पॅरिग्राफः—सर्व प्रसंगाचा शेवट सावकाश करीत आणावा. कधीं कधीं त्यापासून नैतिक उपयोग, उदार चरित्रापासून घेण्याजोगा बोध शेवटीं द्यावा.

कथनात्मक निबंधांत प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें आणि महत्त्वाचे ऐतिहासिक प्रसंग ह्यांचीं वर्णनें येतात. पौराणिक, ऐतिहासिक, काल्पनिक कथांचाहि अन्तर्भाव ह्यांत होतो. एकाद्या प्रसिद्ध पुरुषाचें चरित्रावर निबंध लिहावयाचा असेल तर, त्याचीं खालीं दिलेल्याप्रमाणें सदरें पाडावीं.

१. चरित्रें:—

१. जन्म, कधीं, कोठें, कोणत्या वंशांत ? कोणत्या परिस्थितींत ?
२. पूर्वज, कुलाबद्दल माहिती.
३. बालपण, शिक्षण, विद्या कोणती? गुरु कोण ?
४. कौटुंबिक माहिती.
५. मुख्य गोष्टी आयुष्यांत कोणत्या घडल्या ? व्यवसाय.
६. मृत्यु केव्हां, कोठें ? परिस्थिती.
७. चरित्राचें महत्त्व.
८. चरित्रापासून शिकण्याजोग्या गोष्टी.

२. युद्धः—

१. कारणें–दूरचीं, जवळचीं.
२. स्थळ–काळ, दोन्ही बाजू, पक्ष.
३. मोहिमा, लढाया, हल्ले, साहित्य, सामर्थ्य.
४. जय किंवा पराजय.
५. कारणें.
६. परिणाम–तात्कालिक, कायमचा, समाजावर, राष्ट्रावर.

३. ऐतिहासिक प्रसंग—

१. प्रसंगापूर्वीची देशाची, समाजाची स्थिति.
२. त्यांतून हा प्रसंग उद्भवण्याचीं कारणें, दोहोंचा संबंध.
३. प्रसंगांतील निरनिराळ्या बाबी, त्यांचें यथाक्रम वर्णन, त्यांचीं कारणें, त्यांचा काल, त्यांचा परस्पर संबंध.

४. त्यांमध्यें भाग घेतलेल्या व्यक्ति, त्यांचा परस्पर संबंध, त्यांनीं केलेली कामगिरी.

५. त्या प्रसंगाचा शेवट, त्याचा राष्ट्रावर तात्कालिक व कायमचा झालेला परिणाम.

६. त्या प्रसंगाबद्दलचें इतर इतिहासकारांचें मत, तुमचें स्वतःचें मत, त्याचीं कारणें.

७. त्यापासून घेण्याजोगा बोध.

**४. राजवट—**

१. अभिषेक होण्याच्या वेळचें वर्णन.

२. देशाची त्या वेळची परिस्थिति.

३. नीति, राजकारण, स्वभाव.

४. मुख्य मुख्य गोष्टी व प्रसंग.

५. मृत्यु व परिणाम.

# कांहीं निबंधांचे आराखडे

## १ देवी अहल्याबाई

१ बाईचें माहात्म्य व इतर थोर महात्म्यांमध्यें त्यांची गणना. २ बालपण, लग्न, अकालीं वैधव्य, संतति. ३ राणी झाल्यानंतर रोजची दिनचर्या—नामस्मरण, पुराणश्रवण, नित्यदान, भोजन, स्तोत्रपाठ, सरकारी काम. ४ फुरसतीच्या वेळेचा उपयोग—ईश्वरी भजन. ५ स्वभाववर्णन—प्रसंग पुत्राबद्दल, राघोबा पेशव्यांबद्दल. ६ कर्तव्यतत्परता, धर्मरति, न्यायप्रियता.

## २ समर्थ रामदास

१ जन्म—गांव जांब, वर्ष १६०८, मातापितरें (सूर्याजीपंत). २ बाळपण-मुंज, अध्ययन. ३ महत्त्वाचे प्रसंग—लग्नाच्या वेळची हकीगत "सावधान" शब्द ऐकल्याबरोबर समारंभांतून पळून गेले. ४ पुरश्चरण १२ वर्षें. ५ तीर्थयात्रा—प्रवासांतील अनुभव, अनुभवाचा मनावर परिणाम. ६ शिवछत्रपतींचो

भेट—दोघांच्या विचारानें झालेलें राजकारण. ७ ग्रंथसंपत्ति—त्याचें विशेषत्व-प्रवृत्तीपर, जोरदारपणा, कर्मपर ( दासबोध, मनाचे श्लोक, रामायण, करुणाष्टकें इ. इ. ) ८ त्यांची कामगिरी—धर्मप्रवृत्तिस्थापना, रामदासी पंथ, मठ.

## ३ विष्णुशास्त्री चिपळूणकर

१ जन्म—गांव पुणें, दिवस २० मे १८५०, वडील कृष्णशास्त्री. २ बाळ-पण—शिक्षण आजोबांच्या देखरेखीखालीं मॅट्रिक १८६५, बी. ए. १८७१. ३ ग्रंथलेखनाचे पहिले प्रयत्न—शालापत्रकांतील लेख, चालकत्व, कालिदास—भव-भूतीवरील लेखांनीं मिळालेली मान्यता. ४ निबंधमाला—विशेषत्व—भारदस्त, स्वतंत्र, प्रौढ, जोरदार, शुद्ध. आठ वर्षें चालविली. निबंधमालेनें मराठी भाषेत केलेली कामगिरी. ५ त्यांचे इतर व्यवसाय—सरकारी नोकरी—नंतर न्यू इंग्लिश स्कूल, केसरी—मराठा वर्तमानपत्रें, किताबखाना, चित्रशाळा. ६ स्वभाव व वैशिष्ट्य—मनमोकळेपणा, धडाडी, विद्याव्यासंग, देशप्रीति, शुद्ध आचरण व रहाणी. महाराष्ट्रावर ठसा.

## ४ सिंहगडची लढाई

१ जिजाईचें कोंडाणा पहाणें, त्यावरून सुचलेली कल्पना. कोंडाण्याचें ठिकाण, शोभा, महत्त्व, गडाची माहिती. २ पूर्वतयारी—तानाजीस निरोप—मुलाच्या लग्नाची तयारी, त्याचा निश्चय, मुख्य व्यक्ति-तानाजी, सूर्याजी, शेलारमामा. ३ लढाई—दोन्ही पक्ष, त्यांचें बलाबल, तानाजीचें सैन्य, शिस्त, उदयभानूचें सैन्य, शस्त्रांची माहिती, घोरपड (यशवंती), पहिला अपशकुन, मावळ्यांचें वर चढणें, छापा घालणें. ४ लढाईचें वर्णन तानाजीचा पराक्रम, पहारा कापणें, उदयभानूशीं युद्ध, दोघांचें संभाषण, तानाजीस वार, सूर्याजी येतो. त्यानें कापलेला दोर, तानाजी पडल्यावर सैन्यांत झालेला गोंधळ व पळापळ, सूर्याजीचें आवेशयुक्त भाषण, लढाई, जय, चिन्हें, निशाणें फडफडलीं. ५ उपसंहार—शिवाजीस व जिजाईस वाटलेला आनंद व खेद. जयाप्पाचें लग्न, सिंहगडचें महत्त्व. स्वामि-कार्यार्थ सेवकाचा आत्मयज्ञ.

---

पुढें कांहीं कथानात्मक निबंध लिहून दाखविले आहेत. ते नमुन्या-साठीं पहावे.

## उत्तरध्रुवाची सफर

१ अज्ञात क्षेत्रांत जाण्याचीं कारणें. मनुष्याची चौकसबुद्धि, जिज्ञासा, धाडसी बुद्धि. २ डॉ. नानसेनची सफर. ३ पियरीनें केलेली सफर. ४ दक्षिण ध्रुवाच्या सफरी. ५ अॅडमंडसेन, डॉ. स्कॉट.

अज्ञात क्षेत्राचा शोध लावणें हें मनुष्याच्या स्वाभाविक वृत्तीस अनुसरून आहे. गूढें उकलणें, अगम्याचा शोध लावणें, कठिण सिद्धांत सोपे करणें, हें पुष्कळ लोकांना आवडतें. अशा स्वाभाविक चिकित्सक किंवा चौकस बुद्धीस साहसी बुद्धीची जोड मिळाली म्हणजे अशीं ध्रुवाच्या सफरीसारखीं अचाट कृत्यें मनुष्याच्या हातून होतात. पृथ्वीवरील अज्ञात प्रदेशाचे जे शोध लागले ते ह्याच वृत्तीमुळें लागले व ह्याच वृत्तीनें प्रेरित होऊन गेलीं दोन शतकें निरनिराळ्या धाडशी वीरांनीं ध्रुवांचा शोध लावण्याचा प्रयत्न केला. उत्तर ध्रुव काय किंवा दक्षिण ध्रुव काय, त्यांत रम्यता काय असेल ती असो. त्याबद्दल कांहीं धाडशी महात्म्यांत विशेष ओढा दिसतो खरा. जेथें कोणासहि जातां आलें नाहीं तेथें आपण जावयाचें व अशा रीतीनें अग्रमान मिळावयाचा हीच वृत्ति ह्या धाडसांच्या मुळाशीं असावी असें खात्रीनें वाटतें.

उत्तर ध्रुवाकडे जाणारा पहिला धाडशी नावाडी एक पियरी नांवाचा अमेरिकन होता. १८९३ मध्यें डॉ. नानसेन नांवाच्या एका नार्वेमधील नावाड्याची सफर महत्त्वाची समजली पाहिजे. कारण ह्या गृहस्थानें पुष्कळ वर्षे त्या प्रांतांत प्रवास करून एक सिद्धांत बांधला, तो असा कीं, उत्तर ध्रुवाच्या आसपासच्या प्रांतांत बर्फांत जर एकादें गलबत रुतविलें तर तें हळूं हळूं त्याच बर्फाबरोबर ध्रुवाकडे वाहत जाईल. त्याप्रमाणें एक जहाज मुद्दाम बांधवून त्यानें सोडलें. तें त्याच्या अपेक्षेप्रमाणें कांहीं तरी पंधरा महिने वाहत गेलें. परंतु तें पुढें जाईना. तेव्हां त्यानें कांहीं कुत्रीं व माणसें बरोबर घेऊन पायीं प्रवास सुरू केला व ध्रुवाच्या बराच जवळ गेला. परंतु त्याच्याच्यानें पुढें जाववेना.

दुसरी धाडसाची सफर अमेरिकन खलाशी पियरी ह्यानें १९०९ सालीं केली. त्यानें आपल्या बरोबर कांहीं एस्किमो जातीचे लोक व कांहीं कुत्रीं बरोबर घेतलीं आणि निघाला आणि एक महिन्यानें तो ध्रुवाजवळ जाऊन पोंहोंचला असें म्हणतात. तेथें त्याला सर्व बर्फमय झालेलें आढळून आलें.

दक्षिण ध्रुवाकडे अशाच धाडशी वीरांनीं १९११–१२ मध्यें सफरी केल्या. पियरी जसा उत्तर ध्रुवाकडे गेला तसा एक अॅडमंडसेन नांवाचा नॉर्वेजियन दक्षिणेकडे निघाला. त्याच वेळीं कॅप्टन स्कॉट नांवाचा एक इंग्लिश त्या सफरीस निघाला. वाटेंत खूप त्रास, संकटें, हाल सोसून अखेर ते तेथें एकदाचे पोहोंचले. परंतु त्याच्यापूर्वी एक महिना अॅडमंडसेन हा तेथें येऊन गेला होता. त्यामुळें त्यांचे सर्व श्रम व्यर्थ झालेसें त्यांना वाटलें. कॅप्टन स्कॉटला परत येतांना पराकाष्ठेचे हाल सोसावे लागले. तो व त्याचे साथीदार हे सर्व बर्फाच्या वादळांत सांपडून प्राणास मुकले. अशा रीतीनें ह्या धाडशी वीरांचा अंत झाला.

इतकी जरी संकटग्रस्त अशी सफर असली तरी प्रवासी लोकांना त्यांची चौकस बुद्धि स्वस्थ वसूं देत नाहीं. कित्येक प्रवासी प्राणास मुकताहेत तरी ध्रुवास सफरी करून शोध लावण्याची प्रवृत्ति कांहीं कमी होत नाहीं.

## जादूचा खेळ

१. सामान्य माहिती. एका खेळाचें वर्णन. २ जादुगारानें केलेले कांहीं खेळ, साप, मुंगुस, पत्ते, पेले. ३ आंब्याचें झाड. मुलगा नाहींसा करणें. ४ आश्चर्यकारक–आंगठी, अत्तरें.

जादुगार प्रत्येक देशांत आहेत. नजरबंदीचीं कामें प्रत्येक देशांत केलीं जातात. हिंदुस्थानांतील जादुगार आपल्या धंद्यांतील कौशल्याच्या बाबतींत कांहीं कमी नाहींत. त्यांना आपल्या धंद्यांत इतकीशी पद्धत ठेवतां येत नाहीं, एवढाच काय तो त्यांचा कमीपणा. नाहीं तर हातचलाखी, नजरबंदी वगैरे बाबींत हे कोणत्याहि प्रकारें कमी नाहींत, हें त्यांचे खेळ पाहून मनाला सहज पटतें.

एकदां एक म्हातारा जादुगार खेळ करीत होता. त्या म्हाताऱ्या मनुष्यानें एक वस्त्र भोंवतीं गुंडाळलें होतें. हातांत एक पुंगी घेऊन तो कधीं वाजवी तर कधीं आपल्या घेडगुजरी भाषेंत बोले. तो बोलत असतांना त्याचा साथीदार ढोलगें वाजवीत होता. प्रथम प्रथम साप, नाग, मुंगुस वगैरे खेळवणें झाल्यानंतर त्यानें पत्त्याचे व पेल्याचे खेळ केले. सापाशीं खेळल्यानें लोकांच्या मनावर चांगला परिणाम झाला. त्यानें पेल्यामध्यें पाणी घालून तें एकमेकांत मिसळून निरनिराळ्या रंगाचें पाणी केलें. एकाला चहा तर दुसऱ्याला श्रीखंड तर तिसऱ्याला वासाचें तेल तर चवथ्याला चुरमुरे, पाचव्याला कागदाचे

तुकडे असे निरनिराळे पदार्थ उत्पन्न करून त्यानें दिले. त्याचे एकेक चमत्कार पाहून मुलें व सर्व लोक आश्चर्यानें थक्क होऊन गेले. पत्त्याचेहि त्यानें निरानिराळे खेळ करून दाखविले.

ह्यानंतर त्यानें आंब्याचें झाड तयार करून त्याच्या निरनिराळ्या अवस्था, मोहोर, कैरी, आंबा वगैरे सर्व दाखविल्या व सर्वांना थक्क केलें. प्रथम त्यानें एक कोय घेतली आणि ती मातींत रोवून त्यावर एक वस्त्र झांकून घेतलें. त्या वस्त्राच्या आंत कांहीं तरी हातचलाखी करून प्रथम रोपडें दाखविलें. नंतर क्रमानें मोहोर, हिरवा व पिकलेला आंबा हे दाखविले. ह्यानंतर त्यानें एका मुलाला पेटींत घातलें आणि पेटीभोंवतीं पुंगी व ढोलगें वाजवून त्या मुलाला गडप केलें. कोणालाहि तो मुलगा पेटींत दिसेना. पुन्हां आव, आव, म्हटल्याबरोबर तो मुलगा पेटींत आला! दुसऱ्यांदा त्यानें त्या मुलास एका टोपलींत घातलें व त्यावर एक वस्त्र झांकण घातलें. नंतर त्यानें तलवारीनें त्या टोपलींत भोसकलें व टोपली सर्वांना मोकळी दाखविली! पुन्हां 'आव आव' करतांच मुलगा आपला त्या लोकांच्या जमावांतून एकदम बाहेर आला.

सर्वांत आश्चर्यकारक करामत त्यानें एका आंगठीची केली. प्रथम एक आंगठी एकाजवळून मागून घेतली व ती एका हातरुमालाच्या टोंकास बांधून तें टोंक एकास धरावयास सांगितलें. नंतर ती आंगठी त्या रुमालांत गुंडाळून तेथेंच खालीं टाकावयास सांगितली. पुन्हां जों हातरुमाल उचलला तों त्यांत आंगठी नाहीं! आंगठी गेली कोठें? कोणास उमगेना! तेथेंच एक लिंबु पडलें होतें तें त्यानें उचलून फोडण्यास सांगितलें. तें फोडतां क्षणींच आंत आंगठी! ह्यानंतर त्यानें जवळची कांहीं थोडीशी माती घेतली, हातावर ती चोळली आणि ती फेकून दिली. नंतर केवळ हातावर हात मारून—टाळी वाजवून—प्रत्येक मनुष्या-जवळ जाऊन आपल्या हाताचा वास त्यांना दिला. प्रत्येकाच्या समोर टाळी वाजवून त्याला वास द्यावयाचा. प्रत्येकास वास निराळा, कोणास हिना, तर कोणास वाळा, तर कोणास गुलाब, अशीं नानाप्रकारचीं पंधरा वीस अत्तरें लावलीं. एकास तर त्यानें अत्यंत दुर्गंधयुक्त अशी घाण दिली. सर्व लोक आश्चर्यानें थक्क झाले. नंतर जमलेल्या मंडळींपैकीं कोणी कांहीं पैसे देऊन त्याची संभावना केली. त्याच्या करामतीच्या मानानें त्याला पैसे मात्र कमी मिळाले, तरी पण तो खूष होऊन आपली कावड खांद्यावर घेऊन निघून गेला.

## श्रीशिवछत्रपती

१. घराणें, मातापितरें व जन्म. २. बालपण, शिक्षण व चमत्कार. ३. त्यांच्यावर आलेलीं संकटें. ४. राज्यव्यवस्था. ५. स्वभाव.

श्रीशिवछत्रपती हे दक्षिणेंतील मराठी राज्याचे संस्थापक होत. ह्यांचा जन्म भोसल्यांच्या कुळांत इ० स० १६२७ सालीं शिवनेरी किल्ल्यांत झाला. ह्यांच्या वडिलांचें नांव शहाजी भोंसले. मातोश्रींचें नांव जिजाबाई. भोंसल्यांचें घराणें मूळ उत्तरेकडच्या शिसोदे घराण्यापैकीं रजपूत असें समजतात. परंतु दक्षिणेकडे आल्यानंतर शहाजीराजे यांनीं दाक्षिणेतील विजापूरच्या दरबारचा आश्रय केला. पुढें कांहीं दिवस अहमदनगरच्या बादशहाच्या दरबारीं ते होते. शहाजीराजे शूर असल्यामुळें व बरोबर चांगली लढवय्यी अशी फौज असल्यामुळें त्यांच्या मदतीवर बादशहाची भिस्त असे. त्यांना नेहमीं मुलुखगिरी करण्याचा प्रसंग येत असल्यामुळें त्यांनीं आपलें कुटुंब जिजाबाई आणि मुलगा शिवाजी ह्यांना आपल्या पुणें प्रांतांतील जहागिरीवर ठेविलें व त्यांच्या व्यवस्थेस दादाजी कोंडदेव ह्यांची कारभारी म्हणून योजना केली. शहाजीराजे व त्यांची पत्नी जिजाबाई ह्यांचें पटेनासें झाल्यामुळें ही स्वतंत्र व्यवस्था त्यांनीं त्यांची लावून दिली असेंहि कांहीं इतिहासांत सांगितलें आहे.

तें कांहींहि असो. अशी स्वतंत्र व्यवस्था झाल्यावर जिजाबाईनें आपल्या मुलाच्या शिक्षणास आपणास वाहून घेतलें. ती स्वतः फार मानी, करारी व धार्मिक वृत्तीची स्त्री होती. तिनें दादोजींच्या मदतीनें शिवाजीचें शिक्षण पार पाडिलें. शिवाजीचा स्वभाव मूळचा युद्धप्रिय असल्यामुळें रामायण भारतांतील युद्धाच्या कथा त्याला फार आवडत. तसेंच त्याचें धार्मिक व नैतिक शिक्षणहि चांगलें झालें. सभोंवार म्लेंच्छांच्या अनीतीचा त्यांना वीट आला. गाई-ब्राह्मणांचा झालेला छळ त्याला पहावत नसे. मुसलमानांचीं कृत्यें पाहून त्याच्या आंगावर शहारे येत व त्यांचा प्रतिकार करण्याचें त्याचे मनांत वारंवार येई व तो तें करीतहि असे. लहानपणीं त्यानें मावळ्यांपैकीं पुष्कळ आपले संवगडी केले व पुढें त्यांच्या मदतीनें त्यानें दिवसेंदिवस आपल्या वडिलांसारखी मुलुखगिरी चालविली. तानाजी मालुसरे, एसाजी कंक, बाजी फसलकर हे त्याचे निस्सिम एकनिष्ठ असे मित्र होते. तोरणा किल्ला प्रथम घेऊन त्यानें आपलें स्वातंत्र्य

पुकारलें, व पुढें हळुहळू एक एक किल्ला हस्तगत करूं लागला. कांहीं किल्ले त्यानें स्वतः बांधिले.

शिवरायांचें जसजसें प्राबल्य वाढत चाललें तसतसें दक्षिणेंतील मुसलमानी बादशहांना फिकीर वाटूं लागली व त्यांचा उच्छेद करण्यासाठीं त्यांनीं पुष्कळ सरदार पाठविले. शाइस्तेखान प्रथम आला, परंतु एका रात्रीं पुण्यांत त्यांनीं अशी कांहीं दंगल उडवून दिली कीं, शाइस्तेखानाला आपला जीव वांचविण्यासाठीं पळ काढावा लागला! पळतां पळतां त्याच्या हाताचीं बोटें मात्र तुटून उडालीं. अफजुलखान असाच शिवाजीस मारण्यासाठीं अथवा जिवंत पकडण्यासाठीं विडा घेऊन आला. त्यानें वाईप्रांत उध्वस्त करून प्रतापगडाकडे आपला मोर्चा वळविला. हा जितका शरिरानें धिप्पाड तितकाच राजकारणांत कुशल होता. त्यानें राजकारण लढवून शिवाजीची आणि आपली भेट घडवून आणण्याचा घाट घातला. शिवाजी हें कारस्थान ओळखून आपणाकडून जय्यत तयारी ठेवून हत्यारें, वाघनखें, बिचवा वगैरे घालून तयार झाला. भेट होतांच व दगा होण्याचें चिन्ह दिसतांच शिवाजीनें त्याच्या पोटांत वाघनखें खुपसून त्याचा कोथळा बाहेर काढला. त्याच्या बरोबरच्या सैन्याची दाणादाण झुडपांत दडून राहिलेल्या मावळ्यांनीं केली. दिल्लीहून असेच दोन वीर त्यांचें पारिपत्य करण्याकरितां आले. त्यांच्या बरोबरच्या सैन्यापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं असें पाहून शिवाजीराजे मोठ्या धूर्तपणानें कांहीं अटींवर त्यांच्या हस्तगत झाले. पुढें ते दिल्लीपतीच्या कैदेंतून मोठ्या शिताफीनें सुटून आले. पुढें त्यांनीं पुष्कळ देश काबीज केले व पुष्कळ संपत्तीहि पैदा केली. राज्यांत स्थिरस्थावर झाल्यावर शिवरायांनीं शास्त्रोक्तरीत्या मोठ्या समारंभानें आपणांस राज्याभिषेक करविला ( सन १६७४ ).

शिवरायांनींच प्रथम राज्याच्या सोयीसाठीं अष्टप्रधान नेमून त्यांच्याकडे निरनिराळीं कामें सोंपविलीं. राज्यांतील जुलूम नाहींसा करून प्रजेला वेळेवर योग्य न्याय मिळण्याची व्यवस्था केली. आपल्या नोकर-चाकरांवर त्यांचा पूर्ण विश्वास असे. अशा रीतीनें चांगल्या प्रकारें राज्य करून त्यांचें १६८० सालीं देहावसान झालें. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव संभाजीमहाराज छत्रपती झाले.

शिवाजीमहाराजांचा स्वभाव त्यांच्या आईप्रमाणें करारी व मानी असे. वृत्ति फार धार्मिक असे. कोणाचाहि अपहार करण्याची दुष्ट बुद्धि किंवा दुष्ट दृष्टि

त्यांची नव्हती. त्यांना भवानी देवी प्रसन्न असे व त्यांना नेहेमीं साक्षात्कार होत असे असें म्हणतात. राज्य स्थापण्याच्या कामीं त्यांना महाराष्ट्रांतील विख्यात संत श्रीरामदास ह्यांची मदत झाली. किंबहुना मराठी राज्याची स्थापना ह्या दोघांनीं केली.

## सम्राट् अशोक

अशोक हा मौर्य घराण्यांत जन्मला. मौर्य घराण्याचा संस्थापक जो चंद्रगुप्त त्यानें आर्य चाणक्य ह्या ब्राह्मणाच्या साहाय्यानें नंदवंशाचा उच्छेद करून मगध देशावर आपलें राज्य स्थापिलें. चंद्रगुप्त ख्रिस्तपूर्व २९१ मध्यें मरण पावला. ह्याच चंद्रगुप्ताचा नातू अशोक. ह्याच्या वडिलाचें नांव बिंदुसार. ह्यानेंहि २० वर्षें राज्य केलें. अशोकच्या हातांत राज्यसूत्रें ख्रिस्तपूर्व २७१ मध्यें आलीं. गंगानदीच्या कांठीं असलेलें पाटलिपुत्र हें मौर्यांच्या राजधानीचें शहर होतें.

अशोकाच्या बाळपणाची विशेष माहिती नाहीं. त्याच्या पूर्ववयांत तो फार चैनी, ऐषआरामी होता. तो फार सुखलोलूप असे. महानसांत ( स्वयंपाकगृह ) पुष्कळ प्राण्यांचा संहार होत असे, असें तो आपल्या शिला-लेखांत म्हणतो. धार्मिक प्रवृत्ति त्याच्या उत्तर वयांत दिसते. ती प्रवृत्ति तरुणपणांत नव्हती. अहिंसा, प्राणीमात्रांवर दया वगैरे गुणांबद्दल तो फारशी क्षिति बाळगीत नसे.

अशोक हा हिंदुस्थानावरचा पहिला सम्राट् म्हणावयास हरकत नाहीं. ह्याच्या साम्राज्याचा विस्तार जास्त होता. पूर्वेस बंगालपासून पश्चिमेस काठेवाडापर्यंत, तसेंच उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस जवळ जवळ म्हैसूर-पर्यंत ह्याच्या राज्याचा विस्तार होता. काठेवाडांतील गिरनार पर्वत व पूर्वे-कडील गंजम जिल्हा ह्या दोन त्याच्या साम्राज्याच्या सीमा होत्या. चारी दिशांकडे प्रसिद्ध प्रसिद्ध ठिकाणीं त्यानें शिलालेख त्या त्या भाषांत खोदविले आहेत त्यावरून त्याच्या साम्राज्याच्या सीमा स्थूलमानानें ठरवितां येतात.

इतकें जरी त्याचें साम्राज्य विस्तृत होतें तरी त्याची व्यवस्था त्यानें उत्तम ठेविली होती. सर्व प्रजेला योग्य न्याय मिळण्याची व्यवस्था त्यानें केली होती. त्यामुळें जिकडे तिकडे सुख नांदत असलेलें दिसे. त्याच्या राजधानीजवळच्या प्रांतांवर त्याची स्वतांची देखरेख असे. दूरच्या प्रांतांवर त्यानें आपले विश्वा-

साचे असे प्रतिनिधी नेमिले होते. हे प्रतिनिधि त्याच्या कुटुंबापैकींच नातेवाईक होते. असें जरी होतें तरी त्यांच्यावर त्याची मोठी करडी नजर असे. त्यामुळें गैरव्यवस्था होण्यास अगदीं वाव नसे.

अशोक हा पहिला सम्राट् म्हणून प्रसिद्ध आहेच; परंतु त्यानें जो बुद्धधर्माचा प्रसार केला त्यावद्दल त्याची विशेष प्रसिद्धि आहे. प्रथम हिंसातत्त्व त्याला मान्य नव्हतें, व त्याच्या राज्यांत संहारही फार होत असे. परंतु चैनीचा कळस झाला म्हणजे उपरति होत असते. ह्याप्रमाणें त्याला उपरति झाली व त्यानें बुद्धधर्माचा स्वीकार केला. बुद्धधर्माचा प्रसार करण्यासाठीं पुष्कळ देशांत त्यानें प्रचारक पाठविले. बुद्धधर्माचा फैलाव जो हिंदुस्थानाच्या चारी कोपऱ्यांत झाला त्याचें मुख्य कारण म्हणजे अशोकाचे प्रयत्न हेंच होय. सिलोन, चीन, ब्रह्मदेश, जपान वगैरे देशांत त्यानें धर्मप्रचारक पाठविले होते. बौद्धधर्मावद्दल त्याला विशेष आस्था व कळकळ होती.

आस्था जरी विशेष होती, तरी त्यानें आपल्या प्रजेवर धार्मिक बावतींत अगदीं जुलूम केला नाहीं; किंवा राजा ह्या नात्यानें जीं कर्तव्यें होतीं त्यांकडे दुर्लक्ष्यहि केलें नाहीं. राजा, धर्मप्रसारक, खोदीव लेखांचा कर्ता ह्या तिन्ही दृष्टींनीं अशोकराजाची प्रसिद्धि रहाणार हें उघड आहे. त्याच्या लेखांवरून तत्कालीन इतिहास, धर्ममतें, भाषा वगैरे पुष्कळ गोष्टींचा उलगडा होतो. भाषाशास्त्रीय प्रमाण म्हणून तर त्यांची किंमत विशेष आहे. अशोकराजानें ४५ वर्षें राज्य केलें आणि ख्रिस्तपूर्व २२६ वर्षी तो निर्वाणास गेला.

## आमच्या शाळेचें सम्मेलन

आमच्या शाळेचें सम्मेलन दरवर्षी एकदां भरत असतें. तें यंदा आक्टोबर महिन्यांत जी दिपवाळीनिमित्त सुट्टी देण्यांत येते तिच्या अगोदर भरलें. दरवर्षी उन्हाळ्यांत मार्च महिन्यांत भरत असे. परंतु वार्षिक परीक्षेचे ते दिवस असल्यामुळें व सम्मेलनाच्या खटपटींत मुलांचे बरेच दिवस फुकट जात असल्यामुळें नेहमींची वेळ यंदा बदलली आहे. शाळेच्या सम्मेलनाबरोबरच अगोदरच्या दिवशीं शाळेचा बक्षिससभारंभहि होत असतो. हे दोन्ही सभारंभ एकत्र होत असल्यामुळें साहाजिकच मुलांच्या शिक्षणक्रमांतील हे अतिशय महत्त्वाचे आणि सुखाचे दिवस समजले जातात.

हे समारंभ यशस्वी व्हावेत म्हणून निरनिराळ्या बाबतींत काम करण्यासाठीं मंडळें नियोजित करितात. सर्व मुलांची सभा भरवून त्यांमध्यें अध्यक्ष, चिटणीस, वगैरे अधिकारी मंडळ निवडतात. मुलांपासून घेण्याची वर्गणीहि कायम करितात. वर्गणीकमेटी, भोजनकमेटी, नाटककमेटी, पानसुपारीकमेटी वगैरे निरनिराळ्या कमेट्या नेमतात; त्यांवर तज्ज्ञ व त्यांना मदत करण्यासाठीं कांहीं मुलें निवडलेलीं असतात. जसजसा सम्मेलनाचा दिवस जवळजवळ येतो तसतसा मुलांचा उत्साह सारखा वाढत जातो.

अगोदरच्या दिवशीं वार्षिक परीक्षेंत ज्या मुलांनीं चांगलें यश संपादिलें असेल त्यांना निरनिराळ्या विषयांत बक्षिसें वांटण्यांत येतात. गांवांतील कोणीतरी सन्मान्य, नामांकित गृहस्थ बोलावून त्यांच्या हस्तें हा समारंभ केला जातो. त्याच वेळेस शाळेच्या प्रगतीचा वार्षिक अहवाल वाचतात. मुलांचीं संभाषणें, कांहीं विनोदी भाषणें, कांहीं नाटकांतील संभाषणें मुलांकडून करविलीं जातात. सर्वांच्या शेवटीं अध्यक्षांकडून मुलांस उपदेशाचे दोन शब्द सांगितले जातात. अशा रीतीनें पहिल्या दिवसाचा कार्यक्रम झाल्यानंतर सम्मेलनाच्या कामास सुरवात होते.

सम्मेलनाच्या अगोदरच्या रात्रीं मुलांचा कोण गोंधळ उडून गेलेला असतो! ज्या त्या कमेटींतील स्वयंसेवक आपापल्या कामांत दंग झालेले असतात. भोजनकमेटींतील लोक तर सर्व रात्रभर जागरण करून भोजन वेळेवर तयार करण्याची खटपट करीत असतात.

दिवस उजाडला कीं, मुलांना चहापान देण्यांत येतें. चहापानानंतर मुलें बैठे खेळ खेळण्यांत रंगतात. त्या वेळीं उच्चनीच, लहानमोठे, शिष्यशिक्षक हा भाव नसतो. सर्व अगदीं एका मेळीनें खेळतात. खेळ संपले कीं, सर्व आंघोळीस पोहाण्यासाठीं जातात. तेथेंहि पुष्कळ मजा होते. पोहून आल्यानंतर जेवणाची तयारी करितात. जेवतांना आपआपले मित्र जवळ बसतात. कोणी कोणाला गंध लावितो, कोणी कोणाला वाढतो, कोणी कोणाशीं गप्पा मारितो, कोणी ग्रामोफोन लावितो, तर कोणी स्वतःच श्लोक म्हणतो अशी एकच गंमत उडालेली असते. शिक्षक लोकहि आपला नेहमींचा शिक्षकपणा बाजूस सारून मुलांशीं समरस होतात. कोणत्याहि प्रकारचा भेदभाव ठेवत नाहींत. एकदां तर कांहीं मुसलमान विद्यार्थ्यांना कांहींनीं आडवें गंध लाविलें!

जेवणाचा समारंभ झाल्यानंतर पानसुपारी, गाणें वगैरे होतें. पुन्हां बैठे खेळ सुरू होतात. तिसऱ्या प्रहरीं जुन्या व नव्या विद्यार्थ्यांमध्यें एकादा खेळ खेळतात. रात्रीं नाटक होऊन समारंभ खलास होतो.

ह्याच समारंभास जुने व नवे विद्यार्थी एकत्र होतात. बंधुभाव वाढतो, शिष्य-शिक्षकांत खेळीमेळी उत्पन्न होते, शाळेबद्दल अभिमान वृद्धिंगत होतो.

## जत्रा

१. जत्रा कां भरविण्यांत येते? उद्देश, इतिहास. २. जत्रा केव्हां भरविण्यांत येते, भरविण्याची प्रवृत्ति काय? ३. जत्रेंतील कार्यक्रम, धार्मिक, सामाजिक विधि. ४. जत्रेपासून फायदे, धार्मिक, औद्योगिक, सामाजिक.

मनुष्य हा उत्सवप्रिय प्राणी आहे. वर्षांतून कांहीं दिवस अशा उत्सवाकरितां तो राखून ठेवितो. संसाराची नेहमीं दगदग व कटकट मागें लागलेलीच असते. त्यांतूनहि तो वेळ काढून आपल्या मनाचें रंजन करून घेतो. ह्या मनरंजनानें त्याला आपल्या रोजच्या व्यवहारांत दुप्पट जोर येतो. वर्षांतून ठराविक दिवशीं व ठराविक ठिकाणीं एकत्र मिळून जत्रा भरविण्याचा परिपाठ आपल्या ह्या देशांत फार दिवसांपासून आहे. जत्रा कमींत कमी दोन तीन हजार वर्षांपूर्वीपासून चालत आलेल्याचा दाखला इतिहासांत व पुराणांत सांपडतो.

जत्रा साधारणपणें देवाच्या निमित्तानें भरवितात. देवाचे जे अवतार झाले त्यांच्या जन्मतिथींच्या दिवशीं मोठा उत्सव करण्याचा प्रघात आहे. त्याच प्रमाणें देशांत जे मोठमोठे साधुसंत व वीरशिरोमणी होऊन राष्ट्रास ललामभूत होऊन बसले त्यांच्या निर्याणतिथीच्या दिवशीं त्यांच्या सन्मानार्थ सुद्धां जत्रा भरविण्याचा प्रघात आहे. आपल्या महाराष्ट्रांत प्रत्येक खेड्यागणिक जत्रा भरते. ही जत्रा बहुतेक उन्हाळ्याच्या सुमारास येते. कारण त्या दिवसांत शेतकरी लोकांचें शेतांतील काम सर्व आटपून ते रिकामे असतात व उत्सवांत मनसोक्त रमण्याची त्यांना फुरसत असते.

जत्रेमधील बहुतेक विधि धार्मिक स्वरूपाचे असतात. ज्या देवाच्या अथवा सत्पुरुषाचे नांवानें जत्रा भरते त्याची पूजाअर्चा वगैरे करून त्याच्या पालखीची मिरवणूक काढितात. लोक लांबून आपले नवस फेडण्यासाठीं येतात. प्रत्येकजण पुजेचें साहित्य—फुलें, नारळ, उदबत्त्या, कापूर—देवास अर्पण करून भक्तिभावनें

नमन करितो. देवाचा छबिना निघतो. कांहीं जत्रा एक दिवसाच्या असतात, तर कांहीं जास्त दिवसांच्या असतात. दररोज कांहींना कांहीं विधि असतो. रोज गरिबांना अन्नदान होत असतें. शेवटच्या दिवशीं लळीत व कुस्त्या होऊन गोपालकाला होतो. नंतर जत्रेची परिसमाप्ति होते.

जत्रेपासून फायदे काय होतात तें पाहूं. ज्या साधुसंतांच्या सन्मानार्थ जत्रा भरते त्यांच्या पुण्यस्मरणानें आपल्या वर्तनावर परिणाम होतो. थोरांच्या चरित्रानें आपल्या चरित्रांत उदात्तपणा येतो. त्यांना मोठेपणा कोणत्या गुणानें आला, त्यांनीं पराक्रम काय गाजविले, त्यांनीं लोककल्याण काय केलें तसें कांहीं करण्याची स्फूर्ति त्यांच्या धूलिरजाचें दर्शन घेतल्यानें आपणांस होते. त्या त्या व्यक्तींचा इतिहास आपल्या डोळ्यांसमोर रहातो व तीच परंपरा चालविण्याचें एक प्रकारचें शिक्षण लहानथोरांना आपोआप मिळतें.

जत्रेचा उपयोग प्रदर्शनासारखा होतो. नाना प्रकारच्या कलाकौशल्यांच्या जिन्नसा, धान्यें, जनावरें, पहावयास मिळतात. व्यापारी लोकांना जिनसांची देवघेव करण्यास चांगली संधी मिळते. कारागीर लोकांना नव्या नव्या चिजा दृष्टीस पडून आपल्यांतील गुणदोष समजून सुधारणा करण्यास संधि मिळते. अशा रीतीनें औद्योगिक उन्नति करण्याचें जत्रा हें एक साधन आहे.

जत्रेंत पुष्कळ ठिकाणचे लोक एकत्र येतात. त्यांमध्यें बंधुप्रेम वाढतें. एकमेकांचे विचार, चालीरीति पाहून मनाची संकुचित वृत्ति नाहींशी होते. कुस्त्या वगैरे खेळ पाहून शारीरिक व्यायामाबद्दल आवड उत्पन्न होते. तेव्हां धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक अशा चारी दृष्टींनीं जत्रेचें महत्त्व विशेष आहे.

## परळीची यात्रा

१. यात्रा केव्हां जमते. २. परळीस्थान—रस्ता, सोयी, वाहनें. ३. गडाचें वर्णन, त्याचा इतिहास. ४. उत्सवाचें वर्णन, सर्व व्यवस्था. ५. प्रेक्षणीय स्थळें. ६. यात्रेचे उद्देश.

माघ वद्य नवमीस श्रीसमर्थदर्शनास सज्जनगडीं जावें असें पुष्कळ दिवस आमच्या मनांत होतें. परंतु सुयोग येईना. एकदांचा आम्हीं कांहीं मित्र मंडळीनीं जाण्याचा बेत मुक्रर केला व निघालों. बरोबर सात माणसें

अगदीं आमच्या निकटच्या सहवासाचीं अशीं होतीं. थंडीचे दिवस असल्यामुळें बरोबर पांघरावयाचें आणि कांहीं थोडे वाटेंत खाण्याचे जिन्नस येवढेंच कायतें सामान बरोबर घेतलें होतें.

परळीस जावयाचें म्हणजे सातार्‍याहून जावें लागतें. तेथून पांच मैल पश्चिमेकडे सज्जनगडाची टेकडी आहे. सातार्‍याहून थोडश्या भाड्यांत मोटार मिळू शकते. आम्हीं एक मोटार ठरविली आणि पहाटेच्या सुमारास निघालों. वाट उताराची असल्यामुळें आम्हीं फार थोडश्या वेळांत पायथ्याशीं पोहोंचलों. वाटेंत उरमोडी नांवाची नदी लागली. श्रीसमर्थांचे पट्टशिष्ट कल्याणस्वामी ह्यांचा नित्यक्रम भल्या पहाटेस उठून ह्या नदीवर स्नान करून एक मोठा हंडा भरून पाणी वर सज्जनगडीं नेण्याचा असे. नदी कांहीं फार मोठी नाहीं. प्रवाह फार लहान आहे. परंतु ह्या लहानशा प्रवाहांतच औरंगजेबाच्या स्वारीच्या वेळीं त्याच्या शहासुजा मुलाचें सैन्य वाहून गेल्याची एक गोष्ट सांगतात. आम्ही नदी ओलांडून गड चढण्यास सुरुवात केली.

गड साधारणपणें अर्धा मैल उंचीवर आहे. चढहि साधा आहे. तट बराच नादुरुस्त आहे. गड पूर्वी मुसलमानांच्या ताब्यांत होता. नंतर तो मराठ्यांनीं घेतला व नंतर शिवछत्रपतींनीं समर्थांस अर्पण केला. औरंगजेबाच्या दक्षिणच्या स्वारींत अजिमतार्‍याबरोबर त्यानें सज्जनगडहि काबीज करून त्यास "अल्लागड" हें नांव दिल्याचें लोक सांगतात! श्रीसमर्थ येथें कांहीं दिवस रहात असत व समाधीच्या पूर्वी ४ वर्षे तर येथें ते कायमचे राहिले. आणि समाधीहि त्यांनीं ह्याच गडावर घेतली व गडास पुनीत करून ठेवलें. त्यांच्या ह्या निर्याणकालासच—माघ वद्य नवमीस—येथें उत्सव भरतो.

उत्सव फार मोठा भरतो. यात्रा सुमारें आठ दिवस ५००–६०० असून शेवटच्या नवव्या दिवशीं तर पांचसहा हजारांवर जाते. लोक बरेच लांबून, विशेषतः लांबचे मठाधिपति रामदासी नेमानें येतातच. विशेष भरणा सातारच्या आसपासच्या लोकांचा असतो. पाण्याची व जेवणाची सोय गडावर संस्थानांतून केली जाते. रोज कथा, कीर्तन, भजन, मेळे, पालखी, आरती, फेर्‍या, प्रदक्षिणा वगैरे प्रकार चाललेच असतात. शेवटच्या दिवशीं तर कोण गर्दी होते. लोक घोळका घालून भजन वगैरे करीत असतात. कोणी भजनांत, कोणी प्रदक्षिणेंत,

कोणी दर्शनांत असे सर्वजण श्रीसमर्थभजनीं लागलेले असतात. सर्व लोक रामभजनीं लीन झालेले पहाण्यानें मनाचें समाधान होतें. व रामदासांनीं जें कांहीं धार्मिक म्हणा राजकीय म्हणा कार्य केलें त्याजबद्दल आपली कृतज्ञता वाटते.

सज्जनगडावर पहाण्यासारख्या गोष्टी म्हणजे श्रीरामचंद्राचें देवालय व श्री समर्थांची समाधि ह्या होय. समाधि खालीं भुयारांत असून बरोबर समाधीच्या वर श्रीरामाच्या मूर्ती आहेत. श्रीरामाच्या चरणाखालींच समर्थांनीं समाधि घेतली. नंतर त्यांच्या एका बाजूस समर्थांचें शेजघर आहे. ज्या पलंगावर समर्थ निजत असत तो पलंग तेथेंच दाखविण्यांत येतो. पलंगावरून समर्थ गिड्डे असावेत असें वाटतें. त्यांचीं वल्कलें, कुबडी, काठी, कल्याणस्वामींचा हंडा, अक्काबाईचें स्वयंपाकगृह वगैरे गोष्टी आह्मीं पाहिल्या. वस्तु निर्जीव तर खऱ्याच, पण त्यांच्यावरून त्या थोर विभूतींबद्दल यथार्थ कल्पना आल्याखेरीज मात्र रहात नाहीं.

जवळच एक ग्रंथसंग्रहालय आहे. त्यांतील समर्थवाङ्मय पाहिलें. त्यांचा ग्रंथ दासबोध अवलोकन केला. रामघळ—त्यांची तपश्चर्येची जागा—चढण्यास कठीण-अशी पाहिली. समर्थांचें कार्य फार अफाट. लग्नामधून पळ काढून सर्व संसारावर लाथ मारून जी स्वारी निघाली ती तीर्थयात्रा करून पुरश्चरण करून धार्मिक कार्य केलेंच, परंतु इतर संतांना जें प्रवृत्तिपर राजकारण साधलें नाहीं तें रामदासांनीं अचाट सामर्थ्यानें व बुद्धिमत्तेनें करून दाखविलें. अशा रीतीनें आम्ही ह्या राष्ट्र-संताचा उत्सव पाहून परतलों.

## स्यमंतक मण्याची कथा

ह्या मण्यानें कोहिनूर हिऱ्याप्रमाणेंच मोठमोठ्या भल्यांची अब्रू घेतली; पण श्रीकृष्णाचें वर्तन ह्या हकीकतींत तापलेल्या सोन्याप्रमाणें शुद्ध व प्रज्वलित असेंच आपल्यास दृष्टीस पडतें.

सत्राजित नांवाचा एक यादव सरदार द्वारकेंत रहात होता. त्यानें सूर्याची आराधना करून हा स्यमंतक मणी मिळविला होता. तो अत्यंत तेजस्वी असून दररोज दोन भार सुवर्ण देत असे. अशा प्रकारचें राजरत्न आपल्या जवळ, निदान आपला पिता द्वारकेचा राजा वसुदेव याच्या जवळ असावें असें वाटून श्रीकृष्णानें एकदां तो मणी सत्राजिताजवळ मागितला. बलानें तो हरण करावा

असें श्रीकृष्णाच्या मनांत कधींहि आलें नाहीं. सत्राजिताजवळ त्यानें याचना केली पण त्यानें तो दिला नाहीं. एकदां त्याचा भाऊ प्रसेन ह्यानें तो मणी गळ्यांत घातला आणि तो शिकारीस गेला. शिकारींत त्याला सिंहानें ठार मारलें. त्या सिंहास अस्वलांचा राजा जांबवान् यानें ठार मारिलें. तेव्हां तो मणी जांबवानानें नेला आणि आपल्या मुलाच्या गळ्यांत बांधला. इकडे कृष्णाविषयीं शंका आली. 'मणी मागून मिळाला नाहीं म्हणून श्रीकृष्णानें हें पापकृत्य करविलें' असें त्यानें भर यादवसभेंत बोलून दाखविलें. तेव्हां श्रीकृष्णास फार वाईट वाटलें. आपल्यावर आलेला आरोप नाहींसा करण्यासाठीं तो तात्काळ उठला आणि हुशार माग काढणारे बरोबर घेऊन ऋक्षवान् पर्वताच्या अरण्यांत शिरला. प्रसेनाचा माग काढीत काढीत ते त्याच्या प्रेतापाशीं येऊन पोहोंचले. पुढें सिंहाचा माग काढतां काढतां सिंहाचें प्रेत सांपडलें तरी मणी सापडला नाहीं. सिंहास अस्वलानें मारलें आहे असें पाहून त्याचा माग काढीत जांबवानाच्या गुहेपाशीं ते पोहोंचले. तेथें आपल्या लोकांस गुहेच्या तोंडाजवळ ठेऊन कृष्ण गुहेंत शिरला तों त्यास मणी जांबवानाच्या मुलाच्या गळ्यांत दिसला. जांबवानानें तो मणी सामोपचारानें दिला नाहीं तेव्हां त्याचें व श्रीकृष्णाचें एकवीस दिवस युद्ध होऊन अजिंक्य जांबवानास श्रीकृष्णानें जिंकिलें. जांबवानानें हा श्रीविष्णूचाच अवतार असला पाहिजे असें जाणून तो मणी त्यास अर्पण केला इतकेंच नाहीं तर आपली कन्या जांबवती हीहि त्यास दिली. याप्रमाणें मणी घेऊन श्रीकृष्ण द्वारकेस आला. व सत्राजितास सर्व हकीगत सांगून यादवसभेंत सर्वांसमक्ष त्यानें तो मणी त्यास परत दिला.

## अभिमन्युवध

तिसऱ्या दिवशीं द्रोणाचार्यांनीं आपल्या सैन्याची विलक्षण मांडणी चक्ररूपव्यूहांत केली, आणि 'आज धर्म सांपडला नाहीं तर दुसरा कोणी महारथी जरूर सांपडेल' असें दुर्योधनास आश्वासन दिलें. दुसऱ्या संसप्तक गणांकडून अर्जुनास पुन्हां युद्धक्षेत्रांतून बाहेर काढून द्रोणानें पाण्डवसैन्याशीं युद्ध चालविलें; तेव्हां त्या सैन्याची चाल बंद पडली. भीम, धृष्टद्युम्न इत्यादि वीरांचें चक्रव्यूहावर कांहीं चालेना, तेव्हां युधिष्ठिरानें अभिमन्यूस चक्रव्यूहांत घुसण्यास सांगितलें. "चक्रव्यूहांत प्रवेश करण्याचें मी शिकलों आहें; पण मला परतणें साधणार नाहीं,"

असें तो म्हणाला. परंतु धृष्टद्युम्न, भीम इत्यादि वीर "तुझ्या पाठोपाठ आम्हीं आंत घुसतों" असें म्हणाले. भावी होणार टळत नाहीं म्हणून त्या दिवशीं मुलास पुढें करण्याची इच्छा युधिष्ठिरास झाली हें आश्चर्य नव्हे. अभिमन्यु पराक्रम करून द्रोणावर चालून गेला. द्रोणानें त्यास न आडवतां चक्रांत येऊं दिलें. त्यामागें इतर वीर घुसूं लागले; पण त्यांस आंत जाऊं दिलें नाहीं. भीम, धृष्टद्युम्न इत्यादि कित्येक योद्धे कांहीं पुढें घुसले, पण त्यांस जयद्रथानें पक्कें आडवून धरलें, त्यामुळें अभिमन्यु शत्रुसैन्याच्या चक्रांत एकटा सांपडला. पण तो महारथी श्रीकृष्णाचा शिष्य असल्यानें घाबरला नाहीं. त्यानें दिव्य पराक्रम करून शेंकडों वीर ठार मारले. दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मण ह्यासहि ठार मारिलें. तेव्हां दुर्योधनास क्रोध येऊन त्यानें 'मारा मारा' असें ओरडत त्याजवर चाल केली. त्या वेळीं सहा वीर—कृप, कर्ण, अश्वत्थामा, बृहद्वल, कृतवर्मा व दुर्योधन—ह्यांनीं त्याचेवर पडून त्याचे घोडे व सारथी मारून त्यास विरथ केलें. अभिमन्यु गदा घेऊन पायींच लढूं लागला. तेव्हां दुःशासनपुत्र गदा घेऊन त्यासमोर आला. त्यांनीं एकमेकांस गदेच्या प्रहारांनीं मूर्च्छित केलें. पण थोड्या वेळानें दुःशासनाचा पुत्र प्रथम सावध होऊन अभिमन्यूवर धांवला व त्याचा त्यानें मूर्च्छित असतांना गदेनें प्राण घेतला.

## आगीचें वर्णन

लोकांची वर्दळ शांत झालेली, गोंगाट जिकडे तिकडे शांत झालेला. जो तो दिवसाचा कारभार आटोपून आराम घेत होता. निसर्गसृष्टी शांत होती. कसल्याहि आवाजानें शांततेंत बिघाड होत नव्हता. अशा वेळीं एका बाजूनें एकदम ज्वाळांचा भडका उडालेला लोकांनीं पाहिला. झालें, लोकांमध्यें एकदम गडबड सुरू झाली. जिकडे तिकडे एकदम गोंधळ सुरू झाला. जो तो आहे त्या स्थितींतच त्या जाळाच्या भडक्याकडे पळत सुटला.

प्रथम बंद अशा खोलींतून हळूहळू लहान लहान झळा बाहेर येऊं लागल्या. खोली बंद असल्यामुळें प्रथम प्रथम त्या झळांचा आंतच कोंडमारा होऊं लागला. परंतु ह्या कोंडमाऱ्यानें ज्वाळा विझण्याच्या ऐवजीं त्या जास्तच फैलावल्या व लहानसा ज्वालासूर आपला अक्राळविक्राळ जबडा पसरून आपल्या ज्वालारूपी जटा आपटूं लागला. त्याची धग कोणा एकास पोहोंचली तो

उठला. परंतु दुसरा उठतो कोण ? ज्याच्या त्याच्या डोळ्यावर झोंपेची धुंदी. ज्यांच्या पाठीशी आग लागली ते बिचारे पळाले. कोणास कपड्याची दाद नाहीं, चीजवस्तूंची काळजी नाहीं. आपल्या आप्तेष्टांचा पत्ता नाहीं. दंगलींत एकदम पळालेल्या आया आगींत विसरलेल्या आपल्या अर्भकांची आठवण होऊन छाती बडवूं लागल्या. त्या आवाजानें भोंवतालचे लोक जागे झाले. लोकांची एकच दंगल झाली. दिवसापेक्षां जास्त गोंधळाची अशी येरजार त्यावेळीं सुरू झाली. "आग, पाणी, विझवा, पाडा, धावा, पळा" असें एकसारखें सर्व ओरडूं लागले. सर्वत्र गोंगाट झाला. कोणी नळ फोडूं लागला, कोणी शिडी चढूं लागला, कोणी बंबासाठीं ओरडूं लागला; कोणी बादली, कोणी बकेट, कोणी घागरी, कोणी हंडे, जें हातांत सांपडेल तें घेऊन पळत सुटला; आगीचा फैलाव वाढला. ज्वाला वर चढूं लागल्या. प्रकाश जिकडे तिकडे पसरूं लागला. लोक चिंतामग्न झाले. वारा फार सुटला.

परंतु इतक्यांत आग विझविण्याचा बंब आला. पोलीसहि येऊन दाखल झाले. त्यांनीं सर्व तावा घेतला. लोकांची गर्दी त्यांनीं कमी केली. विनाकारण गोंधळ करणाऱ्या व सांपडेल ती चीजवस्तू लांबविणाऱ्या लोकांना त्यांनीं थोपवून धरलें. बंबवाल्या लोकांनीं नळ्या साफ करून पाण्याचा मारा चोहोंबाजूंस एकसारखा करण्यास सुरुवात केली. व हळुहळू प्रगति करीत त्यांनीं आगीवर पूर्ण ताबा मिळविला. त्यांना कांहीं धाडसी मनुष्यांनीं चांगलीच मदत केली. त्यांचें धाडस तर खरेंच. कांहीं लोक प्राणांची पर्वा न करितां आगीच्या खायीमध्यें जाण्यास सारखे तयार असत. आगीमध्यें सांपडलेलीं माणसें सुरक्षित काढण्यांत तर त्यांनीं जें धाडस दाखविलें तें तर अवर्णनीयच; पण आनंदाची गोष्ट ही कीं, त्यांच्या सर्वांच्या धाडसाचें चीज झालें. कोणीहि आगींत सांपडला नाहीं. ज्यांना कांहीं थोडी आगीची झळ लागली त्यांना लागलीच औषधोपचारासाठीं दवाखान्यांत पोहोंचतें करण्यांत आलें. बंबवाल्यांनीं आगीवर पूर्ण तावा मिळवून थोड्याच वेळांत आग शांत केली. पण चीजवस्तूची खूपच खराबी झाली.

## अभ्यास

१. खालील महात्म्यांचीं चरित्रें लिहा.

(१) तुकाराम, ज्ञानेश्वर, कालिदास, शेक्स्पीयर, मिल्टन.

(२) गोखले, रानडे, दादाभाई, हेमाडपंत, बाळाजी आवजी.

(३) तैमूरलंग, सदाशिवरावभाऊ, तानाजी, रणजितसिंह, टिपू, झांशीची राणी.

(४) बुद्ध, चंद्रगुप्त, शंकराचार्य, नानक, अहल्याबाई.

. खालीं दिलेल्या विषयांवर वृत्तांतविषयक निबंध लिहा.

(१) सुंदर इमारतीस भेट, समुद्रकिनाऱ्यावर सहल, रेल्वेसफर.

(२) तुमचा मजेदार अनुभव, सुटीचा पहिला दिवस.

(३) कृष्णशिष्टाई, अंगदशिष्टाई.

(४) लक्ष्मणास लागलेली शक्ति, पानिपत, रांगणा, सिंहगड, प्लासि वगैरे लढाया, वसईचा वेढा.

५ गांवजेवणाचा समारंभ, सीमोल्लंघनाची मिरवणूक, खेडेगांवांतील रहाणी, उन्हाळ्याची सुटी कशी घालविली ?

३. खालील कथानकें लिहा.

भरतभेट, लंकादहन, कर्णाचें औदार्य, हंसकाकीय, हरिश्चंद्र, नलराजा, शिबिराजा, सावित्री–आख्यान, अंबरीषाख्यान, खाण्डववनदाह, तुमच्या एका मित्राची दिनचर्या, तुमच्या आवडीचा वीर, नायक, संत,–यांचें चरित्र.

४. खालील कथनविषयक निबंध लिहा.

कोलंबसाच्या जलपर्यटणाची हकीकत, लग्नसमारंभ अथवा उपनयनसमारंभ याची हकीकत, तुम्ही वाचलेल्या कादंबरीचें कथानक, विद्यार्थीदशेंतील तुमचे कांहीं गंमतीचे अनुभव.

---

## पाठ ९

# चिंतनविषयक निबंध

चिन्तनविषयक निबंधांत आपण जें चिंतिलें असेल, आपण ज्याच्यावर विचार केला असेल, ज्याच्यावर मनन केलें असेल त्या सर्वांविषयीं आपण लिहितों. चिन्तनविषयक निबंधांत लेखकाला आपल्या स्वतःच्या बुद्धीच्या सामर्थ्यावर अवलंबून रहावें लागतें. बुद्धींत साहित्य गोळा करण्याचें जितकें सामर्थ्य अधिक तितकें लेखन जास्त परिणामकारक होतें. चिन्तनविषयक निबंधांत विषयाचें चित्र लिहिणाऱ्यासमोर नसतें. आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावर सर्व इमारत लेखकास उभारावी लागते. सर्व माहिती गोळा करून त्यांत एक सुसंबद्ध क्रम ठेवून मुद्दे एकामागून एक घेऊन विवेचन करावें लागतें.

**आरंभः**—चिन्तनविषयक निबंधांत पहिला पॅरिग्राफ खालीलपैकीं एका स्वरूपाचा असावा.

( १ ) सर्वसाधारण ठोकळ सिद्धांत देऊन आरंभ करावा. विधान सर्वसाधारण असावें.

उ.—"अहंपणा" यावरील निबंधांत अहं=मीपणा " हा सर्व प्राणिमात्रांच्या ठायीं आढळून येतो " हें वाक्य घालून विस्तार करावा.

( २ ) विषयाचा अर्थ स्पष्ट करणारी एखादी गोष्ट द्यावी.

उ.—गाडीच्या चाकावर बसलेली माशी म्हणते-" मी किती धूळ उडवितें ? काय माझें सामर्थ्य !"—खोटा अहंपणा दाखविणारी गोष्ट द्यावी.

( ३ ) विषय विरोधात्मक असेल तर त्यांतील विरोध स्पष्ट करावा.

उ.—स्वाभिमान व अहंपणा ह्यांमधील विरोध दाखवावा.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

( ४ ) सर्व निबंधांत आपण जें कांहीं लिहिणार त्याचे मुद्दे एका वाक्यांत द्यावे.

उ.—"स्वच्छता" वरील निबंधांत, "शब्दाचा अर्थ, त्याचा धर्माशीं संबंध, त्याचे शारीरिक व मानसिक इत्यादि प्रकार, अस्वच्छता व रोगांची सांथ व त्याचे उपाय" ह्या मुद्द्यांचा विचार करावयाचा आहे.

( ५ ) जेव्हां विषयाच्या पुष्कळ बाजू असतील तेव्हां एकाच बाजूचा आपणांस विचार करावयाचा असेल ती प्रथम द्यावी.

उ.—विमानावरील निबंधांत "सध्यां शास्त्रीय युगांतील विमानासंबंधीं जी कल्पना आहे तिचाच आह्मीं विचार करणार आहोंत. पूर्वीं योगशक्तीनें अंतराळीं कसें तरंगत असत ह्याचा विचार आह्मांस करावयाचा नाहीं," असें पहिलें वाक्य घालावें.

( ६ ) विषयाची स्वतःला पटणारी व इतरांहून भिन्न अशी व्याख्या द्यावी.

**विस्तार:**—चिन्तनविषयक निबंधाच्या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. कारण कोणताहि विषय घेतला तरी त्याला एक चिन्तन-विषयक बाजू अशी असणारच. इतर प्रकारच्या निबंधांत लेखनास मर्यादा आपोआपच असते व ती मर्यादा पदार्थाच्या स्वरूपावर अवलंबून असते. परंतु बुद्धीचा चिन्तनविषयक व्यापारच मोठा असल्यामुळें तिचें क्षेत्रहि अमर्यादित आहे व हा अमर्यादित पसारा निबंधासारख्या लहानशा क्षेत्रांत बसवितांना फार खबरदारी घ्यावी लागते. मुख्य मुख्य मनास पटणारे मुद्दे कोणते? त्यांचा विस्तार कितपत करावयाचा? वाचकास तो कितपत रुचेल? वगैरे बाबींकडे लक्ष देऊन अत्यंत जरूरीचे तेवढे मुद्दे घेऊन त्यांचा विस्तार करावा. विषयाशीं असंबद्ध तेवढें आजिबाद काढून टाकावें.

**शेवटचा पॅरिग्राफ**—शेवटीं आपल्या म्हणण्याचा गोषवारा द्यावा. सिंहावलोकन थोडक्यांत द्यावें. आपल्या म्हणण्यास पोषक असा दुसऱ्याच्या ग्रंथांतील उतारा द्यावा.

## सामान्य स्वरूपाच्या विषयांचे मुद्दे

१. सद्गुण.

१ उपोद्घात, अर्थ, व्याख्या, स्पष्टीकरण. २ आवश्यकता—विवरण, व्यक्तीस, समाजास, राष्ट्रास, फायदे व तोटे. ३ उदाहरणें—प्राचीन व अर्वाचीन पुरुषांचीं. उपसंहार.

२. दुर्गुण.

१ उपोद्घात. २ तोटे, मानसिक, शारीरिक, समाजास, व्यक्तीस. ३ उदाहरणें. ४ उपसंहार.

३. संस्था, चाल, रीत, रहाणी इ.

१ उपोद्घात, अर्थ, व्याख्या, स्पष्टीकरण. २ वर्णन. ३ उत्पत्ति—पूर्वेतिहास. ४ आवश्यकता—कोणती व कशी कामगिरी करते ? ५ उपसंहार. ६ तुमचीं स्वतःचीं मतें

४. कवितेंतील म्हणी अगर सुटसुटीत वाक्यें.

१ कर्ता माहीत असेल तर त्याच्या काव्याची तारीफ. २ त्यानें कोणत्या प्रसंगानें ती म्हण वापरली ? ३ म्हणीच्या अर्थाचें स्पष्टीकरण. ४ तिच्या मुळाशीं असलेलें तत्त्व व त्याची सत्यता; सत्यता सोडिली तर काय परिणाम होईल ? ५ त्याच्याशीं विरुद्ध अथवा बाजूस असलेल्या विचारांची छाननी. ६ ऐतिहासिक दाखले. ७ दुसऱ्या ग्रंथांतील पोषक उतारे. ८ त्यांपासून व्यावहारिक बोध, शेवट.

खालीं कांहीं विषय त्यांच्या मुद्द्यांसह दिले आहेत.

### १. वक्तृत्व

१ वक्तृत्व व संभाषण ह्यांमधील साम्य व भेद. २ वक्तृत्वाचीं अंगें, उपांगें, शब्दयोजना, विषययोजना, आवाजाचे आरोह, अवरोह ( चढ, उतार )

८७४२९०१
भाषा २०८

हावभाव, इ. ३ वक्त्याला लागणारे गुण–( मनाचा शुद्धपणा, सहानुभूति, स्वानुभव, विद्वत्व, सहृदयत्व, अर्थविषदत्व, मनोवृत्तींचें आविष्करण). ४ रोम व ग्रीस ह्या देशांत प्राचीन काली व इंग्लंड देशांत सध्या त्याचा झालेला प्रसार' वर्तमानकाली ह्याचा उपयोग. ५ वक्तृत्व संपादण्याचे उपाय, 'बालसभा' डिबेटिंग क्लब, नामांकित वक्त्यांचें अनुकरण, कांहीं भाषणें पाठ करणें.

## २. म्हणी

१ पूर्वस्वरूप––सुभाषितें, ज्ञानाचें एकत्र व नीटनेटकें स्वरूप. २ म्हणीमधील गुण––शब्दचमत्कार, अर्थचमत्कार, लोकसंमति, कांहीतरी तिच्यांत ज्ञान भरलें असलें पाहिजे, अर्थांच्या मानानें शब्द थोडे पाहिजेत. ३ म्हणींचा प्रसार कसा होतो ? व बनतात कशा ? ४ म्हणींचे प्रकार–स्त्रियांच्या म्हणी, धंदेवाल्यांच्या म्हणी, निरनिराळ्या विषयांप्रमाणें निरनिराळे प्रकार, पारमार्थिक व व्यावहारिक.

## ३. मासिक पुस्तकें

१ वाङ्मयाचे प्रकार–चिरस्थायी, तात्कालिक. २ प्रसाराचीं कारणें–वाचनाभिरुचि, तात्कालिक महत्त्व. ३ मासिक पुस्तकास लागणारे गुण–( बहुश्रुतपणा, मोठमोठे विषय सामान्य बुद्धीच्या माणसाच्या आटोक्यांत आणणें, २ ज्ञानप्रसार, ३ विषयांची सांगोपांग माहिती, आटोपशीर निबंधांत देणें, ४ सदभिरुचीचा प्रसार, ५ भाषेचें पुनरुज्जीवन, ६ चित्रेंवगैरे आकर्षक साधनें ). ४ संपादक, छापखाना वगैरे बाबी.

## ४. इतिहास

१ अर्थ, व्याख्या–गतलोकांचीं चरित्रें, गतकाळांतील राजकारणें. २ इतिहासाबद्दल लोकांची अनास्था, लोकांच्या प्रवृत्ति ( १ वाङ्मय वाचणें म्हणजे रिकामा उद्योग, २ चांगल्या समंजस लोकांचा स्वाभाविक विरोध.) ३ इतिहासामध्यें येणारे विषय–राजकीय, सामाजिक, धार्मिक, वाङ्मयी. ४ इतिहासापासून होणारे फायदे–( १ जिज्ञासातृप्ति, २ नीतिबोध, ३ मनास उन्नति व प्रसन्नत्व, ४ मनाचें रंजन, ५ राजकारण, ६ मनाचें पोषण, स्मृति, कल्पनाशक्ति व विचारशक्ति वाढतात ).

[ इतिहासाचे फायदे दुसऱ्या एका नामांकित लेखकानें खालीलप्रमाणें दिले आहेत—

१. मानवी स्वभावाचें ज्ञान होतें. २. मन प्रशस्त होऊन भ्रांतिमूलक मतें नाहींशीं होतात. ३. सुखदुःखाच्या मिश्रणापासून सुखावह गोष्टी कोणत्या हें समजतें. ४. राज्यांची स्थापना व नाश, सज्जनांचा विजय, दुर्जनांची दुर्दशा, गर्विष्ठपणास मिळणारी शिक्षा, नम्रतेस मिळणारें बक्षिस.]

## ५. विद्यार्थ्यांचा मानसिक ऱ्हास

१ सरासरी बुद्धिमत्ता कमी होत आहे. २ धैर्य, आवेश, निर्धार, दीर्घोद्योग वगैरे मानसिक गुण कमीकमी होत आहेत.

प्रमाणें—१ परीक्षांचे निकाल. २ कठीण विषयांचा कंटाळा. वाङ्मयअध्ययनाकडे कल. ३ औद्योगिक शाखांकडे निरुत्साह. ४ उद्योग, कल्पकता, नीति, शारीरिक सामर्थ्य इत्यादि बाबींत कमतरता.

## ६. विद्येचें सामर्थ्य

१ रानटी मनुष्य व सुधारलेला मनुष्य ह्यांची तुलना व तीवरून ज्ञानाची महती. ( पूर्वीची मुंबई व हल्लींची मुंबई, तुलना ). २ निरनिराळे शास्त्रीय शोध—वाफ, विमान, वीज, तारायंत्रें, ह्यानें ज्ञानांत पडणारी भर. ३ मनुष्याच्या सामर्थ्यांत वाढ—तीन राक्षसांची गोष्ट. किंवा 'विद्याप्रशंसे'तील उतारे. विद्येनें—"केला रवि चित्रकार मनुजानें, होउनि अंकित वायुहि तुष्ट करी...गानें."

## ७. प्रातरुत्थान ( सकाळचें उठणें )

१ प्रातःकाळचें महत्त्व, पंचपंच उषःकाल, धार्मिक महत्त्व, ताजेपणा, नवेपणा. २ त्या वेळचें सृष्टीचें मनोहरत्व, मनाची उल्हसित वृत्ति, पक्ष्यांचें मंजुगान इत्यादि. ३ उशीरां उठण्याचे परिणाम, दिवस कमी होतो, शक्ति क्षीण होते, मांद्य—शारीरिक व बौद्धिक—वाढतें, सर्व नाशास कारणीभूत होतें.

## ८. वक्तशीरपणा

१ अर्थ. २ विद्यार्थिदशेंत उपयोग. ३ पुढील आयुष्यांत उपयोग. ४ आळशी मनुष्याची दिनचर्या. ५ वक्तशीरपणाचे फायदे. कांहीं उदाहरणें. ( नेपोलियनचा लेफ्टनेंट.)

## ९. भूगोल

१ खगोल व भूगोल ह्यांची तुलना. २ भूगोलासंबंधीं प्राचीन मतें. ३ इतिहास आणि भूगोल ह्यांचा परस्परसंबंध. ४ भूगोलाच्या ज्ञानापासून फायदे, व्यापारविषयक, समाजविषयक, राजकारणविषयक. ५ भूगोलज्ञानापासून येणाऱ्या गोष्टी—स्वाभाविक, हवामान, फुलोरा, फळोरा, लोकवस्ती, धर्म, भाषा, प्राणी.

## १०. रेलवे

१ स्वाभाविक अडचणी—पर्वत, नद्या. २ रेलवेनें झालेलीं स्थित्यंतरें ( १ वाहतुकीमध्यें, २ धर्मसमजुतींत, ३ हिंदुस्थानांत जातिभदांमध्यें झालेली खळवळ). ३ रेलवेचे उपयोग—व्यापारास, देशास, युद्धप्रसंगीं (लष्करी रेलवे), व्यापारास उत्तेजन, मालाची लवकर नेआण करणें, दुष्काळांत विशेष उपयोग. ४ फायदे—वेळ, खर्च, सुखें. शिक्षणाची सोय म्हणून. ५ इतर माहिती—स्टीम इंजिनचा शोध, लोखंडी रस्ते, इंजिन इ.

## ११. दानधर्मपद्धति

१ हिंदुधर्मातील समजुती, मिळणारें पुण्य. २ इष्ट व अनिष्ट प्रकार, अनिष्ट प्रकारापासून उत्पन्न झालेली स्थिति, धंदेवाईक भिकारी. ३ दानधर्माविषयीं पाळावयाचे नियम व मर्यादा, पात्रापात्र दृष्टि, दानधर्म व्यवस्थित असल्यामुळें लोकांची स्थिति सुधारते. अनाथांना योग्य मदत करून त्यांच्या ठिकाणीं उद्यो-गाची आवड उत्पन्न करणें. ४ सध्यांच्या काळास योग्य दानपद्धति. ५ इतर सुधारलेल्या राष्ट्रांतील दानधर्मपद्धति. उ. अमेरिका. ६ बोर्ड आफ् चॅरिटीज्-दानधर्म मंडळें, त्यांचा उद्देश व व्यवस्था.

## १२. स्पर्धा

१ मानसिक वृत्ति—दोन तऱ्हांची स्पर्धा, त्यांचीं उदाहरणें, ऐतिहासिक. २ स्पर्धेपासून फायदे—जोम, उत्साह. तोटे-चढाओढ, कुत्सितपणा उत्पन्न होतो. ३ स्पर्धा उत्पन्न करण्याचे उपाय—गुणपरीक्षा, बक्षिसें, प्रदर्शन, इ. ४ उदाहरणें—शास्त्रीय शोध, ध्रुवाच्या सफरी इत्यादि.

## १३. शौर्य

१ मानसिक वृत्ति म्हणून महत्त्व. २ आपल्या मताप्रमाणें त्याचा अर्थ. 'संकटा-विरुद्ध तोंड देणें.' ३ खरें शौर्य व खोटें शौर्य ह्यांत फरक, दोन्हींचे विशिष्ट प्रसंग. ४ शौर्याचीं योग्य स्थानें. स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, स्वाभिमान, स्वलोक.

## १४. व्यायाम

१ शरीर आणि मन ह्यांचा परस्परसंबंध. २ व्यायामाची जरुरी, वेळ, साहित्य. ३ व्यायामाचे प्रकार, त्यांचा तुलनात्मक विचार-सांघिक खेळ, व्यक्ति-खेळ, देशी, विलायती, बैठे खेळ, फिरणें, पळणें. ४ उपयोग, गुण, सांघिक खेळांपासून फायदे. मानसिक गुण—नैतिक विकास, शरीरवृद्धि, आटपशीरपणा, चापल्य, सहकार्य, चुरस, शिस्त, सामर्थ्य इत्यादि.

## १५. शरीरसामर्थ्य

१ जरुरी—शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । धर्म, अर्थ, काम हे तिन्ही पुरुषार्थ शरीरसामर्थ्यावर अवलंबून आहेत. जीवनार्थ कलहांत कोण तगूं शकतें ? शरीरानें धष्टपुष्ट कां कमकुवत ? २ शरीरसामर्थ्य कमी होण्याचीं कारणें. दारिद्र्य, वाईट संवयी, निःसत्त्व आहार, देशाची परिस्थिति. भौगोलिक कारणें. ३ शरीरसामर्थ्य साधण्याचे उपाय—१ उत्तम आहार, २ व्यायाम-योग्य व वक्तशीर, ३ ब्रह्मचर्य-मानसिक, वाचिक, शारीरिक, मर्यादा.

## १६. उद्योग

१ आलस्यो हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः । } ह्याचा अर्थ
नास्त्युद्यमसमो बन्धुः कृत्वा यं नावसीदति ॥ } व महत्त्व.

२ उद्योग व स्वावलंबन ह्या दोहोंचा संबंध. ३ उद्योग व श्रीमंती ह्यांचा संबंध. ४ उदाहरणें—जपान, इंग्लंड वगैरे देशांतील लोकांच्या भरभराटीचीं कारणें. व्यक्ति—फोर्ड, किर्लोस्कर, सर जमशेटजी. ५ हवामानाचा उद्योगशीलत्वावर होणारा परिणाम.

## १७. स्वावलंबन

१ स्वावलंबन व परावलंबन, तुलना व विरोध. उदाहरणें—पारवा, मृगेंद्र. २ स्वावलंबन व श्रमविभाग ह्यांमध्यें येणारा विरोध, दोन्हींची मर्यादा, लोकव्यवहारांत स्वावलंबन कितपत शक्य आहे. ३ स्वावलंबनप्रकार-नैतिक, शारीरिक, बौद्धिक, त्यांच्या मर्यादा. ४ स्वावलंबनानें कोणते गुण व कसे चांगले दिसतात ? स्वावलंबनी लोक पुढें येतात, संकटास तोंड देतात. स्वतःवर ज्यांचा विश्वास त्यांच्यावरच दुसऱ्यांचा विश्वास बसतो.

## १८. स्वाभिमान

१—अर्थ, स्व+अभिमान. २ कां उत्पन्न व्हावा ? सर्वांत जास्त प्रेम आपण आपणावर करतों. तेव्हां साहजीकच स्वतावद्दल आपणास अभिमान वाटतो. त्याची मर्यादा. ३ प्रकार—खरा, खोटा, बेसुमार झाला तर त्याला बढाईचें स्वरूप येतें. ४ त्याचीं नैतिक व व्यावहारिक स्वरूपें.

## १९. स्वदेशाभिमान

१ एकाच वृत्तीच्या तीन स्थिति, देह, देश, देव—एकेक पायरी वर. पहिला स्वाभिमान, दुसरा स्वदेशाभिमान, तिसरा धर्माभिमान. २ हिंदुस्थानांत पूर्वी राजनिष्ठपणा होता, नाविष्णुः पृथिवीपतिः, त्याचीं कारणें. हिंदुस्थानांत इंग्लंडहून हा गुण आला. ३ इतर देशांचीं उदाहरणें—इंग्लंड, रोम, स्वित्सरलंड.

## २०. स्वधर्मप्रीति

१ आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक भावना. २ आध्यात्मिक दृष्टि. ३ उदाहरणें— मुसलमान, ख्रिस्ति, प्रॉटेस्टंट, रोमन कॅथालिक. ४ आजपर्यंत झालेले छळ, धर्मात्म्यांची आहुती.

## २१. वर्तमानपत्रांचें वाचन

१. वर्तमानपत्रांत काय काय असतें, वर्तमानकालीन इतिहास, प्रचलित राजकारण, ताजे व नवे शोध, ( शास्त्रीय व वाङ्मयिक ), अगदीं नवीं पुस्तकें, नोटिसा, जाहिराती, टीका. २. वर्तमानपत्रांचें महत्त्व, त्यांची कामगिरी—( १ ) कोणत्याहि चळवळीचा प्रसार व पुरस्कार करण्याचें साधन, ( २ ) समाजांत परस्परांविषयीं सहानुभूति उत्पन्न करितात, ( ३ ) साक्षरता वाढवितात, ज्ञानप्रसार करितात. ३ कांहीं आक्षेप—( १ ) त्याच्यांत वेळ फार जातो, ( २ ) त्यांच्यांत अनिष्ट प्रकार फार येतात, ( ३ ) त्यांच्यांत वाङ्मय तात्कालिक महत्त्वाचें असतें. ४. त्याला उत्तरें—( १ ) वेळ जर वांचविला तर दुसऱ्या सत्कारणीं आपण लावतों कां ? ( २ ) अनिष्ट प्रकारांकडेच तेवढे लक्ष द्या कां ? ( ३ ) तात्कालिक वाङ्मयामधूनच चिरकालीन वाङ्मय उत्पन्न होतें.

## २२. कादंबरीवाचन

१. कादंबरीवाङ्मयाची व्याख्या, (कथानक, पात्रें, स्वभावगुणदोष, भाषा.) २ कादंबऱ्यांचे प्रकार-सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, काल्पनिक. ३ कोणत्या कादंबऱ्या वाचणें अनिष्ट? वाचनाची मर्यादा. ४ अमर्यादित कादंबरीवाचनापासून काय तोटे होतात? कल्पनाशक्ति तीव्र होते, हवेंत किल्ले बांधण्याची संवय लागते. ५ चांगल्या कादंबरींच्या मर्यादित वाचनापासून फायदे—( १ ) इतिहास कळतो, (२) सद्गुणांचा उत्कर्ष, दुर्गुणांचा अपकर्ष, व्यसनाची हकालपट्टी, सद्यःस्थितीचीं सामाजिक चित्रें, व्यावहारिक अनुभव, अनुकरणीय अशीं स्वभावचित्रें कादंबरींत येतात.

## २३. नाटकें

१ व्याख्या-समाजांतील एकादें दृश्य घेऊन त्याचा आदर्श करावयाचा. २ लोकांना कां आवडतात? (१) दृश्य लोकांच्या परिचयाचें असतें, ( २ ) त्यांमध्यें प्रेमाचा संबंध येतो, ( ३ ) करमणूक होते. ३ नाटकाचें पूर्वस्वरूप-गोंधळ, ऊर्दू नाटकें, संस्कृत नाटकें. ४ सध्यांच्या नाटकाची स्थिति. ५ नाटकांत येणाऱ्या गोष्टी—पात्रें, कथासूत्र, गायन. ६ नाटक पाहण्यापासून फायदे—करमणूक, नैतिक शिक्षण. तोटे पैशाचा व वेळेचा अपव्यय, मनें बहकण्याचा संभव, जाग्रणामुळें शरीराच्या खराबीची भीति.

## २४. धंद्याची निवड

१ धंद्याची योग्य निवड करण्याची सर्वांना पडत असलेली अडचण. २ हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून जातिभेदामुळें कांहीं धंदे ठरून गेले आहेत. ३ जातिभेदाच्या कल्पनेंत पडत चाललेला फरक, वाटेल तो मनुष्य वाटेल तो धंदा करूं शकतो. ४ ह्या सुधारणेच्या युगांत नवीन धंदे पुष्कळ उत्पन्न झाले आहेत. सरकारी नोकरी, वकिली, वैद्यकी, कारखाने, गिरण्या, छापखाने, रेल्वे इ. ५ धंद्याची निवड कशी करावी? प्रकृतीला मानवेल असा धंदा पत्करावा. ६ धंद्यांत यश संपादण्यास लागणाऱ्या गोष्टी—शिक्षण, उमेदवारी, अनुभव, भांडवल, प्रामाणिकपणा, निरालस्य. ७ धंदा कारणाशिवाय सोडूं नये.

## २५. परीक्षा

१ उद्देश—(१) लायकी अजमाविणें, (२) उत्तेजन, (३) काय येतें हें पाहणें, काय येत नाहीं हें न पाहणें. २ दुरुपयोग—पाठांतरास उत्तेजन. ३ वेळ, मर्यादा,

बसण्याची सोय, विद्यार्थ्यांची संख्या, पर्यवेक्षकांची व्यवस्था, प्रश्नपत्रिका, उत्तर-पत्रिका, पूर्वतयारी. ४ प्रकार—तोंडी, लेखी, चांचणी, संदर्भपुस्तकें वापरण्याची परवानगी. ५ परीक्ष्य व परीक्षक ह्यांचा संबंध, ह्याचे गुण. प्रश्न कसे असावेत, साधे, सरळ, स्पष्ट, असंदिग्ध, लहान.

## २६. निसर्गसौंदर्य

१ ईश्वराची अतर्क्य शक्ति, २ निसर्गांतील सौंदर्य—सृष्टिदेखावे, सुंदर पक्षी, आकाशाची विस्तृतता, निरनिराळे रंग. ३ रेल्वे प्रवास करितांना दिसणारे देखावे—उ. खंडाळ्याचा घाट. ४ पायीं चालतांना दिसणारें सौंदर्य. ५ त्याचे परिणाम, मनाला आल्हाद, कवीला स्फूर्ति.

## २७. प्रामाणिकपणा

१ समाजोपयोगी गुण. २ प्रामाणिकपणाचा रोजच्या व्यवहाराशीं संबंध. ३ निरनिराळ्या व्यवहारांत येणारा संबंध—नोकरी, व्यापार, खाजगी. ४ मानवेतर प्राण्यांत दिसून येणारा प्रामाणिकपणा. उ. कुत्रा, घोडा.

## २८. वक्तशीरपणा

१ वैयक्तिक संवय. २ कामाच्या आटोपामध्यें ह्याचा उपयोग. ३ कांहीं वक्तशीर लोकांच्या आठवणी—मंडलीक, फ्रेंच सेनापती. ४ मानवी शरीर हें एक यंत्रच आहे, त्यावर वक्तशीरपणाचा परिणाम.

## २९. मित्रत्व

१ मित्रत्व आणि ओळख त्यांमध्यें फरक. २ खरा मित्र, मित्राची पारख कशी होते? ३ "कठिण समय येतां कोण कामास येतो?" "शितें तोंवर भुतें" इत्यादि म्हणींचा अर्थ व त्यांचा विषयाशीं संबंध. ४ अर्जुन व कृष्ण ह्यांचें मित्रत्व.

## ३०. नम्रता

१ अर्थ—उच्च कुलांत जन्मास आल्याचा परिणाम, अभिजातपणा. २ व्यवहारांत उपयोग. ३ उद्धटपणापासून होणारे तोटे. ४ कांहीं उदाहरणें—निसर्गांतील नम्रत्व. ५ जितकें ज्ञान जास्त तितकी नम्रता जास्त.

## ३१. समाधान

१ मानसिक वृत्ति—मनुष्याच्या वृत्तीवर अवलंबून. २ खरें सुख समाधानी वृत्तींत आहे. ३ मानसिक वृत्तींचें स्वाभाविक चांचल्य व अनावरपणा. ४ समाधान संपादण्याचे उपाय—साधी रहाणी, मनाला तसें शिक्षण द्यावयाचें. ५ साधु-संतांचीं उदाहरणें, असमाधानवृत्तींचा उल्लेख, शिकंदराचें उदाहरण.

## ३२. आज्ञाधारकत्व

१ ह्या गुणाची व्यवहारांत मातब्बरी, खेळांतील पक्ष, लढायांतील सैनिक. २ निसर्गांतील आज्ञाधारकत्व. ३ मानवी जगांतील आज्ञाधारकत्व, वाडवडील, शिक्ष्यसेव्य. ४ प्रगति करण्याचें हें एक साधन आहे.

## ३३. स्वच्छता

१ अर्थ. २ निरोगीपणाशीं संबंध, धर्माशीं संबंध. ३ प्रकार—शारीरिक, मानसिक. ४ रोगांची सांथ, आणि अस्वच्छता. जंतु. ५ स्वच्छता राखण्याचे उपाय—खाणेंपिणें, कपडे, राहाणी. संवयीनें स्वभाव बनतो.

## ३४. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात

१ म्हणीचा अर्थ, त्यावरून निघणारीं अनुमानें, बालपणांत ज्या संवयी लागतात त्यांच्यामुळें शीलास कायमचें वळण मिळतें. २ संवय कशी बनते? ३ इतिहासामधून अथवा वैयक्तिक अनुभवांवरून संवयीबद्दलचीं उदाहरणें. ४ कांहीं अपवादात्मक उदाहरणें, संवयींचे गुलाम बनत नाहींत. ५ उपसंहार. मुलांच्या शिक्षणांत संवयी बनविण्याबद्दलची काळजी.

## ३५. चातुर्य

१ दैवी व मानुषी गोष्टींचें सोपपत्तिक ज्ञान. २ चातुर्याचें महत्त्व. ३ घाई करण्यानें होणारें नुकसान. ४ ज्ञानाचें महत्त्व व त्याहिपेक्षां चातुर्याचें महत्त्व! ज्ञान हें कच्च्या मालासारखें आहे, चातुर्य हें त्याचा योग्य विनियोग करितें. ५ मनुष्याची पोकळ घमेंड व तिचा निरर्थकपणा. ६ कोणत्याही गोष्टींत मर्यादितपणा राखणें हेंच चातुर्याचें लक्षण, अतिरेकानें होणारें नुकसान.

## ३६. स्त्रीशिक्षण

१ जरूरी, स्त्रियांचा अर्धा दर्जा, अर्धी जबाबदारी, स्त्रियांच्या हातांत पाळण्याची दोरी असते, शिशुसंवर्धन, शिक्षण. २ स्त्रियांचा स्वभाव, शारीरिक

स्थिति, त्यांशीं संबद्ध असें शिक्षण. ३. शिक्षणक्रम कोणता असावा ? स्त्रियांचें व पुरुषांचें सारखें शिक्षण असावें काय ? ४ विषय–जन्मभाषा, संस्कृत, इंग्लिशचें थोडें ज्ञान, आरोग्यविज्ञान, वैद्यक, चित्रकला, शिवणकला, संगीत, धर्मशिक्षण. ५ प्राचीन आर्यावर्तातील उत्कृष्ट नमुने–गार्गी, अत्री, वाचक्नवी.

## ३७. संहतिः कार्यसाधिका–एकी

१ इसापनीतींतील कथा, म्हातारा मनुष्य आणि त्याचीं भांडणारीं मुलें. २ इतर कार्यक्षेत्रांत एकी कशी फळास येते? सैन्य व सांघिक खेळ. ३ फोडा व झोडा हें तत्त्व, वितुष्ट माजलें म्हणजे तोटा कसा उत्पन्न होतो ? ४ उदाहरणें, महंमद घोरी, जयचंद आणि पृथ्वीराज.

## ३८. वर्तमानपत्रें

१ वर्तमानपत्रांचा प्रसार, वर्तमानपत्रांचे प्रकार. २ त्यायोगें शिक्षणाची होणारी वाढ, लोकशिक्षणाचें साधन. ३ सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचें साधन, लोकजागृतीचें साधन. ४ वर्तमानपत्रांत येणारे विषय. ५ त्यांचीं अंगें, उपांगें, बाह्यांग, अंतरंग, अग्रलेख, संपादकीय, बातमीपत्रें. ६ वर्तमानपत्राचे इष्ट व अनिष्ट परिणाम.

## ३९. प्रामाणिकपणा

१ सद्‌गुणांचा अर्थ. २ व्यवहारामध्यें कधीं कधीं प्रामाणिक मनुष्यास यश येत नाहीं. ३ अप्रामाणिकपणा व त्याला येणारें यश. ४ प्रामाणिकपणा हेंच ध्येय अंतीं यशस्वी ठरतें. ५ आधिभौतिक व आध्यात्मिक दृष्ट्या विचार.

## ४०. विमान–विद्या

१ प्राचीनकालच्या कल्पना, रामायणांतील कल्पना, पुष्पक विमान. २ विमानरचनेसंबंधीं शास्त्रीय शोध, (१) कोलगॅस, (२) हायड्रोजनची पिशवी. ३ वाहतुकीच्या किंवा दळणवळणाच्या साधनांत झालेली उत्क्रांति. ४ विमानाचे प्रकार–झेपेलिन, एरोप्लेन इ. ५ विमानांचा भविष्यकाळ.

## ४१. जिच्या हातीं पाळण्याची दोरी, ती राष्ट्रातें उद्धारी

१ उपोद्‌घात–म्हणीचा अर्थ. २ बालपण–मुलांना वाटेल तसें वळण देतां येतें. ३ आईची जबाबदारी–शिक्षण व संवयी ह्या बाबतींत. ४ भावी नागरिक

है आजच्या लहान पिढीपासूनच होतात. ५ ह्याकरितां स्त्रियांच्या शिक्षणाचें महत्त्व, बौद्धिक व नैतिक.

### ४२. साहसे श्रीः प्रतिवसति

१ उपोद्घात–अर्थ. २ व्यापार, शिक्षण, उद्योग, शास्त्रसंशोधन वगैरे बाबतींत साहसानें होणारी प्राप्ति. ३ साहस न दाखविलें तर काय होतें? शांत आयुष्याचीं उदाहरणें. ४ अति साहस दाखविल्यानें होणारे तोटे. ५ व्यापारांत दिवाळीं निघण्याचीं कारणें. ६ उपसंहार-चांगलीं उपकारी उदाहरणें.

### ४३. स्वप्नें

१ कारणें:—(अ) शारीरिक अपचनामुळें, अस्वस्थ झोपेमुळें. ( आ )मानस-शास्त्रीय–जागृतावस्थेंत ज्या वृत्तींवर आपण दडपण ठेवितों त्या वृत्ति स्वप्नांमध्यें प्रादुर्भूत होतात. २ स्वप्नांबद्दल समजुती:—(अ) पुढें येणाऱ्या गोष्टींच्या पूर्व-छाया आहेत, ( आ ) कधींकधीं त्या विरुद्ध गोष्टी घडून येतात, (इ) कधींकधीं अशक्य व अद्‌भुत प्रसंग स्वप्नांत दिसतात. ३ मनुष्याच्या तीन अवस्था— जागृती, स्वप्न, सुषुप्ति, चौथी मोक्ष. मृत्यु व मोक्ष ह्यांमध्यें फरक. ४ स्वप्नांमध्यें जाणीव असते, स्वप्नमय जगाचा व्यापार. ५ कधींकधीं स्वप्नांत उत्तम बौद्धिक काम होतें, कधीं ईश्वराचा साक्षात्कार होतो.

### ४४. गरज ही कल्पकतेची जननी

१ म्हणीचा अर्थ–त्याचीं कांहीं उदाहरणें–डच लोकांचें, इंग्लिश लोकांचें. २ मनुष्याचा निसर्गाशीं झगडा–हळुंहळूं त्यानें केलेल्या सुधारणा. ३ अग्नीचा शोध, निरनिराळ्या धातूंचा, हत्यारांचा शोध त्या त्या वेळेस गरज पडली म्हणून लागला. ४ गेल्या युरोपमधील महायुद्धांत निरनिराळे लावलेले शोध व परिस्थिति, पाणबुडी, विमानें, विषारी धूर, टँक, तोफा, इ. ५ निरनिराळ्या शास्त्रांत सध्या जे शोध लागतात ते गरजेमुळें नाहींत. त्यासाठीं हेतुपूर्वक प्रयत्न करण्यांत येतो. शास्त्राभिज्ञ वर्षेंच्या वर्षें आपले अनुभव गोळा करीत असतात.

### ४५. दारिद्र्य

१ दारिद्र्यांतील हाल. २ दारिद्र्य नको कां वाटतें? सामान्य माणसाला पैशासारखें दुसरें कांहींच वाटत नाहीं. ३ श्रीमंती व गरिबी ह्यांची तुलना श्रीमंतीचीं संकटें. ४ दारिद्र्यांचें समाधान, दारिद्र्यांत आढळून येणारे गुण,

५ द्रव्यापेक्षां अधिक महत्त्वाच्या व सर्वांच्या आटोक्यांतील गोष्टी ( १ ) उच्च शील, ( २ ) ज्ञान. ६ सज्जनांचा धनाविषयीं अभिप्राय, धनाची नश्वरता. ७ द्रव्यतृष्णा निंद्य असली तरी न्यायार्जित द्रव्यांत काटकसरीनें सुखी रहाणें योग्य आहे.

## ४६. सहकारी पतपेढी

१ ऐतिहासिक—पूर्वी पैशाची देवघेव कशी होत असे ? सावकार लोकांना पैसे व्याजू देत, व देतांना त्यांची जर पत नसेल तर स्थावर मिळकत गहाण ठेवून देत असत. २ त्यामधील दोष—मोठा व्याजाचा दर, सावकारांचा अप्रामाणिकपणा, सर्व मालमत्ता सावकारांच्या घरीं जात असे व बिचाऱ्या शेतकऱ्यास हाल काढावे लागत. हे सर्व हाल टळावे म्हणून ही योजना सरकारनें अंमलांत आणिली आहे. ३ सहकारी पतपेढीचें पूर्वस्वरूप—जर्मनी देशांत प्रथम सुरुवात. ४ पतपेढीचीं आद्यतत्त्वें—(१) प्रत्येक खेड्यांत एक स्वतंत्र पेढी असावी, (२) त्या खेड्यांतील रहिवाशी त्या पेढीचे सभासद होण्यास लायक असावेत, (३) त्या सभासदांनाच तेवढें त्यांतून कर्ज मिळावें, इतरांना मिळूं नये, (४) त्या सभासदांनींच आपणांमधून कांहीं लोक कार्यकारी मंडळ म्हणून निवडावे व त्यांच्या हातांत सर्व व्यवस्था द्यावी. ५ सध्यांचें स्वरूप—प्रत्येक मोठमोठ्या खेड्यांत ह्याप्रमाणें व्यवस्था आहे. ६ यशस्वी होण्यास उपाय—सभासद प्रामाणिक असले पाहिजेत, ठेवींवर दुष्ट नजर ठेवूं नये, अपहार करण्याची बुद्धि असूं नये. ७ फायदे—शेती सुधारते, योग्य वेळीं कर्ज मिळूं शकतें, व्याजाचा दर थोडा असतो, एकमेकांच्या उपयोगीं पडण्याचें हें एक साधन आहे, हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशाला ह्यापासून फार फायदे आहेत.

खालीं कांहीं चिंतनविषयक निबंध लिहून दाखविले आहेत. ते नमुन्यासाठीं पहावे.

## १. स्वावलंबन

१ इसाबनीतींतील गोष्ट. २ परावलंबन. ३ परावलंबनाची मर्यादा. ४ स्वावलंबनाचे जरूरीचे गुण. ५ स्वावलंबनाची विशेष जरूरी कोणास लागते ?

स्वावलंबनासंबंधीं एक गोष्ट सांगण्यांत येते. एका शेतामध्यें एक लावी पक्षीण आपल्या मुलांना घेऊन रहात असे. शेतांतील पिकाची कापणी व्हावयाची होती. एकदां त्या शेताचा मालक शेतांत येऊन आपल्या मुलाला बोलला कीं, "आपण आपल्या शेजाऱ्यांना बोलावून पिकाची कापणी उद्यां उरकून घेऊं." हें बोलणें तिच्या पिलांनीं ऐकिलें आणि घाबरून जाऊन आपल्या आईस सांगितलें. त्या पक्षिणीनें शांतपणानें उत्तर दिलें कीं, "बाबानों ! घाबरूं नका. जोंपर्यंत तो शेतकरी दुसऱ्याच्या मदतीवर विसंबून आहे तोंपर्यंत आपणांस भीति नाहीं." शेतकऱ्यानें आपल्या शेजाऱ्यांची वाट कांहीं दिवस पाहिली. ते येत नाहींतसें पाहून त्यानें स्वतःच 'आपण कापणी करूं' असें मुलांस सांगितलें. हें ऐकिल्याबरोबर मात्र लावीण म्हणाली—" चला आतां; आतां मात्र येथें राहून भागावयाचें नाहीं." नंतर ती आपल्या मुलांसह दुसरीकडे राहण्यास गेली.

स्वावलंबनाचें महत्त्व ह्या गोष्टीवरून चांगलें प्रत्ययास येतें. "जो दुसऱ्यावरी विश्वासला, त्याचा कार्यभाग बुडाला," अशी समर्थांची उक्ति आहे. दुसऱ्याच्या मदतीबद्दल आपणांस खात्री देतां येत नाहीं, तो येईल किंवा नाहीं' मदत करील किंवा नाहीं वगैरे कांहीं निश्चयानें सांगतां येत नाहीं. दुसरा मदत करील म्हणून आपल्या हातून जो शक्य खटपट तीहि आपण करीत नाहीं. परावलंबनानें आपणामध्यें आळस उत्पन्न होतो.

जगाचा एकंदर व्यवहार परस्परसापेक्ष आहे. एकमेकांची मदत एकमेकांना घ्यावी लागते. सर्व काम एकटा करूं म्हणेल तर तें शक्य होत नाहीं. श्रमविभागाचें तत्त्व ह्यावरच उभारलेलें आहे. शिवाय कांहीं बाबतींत मनुष्य असहाय्य असतो. मुलांना थोरांवर विसंबावें लागतें. अजारी लोकांना दुसऱ्यांची मदत घ्यावी लागते. अशक्त दुबळ्या लोकांना सशक्त प्रबलांच्या तोंडाकडे बघावें लागतें, असा हा न्याय आहे. धान्य मीच पिकविणार, कपडे मीच तयार करणार, घर माझें मीच बांधणार, माझें सामान मीच करणार असें कोणी म्हणेल तर तें शक्य नाहीं. त्याला त्याचें आयुष्य पुरणार नाहीं. वेळ व पैसा ह्याचा अपव्यय होईल व शिवाय काम होणार नाहीं तें नाहींच. श्रमविभागाचें तत्त्व अंगीकारिलेंच पाहिजे.

स्वावलंबी मनुष्यानें आपलें स्वतःचें सामर्थ्य प्रथम अजमाविलें पाहिजे. आपली कुवत किती आहे, आपणांस ओझें कितपत निभण्यासारिखें आहे, हें पाहिलें पाहिजे. आपली आपण परीक्षा अगोदर करावी. दुसरी गोष्ट, त्याला आत्मविश्वास पाहिजे. आपण अमुक एक करूं शकूं असें त्याला म्हणतां आलें पाहिजे. खोटा आत्मविश्वास उपयोगी नाहीं. विनाकारण बढाई मारल्यानें दुसऱ्यास तर आपण फसवितोंच परंतु आपलें आपणांसहि फसवितों. आणि तिसरी गोष्ट, आपल्या पायावर उभें राहण्याचा एक प्रकारचा ठाम निश्चय पाहिजे. कांहीं जरी झालें तरी डगमगतां कामां नये. त्याचप्रमाणें अपयश आलें तरी आपलें काम नेटानें, आत्मविश्वासानें चालविलें पाहिजे.

ज्यांना असा विश्वास नाहीं त्यांचें हसें होतें. जे दुसऱ्याची हांजी हांजी करतात, आपलें स्वत्व विसरतात, त्यांच्याविषयीं तिटकारा उत्पन्न होतो. जें आपणांस स्वतः करतां येण्यासारखें आहे, जें करण्यास आपणांस ईश्वरानें सामर्थ्य, ज्ञान व कौशल्य दिलें आहे त्याबद्दल तरी निदान दुसऱ्यावर अवलंबून राहूं नये. आळशी माणसें कामास हात घालण्यास कचरतात, मदतीसाठीं दुसऱ्यास बिलगतात. असल्या लोकांनाच स्वावलंबनाचे पाठ देणें जरूर आहे.

## २. आयुष्याचा विमा अथवा विमा कंपनी

१ जीविताचें नश्वरत्व, जितकी जास्त सुधारणा तितका धोका जास्त. २ अकालीं अपाय झाल्यास तरतुदीचे उपाय. ३. सध्यांच्या काळीं त्याची विशेष जरूरी. ४ विमा कंपन्यांची व्यवस्था. ५ फायदे—विमा, काटकसर, काळजी नाहींशी होते. ६ विम्याचे प्रकार.

मनुष्यजीवित फार नश्वर आहे. त्याचें खात्रीलायक असें कांहींच सांगतां येत नाहीं. आतां आहों आणि एका घटकेनें नाहीं अशी स्थिति आहे. दिवसानुदिवस वैद्यकशास्त्रांत शोध लागताहेत, नाना प्रकारची शस्त्रक्रिया अमलांत येऊं लागली आहे, रोगांचा नायनाट करण्याचा मनुष्य सारखा प्रयत्न करीत आहे, तरी पण जीविताचा स्थिरपणा वाटत नाहीं. रोग व सांथी केव्हां झडप घालतील ह्याचा नेम नाहीं. ह्याशिवाय इतर संकटेंहि कांहीं थोडीं नाहींत. हिंदुस्थानांत सर्पदंशानें कितीतरी माणसें मृत्युमुखीं पडतात. मुंबईसारख्या शहरीं थोडेंसें अवधान नाहींसें झालें कीं, मृत्यु जवळ ठेवलेलाच. रेल्वे,

ट्रॅम, बोटी, तुफान, मोटार, जाळपोळ, घेरपड, विजेचे उत्पात हीं सर्व ह्या सुधारणेच्या काळांतील मृत्यूचीं साधनें होत.

अशा रीतीनें जीविताची जर एका क्षणाची खात्री देतां येत नाहीं तर, त्याबद्दल प्रत्येकानें कांहीं तरतूद करणें जरूर आहे कीं नाहीं? हिंदुस्थानांतील कौटुंबिक व्यवस्था व एकंदर रहाणी अशी आहे कीं, प्रत्येक मनुष्यावर अवलंबून असणारे इतर लोक फार. मिळविणारा एक तर पोसले जाणारे चार, अशी प्रत्येक कुटुंबांत स्थिति आहे. त्यामुळें जर कर्त्या मनुष्यावर दुर्दैवानें मृत्यूचा घाला आला तर, त्या दुर्दैवाला सीमा नाहीं. बिचारी बायको, त्याचीं चार पांच मुलें व इतर आश्रित मंडळी असहाय्य व पोरकीं होऊन त्यांना जगांत मोठ्या दैन्यानें हिंडावें लागतें. ही सर्व आपत्ति टाळण्याचा एकच चांगला मार्ग आहे आणि तो म्हणजे आयुष्याचा विमा उतरणें हा होय.

ज्याला आपल्या आयुष्याचा विमा उतरावयाचा असेल त्याच्या प्रकृतीची नामांकित डॉक्टरकडून तपासणी करण्यांत येते. नंतर हा मनुष्य अमुक वर्षे जगेल असें ठरवून त्याप्रमाणें त्याला जेवढ्या रकमेचा विमा उतरावयाचा असेल त्याप्रमाणें त्याच्यावर हप्त्याची आकारणी करतात. हे हप्ते त्यानें दरसाल त्या मुदतीपर्यंत भरावयाचे असतात. मध्येंच जर तो मनुष्य कालवश झाला तर, विम्याची रकम त्याच्या वारसास देण्यांत येते. अशा रीतीनें कर्ता मनुष्य जरी गेला—जाणें हें वाईटच—तरी त्याच्या कुटुंबाची दैन्यावस्था होत नाहीं.

आतां येथें कोणी असा प्रश्न विचारील कीं विमा कंपन्या तर फार थोडे हप्ते घेतात, परंतु मृत्यूच्या प्रसंगीं हजारों रुपये देतात; हें कसें? विम्याच्या तत्त्वाची उभारणी मानवी आयुष्याच्या सरासरी मर्यादेवर केली आहे. सर्वच कांहीं मनुष्यें तरुणपणीं मृत्युमुखीं पडत नाहींत. सर्वांनाच कांहीं धोका होत नाहीं. मोटारखालीं सांपडणारे, विजेच्या आघाताला बळी पडणारे, साथींत, रोगराईत सांपडणारे लोक एकंदर लोकसंख्येच्या मानानें केव्हांहि थोडेच असणार. बहुसंख्याक असते तर जग चालावें कसें? तेव्हां जे थोडे असे अकालीं मृत्युमुखीं पडतील, त्यांच्या साठीं जो तोटा येतो तो जास्त दिवस जगणारे व हप्ता भरणारे असे लोक असतात त्यांच्या हप्त्यांत भरून काढतात.

विमा उतरण्यानें संकटसमयींची तरतूद केली जाते. विम्याचे हप्ते वेळच्या वेळीं भरावे लागल्यामुळें काटकसरीनें राहण्याचें शिक्षण मिळतें. संकटाची

तरतूद लागल्यामुळें मनास रुखरुख लागत नाहीं. रुखरुख नसली म्हणजे साहजिकच खाल्लेलें अन्न पचतें व आंगीं लागतें.

अलीकडे आयुष्याचाच केवळ नव्हे तर इतर बहुमोल वस्तूंचाहि विमा उतरतां येतो. घरें, वाडे, बोटी, आगगाड्या, मोटारी वगैरेंचे विमे उतरून ठेवतात. त्यांना जर कांहीं अपाय घडला तर, निदान आर्थिक आपत्ति तरी ओढवत नाहीं. विमाकंपनींत व्याज कमी मिळतें हें खरें, तरी संकटसमयींची तरतूद म्हणून त्याची किंमत जास्त आहे. प्रत्येकानें, विशेषतः मध्यम स्थितींतील लोकांनीं, ह्याचा अवश्य फायदा घ्यावा.

## ३. सेव्हिंग बँक-ठेवपेढी

१ कांहीं उदाहरणें ( पोषक ). २ व्याख्या व जरुरी. ३ ऐतिहासिक व तत्त्वें. ४ प्रकार. ५ व्यवस्था. ६ फायदे.

पावसाळ्यामध्यें सुखानें राहणारी मुंगी सर्वांना माहिती आहे. मुंगीच्या चांगल्या काळांत काटकसरीनें राहून संग्रह केल्याचा फायदा तिला मिळतो हें उघड आहे. नाहीं तर उलट वानरांचें उदाहरण आहेच. कधीं संग्रह म्हणून विचाऱ्याला माहीत नसतो. पावसाळ्यांत संकटकाळीं त्याचे हाल झाल्याशिवाय रहात नाहीं. मनुष्यानें ह्यापासून शिकण्यासारखें पुष्कळ आहे.

मनुष्याची मिळकत कितीहि असली तरी स्वतः आपल्याजवळ आपण आपली शिल्लक ठेवीत जाऊं असें तो म्हणेल तर त्याला तें शक्य होत नाहीं. मिळकतीमधून खर्च वजा जातां जी शिल्लक उरते ती योग्य सुरक्षित रीतीनें ठेवण्याची जी संस्था तिला सेव्हिंग बँक—पेढी—असें म्हणतात.

प्राचीन काळीं प्रत्येक शहरीं सावकार असत ते लोकांना पैसे व्याजीं देत. त्यांचे पैसेहि व्याजानें ठेवीत असत. परंतु पैशाच्या देवघेवीस जो प्रामाणिकपणा लागतो, जी एक सचोटी लागते, ती त्या वर्गांत हळुहळू कमी कमी होत गेल्यामुळें सावकारावर कोणी विश्वास ठेवीनातसे झालें. दुसऱ्याचा पैसा अपहार करण्याची इच्छा जर धरली तर लोक विश्वासानें जवळ कसे यावेत? शिवाय सावकारांच्या देवघेवीच्या व्यवहारानें व्यक्तीचा फायदा होत असे. समाजाला फायदा होत नसे. राष्ट्रांतील संपत्तीचा व्यक्तीस तर फायदा मिळावाच पण समाजालाहि मिळाला पाहिजे व ह्याच तत्त्वावर ठेवींच्या पेढींची उभारणी केली आहे.

ठेवीच्या पेढीचे पुष्कळ प्रकार आहेत. पोष्ट ऑफिसतर्फे सरकारी पेढीची व्यवस्था केली जाते. समायिक भांडवलाच्या तत्त्वावर पुष्कळ कंपन्यांनीं पेढ्या काढल्या आहेत. कांहीं जातिविशिष्ट पेढ्या त्या त्या जातींतील लोकांच्या उत्कर्षासाठीं निघाल्या आहेत. मजुरांच्या सोयींसाठीं भांडवलवाल्यांनीं पेढ्या काढिल्या आहेत.

पेढीमध्यें पैसे ठेवण्याच्या निरनिराळ्या सोयी असतात. चालू खात्यांतील रकमेस व्याज कमी मिळतें. मात्र रकम केव्हांहि काढितां येते. ठरावीक मुदतीनें जी रक्कम ठेविली जाते तिला व्याज जास्त मिळतें. अशी जी लोकांची रक्कम येते आणि भागिदारांच्या रकमा मिळून पेढीचे अधिकारी मोठ्या व्याजानें लावितात. पेढीला स्थैर्य यावें म्हणून कांहीं भाग खात्रीच्या सरकारी बँकेंत ठेवितात, बाकीची रकम व्यापारांत गुंतवितात. सर्व हिशेब वर्षाअखेर पुरे करून भागिदारांस व खातेदारांस त्यांच्या ठेवीबद्दल व्याज देण्यांत येतें.

पेढीपासून व्यक्तींचे, समाजाचे व राष्ट्राचे फायदे आहेत. व्यक्तीस काटकसरीच्या राहाणीची संवय लागते. त्याच्या उधळेपणास आळा बसतो. पैशाची किंमत तरुणपणीं न कळतां म्हातारपणीं—हातपाय थकले म्हणजे कळते. पैशाची शिल्लक स्वस्थ निकामी न पडतां तिला व्याज येतें. राष्ट्रामध्यें असें मोठें खेळतें भांडवल राहिल्यानें व्यापारधंदा, कलाकौशल्य, कारखाने ह्यांस उत्तेजन मिळून भरभराट होते.

## ४. अतिपरिचयादवज्ञा

१ म्हणीचा अर्थ. २ परिचयाचा हळुहळू होणारा परिणाम. ३ वितुष्ट कसें येतें. ४ दुसरी बाजू—परिचयाचे चांगले परिणाम. ५ इतर जड वस्तूंच्या बाबतींत म्हण कशी यथार्थ होते.

अतिनिकटचा परिचय अथवा दाट ओळख परस्परांत झाली म्हणजे अवज्ञा किंवा अपमान होतो. डोंगर लांबून चांगले दिसतात. त्यांमध्यें निसर्गसौंदर्य दिसतें. त्यांच्याजवळ गेलें, त्यांच्याशीं जास्त निकट परिचय झाला म्हणजे त्यांच्यांतील खबदाडें, ओबडधोबडपणा नजरेस पडून त्यांच्या सौंदर्याबद्दलची आस्था कमी होते. हाच नियम मनुष्यास लागतो. परिचय झाला कीं, त्याचे दोष दिसतात आणि दोष दिसले कीं, त्याविषयीं विशेषसा आदर वाटत नाहीं.

वरील म्हण विशेषतः मनुष्याच्या बाबतींतच उपयोगांत आणितात. अवज्ञा ही मनुष्यालाच जास्त जाणवते. जड पदार्थांची अवज्ञा करून करून ती काय करणार ? अपमानाचे प्रसंग मनुष्यासच जास्त येणार हें उघड आहे. परिचय जास्त झाला कीं शिष्टाचाराचा लोप होतो. औपचारिक व्यवहाराचें, वरवर शिष्टाचाराचें नेहेमीं एक प्रकारचें पांघरूण घ्यावें लागतें व परिचयानें हें पांघरूण हळुंहळूं नाहींसें होतें. अंत:करणांतील भावनांवर जे पडदे असतात, ते हळुंहळूं नाहींसे होतात व असें झालें म्हणजे त्याचे परिणामहि जाणवतात.

प्रथम प्रथम जर आपण मोठया अदबीनें बोलत असलों तर त्या ठिकाणीं सलगीनें बोलणें येतें. सलगीबरोबर विनोद येतो, विनोदाचें पर्यवसान थोड्याच दिवसांत थट्टेंत होतें, थट्टेतच एकमेकांचें उणें पाहण्याची प्रवृत्ति डोकावते, व उणें काढलें कीं लागून बोलणें आलें, लागून बोललें कीं स्नेहामध्यें वितुष्ट येण्यास काय उशीर ?

स्नेहाला सलगीचें रूप आलें कीं त्याचा व्यवहारांत परिणाम होतो. सलगी झाली कीं, एकमेकांचें देणेंघेणें, उसनेंपासनें, मदत मागणें देणें, काम सांगणें करणें वगैरे व्यवहार सुरूं होतो व पैशाचा व्यवहार आला व जर तो योग्य झाला नाहीं कीं वितुष्ट आल्याशिवाय रहात नाहीं.

अतिपरिचयानें अशी अवज्ञा होते हें जरी खरें असलें तरी परिचय करूं नये हें मात्र खरें नाहीं. परिचय किंवा दाट ओळख करावयाचीच नाहीं म्हटलें तर, जगाचा व्यवहार केवळ व्यापारी स्वरूपाचा होईल. प्रेम, मैत्री वगैरे उत्तम उत्तम गुणांस आपणांस पारखें व्हावें लागेल. केवळ वाईट परिणामापासून किंवा अतिप्रसंगापासून दूर रहावें एवढाच अर्थ वरील म्हणींत घ्यावयाचा आहे. चांगल्या चांगल्या व्यक्तींचा दृढ परिचय झाल्यानें चांगलें कल्याणच झालें आहे. त्याचीं रामचंद्र व मारुती, शिवराय व रामदास अशीं उदाहरणें पुराणांत व इतिहासांत मुबलक पहाण्यास सांपडतील.

त्या म्हणीची प्रतीति जड वस्तूंमध्येंहि येते. जोंपर्यंत वस्तुहि नवी तोंपर्यंतच तिचें कौतुक वाटतें. वस्तु मिळविण्यास जितके श्रम जास्त तितकी तिची मातब्बरी जास्त. तीच वस्तु सुलभ झाली तर, तिच्याबद्दल कांहीं दिक्कत वाटत नाहीं. मारवाडांत पाण्याचें दुर्भिक्ष्य म्हणून पाण्याची तेथें केवढी आपूर्वाई ? परंतु जेथें

पाणी मुबलक तेथील लोकांना पाण्याची काय पर्वा ? ते पाणी किती तरी सांडणार, लवंडणार. तेव्हां कोणत्याही वस्तूबद्दल अगर पुरुषाबद्दल अनास्था होण्यास, तिटकारा वाटण्यास तीन कारणें आपण पाहिलीं. एक अतिनिकट सांनिध्य, दुसरें दीर्घ सहवास आणि तिसरें मुबलकपणा.

## ५. मोफत वाचनालयें

१ उद्देश. २ ज्ञानप्रसाराचें साधन म्हणून महत्त्व. ३ वाचनालयाची मांडणी. ४ वाचनालयांचा प्रसार. ५ वाचनालयापासून होणारे तोटे. व त्यांचा परिहार.

वाचनालयांत पुस्तकें व वर्तमानपत्रें असतात. तीं वाचलीं म्हणजे साहजिकच ज्ञानांत भर पडते. ज्ञानाचा प्रसार करण्याचीं उत्तम साधनें म्हणजे हीं वाचनालयें होत. हीं साधनें जर खर्चाशिवाय मनुष्याला लाभूं शकतील तर फारच चांगलें.

ज्ञानप्रसाराचीं इतर साधनें पुष्कळ आहेत. परंतु सर्व साधनांचा सर्वांना सारखा उपयोग होत नाहीं. कांहीं विशिष्ट वर्गाच्या लोकांच्या उपयोगीं असतात. शालागृहाच्या योगानें लहान मुलांमध्यें ज्ञानाची लालसा व वाढ उत्पन्न होते. परंतु वाचनालयांचें तसें नाहीं. त्याचा उपयोग सर्वांना सारखा होतो. लहानथोर, गरीबश्रीमंत, स्त्रीपुरुष इत्यादि विविध प्रकारच्या मनुष्यांना वाचनालयांपासून फायदा करून घेतां येतो. हा फायदा करून घेण्यासाठीं कांहीं थोडीशी पूर्वतयारी लागते. त्या मनुष्यास वाचावयास यावें लागतें. वाचावयास आलें तरच, त्यामध्यें जास्त गोडी लागून दिवसेंदिवस त्याच्या ज्ञानांत वाचनालयापासून भर पडेल.

वाचनालयांत वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें, इतर विषयांवरील पुस्तकें इत्यादि भाग असतात. त्यांमध्यें आणखी पोटभाग केलेले असतात. धार्मिक, सामाजिक, राजकीय, मनोरंजक इत्यादि प्रकारांचीं पुस्तकें विषयवारीनें लाविलेलीं असतात. त्या सर्वांची नोंद एका पुस्तकांत केलेली असते. बालोपयोगी व बालेतरोपयोगी अशीहि वर्गवारी कधीं कधीं करितात.

सर्वच पुस्तकें किंवा सर्वच वर्तमानपत्रें एकटाच विकत घेऊं म्हणेल तर शक्य नाहीं. त्याची संपत्ति त्याला पुरणार नाहीं. शिवाय राष्ट्रांमध्यें गरीब

व मध्यम लोकांचा भरणा विशेष असल्यामुळें त्यांची सोय काय ? पुस्तकें वाचण्याची तर हांव, परंतु विकत घेण्याची तर ऐपत नाहीं अशा लोकांच्या-साठीं वाचनालयें असणें व तींही मोफत असणें फार जरूर आहे.

हिंदुस्थानामध्यें अलीकडे मोफत वाचनालयांचा प्रसार बराच होऊं लागला आहे हें एक सुचिह्न आहे. दरवर्षी वाचनालयांचे तज्ज्ञांची एक परिषद भरून वाचनाची अभिरुची लावण्याकरितां एखादी योजना मुक्रर करितात. बडोदा संस्थानांत एक फिरतें वाचनालय सुरूं केलें आहे. त्यामुळें लहान लहान खेड्यांतील गरीब लोकांनाहि त्याचा मोफत फायदा मिळूं शकतो.

वाचनालयांत कादंबऱ्यानाटकांचा भरणा जास्त असतो व असलीं पुस्तकें वाचण्याचा नाद लागल्यानें तरुण लोकांचीं मनें बहकण्याचा संभव असतो. ही आपत्ती टाळण्यासाठीं वाचनालयाच्या अधिकाऱ्यांनीं योग्य व नीतीस पोषक अशा पुस्तकांची निवड करण्याची खबरदारी घ्यावी. दुसरा एक असा तोटा आहे कीं, पुस्तकें पुष्कळ लोकांच्या हातांतून गेल्यामुळें फाटतात व त्यांमध्यें रोगांचे कृमी राहण्याचा संभव जास्त असतो. व असलें फाटकें पुस्तक एकाद्या रोगग्रस्त मनुष्याच्या हातांतून दुसऱ्याच्या हातांत गेलें कीं, रोगाचा फैलाव बराच होतो. तिसरा एक तोटा असा आहे कीं, मोफत वाचनालया-मुळें पुस्तकें विकत घेऊन वाचण्याची लोकांची प्रवृत्ति नाहींशी होते. फुकट जें मिळतें त्याला मुद्दाम पैसे कोण देणार ? पुस्तकांना खप नसला म्हणजे ग्रंथकाराची हिंमत खचते. अशा रीतीनें उत्तम ग्रंथनिष्पत्तीस हीं वाचनालयें हानिकारक होतात.

इतके जरी तोटे असले तरी ज्ञान हें अमृत आहे व तें मोफत जितकें दिलें जाईल तितकें राष्ट्रांत जास्त संजीवन उत्पन्न होईल हें खास.

## ६. शीलं परं भूषणम्

१. शील हें भूषण कसें ? इतर भूषणाशीं तुलना. २. शीलाच्या प्रधान बाबी. ३. शीलसंवर्धनाचीं स्थानें. ४. शीलसंवर्धनाचीं साधनें. ५. उदाहरणें व उप-संहार.

मनुष्याचें शील म्हणजे त्याला एक मोठें भूषण आहे. सोन्याचांदीच्या दागिन्यांनीं मनुष्याला खरी शोभा येत नाहीं. ते शोभा देतात परंतु ती शोभा फार हलक्या दर्जाची असते. संपत्तीनें मदांध झालेल्यांनाच त्या दागिन्यांत

विशेष राम वाटतो. ह्यापेक्षां ज्यांची दृष्टी निवळली आहे ते विद्यारूपी भूषणाला महत्त्व देतात. श्रीमंतांतील श्रीमंत म्हणजे राजा. परंतु तो देखील आपल्या देशांत मानला जातो. इतरांना त्याचें काय ? परंतु 'विद्वान् सर्वत्र पूज्यते.' विद्याशून्य मनुष्यानें जर खूप दागिने घातले तर, त्याचें सौंदर्य खुलून दिसण्याऐवजीं तें विरूप दिसतें. त्याची छीः थू होते. तसेंच खूप विद्वान् मनुष्य असून देखील जर शीलशून्य असेल तर, त्याचें हंसें झाल्याविना रहात नाहीं. विद्वान् परंतु बढाईखोर, लांचलुचपती करणारा, सत्यासत्याचा विधिनिषेध न बाळगणारा असला तर त्याच्या विद्वत्तेकडे कोणीहि बघणार नाहीं. मनुष्य खरा शोभायमान दिसतो तो शीलानें. मग त्याजवळ द्रव्य असो वा नसो; विद्या असो वा नसो.

शीलामध्यें कोणकोणत्या गोष्टी येतात ? शीलामध्यें वैयक्तिक व सामाजिक असे दोन्ही प्रकारचे गुण येतात. कारण मनुष्याला जसा स्वतःच्या स्थैर्याचा विचार करावा लागतो तसा समाजाच्या स्थैर्याचाहि विचार करावा लागतो. वैयक्तिक गुणांमध्यें त्याचें शारीरिक व मानसिक शुद्धित्व, वक्तशीरपणा, उद्योगशीलता इतके गुण प्रमुख आहेत. स्वताची प्रगति ह्या गुणांनीं होते. सत्य बोलणें, दुसऱ्याच्या उपयोगीं पडणें, दुसऱ्याचा अपहार न करणें वगैरे हे सामाजिक गुण होत. कारण ह्यांचा संबंध दुसऱ्यांशीं येतो. शीलसंवर्धन म्हणजे ह्या गुणांचाच आपल्यामध्यें प्रकर्ष करणें हें होय.

शीलसंवर्धनाचें योग्य स्थान म्हणजे आपलें स्वतःचें कुटुंब होय. आपण ज्या कुटुंबांत रहातों त्यांतच आपलीं वडीलमाणसें, भाऊबहिणी, व इतर संबंधी माणसें असतात. त्यांच्याशीं निरनिराळ्या प्रकारांनीं वागावें लागतें व असें वागतांना लहानपणीं आज्ञाधारकपणा, सहिष्णुता, स्वार्थत्याग वगैरे गुणांची शिकवण आपणांस मिळून जाते. लहानपणीं मनोवृत्तींत लवचिकपणा असल्यामुळें त्यांना जसें वळण द्यावें तसें त्या वळण घेतात. शीलोपयोगी असेंच वळण त्यांना देण्याची प्रत्येकानें खबरदारी घ्यावी.

शीलशिक्षणाचें दुसरें महत्त्वाचें ठिकाण म्हणजे शाळागृह. शाळेमध्यें शिक्षकाचें आदर्श-वर्तन समोर असतें. शिवाय शिक्षणामध्यें असलेल्या विषयांच्या अध्ययनानें शीलसंवर्धन होतें. थोर ऐतिहासिक विभूतींचीं चरित्रें वाचून शीलावर परिणाम होतो. तसेंच पुराण, धर्म वगैरे ग्रंथांतील उतारे वाचल्यानें नीति-

शिक्षण मिळतें. शीलामध्यें नैतिक धर्मच ज्यास्त प्रधान आहे. समाजामध्यें आपणांस नैतिक धर्मच पाळावा लागतो. सत्य बोलणें, दुसऱ्यास न दुखविणें, आचारविचार शुद्ध असणें, दया करणें, त्याग करणें वगैरे नैतिक धर्माच्या प्रधान बाबी आहेत व ह्या सर्वांच्या एकीकरणांतच शील आहे.

शीलाच्या सात्त्विकपणाबद्दल बऱ्याच विभूति इतिहासांत व पुराणांत आढळून येतात. निदान हिंदुस्थानसारख्या धर्मप्रधान देशांत तर असलीं उदाहरणें पुष्कळ. भीष्माचार्य, श्रीरामचंद्र, युधिष्ठिर, छत्रपती शिवाजी, देवी अहिल्याबाई हीं शीलाचीं कांहीं ठळक उदाहरणें होत. मनुष्यानें ह्या विभूतींचीं चरित्रें पुढें ठेवून शीलाच्या मुख्य अंगांचा विकास करून आपणांस, आपल्या कुटुंबास व राष्ट्रास ललामभूत करून घेणें हेंच उचित आहे.

## ७. पोष्टखातें

१. पोष्टखात्याचें महत्त्व
२. पूर्वीची स्थिति
३. रेल्वेची मदत
४. निरानिराळीं कामें
५. अंतर व खर्च कसें तोडलें ?

सध्यांच्या काळीं पोष्टखात्यानें फार सोय झाली आहे. आपले जर इष्टमित्र दूर लांब असतील तर त्यांच्याशीं संभाषण करतां येत नाहीं. आपणांस जें बोलावयाचें तें आपण त्यांना लिहून कळवितों. आपण पत्राला अर्धा आण्याचें तिकिट लावून जवळच्या पोष्टाच्या पेटींत टाकितों. पुढें आपण त्याचा विचार करीत नाहीं. तें पत्र पेटींत पडल्याबरोबर इतर पत्रांबरोबर शिपाई घेऊन जातो. नंतर पत्त्यावरील ठिकाणांप्रमाणें त्या पत्रांची निवडानिवड होते. नंतर त्यांवर तारीख, गांव वगैरेंचा ठसा मारून रेल्वेमार्फत त्या त्या ठिकाणांवर पाठवितात. कितीतरी अल्प वेळांत व अल्प मोलांत आपण आपल्या इष्टमित्रांस आपले निरोप कळवूं शकतों !

सध्यां पोष्टानें झालेली सोय व प्राचीन काळीं असलेली सोय ह्यांची तुलना केली तर त्याचें महत्त्व प्रत्ययास येतें. पूर्वी जासूद असत व निरोप पोंचविण्याचें काम त्यांच्यामार्फत होत असे. जासुदास प्रवासाला वेळ फार लागत असे. रेल्वे, बोटी वगैरे प्रवासाचीं सुखाचीं साधनें त्या वेळीं नव्हतीं. पूर्वी रस्तेहि सध्यांइतके चांगले नव्हते. वाट फार बिकट, शिवाय वाटेंत चोरांचिलटांचा

उपद्रव, हिंस्र श्वापदांची भीति. अशा व इतक्या संकटांतून निभावून जासुदानें निरोप पोहोंचवायचा म्हणजे महाकर्म कठीण असे. जासुदांपेक्षां जरा जलद चालणारा सांडणीस्वार असे. त्याच्यामार्फत विशेषतः राजे, सरदार वगैरे मोठ्या श्रीमंत लोकांचें टपाल जात असे. जासूद झाला काय किंवा सांडणीस्वार झाला काय, दोघांचाहि उपयोग करून घेणें म्हणजे मोठ्या खर्चाचें काम असे. गरीबांना त्याचा फायदा करून घेणें मोठ्या मुष्किलीचें असे. पूर्वी कांहीं देशांत टपाल नेण्याच्या बाबतींत रथ किंवा गाड्या उपयोगांत आणीत. परंतु वाफेच्या शोधामुळें व रेल्वे, बोटी वगैरे जलद धावणारीं साधनें लाभल्यामुळें टपालाच्या सोयींत क्रांति झाली आहे. त्यांतच आणखी विजेच्या व बिनतारी विद्युत्संदेशाच्या शोधांमुळें तर विशेषच चमत्कार घडून येऊं लागले आहेत. टपालाची नेआण सरकारी खात्यामार्फत करण्याची सुरुवात हिंदुस्थानांत शीरशहानें केली. इंग्रजी अमदानींत त्यांत फार सुधारणा झाल्या आहेत.

पोष्टखात्यानें पत्रेंच तेवढीं नेआण करण्याचें पत्करलें आहे असें नाहीं. तर पुस्तकें, बंग्या, विमा, पैसे इत्यादीहि पोहोंचाविलीं जातात, त्याचप्रमाणें पैशाची ठेव ठेवून त्याच्यावर व्याज देतात. आयुष्याचा विमा उतरतात. अगदीं जर जलद संदेश पोहोंचवायचा असेल तर विद्युत्संदेश केला जातो, व ह्या सर्वांला विशेष खर्च लागत नाहीं. वेळहि फार लागत नाहीं.

टपालखात्याच्या योगानें लोकांच्या खाजगी सोयी तर झाल्याच आहेत परंतु प्रस्तुतच्या कालांत—ह्या व्यापारी युगांत—तर त्याचा फारच उपयोग झाला आहे. त्वरित सोयींमुळें व्यापार फार भरभराटीस आला आहे. सर्व राष्ट्रांमध्यें ही सोय करून घेतां येते. कोणत्याहि देशांत आपणांस पत्रें पाठवितां येतात. अंतर व खर्च हीं दोन्हींहि कमी केलीं आहेत.

## ८. पोषाख

१. पोषाखाचें महत्त्व.
२. पोषाखाचे उद्देश.
३. पोषाखांत सुधारणा
४. पोषाख कसे बदलले जातात.
५. इंग्लिश पोषाखाचें महत्त्व.

मनुष्याला ईश्वरानें जन्मतःच दिलेलें एक प्रकारचें सौंदर्य आहे. पोषाखानें आणखी एक दुसऱ्या प्रकारचें सौंदर्य मनुष्यास मिळतें. एक स्वाभाविक व एक

कृत्रिम. जे जातीचे सुंदर आहेत त्यांना कांहींही चालतें हें जरी खरें असलें तरी, पोषाखानें त्या मूळच्या सौंदर्यांत भर पडते हेंही खरें आहे. एखादा मनुष्य मूळचा पुष्कळ सुंदर असला आणि जर त्यानें पोषाख विद्रूप केला तर त्याचें हंसें होतें.

मनुष्य प्रथम प्रथम सृष्ट्युत्पत्तीच्या वेळीं उघड्या स्थितींतच होता. पुढें कालान्तरानें मनुष्याला पोषाख स्वीकारण्याची जरुरी भासली. थंडी, ऊन वगैरे आपल्या शरीरास तापदायक होऊं नये म्हणून त्यानें प्रावरण घालण्यास सुरुवात केली. शरीरसंरक्षणाबरोबर आणखीही एक त्याचा उद्देश होता. ईश्वरानें ज्या स्थितींत निर्माण केलें त्या स्थितींत वावरणें केव्हांही लज्जास्पद होतें. शरीर झांकून समाजांत वावरणें हें एक सभ्यपणाचें चिन्ह समजण्यांत येऊं लागलें.

प्रथम मनुष्य वल्कलें घालीत असे. पुढें जनावरांचीं कातडीं तो पांघरूं लागला. त्याच्यांतहि सुधारणा होत होत लोंकर, कापूस, रेशीम ह्या पदार्थांचा तो उपयोग करूं लागला. एकदां वस्त्रें-प्रावरणें घालण्यास सुरुवात झाली म्हणजे त्यांतच छानछूकपणा करण्याकडे प्रवृत्ति होते. जेणेंकरून आपल्या शरीराचें सौंदर्य जास्त उठावदार दिसेल असाच कपडालत्ता पेहेरण्याची इच्छा होते.

प्रत्येक देशांत निरनिराळे पेहराव दृष्टीस पडतात. पेहराव मुख्यतः त्या त्या देशाच्या हवामानाप्रमाणें ठरविण्यांत येतात. हवामान जर उष्ण असेल तर पोषाख पातळ व सैल असावयाचा. थंडी जर विशेष असेल तर अर्थातच लोकरीच्या जाड वस्त्रांचीच जरूरी भासणार. वयाप्रमाणें व धंद्याप्रमाणें पेहराव निराळे होतात. स्त्रियांचा पोषाख निराळा, पुरुषांचा निराळा असतो. पेहराव हा असा कालपरत्वें ठरतो व त्याला एक प्रकारचें राष्ट्रीयत्व येतें. एकदां एक पोषाख ठरला म्हणजे विशेष कारणाशिवाय तो बदलूं नये. मुलानें जर थोराच पोषाख केला किंवा गरीबानें श्रीमंताचा पोषाख केला तर त्याची चेष्टा होते. पोषाख करितांना तो आपल्या परिस्थितीस साजेलसा असावा. पोषाखानें मनुष्याच्या आंतील स्वभावाची ओळख पटते. छचोर पोषाख छचोर वृत्तीचा द्योतक आहे. ह्या कारणामुळेंच पेहरावाबद्दल कांहीं देशांत कडक कायदे केले आहेत. न्यायाधीश, वकील, सरदार वगैरे लोकांचे पोषाख कायद्यानें ठरलेले आहेत. एकानें दुसऱ्याचा पोषाख करण्यास कायद्यानें परवानगी नसते.

पोषाख कसाहि साधा जाडाभरडा असला तरी स्वच्छ व नीटनेटका असावा. श्रीमंतीचा, डामडौलाचा पोषाखच चांगला असें नाहीं. साधारण स्थितींतील मनुष्यानें कपड्यावर जरुरीपेक्षां जास्त खर्च करूं नये व जरुरीपेक्षां जास्त कपडे करूं नये. पोशाख उंची असावा पण भपकेदार असूं नये.

अलीकडे इंग्रजी पोषाख घालण्याची लोकांची–विशेषत: शिकलेल्या लोकांची–जास्त प्रवृत्ति दिसून येते. सर्व युरोपियन राष्ट्रांत सर्वांचा एक तऱ्हेचाच पोषाख आहे. हा पोषाख सुटसुटीत व नीटनेटका आहे. परंतु, हा पोषाखहि अर्धामुर्धा करूं नये. घ्यावयाचा तर सर्व घ्यावा. त्याला पुन्हां आपल्या हिंदु पोषाखाची जोड देऊन त्यांत विद्रूपता आणूं नये. हा पोषाख दिसण्यांत बरा दिसतो. राजदरबारांतहि त्याला मान्यता आहे. प्रथम भेटींत चांगला पोषाख घालून निरीक्षकांचें मत चांगलें करावें.

## ९. पुस्तकें

१. पुस्तक मित्र कसा आहे ? २. पुस्तकाचा विशेष.
३. पुस्तकाचे प्रकार. ४. पुस्तक कसें वाचावें.
५. पुस्तकाची निवड.

पुस्तकासारखा मित्र नाहीं असें म्हणतात. इतर मित्र आहेत परंतु ते कधीं रागावतात; कधीं चिडतात तर कधीं चेष्टा करितात; कधीं वेळेच्या अभावीं आपल्या उपयोगीं पडत नाहींत. कधीं ते आपलें अंतरंग खुलें करीत नाहींत. तें आपणांपासून लपवून ठेवतात. परंतु पुस्तकाचें तसें नाहीं. त्याला जवळ करण्याचा अवकाश कीं तें आपलें अंतरंग खुलें करितें. तें कधीं फसवत नाहीं. कधीं चुकवत नाहीं. नेहेमीं अगदीं आपल्या सेवेस तत्पर असतें.

आपण दुसऱ्याशीं बोलतों. बोलतांना आपल्या विचारांना, भावनांना कायमपणा येत नाहीं. त्यांना कायमपणा देण्यासाठीं आपण लिहितों. आपल्या स्फूर्तीच्या जोरावर जे विचार अथवा विकार सुचतात ते नाहींसे न व्हावेत अशी आपली इच्छा असते. म्हणूनच ते आपण पुस्तकांत ग्रथित करतों. त्रिकाल टिकणारे, सर्वकाळीं सारखे उपयोगीं पडणारे, सर्वांना सारखा पडताळा देणारे असे जे अनुभव असतात तेच पुस्तकांत घालण्यास योग्य असतात. असें म्हणतात कीं, लेखक आपल्या ग्रंथांत आपलें सर्वस्व ओततो. पेलिकन

या नांवाचा पक्षी आपल्या पिलांना आपलें रक्त पाजतो व आपण कालवश होतो. तसेंच ग्रंथकर्ता आपला प्राण पुस्तकांत घालतो आणि आपला देह ठेवतो. इच्छा ही कीं, आपलें ग्रंथरूपी अपत्य आपल्या मागें दिगंत कीर्ति पसरवो.

पुस्तकांचे पुष्कळ प्रकार असतात. कांहीं पुस्तकें अल्पायुषी तर कांहीं दीर्घायुषी असतात. त्यांचें आयुष्य त्यांच्यामधील विचारांवर अवलंबून असतें. विचार जितके स्थायी तितकें पुस्तक स्थायी. वर्तमानपत्राचें आयुष्य एक दिवस. सकाळीं अगदीं उत्साहानें व आतुरतेनें तें आपण वाचितों परंतु त्याचें पारायण सारखें कोणी करूं म्हणेल तर योग्य होणार नाहीं. मासिक पुस्तकाचें आयुष्य एक महिना. परंतु कांहीं पुस्तकें सदासर्वकाळ बहुमोल असून तप्त मनाला समाधान देतात. भगवद्गीता, बायबल, कुराण, वेद वगैरे ह्या प्रतीचे ग्रंथ होत.

ह्या त्यांच्या प्रकारांवरून तीं कशीं वाचावींत ह्याचा क्रम ठरविण्यांत येतो. कांहीं पुस्तकें नुसतीं चाळावयाचीं असतात, कांहीं भरभर वाचावयाचीं असतात, कांहीं जरा लक्षपूर्वक वाचावयाचीं असतात, कांहींचें मनन करावयाचें असतें. जितका विषय महत्त्वाचा तितकें त्यासंबंधीं ज्यास्त परिशीलन करावयाचें असतें.

वाचनिय पुस्तकांची योग्य निवड करून जर वाचलीं तर मनाची करमणूक होऊन समाधान होतें. कादंबऱ्या, नाटकांच्या वाचनानें करमणूक होऊन मनुष्य स्वभावाची ओळख पटते. दिवसभर दमलेभागलेल्यांना कादंबरीवाचनापासून करमणूक होते. परंतु सर्वच दिवसभर कादंबरी वाचणें हें मिठाई खाण्यासारखें आहे. त्यानें क्षुधा भागेल परंतु शरीरास जेवणानें जी पुष्टि मिळते ती मिळत नाहीं. लोणचें, चटण्या, कोशिंबिरी खाणें म्हणजे जेवण नव्हे. मुख्य जेवणाचीं तीं साधनें आहेत. जेवणास त्यानें विशेष चव येते. इतिहास, धर्म, नीति, पुराण, वेदांत वगैरे विषयांवरचीं पुस्तकें वाचून मनाची संसारानें लागलेली रुखरुख, तळमळ नाहींशी होते. त्यानें शिक्षण मिळून आनंद प्राप्त होतो.

## १०. खानेसुमारी

१. खानेसुमारीचें महत्त्व. जमाखर्चाशीं तुलना. २. खानेसुमारीस प्रथम विरोध कां केला गेला? कारणें. ३. खानेसुमारी कशी करितात? ४. त्यापासून उपयोग.

देशामध्यें दर दहा वर्षांस लोकांची मोजदाद सरकाराकडून केली जाते. तीस खानेसुमारी म्हणतात. खानेसुमारी म्हणजे शिरगणति. आपल्या रोजच्या व्यवहारांत, जो आपण जमाखर्च ठेवितों त्याच्या मुळाशीं जें तत्त्व आहे, तेंच तत्त्व खानेसुमारीच्या मुळाशीं आहे. आपला आदा किती व आपणांस खर्च किती करितां येण्यासारखा आहे, हें आपणास आढाव्यावरून कळतें. आपली एकंदर स्थिति काय आहे ? आपण दोन पैसे मागें टाकीत आहों कीं दिवसें-दिवस कर्जामध्यें न कळत रुतत चाललों आहोंत हेंहि त्यावरून कळतें. त्याचप्रमाणें राष्ट्राची एकंदर उन्नति किंवा अवनति चालली आहे हें खाने-सुमारीवरून ठरवितां येतें. खानेसुमारी म्हणजे लोकसंख्येसंबंधीं एक प्रकारचा आढावा आहे.

प्राचीन काळीं अशी शिरगणति करीत नसत व त्यास चांगलीं साधनेंहि उपलब्ध नसत. हिंदुस्थानासारख्या अफाट देशांत तर हें बरेंच कठीण असे. तेव्हां खानेसुमारी लोकांना माहिती नव्हती असें म्हटलें असतां चालेल. इंग्रजी अमदानींत खानेसुमारी प्रथम सुरू करण्यांत आली. पहिल्या पहिल्यांदां ह्या पद्धतीसंबंधीं लोक बरेच साशंक होते. सद्धेतूबद्दल त्यांना खात्री वाटत नव्हती. शिवाय आपणा हिंदूलोकांत "माणसें मोजूं नयेत" अशी एक भोळी समजूत आहे. माणसें मोजिलीं म्हणजें तीं कमी होतात, रोगानें मरतात असें समजतात. तेव्हां खानेसुमारी जेव्हां प्रथम सुरू केली तेव्हां तिला पुष्कळ विरोध झाला. लोक बरोबर माहिती देईनात व त्यांची समजूत पटेना. लोकांना त्यांच्या खाजगी व्यवहारावद्दल बारकाईनें विचारपूस केलेली खपेना. सरकारनें तरी असली विचारपूस कां करावी ? त्याला त्यांत ढवळाढवळ कर-ण्याचें काय प्रयोजन ? इत्यादि प्रश्न लोक विचारूं लागले. ह्याच प्रवृत्तिमुळें सरकारनें विचारिलेली माहिती पुरविण्याचें त्यांचें मन घेईना. खानेसुमारीची जसजशी उपयुक्तता त्यांना पटूं लागली तसतसा हा विरोध कमी होऊं लागला.

खानेसुमारी दर दहा वर्षांनीं करतात. कोणता तरी एक दिवस मुक्रर करून त्या दिवशीं एका वेळेस कामास सुरुवात करितात. शिरगणतीबरोबर दुसरी आणखी माहिती गोळा केली जाते. धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे माहिती गोळा केल्यानें कोणत्या बाबतींत प्रगति, अथवा परागति आहे हें अजमावून

त्यावर उपाययोजना करितां येते. सरकारास कर गोळा करितांना खानेसुमारीचा उपयोग होतो.

राष्ट्रांतील शिरगणती करणें हें अचाट काम आहे. हें एका दोघांच्यानें होणें शक्य नाहीं. पुष्कळ मनुष्यें ज्या वेळीं पुष्कळ दिवस सारखी मेहनत करतील तेव्हांच हें शक्य आहे. सर्व खात्यांतील नोकरांना कांहीं थोडेंथोडें काम देतात. प्रश्नाच्या याद्या अगोदर तयार करितात. व त्याचीं उत्तरें बरोबर देण्याची कायद्यानें सक्ती करितात. नंतर सर्व प्रश्नपत्रिका गोळा करून त्यांची योग्य तपासणी करून त्यापासून अनुमानें काढतात. खानेसुमारीचें एक तज्ज्ञांचें मंडळ नेमतात. त्यांतील अधिकारी मानवशास्त्र व समाजशास्त्र ह्यांत तरबेज असतात.

खानेसुमारी राष्ट्रास फार उपयोगी आहे. तीस मदत करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. कोणताहि किंतु मनांत न आणतां त्या राष्ट्रीय कार्यास सर्वांनीं मदत केली तरच ती यशस्वी होईल.

## ११. दुष्काळ

१. दुष्काळ पडण्याचीं कारणें व स्थळें. २. दुष्काळांत होणारे हाल. ३. हाल कमी करण्याचीं साधनें—( १ ) सोपी वाहतुकी, ( २ ) तगाईचीं कामें, ( ३ ) कालवे.

दुष्काळ म्हणजे वाईट काळ. आणि काल वाईट येण्याचीं कारणें म्हटलीं म्हणजे अन्न पोटभर न मिळणें व वस्त्र आंगभर न मिळणें हीं होत. अन्नवस्त्र भरपूर पुरेसें मिळणें न मिळणें हें प्रत्येक देशाच्या हवामानावर अवलंबून आहे. ज्या देशांत हवामानाविषयीं थंडीचा अथवा उष्णतेचा अतिरेक होतो त्या देशांत दुष्काळ पडण्याची फार भीति असते. उत्तर अथवा दक्षिणध्रुव किंवा विषुववृत्ताजवळील प्रदेश ह्यांत हवामानाचा अतिरेक होत असल्यामुळें तेथील लोकांना अन्नवस्त्र भरपूर मिळत नाहीं. सर्वच दिवस विपन्नावस्थेंत जातात. त्यामुळें त्या प्रदेशांत वस्तीही फार नसते. हिंदुस्थानसारख्या देशांतहि पाऊस जर वेळेवर पडला नाहीं किंवा जर फार पडला तर दुष्काळ पडतो. अतिवृष्टि व अनावृष्टि ह्या दोहोंचीं संकटें सारखींच.

दुष्काळ पडला म्हणजे लोकांचे फार हाल होतात. कित्येक लोक उपाशी मरतात. कित्येक वस्त्रप्रावरणांशिवाय मरतात. हिंदुस्थानांत असे दुष्काळ पुष्कळ

पडून लोकांचे हाल झालेले आहेत. लोकसंख्या पुष्कळ असल्यामुळें कित्येक लोकांना अर्धपोटीं रहावें लागतें. अशांत आणखी दुष्काळ पडला म्हणजे मग हाल काय विचारावे ? दुर्गादेवीच्या दुष्काळांतील लोकांच्या झालेल्या हालांचें वर्णन वाचून आंगावर शहारे उठतात.

लोकांचे दुष्काळांत हाल होऊं नयेत म्हणून सध्यांच्या काळीं पुष्कळ सोयी करितां येतात. (१) दुष्काळग्रस्त लोकांना अन्नवस्त्रांचा पुरवठा व्हावा म्हणून जेथें सुबत्ता असेल तेथून अन्नवस्त्र आणितां येतें. रेल्वेगाड्या वगैरे साधनांची विपुलता सध्यांच्या काळीं आहे. त्यामुळें ही देवघेव सोयीवार झाली आहे. रंगूनचे तांदूळ, पंजाब, कानडा येथील गहूं, कानपूरची डाळ, गुजराथ, ईजिप्त येथील कापूस वगैरे रोज लागणारे जिन्नस हवे तितके आणितां येतात. ( २ ) दुष्काळामध्यें शेतांत लोकांना कांहीं काम नसतें. लोक हवालदील होतात व त्यांना कांहीं तरी काम मिळून कांहीं गुजराण करण्याकरितां पैशाची प्राप्ती व्हावी ह्या हेतूनें सरकार पुष्कळ नवीं कामें काढितें. ह्यानें लोकांचा फायदा होतो. शेतकऱ्यांस तगाई देण्यांत येते. साऱ्याची सूट देण्यांत येते. गरीब लोकांच्या मदतीसाठीं फंड गोळा करण्यांत येतो. ( ३ ) शेती पावसावर अवलंबून असते. पाऊस न पडला तर दुष्काळाची आपत्ति कायमची ठरलेली. ही आपत्ति टाळण्यासाठीं मोठमोठ्या नद्यांचे कालवे काढून शेतांमध्यें चांगलें उत्पन्न पिकविण्याची व्यवस्था करितां येते.

दुष्काळांत आपत्ति तर फारच. परंतु त्या ह्या व असल्याच उपायांनीं कमी केल्या जातात. प्राचीन काळाइतकी दुष्काळाची तीव्रता सध्यांच्या सुधारलेल्या काळांत भासत नाहीं.

## १२ रोजनिशी अथवा दिनचर्या ठेविणें

१ व्याख्या. २ दिनचर्या ठेवण्यांत पुष्कळ उद्देश असतात.
३ फायदे व तोटे. ४ नमुनेदार रोजनिशी.

रोजच्या रोज प्रत्येक दिवसाच्या अवधींत आपण कोणकोणतीं कामें करितों, आपल्यासंबंधीं कोणकोणतीं कार्यें होतात ह्यांची नोंद करण्याचें पुस्तक म्हणजे रोजनिशी अथवा दिनचर्या. दोन्ही शब्दांचे अर्थ एकच आहेत.

नगर वाचनालय सातारा संगणकीकृत

उद्देश—दिनचर्या ठेवण्यांत निरनिराळ्या लोकांचे निरनिराळे उद्देश असतात. कांहीं लोक—आणि ह्या लोकांचाच भरणा जास्त असतो—रोजनिशी-पुस्तकांत आपली जी दिनचर्या लिहितात ती जमाखर्चाच्या स्वरूपाची असते. आपले दुसऱ्याकडून येणारे पैसे, आपण दुसऱ्यास द्यावयाचे पैसे, जमा, खर्च, ह्यांचीच नोंद रोजनिशींत करितात. व्यापारी लोकांची रोजनिशी ह्याच स्वरूपाची असते. "आपल्या मालास मागणी कोणाकडून केव्हां आली? कोणाला किती माल केव्हां पाठविला? त्यासंबंधीं पत्रव्यवहार काय केला?" ह्या किंवा असल्याच प्रकारच्या बाबींची नोंद व्यापाऱ्यांच्या रोजनिशींत असणार. त्यांचा रोजखर्डा, रोजकीर्द म्हणजे एक प्रकारची रोजनिशीच आहे. सरकारी कचेऱ्यांमध्यें "प्रत्येक नोकर किती काम करितो? कसलें काम करितो" ह्याजविषयीं नोंद असते. प्रत्येक अधिकाऱ्यास आपल्या कार्याची एक रोजनिशी ठेवावी लागते. कोणत्या वेळीं कोणता सरकारी पत्रव्यवहार आला किंवा गेला ह्याची नोंद त्यामध्यें असते. ह्या नोंदीमुळें त्याला आपल्या कचेरींतील काम सुरळीतपणें करितां येतें. सार्वजनिक स्वरूपाचें काम करणारे लोकहि रोजनिशी ठेवितात व पुढें मागें जर आत्मचरित्र लिहिण्याचा प्रसंग आला तर त्याला उपयोगीं असें साहित्य त्यांमध्यें एकत्र लिहून ठेवितात. समाजांत अथवा देशांत, सामाजिक अथवा राजकीय कायकाय व कसकशीं अवस्थांतरें होत गेलीं हें त्यांना त्यांच्या रोजनिशीवरून अजमावितां येतें. एखादें राजकारणावर पुस्तक लिहिण्याची सामग्री त्यांना त्यांच्या रोजनिशीवरून मिळते. एकाद्या शास्त्रांतील संशोधकाची रोजनिशी जर पाहिली तर त्याला रोज निरनिराळे चमत्कार जे दिसले, त्यांचे निरनिराळे प्रयोग, त्यांत सांपडलेले शोध, त्यांवरील अनुमानें इत्यादि बाबींची नोंद आपणांस आढळून येईल. कोणी एकादा कवी अथवा विचारवान् मनुष्य असेल तर त्याच्या रोजनिशींत त्याला क्षणोक्षणीं जी स्फूर्ती स्फुरली, जे बहुमोल विचार सुचले तेच तो लिहून ठेवील. ह्याप्रमाणें रोजनिशी लिहून ठेवण्यांत पुष्कळ उद्देश असतात.

रोजनिशी ठेवणें हे कोणी दुसऱ्यासाठीं करीत नाहीं. तर स्वतःच्या उपयोगासाठीं व करमणुकीसाठीं करीत असतो. त्यामुळें रोजनिशींतील भाषा संक्षिप्त, अस्पष्ट व कोड्याची अशी असते. स्वतःला समजलें म्हणजे तिचें काम झालें. रोजनिशी खाजगी स्वरूपाची असल्यामुळें एकाची रोजनिशी दुसऱ्यानें पाहूं नये.

**फायदे व तोटे**—दररोज महत्त्वाचे असे प्रसंग आपल्या आयुष्यांत पुष्कळ घडतात. महत्त्वाचीं कार्यें होतात. त्यांची नोंद न करितां ते तसेच जाऊं दिले तर त्यांची स्मृतीहि आपणांस रहाणार नाहीं. आले, गेले अशी स्थिति होणार. रोजचे विचार, आचार, मतें, तत्त्वें हीं लिहून ठेवून पुढें कांहीं दिवसांनीं जर त्यांच्याकडे पाहिलें तर आपणांस एकंदर नैतिक, बौद्धिक अथवा इतर बाबतींत काय विकास झाला ह्याचा अजमास करितां येईल. आतां हेंहि खरें आहे कीं, कधींकधीं आपण आपल्या रोजनिशींत भपकेदार अशीं वर्णनें लिहितों. कोणीतरी पुढें जर तीं वाचलीं तर त्याचा चांगला ग्रह व्हावा म्हणून अवास्तव रंग भरतों. रोजनिशींत नोंद प्रामाणिक, सत्य, यथातथ्य व वेळच्यावेळची असावी.

**कांहीं नमुनेदार रोजनिशा**—नानाफडणविसांच्या रोजनिशीचा इतिहासास किती तरी फायदा झाला आहे ? ती एक त्यांचें आत्मचरित्रच आहे. तसेंच इंग्लिश, फ्रेंच, डच, ईस्ट इंडिया कंपनीच्या रोजनिशींमध्यें केलेल्या नोंदींच्या साहाय्यानें कितीतरी वादग्रस्त ऐतिहासिक मुद्यांवर प्रकाश पडला आहे.

## १३. धंद्याची निवड

१. धंद्याची निवड करण्याबद्दल सध्यांची परिस्थिति २. जातिभेद व धंदे. ३. धंद्याची निवड कोणत्या गोष्टींवर अवलंबून आहे ? ४. धंद्यास लागणारे गुण. ५. एक धंदा पत्करला म्हणजे तो कां सोडूं नये ?

आईबाप आणि तरुण ह्यांच्यापुढें जर कोणता अतिशय बिकट प्रश्न येऊन पडत असेल तर सध्यांच्या काळीं धंद्याची योग्य निवड करण्यासंबंधीं होय. तरुण तर ह्यासंबंधीं किंकर्तव्यमूढ होतात. काय करावें हें त्यांना सुचत नाहीं. शिक्षण घ्यावयाचें, परीक्षा पास व्हावयाच्या; ह्या वेळपर्यंतचा मार्ग धोपट, सरळ असतो व तो आक्रमण करण्यास कांहीं अडचण पडत नाहीं. परंतु शिक्षण संपलें, परीक्षा पास झाल्या, म्हणजे पुढें काय ? हा प्रश्न तरुणांना फार भेडसावीत असतो. त्या विचाऱ्यांना त्या प्रश्नाला उत्तर सांपडत नाहीं. शिक्षणानें जी मनाला हुषारी वाटावी, जी तरतरी वाटावी, ती न वाटतां, आतां पुढें काय ? ह्या प्रश्नानें त्यांचा हिरमोड होतो, नाउमेद होते, कांहीं वेळेस हताश होऊन बसावें लागतें. दिवसेंदिवस ही स्थिति सुधारण्याऐवजीं जास्त निराशाजनक होऊं लागली आहे हें खास.

हिंदुस्थानांत जातिभेद आहेत व समाजांतील बऱ्याच जणांचे धंदे पुष्कळ वेळां ज्यांच्या त्यांच्या जातीप्रमाणें ठरत असतात. निवड करण्याचा प्रसंग त्यांच्यावर फारसा येत नाहीं. परंतु, दिवसेंदिवस जातिभेदाचीं बंधनें शिथिल होऊं लागलीं आहेत. बापाचाच धंदा मुलानें करावा, दुसरा करूं नये असा निर्बंध कोणी पाळीनातसे झाले आहेत. त्यामुळें पुढें काय ? हा प्रश्न सर्वांना सारखाच गांजणूक करितो.

धंद्याची निवड बऱ्याच गोष्टींवर अवलंबून आहे. ज्याला धंदा पत्करावयाचा आहे त्याचें शिक्षण ही पहिली गोष्ट. प्रत्येक प्रकारच्या शिक्षणांत विशेष म्हणून कांहीं असतें. ज्या धंद्याला उपयोगीं त्याचें शिक्षण पडेल तो धंदा त्यानें पत्करावा. दुसरी गोष्ट त्याच्या स्वभावाची. आपल्या स्वभावाला जो धंदा मानवेल तो धंदा पत्करावा. प्रकृती नाजूक आणि धंदा जर राकट पत्करला तर प्रकृति टिकणार नाहीं. ह्या दोन गोष्टींकडे पाहून धंदा एकदां पत्करल्यावर मग तो यशस्वी कसा होईल ह्याचा विचार करावा. धंद्यासाठीं उमेदवारी म्हणून कांहीं दिवस करावी लागते आणि पुष्कळ उदाहरणें अशीं आहेत कीं, ह्या उमेदवारीच्या अवस्थेमध्येंच पुष्कळ लोक हताश होऊन धंद्याचा नाद सोडितात. उमेदवारी म्हणजे जरा कावाडकष्टाची असते. जरा आंगमेहनत पडली कीं, नवीन शिकाऊ मनुष्य धीर सोडितो. त्यांत आणखी आपल्या इकडील तरुणांना आंगमेहनत करणें म्हणजे जिवावर येतें. सर्व कांहीं गादीतक्क्यास टेंकून मिळावें ही इच्छा. ऐतोबांचा भरणा फार ! धंद्यामध्यें जो अनुभव लागतो व ज्याच्यावर पुढील सर्व यश अवलंबून असतें तो अनुभव ह्या उमेदवारीच्या अवस्थेमध्यें मिळतो. धंद्यांतील खांचाखोंचा, बारीकसारीक माहिती झाली तरच स्वतःच्या शिरावर नवीन धंद्याची उभारणी करितां येते.

नवीन धंद्याची उभारणी करितांना मुख्य भांडवल हें लागतें. त्यानंतर धंदा चालवितांना प्रामाणिकपणा लागतो. सर्व धंदा या गुणांवरच अवलंबून असतो. लांडीलबाडी केल्यानें कांहीं वेळेस तात्कालिक फायदे होतील, परंतु चिरकालिक फायदे होण्यास प्रामाणिकपणा पाहिजे. शब्दांत व कृतींत ठरीवपणा पाहिजे. त्याच्याबरोबर निरालस्य असावें लागतें. धंदा करूं लागल्यावर स्वातंत्र्य असतें व "मनःपूतम् समाचरेत्" ह्याला अवसर मिळतो अशी जी समजूत असते ती सर्वथैव चुकीची आहे.

एकदां धंदा कोणताहि स्वीकारिल्यावर तो सबळ कारण असल्याशिवाय सोडूं नये. त्यापासून तोटा होतो. अस्थिर वृत्तीनें कांहीं साधत नाहीं. नदीच्या पात्रामधील नेहमीं गुडगुड वहाणाऱ्या अस्थिर गोट्यांभोंवतीं शेवाळें कधीं सांचत नाहीं अशी एक म्हण आहे. एक धंदा सोडून दुसरा घेतला कीं, पुन्हां नवा विटी नवें राज्य अशी स्थिति होते. पूर्वीचा अनुभव वाया जातो. नवी उमेदवारी करावी लागते. प्रत्येक वेळेस नवा तकवा आणावयाचा कोठून ? ह्याकरितां धंद्याची निवड करितांना प्रथमच फार काळजी घ्यावी लागते. आणि एकदां धंदा पत्करिला म्हणजे त्यालाच कायमचें चिकटून रहावें लागतें.

## १४. चरित्रें

१. चरित्राचा विशेष. २, ३. काल्पनिक व ऐतिहासिक वाङ्मय, त्यांचे विशेष. ४. चरित-लेखक-कर्तव्य. गुण व दोष सांगणें. ५. आत्मचरित्राचे विशेष. ६. उपसंहार.

कथनात्मक लेखानाचे जे निरनिराळे प्रकार आहेत त्यांमध्यें चरित्र हा एक लोकांचा आवडता प्रकार आहे. ह्याचें कारण म्हटलें म्हणजे त्याचा संबंध मानवी व्यवहाराशीं मोठा जिव्हाळ्याचा असा आहे.

प्रणयीकथांमध्यें कल्पनेस स्वैरसंचार करण्यास वाव असतो. वाटेल तितके प्रसंग कल्पितां येतात व त्यांमध्यें अद्‌भुतपणा आणितां येतो. फरक हवे तितके दाखवितां येतात. ते सर्व शक्यतेच्या कोटींत असले म्हणजे झालें. असल्या कथांनीं मनास चमत्कार वाटतो. परंतु कल्पनाशक्तीच्या स्वैरसंचारास सारासार बुद्धीच्या मुळें आळा पडतो व कल्पनाशक्तीच्या स्वैरसंचारांत झालेल्या चुका अनुभवानें समजूं लागतात. नंतर त्यांच्या योगानें मनरंजन होऊं शकत नाहीं. अमुक एक गोष्ट खोटी आहे, तिच्यांत जिवंतपणा अथवा खरेपणा नाहीं, असें कळल्यावरोबर तिच्यांतील स्वारस्य नाहींसें होतें. ही झाली काल्पनिक वाङ्मयाची गोष्ट.

ऐतिहासिक वाङ्मयामध्यें वरीलप्रमाणें असत्य नसतें. त्यामध्यें खरेपणा असल्यामुळें त्याचा मनावर परिणाम होतो. परंतु त्यालाहि चरित्र-वाङ्मयाची बरोबरी येत नाहीं. अमुक एका वीरानें लढाई मारली, अमुक एक पडला, अमुक एक राजकारण फसलें किंवा साधिलें, इत्यादि सर्व गोष्टी खऱ्या; परंतु फारच थोडक्यांना तसल्या प्रसंगांतून जाण्याचा योग येतो. यांचा उपयोग संभाषणांत, व्याख्यानांत, लेखांत ज्ञान दाखविण्याकडे मनुष्यांची प्रवृत्ति असते.

दुर्गुणाचे, व्यसनाचे, अवास्तव महत्त्वाकांक्षेचे, व जबर मनोविकारांचे दुष्परिणाम भयंकर तर खरेच; परंतु ते साध्या माणसाच्या बावतींत जितके भयंकर दिसतात तितके मोठ्या राजेरजवाडयांच्या बावतींत दिसून येत नाहींत.

चरित्रलेखक हा चरित्रनायकाच्या गुणांचेंच बहुतेक वर्णन करितो. चरित्रनायकाचें मोठेपण दुसऱ्याच्या नजरेस आणण्याचा त्याचा प्रयत्न असतो. दोष जर त्यानें टाळले तर, चरित्राचा देखील मानवी व्यवहारांत जितका उपयोग व्हावयास पाहिजे तितका होत नाहीं. दोष टाळल्यामुळें खरेपणास बाध येतो. कारण नायक जरी झाला तरी मनुष्यच आणि इतर मनुष्यांप्रमाणें तोहि स्खलनशील-दोषशील-असणारच. आंगचे दोष दाखविल्यानें दोष येतो, ही चुकीची समजूत आहे. उलट त्यानें सद्गुणांचा उठाव चांगला होतो.

आत्मचरित्राची गोष्ट ह्यापेक्षां थोडी निराळी आहे. चरित्रकार कितीहि प्रामाणिक असला तरी स्वतःच्या आयुष्यांतील आठवणी स्वतःच सांगण्यांत जितका खरेपणा असतो तितका त्याच्या चरित्रांत येणें शक्य नाहीं. खोटेपणा, पक्षपात ह्यांना आत्मचरित्रांत वाव मिळत नाहीं. चरित्रकार नायकाच्या आयुष्यांतील ठळक ठळकच तेवढे प्रसंग घेतो. त्याच्या वाईट वृत्तींवर पांघरूण घालून दैवी वृत्तींचा परिपोष करितो आत्मचरित्रकार आपण होऊन आपल्या आयुष्याचें सिंहावलोकन—दुसऱ्याला कांहीं उपयोग व्हावा म्हणून किंवा आपल्या मनाचें समाधान व्हावें म्हणून—करितो.

चरित्रें आणि चित्रें ह्यांमध्यें बरेंच साम्य आहे. किंबहुना चरित्र हें चित्रासारखें असावें. चित्रांत ज्याप्रमाणें त्या मनुष्याची हुबेहुब—गुणदोष, खाचाखोंचा ह्यांची-प्रतिमा असते, ती त्या माणसाची बरोबर कल्पना आणून देते. त्याप्रमाणें चरित्रानें साधलें पाहिजे. चरित्रलेखकानें हें साधण्याकडे रोख ठेविला पाहिजे.

## झोंप

१. झोंपेच्या चमत्काराचें स्पष्टीकरण. २. झोंपेची जरूरी. ३. स्वप्नसृष्टी. ४. झोंपेची मर्यादा. ५. झोंपेविषयीं कवींच्या स्तुति.

झोंप कशी लागते, लागतांना आंत काय चमत्कार होतो, ह्याचा उलगडा अद्याप मानसशास्त्रवेत्त्यांस झाला नाहीं. आपल्या इकडील तत्त्ववेत्ते झोंपेला एक प्रकारची अवस्था समजतात. ह्या अवस्थेंत शरीरांतील आत्मा शरीरास सोडून अन्यत्र जवळपास वावरतो व जागृतीची वेळ आली कीं, लागलीच शरीरांत प्रवेश

करितो असें त्याचें स्पष्टीकरण करितात. दुसरे कांहीं लोक असें म्हणतात कीं, मनुष्य जागा असला म्हणजे नानाप्रकारचीं कामें करितांना शरीरामध्यें एक प्रकारचा विषारी पदार्थ उत्पन्न होऊन सांठत असतो व ह्या पदार्थाचा परिणाम मेंदूवर होऊन त्या मनुष्यावर झोंपेचा अंमल चढतो.

झोंपेची मनुष्याला फार जरूरी आहे. जसें अन्नपाणी तशी झोंप. झोंपे-शिवाय शरीरांत ताकत रहाणार नाहीं. सर्वांत जास्त कडक शिक्षा जर कोणती असेल तर ती झोंप न येऊं देण्याचीच होईल ! झोंप जर बरेच दिवस टळली तर मेंदूवर परिणाम होऊन वेड लागल्याशिवाय रहात नाहीं. इंद्रियें काय, किंवा मेंदू काय सर्व दिवसभर थोडेंच काम करणार ! त्यांना विश्रांति ही लागणारच. आणि ही विश्रांति झोंपेशिवाय मिळणें शक्य नाहीं. झोंपेंत नाक वास घेत नाहीं, कान ऐकूं शकत नाहींत, डोळे पाहूं शकत नाहींत. सर्व इंद्रियें आपआपल्या ठिकाणीं विश्रांति घेत असतात. सर्व दिवस सारखा पडलेला ताण झोंपेंतच सैलावणें शक्य असतें व अशा रीतीनें ताण नाहींसा झाला म्हणजे पुन्हा दुसऱ्या दिवशीं नव्या दमानें कामास लागण्यास शरीरास व इंद्रियास तकवा येतो.

झोंपेमध्यें जरी आपली स्मृति किंवा जाणीव नाहींशी होते तरी कधीं कधीं कांहीं तरी कारणांनें एक प्रकारचें खोटें जग उत्पन्न करून त्यांमध्यें आपण विहरत असतो. ही स्वप्नसृष्टि होय. ह्यामध्यें नानाप्रकारचे चमत्कार होतात.

झोंप किती घ्यावी ह्याविषयीं कांहीं नियम घालितां येणार नाहीं. सामान्यें-करून लहान अर्भकें सर्व दिवसभर झोंपेंतच असतात. जसजसें तीं वाढीस लागतात तसतशी त्यांची झोंप कमी होऊं लागते. बौद्धिक कामें करणाऱ्या लोकांना झोंप थोडी लागते. शारीरिक कामें करणारे लोक फार वेळ झोंपेंत काढितात. साधारणपणें सहा पासून सात तासांपर्यंत झोंप प्रत्येक मनुष्याला पुरते. झोंपेनें मनुष्य निरोगी असतो.

झोंपेनें शरीराला आराम मिळून एक प्रकारचें सौख्य प्राप्त होतें हें खास. व ह्या सौख्यामुळेंच झोंपेबद्दल पुष्कळ कवींनीं स्तुतिपर उद्गार काढिले आहेत. कोण तिला आयुष्यांतील संजीवनी म्हणतो, कोण तिला अमृत म्हणतो, कोण तिला देवदूती म्हणतो, कोण तिला स्वर्गीय बनवितो, कोण तिला मृत्यूची बहीण म्हणतो, तर कोण तिला आनंदसमाधी म्हणतो. अशा रीतीनें तिच्या गुणाची तारीफ सर्व कवींनीं केली आहे.

## अभ्यास

चिंतनविषयक निबंधांचे विषय व त्याचे स्थूल मुद्दे.

१. सुवर्णमध्य-तडजोड—( मुद्दे–विश्वामध्यें चाललेली रस्सीखेंच–जास्त ताणण्याचा परिणाम, तडजोडीचा उपयोग, धार्मिक, सामाजिक, राजकीय तडजोड. तत्त्वाच्या बाबतींत तडजोड शक्य नसते. क्षेत्र ).

२. नामकरण विधि—( धार्मिक विधि, संस्कार, प्रयोजन, परिणाम).

३. नांवें व टोपणनांवें—(नांवें कां ठेविलीं जातात?–गुणावरून विशेषणें–विशेषणावरून विशेषनामें. टोपणनांवें ठेवण्याचीं कारणें–चेष्टा, प्रेम, सत्यापलाप).

४. सूर्य व चंद्र—( सूर्यमालेंतील स्थान, ऐतिहासिक स्वरूप, शास्त्रीय माहिती, अंतर, आकार, ऊष्णता, उपयोग, धार्मिक स्वरूप ).

५. मराठी वर्णमाला—( पूर्ण अथवा सदोष कितपत; ऐतिहासिक, प्रकार, संख्या ).

६. चित्रलिपि—( ऐतिहासिक, जगांतील मुख्य लिपि, चित्रलिपीचें स्थान, लिखाण, ईजिप्तमधील इतिहास, लेख ).

७. लेखनरीतीवरून लेखकाचा स्वभाव—( स्वभाववैचित्र्य, लेखन-वैचित्र्य, विशिष्टत्व, व्यक्ति तितक्या प्रकृति–व लेखन ).

८. बोली—(कोठें व कशा उत्पन्न होतात? भाषा, आवाज, कारणें,प्रकार.)

९. सूर्यमाला—(शास्त्रीय वर्णन, निसर्गाचे कायदे, काल, संख्या, परिणाम.)

१०. सत्ययुग—( युगसंख्या, गुण, आपल्या इकडील धर्मसमजुति ).

११. पोवाडे—( गद्यकाव्य, आद्यकाव्य, राजवंशिक काव्य, ऐतिहासिक, राष्ट्रीय स्वरूप–विषय–पद्धत–त्याचा परिणाम–उदाहरणें ).

१२. आत्मचरित्र—( चरित्र, आवश्यकता, चरित्र व आत्मचरित्र-भेद, विशेष प्रकार, उदाहरणें, दिनचर्या लिहिण्याचा प्रघात .

१३. राष्ट्रोन्नतीप्रीत्यर्थ स्त्रियांची कामगिरी—( अपत्यसंगोपन–पुढच्या पिढीची तयारी, लहानपणचें शिक्षण, पुरुषाच्या मनावर ताबा इ. )

१४. पुढच्यास ' ठेच ' मागचा शहाणा—(प्रगति, अनुभव, व्यवहारांत प्रतीति).

१५. वाङ्मयांत तत्कालीन समाजाचें प्रतिबिंब कितपत उठतें ? ( लेखनाचा आत्मा-विचार-तत्कालिन समाजाचे विचार ).

## चिंतनविषयक निबंधांसाठीं विषय

| | | | |
|---|---|---|---|
| १. राजनिष्ठा | स्वदेशाभिमान | प्रसंगावधान | आत्मसंयमन |
| भूतदया | वक्तृत्व | क्षमा | शान्ति |
| धैर्य | सदाचरण | मितव्यय | उद्योग |
| स्वच्छता | नियमितपणा | मातृपितृभक्ति | शील |
| संगत | बंधुप्रेम | विश्वबंधुत्व | माणुसकी |
| व्यापार | एकी | आत्मनिरीक्षण | धर्माभिमान |
| सहनशीलता | काटकसर | मानवी कर्तव्य | मनोराज्य |
| समयसूचकता | अंध श्रद्धा | व्यवहारज्ञान | पुत्राचें कर्तव्य |
| शालीनता | रसिकता | ढोंगीपणा | संगतीवरून माण- |
| विद्यार्थ्यांचे धर्म | चांगल्या चालीरीती | संवयीचा जोर | साची परीक्षा |

| | | |
|---|---|---|
| २. वेळेचें महत्त्व | वाचनालयें | हिंदूंची रहाणी |
| नागरिकांचें कर्तव्य | वेळेचा सद्व्यय | शेतीसुधारणा |
| कालवे | जातिभेद | पोषाख कसा असावा ? |
| वरिष्ठांशीं वर्तन | संपत्तीचा सदुपयोग | ग्रंथ |
| वर्तमानपत्रें | छापण्याची कला | प्रदर्शनापासून फायदे |
| नीतिशिक्षण | औद्योगिक शिक्षण | लष्करी शिक्षण |
| धार्मिक शिक्षण | ग्रहणें | ज्योतिष |
| बैठे खेळ | जाहिरात देण्याची कला | साथीचे रोग व उपय |
| पंचांग व उपयोग | ध्येय | चलनी नाणीं |
| म्हणी व वाक्प्रचार | प्राण्यांचा जन्मस्वभाव | विश्वभाषा |
| स्मरणशक्ति | लहरी स्वभाव | जुगाराचे परिणाम |

३. लोकलबोर्ड, म्युनिसिपॅलिटी, कायदे-कौन्सिल, ग्रामपंचायत.

४. मुकीं जनावरें विचार करितात कां ? सभ्य गृहस्थ कसा ओळखावा ? देशाचा इतिहास कां शिकावयाचा ? भाषा, वंश, राष्ट्रियत्व म्हणजे काय ? व त्यांचा परस्पर संबंध काय ? सुखी कसें व्हावें ?

निबंधाकरितां कांहीं म्हणी:—

कां न सदन बांधावें कीं, त्यांत पुढें बिळें करिल घूस. उद्योगाचे घरीं ऋद्धिसिद्धि पाणी भरी. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. थेंबें थेंबें तळें साचे. मरावें परी कीर्तिरूपें उरावें. निश्चयाचें बळ तुका म्हणे तेंची फळ. अंथरुण पाहून पाय पसरावे. मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं. मिठाची केली वाण आणि लोणच्याची केली घाण. ढेकुणाच्या संगें हिरा जो भंगला । कुसंगें नाडला साधु तैसा । एकानें गाय मारिली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारूं नये. हांसत कर्म करावें भोगावें रडत तेंचि परिणामीं. अनेक मित्रांप्रति जोडी संपदा । कसास लावी परी त्यास आपदा । जगीं सर्व सूखी असा कोण आहे ? आळस भिकारी कुटुंबाचा घात करी. असंगाशीं संग प्राणाशीं गांठ । अक्कलसे खुदा जानना. अपापाचा माल गपापा. उथळ पाण्यास खळखळ फार. करावें तसें भोगावें. खटपट करी तो पोट भरी. खाण तशी माती. यथा बीज तथा अंकुर. गरज सरो वैद्य मरो. वहात्या गंगेंत हात धुणें. दाम करी काम. दुरून डोंगर साजिरे. प्रयत्नांतीं परमेश्वर. कुसंतानापेक्षां निसंतान बरें. मन झांकलेंस म्हणून रूप कां तुला झांकतां येईल ? टांकीचे घांव सोसल्याशिवाय देवपणा येत नाहीं. दसकी लकडी एकका बोजा. संहतिः कार्यसाधिका. पांचामुखीं परमेश्वर. बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें. मूर्ति तितक्या प्रकृति. व्याप तितका संताप. शीर सलामत तो पगडी पचास. सत्तेपुढें शहाणपण नाहीं. हात ओला तर मित्र भला. करी नराला धनलोभ राक्षस. मतिरेव बलाद्गरीयसी. अतिसर्वत्र वर्जयेत्. अव्यापारेषु व्यापार. निस्पृहस्य तृणं जगत्. मौनं सर्वार्थसाधनम्. समानशीलव्यसनेषु सख्यं. स्वभावोदुरतिक्रमः. राजा कालस्य कारणम्.

पाठ १०

## वादविवादविषयक अथवा चर्चात्मक निबंध

ह्या प्रकारामध्यें वादविवादाचे सर्व विषय येतात. प्रस्थापित केलेल्या सिद्धांतांवरून साधकबाधक प्रमाणें लावून अनुमानें काढणें हें ह्या निबंधामध्यें मुख्य कार्य होऊन बसतें. विचारशक्तीला जास्त चालना देण्याची जरूरी ह्यांत भासते. तेव्हां साहजीकच निबंधलेखनाच्या प्राथमिक स्थितींत अशा चर्चेच्या विषयाचा अन्तर्भाव होणें शक्य नाहीं. प्राथमिक स्थितींत विद्यार्थ्यांना विचारशक्तीचा योग्य उपयोग करितां येत नाहीं. कांहीं तरी विचार हा नेहेमींच करावा लागतो. परंतु विचाराविचारांत फरक आहे. सद्विचार कोणता, असद्विचार कोणता, चांगलें अनुमान कोणतें, वाईट, खोटें अनुमान कोणतें, त्रिकालाबाधित सिद्धांत कोणते, अपसिद्धांत कोणते, इत्यादि लेखकाला स्वतःला ह्या निबंधांत ठरवावें लागतें. त्यामुळें असल्या चर्चात्मक विषयावर लिहितांना लेखकावर एक प्रकारची जबाबदारी येऊन पडते. एक प्रकारचें मतस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, दुसऱ्याच्या विचारांतील, अनुमानांतील दोष पहाण्याची दृष्टी, आपल्या मताबद्दलची खात्री, विश्वास, लेखकाजवळ असाव्या लागतात व त्याबरोबर चांगलें वाचन, ज्ञान व ज्ञानानें व वयानें येणारी विचाराची परिपक्वता असावी लागते. इतर प्रकारचे निबंध चांगले लिहितां येऊं लागल्यावरच चर्चात्मक निबंध लिहिण्यास आरंभ करावा. चिन्तनविषयक निबंधांत चर्चा करण्याची थोडीशी जरूरी भासते. उदाहरणार्थ—"खेडेगांवांतील राहाणी" ह्या विषयावरील निबंध चिन्तनविषयक आहे. हा निबंध लिहितांना "नागरिकांची राहाणी" ह्या बाबीचा विचार करणें ओघानेंच प्राप्त होतें व हा

विचार करितां करितां साधक बाधक विचार करावा लागतो व आपल्या मताप्रमाणें लेखकाला निकाल द्यावा लागतो.

वादविवादविषयक निबंधाचे तीन प्रकार पडतात.

१. जे कांहीं दोन पक्ष दिले असतील त्यांची साधकबाधक तुलनात्मक चर्चा करावयाची आणि त्यांची परस्पर किंमत ठरवून श्रेष्ठता ठरवावयाची.

उदाहरण–"चित्रें आणि चरित्रें" हा पृष्ठ ३३ वरील उतारा पहावा.

ह्या प्रकारांत मोठीं, समानावयवीं वाक्यें उपयोगीं पडतात. एका पक्षाचे गुण हळुंहळूं चढवावे लागतात. सार, अलंकार साधावयाचा असतो. दोन्ही पक्षांपैकीं एक कोणता तरी मुकर करून त्याची मांडणी उत्तम करून आणि नंतर दुसरा पक्ष घेऊन पहिल्या विवेचनाला पोषक होईल असें करावयाचें.

२. ह्या प्रकारांत अगोदर आपला सिद्धांत मांडावयाचा आणि नंतर त्याच्या पुष्टयर्थ विधानें एका मागून एक द्यावयाचीं. नंतर दुसऱ्या मतांचा पूर्वपक्ष योग्य मांडून त्यांतील प्रत्येक विधानाची असत्यता, विरोध, अपसिद्धांत हळुंहळूं सिद्ध करावयाचे, हा क्रम पत्करावा लागतो. अशा रीतीनें पूर्वपक्षाचा निरास केल्यानंतर आपलें मत पुन्हां मांडून त्याचें विवरण उदाहरणें देऊन करावयाचें व सर्व विखरलेले सिद्धांत, विधानें एके ठिकाणीं आणावे लागतात. सिद्धांत शिरोलेखांत मांडावयाचा आणि नंतर पहिल्या पॅरिग्राफांत त्याला प्रमाणें द्यावयाचीं. नंतर त्याला उदाहरणें द्यावयाचीं.

३. कधीं कधीं व्याख्येच्या स्वरूपांत मूळ सिद्धांत मांडावा लागतो. आणि नंतर व्याख्येचें स्पष्टीकरण करावें लागतें. विरोधाची कल्पना करून त्याचा निरास करावा लागतो.

खालीं कांहीं चर्चात्मक निबंधाच्या विषयांचे मुद्दे देऊन ते लिहून दाखविले आहेत.

## १. खेळामध्यें चढाओढ असावी कीं नाहीं ?

१. प्रास्ताविक—खेळाचें महत्व, खेळाच्या दृष्टीनें लहानपणचें महत्त्व, शरीरवृद्धि इ. शारीरिक व्यायाम कसा होतो ?

२. खेळ—कसे खेळले जातात ? खेळाचे नियम, खेळाडूंची संख्या, गुण.

३. चढाओढीचा परिणाम—खेळांत भाग घेतला म्हणजे ईर्षा उत्पन्न होते, गोडी लागते, आपल्या पक्षाबद्दल, शाळेबद्दल, मुलांबद्दल, स्वतांबद्दल, अभिमान जागृत होतो. निरनिराळया संस्थांना एकत्र येण्याची संधि मिळून त्यांमध्यें भ्रातृभाव उत्पन्न होतो.

४. शिस्त—तिचें महत्त्व, स्पर्धा असणें वाईट. तिला वाव देऊं नये. आज्ञाधारकपणाबद्दल करडी शिस्त असावी. त्यांमध्यें वेळ गेला तरी तो सद्व्ययच आहे.

५. पहाणाऱ्या लोकांवर होणारा परिणाम.

## २. बालविवाह इष्ट कां अनिष्ट ?

१. विवाह म्हणजे काय ? त्याच्या जबाबदाऱ्या काय आहेत ?

२. त्यांची मर्यादा. धर्मानें व समाजांतील रूढीनें घातलेले निर्बंध.

३. बालविवाहापासून तोटे.

( अ ) शैशवांतील सुखें विवाहित मुलांना अनुभविण्यास मिळत नाहींत. (आ) बालविवाहामुळें संततिहि लौकर होते. बालमाता होतात. ( इ ) बालविवाहामुळें विवाहित मुलांची पूर्ण वाढ होण्यास अडथळा होतो. त्यांच्यावर संसाराची जबाबदारी लौकर पडते. (ई) संतति लौकर झाल्यास तिची अननुभवी मातापितरांकडून अनास्था होते. उ. संतति जास्त झाल्यानें लोकसंख्या वाढते व लोकसंख्या वाढल्यानें दारिद्र्य येतें.

४. दुसरी बाजू—फायदे.

( अ ) हिंदुसमाजाच्या विशेष रहाणीमुळें बालविवाह प्रचारांत आले. ( आ ) अविभक्तकुटुंबपद्धति असल्यामुळें वर सांगितलेले तोटे बालविवाहापासून होत नाहींत. ( इ ) प्रथम दर्शनीं प्रेम बसून विवाह होण्यापेक्षां बालविवाहच बरा. कारण पतिपत्नींमध्यें प्रेम वाढण्यास त्यांत पूर्ण वाव मिळतो.

५. दोन्ही बाजूंची छाननी करून सद्यःस्थितीला बालविवाह न करणें हेंच योग्य.

## ३. शाळेंमध्यें धार्मिक शिक्षण असावें काय ?

१. शाळेंमध्यें मुख्यत्वें मिळणारें शिक्षण. बौद्धिक, व्यावहारिक, शारीरिक.

२. ह्या शिक्षणाबरोबर धार्मिक शिक्षणाचीहि जरूरी आहे. शीलसंवर्धनास योग्य शिक्षण म्हणजे धर्माचें होय. पुढील आयुष्यामध्यें इतर शिक्षणापेक्षां शीलसंवर्धनच जास्त उपयोगी पडतें.

३. प्रकार—प्रथम नमन, ईशस्तवन, पुराण व धर्मग्रंथांतील उतारे.

४. हिंदुस्थानामध्यें नाना पंथ व धर्म असल्यामुळें सार्वजनिक रीत्या शाळेंत सर्वसाधारण असें धार्मिक शिक्षण देणें कठीण जाईल; व जरी दिलें तरी शीलसंवर्धन होण्याच्या ऐवजीं एकमेकांमध्यें कलह माजतील.

५. ही अडचण काढण्यासाठीं योग्य तडजोड काय असावी ? सर्व धर्मांतील उत्तम उत्तम तत्त्वें काढून त्यांमध्यें कोणत्याहि धार्मिक बाबींचा वास येऊं न देतां निर्विकार मनानें प्रतिपादन करून एक प्रकारचें नैतिक शिक्षणाचें पुस्तक तयार करावें.

## ४. शहरांत राहणें चांगलें कां खेडेगांवांत राहणें चांगलें ?

१. खेडेगांव व शहर येथील रहाणींमध्यें असलेला फरक–खेडेगांवांतील रहाणी स्वाभाविक तर शहरांतील कृत्रिम असते. खेडेगांवांत ईश्वराचें निर्माणकौशल्य दिसतें. तर शहरांत मनुष्याचें निर्माणकौशल्य दिसतें. एक ईश्वरी तर दुसरें मानवी असा दोहींत फरक.

२. खेडेगांवांतील रहाणीचे फायदे–१. स्वच्छ हवा. २. आरोग्यकारक परिस्थिति. ३. लोकांची साधी रहाणी. ४. बौद्धिक सुखसाधनें, निसर्गसौन्दर्य. ५. संसाराचा एकंदर खर्च कमी.

३. शहरांतील रहाणीचे फायदे—१. बौद्धिक सुखसाधनें, शिक्षणसंस्था, वाचनालयें, समाज, क्लब, मंडळें इ., २. समाजाच्या भिन्नपणामुळें वाटणारें नवल. ३. रोज निरनिराळे होणारे समाजांतील फरक, त्यामुळें मनास वाटणारा आल्हाद.

४. उपसंहार—दोन्ही प्रकारच्या रहाणींचे फायदे मिळावे म्हणून अंमलांत आणलेले निरनिराळे उपाय, शहरांत राहून खेडेगांवीं रहाणीचे फायदे कसे उत्पन्न केले जातात? शहरांत शहर आणि खेडेगांव अशी योजना.

## ५. हक्क कीं कर्तव्य?

१. हक्क म्हणजे काय? त्याची मर्यादा. २ हक्क व कर्तव्य ह्यांमध्यें फरक. ३. कर्तव्य कसें श्रेष्ठ आहे?

हल्लीं ज्याच्या त्याच्या तोंडांत हक्क हा शब्द आहे. आपल्या हक्कांचें डोळ्यांत तेल घालून संरक्षण करण्यांत सर्व जनता गर्क झाली आहे. हें हक्कांचें वेडें पीक पश्चिमेकडून पूर्वेकडे आलें आहे. अर्वाचीन संस्कृतीचा तो एक आधारस्तंभ आहे. सुखप्राप्ति हा प्रत्येक क्रियेचा हेतु असतो. आपल्या हक्कांचें उल्लंघन दुसऱ्याला करूं न देण्यानें व दुसऱ्याच्या हक्कांची पायमल्ली आपण न केल्यानें एकंदर जनता सुखी होईल असा आधुनिक पंडितांचा सिद्धांत आहे. पण इतर सिद्धांतांप्रमाणें हाहि चुकीचा ठरेल ह्यांत संदेह नाहीं. अनुभवहि तसाच येऊं लागला आहे. हक्क ह्या शब्दांत उन्माद उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असल्यामुळें अलीकडे सर्वच लोक उन्मत्त व रजोगुणी दिसतात. सात्त्विक गुण समाजांत लुप्तप्राय झाला आहे.

हक्क हा शब्द संस्कृत किंवा मराठी नसून अरबी आहे. ह्या शब्दाचा प्रतिवाचक शब्द उभ्या संस्कृत मराठींत आढळत नाहीं. आमच्या प्राचीन विद्वानांच्या मतें समाजघटना धर्मावर म्हणजे कर्तव्यावर झाली पाहिजे. प्रत्येक मनुष्याचें तो ज्या परिस्थितींत व अवस्थेंत असेल त्या अवस्थेला अनुसरून सहज कर्तव्य असतें. आपआपल्या धर्माप्रमाणें, कर्तव्याप्रमाणें प्रत्येकानें वागलें पाहिजे. प्रत्येकाच्या मागें कर्तव्य लागलें आहे. त्याची जाणीव त्याला असली पाहिजे. हक्काची नको. आमच्या भाषेंत पतिधर्म, स्त्रीधर्म, राजधर्म, प्रजाधर्म, भृत्यधर्म इत्यादि शब्द आहेत.

हक्काबद्दल होणाऱ्या होतात तशा धर्माबद्दल होत नाहींत. धर्म, कर्तव्य, ह्यांविषयीं निष्ठा, भक्ति उत्पन्न होते. हक्काविषयीं अभिमान उत्पन्न होतो. समाजामध्यें नेहमीं खळबळ चालू असते, असंतोष माजतो, आणि खालपासून वरपर्यंत सुख कोणाच्याच वांट्यास येत नाहीं. परंतु हक्कदृष्टि निवळून कर्तव्य-दृष्टि प्राप्त झाली कीं, असंतोषाचें बीजच नाहींसें होतें. अधिक हक्काच्या माणसाबद्दल मत्सर उत्पन्न होतो, पण अधिक कर्तव्याच्या माणसाबद्दल तितका हेवा वाटत नाहीं. पण ही हक्काची बडबड बंद कधीं होणार?

(चापेकर गप्पा. पा. ३७–३८.)

## राष्ट्राच्या प्रगतीसाठीं युद्ध हें आवश्यक आहे काय?

१. युद्धाचा भयंकरपणा. २. युद्धानंतरचा काळ. ३. युद्धाची जरूरी कितपत आहे? ४. या प्रश्नाला विचार व त्याला उत्तर. ५. त्या दिशेनें चाललेले प्रयत्न.

निसर्गामध्यें कांहीं कांहीं किती भयंकर उत्पात आहेत? ज्वालामुखीच्या स्फोटानें शहरेंच्या शहरें गडप केलीं जातात. तसेंच धरणीकंपानें शहरेंच्या शहरें गाडिलीं जातात. हीं जशीं ईश्वरनिर्मित संकटें आहेत, तसेंच युद्ध हें मनुष्य-निर्मित संकट आहे. युद्ध जोंपर्यंत चालू असतें तोंपर्यंत त्याच्या धडाक्यानें आपण भारून जातों. शौर्याच्या कथांनीं मन तल्लीन होतें व त्याचा भयंकर-पणा यावा तसा दृष्टीपुढें येत नाहीं. परंतु युद्ध जसें संपत येतें तसतसें त्याचे जाज्वल्य परिणाम हळूंहळूं जाणवूं लागतात. मानवी आयुष्याची किती खराबी होते पहा! महाभारतांतील कौरव–पांडवांचें युद्ध घ्या किंवा पानि-पतचें युद्ध अथवा परवांचें जर्मन युद्ध घ्या. ह्यांमध्यें किती प्राणांची आहुती पडली हें पाहिलें म्हणजे हा केवढा राष्ट्रीय उत्पात आहे हें ध्यानांत येईल. कित्येक लढाईत मेले, कित्येक दुष्काळानें मेले, कित्येक अनेक आपत्तींनें मेले. युद्धांत जे कामास येतात ते सगळे तरुण अस्सल रक्ताचे असतात. अशा रीतीनें अस्सल रक्त नाहींसें झालें म्हणजे शिल्लक राहतें ते अर्थात् कमकुवत, निर्बल असे लोक रहातात व त्यांच्यावरच सर्व जबाबदाऱ्या येऊन पडतात. त्यामुळें राष्ट्राची खराबी होते. अधोगतीमधून मान वर काढण्यास राष्ट्रास फार वेळ लागतो. दुसरीं जीं माणसें जिवंत राहतात त्यांच्यावर पुष्कळ संकटें येतात. कित्येक स्त्रिया विधवा होऊन निराश्रित होतात. कित्येक मुलें पोरकीं

होतात. कित्येक घरें उघडीं पडतात. गांवेंच्या गांवें ओसाड होतात. त्याचप्रमाणें मालमत्तेची खराबी होते. व्यापार-उद्योगांची पिच्छेहाट होते. नव्या नव्या करांचें ओझें सरकाराकडून लादलें जातें. सामाजिक बाबतींत कांहीं उलथापालथ होते व शेवटीं राष्ट्रा-राष्ट्रांत युद्ध संपल्यानंतर सौख्य, बंधुभाव नांदावा हें तर बाजूलाच राहो, पण वितुष्ट मात्र जास्त वाढत जातें. लढाई नंतरच्या तहांत भावी युद्धाची बीजें पेरलीं जातात असें म्हणतात.

युद्धाचा काल खडतर खराच. परंतु युद्धानंतरचा काळ त्याहून फार खडतर असतो. एक वेळ युद्ध पुरवलें, परंतु युद्धानंतरचा काळ नको असे इतके लोकांचें हाल होतात. जीवनकलह फार बिकट होतो. युद्धाचा थकवा सर्वांना चांगलाच जाणवतो.

अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं हाल करणारें, राष्ट्राची शक्ति हरण करणारें, असें हें युद्ध राष्ट्रास आवश्यक आहे काय ? कांहीं लोक त्याची जरूरी प्रतिपादितात. राष्ट्रांत जो जोम, उत्साह असतो, जें तरुण रक्त सणसणतें त्याला वाट देणें जरूर असतें. त्याला जर वाट फोडून दिली नाहीं तर, अंतःकलह माजून यादवी सुरू होते. मानवी स्वभाव कधीं बदलत नाहीं, तो त्रिकाल आहे तसाच आहे. त्याच्यांत दुसऱ्याचें सर्वस्व अपहार करण्याची बुद्धि होणार, महत्त्वाकांक्षा वाढणार; तेव्हां सर्वापहारास आळा घालणारा योग्य उपाय म्हणजे युद्ध होय.

परंतु हा निराशेचा वेदांत होय. जोम, उत्साह ह्याला वाट फोडण्याचा योग्य उपाय म्हणजे युद्धच आहे काय ? दुसरा नाहीं ? त्याचप्रमाणें मानवी स्वभावास दुसऱ्या प्रकारानें इष्ट वळण देणें शक्य नाहीं कीं काय ? आपण आपलीं भांडणें लवादपंचांमार्फत सोडवून नाहीं का घेत ? कौटुंबिक कलह नाहींसे करण्यास कितीतरी मार्ग आहेत. कुटुंबांतील वितुष्ट घालविण्यास आपण लवाद नेमितों, न्यायाधीश नेमितों, वकील देतों, कोर्टांत जातों व न्याय करून घेतों; परंतु मारामारी करीत नाहीं, किंवा खूनहि करीत नाहीं. मग हीच वृत्ति राष्ट्राराष्ट्रांतील वितुष्ट तोडण्यांत कां अवलंबू नये ? थोडीशी देवाण-घेवाण वृत्ति स्वीकारिली पाहिजे.

अलीकडे ही वृत्ति कांहीं राष्ट्रांत दिसूं लागली आहे. लीग आफ् नेशन्स म्हणून एक सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींचें मंडळ काढिलें आहे. त्यांच्यामार्फत

युरोपांतील बरेचसे आंतरराष्ट्रीय प्रश्न निकालांत काढितात. युद्धप्रवृत्तीचें समूल उच्चाटण ह्या मंडळामार्फत करण्याचा सर्व राष्ट्रांचा इरादा आहे. आणि त्याला यश आल्यावांचून राहणार नाहीं.

## अभ्यास

### चर्चात्मक निबंध

१. तुलनात्मक निबंध लिहा:—

( अ ) वनांतील फूल व बागेंतील फूल.

( आ ) प्रवास व एकस्थायित्व.

( इ ) कुत्रें व मांजर, घरांतील पाळीव जनावर म्हणून.

( ई ) उष्ण व समशीतोष्ण हवा.

२. खालील मुद्दयांवर साधकबाधक प्रमाणें देऊन लिहा.

लेखनस्वातंत्र्य; लोकसत्ताक राज्यपद्धति; सक्तीचें लष्करी शिक्षण; कादंबरीवाचन; वसतिगृहें; फिरतीं वाचनालयें; घोकंपट्टी; परीक्षा.

३. खालील मुद्दयांवर अस्तिनास्तिपर लिहा.

१. उपकाराची फेड करण्यांत घाई करणें म्हणजे एक प्रकारचा कृतघ्नपणाच आहे.

२. राष्ट्रगीतें करण्याची सत्ता मला द्या, मग कायदे कोणी कां करीनात ?

३. संभाषणावर जसा अभिजातत्वाचा परिणाम होतो तसा काटकसरीचा समृद्धीवर होतो.

४. खालील विधानांची साधकबाधक छाननी करा.

१. मनुष्य हा साहित्य वापरणारा ( हसणारा, बोलणारा, विचार करणारा ) प्राणि आहे.

२. ब्रह्मर्षींनीं ब्रह्माची व्याख्या ‘ नेति नेति ’ अशी केली आहे.

३. क्षुद्र लहान गोष्टींत जो आपण उदारपणा दाखवितों त्यालाच नम्रपणा म्हणतात.

४. सूड घेणें म्हणजे एक प्रकारची कठोर न्यायप्रियता दाखविणें आहे.

५. खालील निबंध लिहा.

( अ ) क्रिकेट आणि फुटबॉल ह्यांची तुलनात्मक चर्चा करा.

( आ ) तुमच्या शाळेचें मासिक पुस्तक कसें असावें ?

( इ ) चुगलखोरी करणें योग्य आहे का ?

( ई ) तुह्मी वाचिलेल्या पुस्तकाचें परीक्षण करा.

६. खालील विषयांची चर्चा कराः–

दुय्यम शिक्षणक्रमांतून परीक्षा काढून टाकाव्या कीं नाहीं ?

वर्तमानपत्रें विद्यार्थ्यांनीं कोठवर वाचावीं ?

वाचन चांगलें कां निरीक्षण चांगलें ?

फांशीची शिक्षा असावी कीं नाहीं ?

हायस्कूलमध्यें संस्कृत हा विषय असावा कीं नाहीं ?

सक्तीचें मोफत शिक्षण असावें कीं नाहीं ?

नफाबाजी करणें न्याय्य आहे कीं नाहीं ?

७. वादविवादात्मक निबंध लिहा.

शिक्षणांत धंदेशिक्षण हा विषय असावा काय ?

खोटें बोलणें कधीं योग्य आहे कां ?

युद्ध नैतिक दृष्ट्या कितपत योग्य आहे ?

देहांत शिक्षा–साधक, बाधक.

युद्ध कीं तह ?

दानपद्धति–योग्य, अयोग्य ?

## पाठ ११

# कल्पनाविषयक निबंध व संवाद

### १. निबंध

वर सांगितलेल्या कथनविषयक, वर्णनविषयक, चिन्तनविषयक ह्या निबंधांच्या कोणत्याहि प्रकाराच्या निबंधाचा अन्तर्भाव ह्या कल्पनाविषयक निबंधांत होतो. चिन्तनविषयक निबंधांत बुद्धीला वाव मिळतो. कल्पनाविषयक निबंधांत कल्पनाशक्तीला वाव मिळतो. वर्णनविषयक व कथनविषयक निबंधांत वर्ण्य विषय समोर असतो; कल्पनाशक्तीचें कांहीं काम लागत नाहीं. ह्या निबंधांत कल्पनाशक्तीला जो अवसर द्यावयाचा तो सत्याच्या भरींव पायावर द्यावा लागतो. वर्णनाच्या मुळाशीं जर सत्यता असेल तर त्या विषयाची, त्याच्या वर्णनाची वाचकांस खात्री पटेल. नाहीं तर येथूनतेथून असंभाव्य कथाच होईल.

कल्पनाविषयक निबंधांत जें साहित्य घ्यावयाचें तें आपल्या भोंवतालच्या परिस्थितींतून घ्यावें लागतें. कल्पनाशक्तीस वाव द्यावयाचा तो साहित्य उत्पन्न करण्याच्या बाबतींत न देतां साहित्याच्या मांडणींत द्यावयाची हें लेखकानें ध्यानांत ठेवावें. कधींकधीं लेखकास सामग्रीचा तुटवडा पडलासा वाटतो व म्हणून तो आपल्या कल्पनेनें काल्पनिक सामग्री तयार करितो. कल्पनाशक्तींत चांगलें सामर्थ्य नसल्यामुळें भोंवतालच्या परिस्थितींत त्याला कांहीं नवीनपणा दिसत नाहीं, म्हणून तो असंभाव्य सृष्टीकडे धांव घेतो. निसर्गामध्यें एवढें अमर्याद ऐश्वर्य आहे कीं, जिकडे पहावें तिकडे त्यास नवीन पदार्थ, किंवा जुन्या पदार्थांतहि कांहीं नवीन दिसल्याखेरीज रहाणार नाहीं. येथें योग्य निरीक्षणशक्तीची जरूरी लागते.

कल्पनाविषयक लिखाणाचे तीन प्रकार खालीं दिले आहेत.

१. अरबी भाषेंतील सुरस गोष्टी.

२. काल्पनिक व्यक्तांचें, प्राण्याचें आत्मचरित्र.

३. काल्पनिक व्यक्तींमधील चाललेल्या कांहीं विषयांवरील संवाद.

खालीं कल्पनाविषयक निबंधाचे नमुने दिले आहेत.

### एक जुना रुपया व त्याचें आत्मचरित्र

एकदां एक रुपया आपल्या कडावर एकदम उभा राहिला आणि लोकांच्या-कडे आपलें तोंड फिरवून आपल्या आयुष्यांतील घडलेल्या साहसाची कहाणी सांगूं लागला. तो म्हणाला:—

माझा जन्म अमेरिका खण्डांतील पेरू देशांतील अण्डीज नांवाच्या पर्वता-मध्यें झाला. जन्म झाल्याबरोबर जन्मतांच असलेलें माझें अशुद्धत्व धुऊन काढिल्यावर मला एका पेटाऱ्यांत बंदोबस्तानें घालून हिंदुस्थान देशाकडे पाठ-वून दिलें. कृष्णास ज्याप्रमाणें जन्मतांच कैद व त्यानंतर यमुना नदीचें उल्लं-घन तद्वतच माझें झालें. माझा जलप्रवास सुरक्षित झाला. परंतु, माझा हिंदु-स्थानास पाय लागल्याबरोबर माझा जंगली, रानटी, डोंगरी अवतार उतरला व एतद्देशीय पोषाख मजवर चढविण्याची लोकांनीं चांगली तयारी केली. माझें दैव चांगलें म्हणूनच मला धर्मशील, पवित्र, उदार, अशा अकबर बादशहाचा सहवास लाभला. मला जितकें मुसलमान लोक जवळ करीत तितकेंच हिंदु लोक जवळ करीत. अकबर बादशहाची प्रतिकृति आपल्या मुखावर लावून मी मोठ्या दिमाखानें संचार करूं लागलों. माझा आकार वाटोळा, लहान, सुटसुटीत असल्यामुळें प्रवासांत मला जागेची अडचण कधींहि भासली नाहीं. मला कोठेंहि मज्जाव नसे. माझ्याजवळ जातिभेद नसे. खाटिकाच्या कसाईखान्यापासून तों सोंवळ्या ब्राह्मणाच्या कनवटीपर्यंत माझा शिरकाव सहज व मोठ्या आप्रुपाईनें होत असे.

माझा जन्म होऊन पांच सहा वर्षें झालीं असतील नसतील तों मी एका म्हाताऱ्या कद्रूच्या हातांत सांपडलों. त्यानें एकदम माझ्या प्रवासप्रियतेवर गदा आणली. आणि माझ्यासारख्याच पांचशें इतर सवंगड्यांसह एका तिजोरींत त्यानें मला कोंडून टाकलें. दुःखांत सुख एवढेंच कीं, तो म्हातारा दररोज सकाळीं

संध्याकाळीं आह्मांस बाहेर काढून आह्मी बरोबर आहोंत कीं नाहीं, हें मोजून पुन्हां तिजोरीच्या तुरुंगांत टाकीत असे. अशा रीतीनें प्रवासास कांहीं दिवस आह्मी अंतरलों; परंतु पुन्हा आमचें दैव उगवलें.

एके अपरात्रीं एकदम आमच्या तुरुंगाच्या दारावर हातोड्याचे कोणी घांव घालतांना आह्मीं ऐकिलें. तिजोरी फोडून बाहेर पडतों न पडतों तोंच फोडणारा गृहस्थ कोणी बदमाष चोर नसून आमच्या ह्मातार्‍या मालकाचा वारस मुलगाच होता असें आम्हांस आढळून आलें. आपले वडील मृत्युपंथास लागले आहेत असें पाहून सर्व चीजवस्त हस्तगत करून घेण्याच्या इच्छेनें त्यानें आपल्या उधळ्या स्वभावास अनुसरून एकदम अशा रीतीनें आह्मांस खुलें केलें. आमची एकदम ताटातूट केली. माझ्या इतर सवंगड्यांचें काय झालें कोणास ठाऊक! माझी मात्र त्या उधळ्या मुलानें एकदम एका वैद्याकडे रवानगी केली, वैद्याकडून काष्ठौषधी-वाल्याकडे, त्याच्याकडून लाकुडतोड्याकडे, त्याच्याकडून कलालाकडे, कलाला-कडून त्याच्या बायकोकडे व बायकोनें शेवटीं दक्षिणा म्हणून एका भटजींच्या ह्वालीं मला केलें.

अशा रीतीनें माझा प्रवास भिन्न भिन्न परिस्थितींत मोठ्या आनंदांत चालला होता. ह्या खिशांतून त्या खिशांत, त्या खिशांतून तिसर्‍या खिशांत, असा प्रवास होऊन अखेर त्या ब्राह्मणानें मात्र मी जुनापुराणा ह्मणून देवार्‍यांत ठेविलें आणि तो माझी रोज पूजा करूं लागला.

## एका म्हातार्‍या बैलाचें आत्मचरित्र

मी मूळचा कृष्णाकांठचा. आमच्या कृष्णाकांठचा असा कांहीं गुण आहे कीं, तेथील बैलांमध्यें एक विशेष प्रकारचा जोम असतो. कृष्णानदीच्या पाण्याचेंच तें बहुतेक सामर्थ्य असेल. तें पाणी प्यालें म्हणजे आंगांत विशेष गुर्मी येते. आमच्या बैलाच्या ज्या कांहीं थोड्या बहुत जाती—अमृतमहाल, कंकर, सोरटी वगैरे—त्या सर्वांत कृष्णाकांठचा खिल्लारी बैल दिसावयास फार सुंदर दिसतो. माझ्या तरुणपणीं मी असाच मोठ्या खिल्लारी जोडीमध्यें होतों. ते माझे दिवस मोठ्या आनंदांत गेले. त्यांची मला पूर्ण आठवण आहे. त्या दिवसांत माझ्या मालकाचें माझ्यावर फार प्रेम होतें. मला कामहि फारसें नसे. रोज खूप चांगलें हिरवें गार गवत, चांगली पेंड, दाणा वगैरे खावें आणि

खुशाल गोठ्यांत बसावें. रोज संध्याकाळीं मालकानें बाहेर पाण्यावर न्यावें, असा रोजचा कार्यक्रम होता. पाण्यावर गेलें म्हणजे जरा मोकळें वाटून शिंगानें जमीन उकरणें, मोठ्यानें डुरकणें, दुसरा खिल्लारी खोंड भेटला तर, त्याच्याशीं झुंजणें, ह्यांमध्यें आम्हीं आमच्या मनाची करमणूक करीत असूं. कधीं एखाद्या सणाचे किंवा दुसऱ्या महत्त्वाचे दिवशीं माझा मालक मला गाडीस जुंपी, पण त्या वेळेस तो माझ्या आंगावर झूल वगैरे अलंकार घाली.

माझ्या मध्यम वयांत मात्र मला हें सुख मिळालें नाहीं. जेवढें सुख पूर्वी अनुभविलें तेवढेंच कष्ट पुढें सोसावे लागले. रोज शेतांमध्यें नांगर, कुळव वगैरे चालवावे लागत. मोट ओढतांना तर फारच हाल होत असत, आणि रोज मोट सकाळपासून दोनप्रहरापर्यंत ओढावी लागे. पावसाळ्यांत शेतीचें काम नसलें म्हणजे गाडी ओढावी लागे. अशा रीतीनें मी माझ्याकडून पूर्णपणें माझ्या मालकाच्या उपयोगीं पडलों व मालकानेंहि पण माझ्या खाण्यापिण्याचे अगदीं हाल केले नाहींत.

आतां माझें उतार वय झालें आहे. माझ्या हातून कांहीं काम होत नाहीं. व मालकही मला काम करावयास लावीत नाहीं. आतां खुशाल काय जें मिळेल तें खाऊन दिवस कंठीत असतों.

## २. कल्पनाविषयक संवाद

काल्पनिक संवाद लिहितांना खालीं दिलेल्या सूचना ध्यानांत ठेवाव्या.

( १ ) विषयाची निवड योग्य असावी.

( २ ) ज्या प्रकारचा विषय असेल त्या प्रकारचीं त्याला योग्य माणसें असावीं. विषयावर संभाषण करण्याची त्यांच्या अंगीं पात्रता असली पाहिजे.

( ३ ) विषयासंबंधीं अगोदर पूर्ण विचार करावा. त्याविषयीं सर्व मुद्दे व प्रमाणें लिहून ठेवावीं व तीं ज्या माणसांच्या तोंडांत योग्य दिसतील त्यांच्या तोंडांत घालावीं.

(४) विषयावरील मुद्दे कोणत्या तरी एका क्रमानें घ्यावे. एका मुद्द्यापासून दुसरा मुद्दा निघावा व तो संभाषणाच्या ओघांतच निघावा.

(५) ज्या त्या मनुष्याच्या तोंडांत त्याच्या योग्यतेप्रमाणें भाषा घालावी. खेडेगांवांतील मनुष्य इतकासा शुद्ध बोलणार नाहीं. शिष्ट मनुष्याच्या तोंडांत भारदस्त भाषा असावी. भाषा साधी, सरळ व सोपी असावी.

(६) प्रश्न व उत्तरें, पुढचें व मागील भाषण, यांमध्यें योग्य संबंध असावा. संभाषण एकंदरींत साधें, थोडक्यांत पण पूर्ण, मुद्देसूद, स्वभाविक असें असावें.

खालीं कांहीं संवाद लिहून दाखविले आहेत.

१. "**देशी खेळ चांगले कां विदेशी खेळ चांगले?**" ह्या विषयावर दोन विद्यार्थ्यांचा संवाद.

रामाः--काय रे गोविंदा, कोठें चाललास ? अगदीं शाळा सुटावयाच्या अवकाश कीं चाललास खेळायला ? का रे, सर्व मुलें खेळावयास येतात का ?

गोविंदाः--अरे सर्व कशीं येणार ? आणि सर्व मुलें जरी आलीं तरी सर्वांना खेळावयास कसें मिळणार ?

रामाः--म्हणजे तूं म्हणतोस तरी काय ? शाळेंतील सर्व मुलें जर मैदानावर आलीं तर त्यांना खेळावयास मिळत नाहीं ? सर्वांना व्यायाम मिळण्याची व्यवस्था तुमच्या शाळेंत केली जात नाहीं का ? आमच्या शाळेंत तर सर्वांना व्यायाम रोज नियमानें मिळेल अशी व्यवस्था केली आहे.

गोविंदाः--आमच्या शाळेंत व्यवस्था जरा निराळी आहे. आह्मी क्रिकेट, हॉकी, फुटबाल वगैरे इंग्रजी खेळ खेळतों. ह्या इंग्रजी खेळांमध्यें सर्व मुलांना एकदम खेळतां येत नाहीं. अकरा मुलांचा संघ करून खेळ खेळावा लागतो.

रामा--अरे ही मोठीच गैरसोय म्हणावयाची ? तुह्मी अकराजण खेळूं लागलां म्हणजे बाकीच्यांनीं काय करावयाचें ? तुमच्या तोंडाकडे बघावयाचें ना ? बरें, तुमच्या अकरा जणांचे किती संघ एकाच वेळीं खेळूं शकतात ?

गोविंदा—जास्तींत जास्ती दोन संघ एकाच वेळीं खेळूं शकतात. कारण ह्या तिन्ही खेळांपैकीं कोणताहि खेळ खेळला तरी त्याला जागा मुबलक लागते. प्रत्येक खेळाला एक एक एकर जागा लागते.

रामा—तुमच्या ह्या खेळाचा फायदा फार झालें तर तेहतीस विद्यार्थ्यांनाच मिळूं शकेल. शिवाय मैदान तरी किती मोठें लागेल! तुमच्या तीन खेळांना जेवढें मैदान लागतें तेवढ्याच मैदानांत आमच्या हुतुतु, आट्यापाट्या, खो खो, लंगडी वगैरे खेळांचे कितीतरी संघ खेळतील! तुमचीं जर तेहतीस मुलें खेळूं शकलीं तर तेवढ्याच जागेंत साधारणपणें दीडशें मुलें हे देशी खेळ एकाच वेळीं खेळूं शकतील. बरें, का रे गोविंदा, तुमच्या खेळाला साहित्य जें लागतें त्याला खर्च तरी काय येतो?

गोविंदा—क्रिकेट व हॅकी ह्या खेळांना खर्च फार येतो. प्रत्येक बॅटीला चारपांच रुपये व चेंडूला दोनतीन रुपये पडतात. ह्याशिवाय पायाचे पॅड्स, हातमोजे, वुइकेट्स इत्यादि जिन्नसा लागतात त्या निराळ्याच. हॉकीसहि असाच खर्च येतो. फुटबॉलमध्यें फक्त एक सात-आठ रुपयांचा चेंडू लागतो.

रामा—अरे, खर्चाच्या दृष्टीनेंहि हे इंग्लिश खेळ पटत नाहींत. आमच्या ह्या आट्यापाट्या, खोखो, हुतुतु, लंगडी ह्या खेळांना एका पैचाहि खर्च येत नाहीं. एक मैदान चांगलें असलें म्हणजे झालें. शिस्त पाळणें, अंगांत चलाखी येणें, वरिष्ठाचा हुकूम पाळणें वगैरे नैतिक गुण दोन्हींमध्यें सारखेच आहेत. तेव्हां मग हे देशी खेळ खेळण्यांतच विशेष फायदा आहे. ह्या शहरीं एक नवीन क्रीडा-मंडळ निघालें आहे. चल, आपण आजपासून तेथें जाऊं.

**२. " खेडेगांवांतील रहाणी चांगली, कां शहारांतील रहाणी चांगली ?"** ह्या विषयावर दोन गृहस्थांचा संवाद.

देवबा—काय पंत, आज कुणीकडे इकडे आमच्या ह्या खेडेगांवास आपले पाय लागले?

दिनकरपंत—होय, आलों इकडे यंदाच्या सुट्टींत.

देवबा—तुम्हांला येथें अगदीं करमत नसेल? येथें कांहीं तुमच्या शहरांतल्यासारखे टांगे, मोटारी, नाटकें, सिनेमा वगैरे कांहीं सांपडावयाचें नाहीं. येथें वाचावयास कांहीं मिळावयाचें नाहीं.

वाचनालय, सातारा.



दिनकरपंत—हो, असें झालें आहे खरें. येथें येऊन कांहीं फार दिवस झाले नाहींत तोंच मला कंटाळा आला आहे. प्रथम प्रथम कांहीं दिवस बरें वाटलें. परंतु आतां दिवस जात नाहींत.

देवबा—आम्हांला सुद्धां तुमच्या शहरांत गेलें म्हणजे असें होतें ! कामासाठीं मी कधीं कधीं जातों. परंतु काम झालें म्हणजे कधीं एकदां बाहेर पडेन असें होऊन जातें. अहो ! शहरांतील काय तो गलिच्छपणा ? काय तो गोंगाट ? किती ती धूळ ? काय तो गिरण्यांचा धूर ? डोक्याला कधीं शांतता म्हणून मिळतच नाहीं. सदा रखरख, सदा आपली बजबजपुरी !

दिनकरपंत—खेडेगांवांत राहण्यानें हवापाणी उत्तम मिळतें ही गोष्ट खरी. ती तुम्हांला ईश्वरानें एक देणगीच दिली आहे. शहरांत त्या गोष्टी मिळत नाहींत. शहरांतील गोंगाट तेथें कांहीं दिवसांच्या रहाणीनें संवयीचा होतो. परंतु खेडेगांवांतील ह्या तुमच्या शांततेनें एखाद्यास वेडच लागावयाचें ! येथें कांहीं धंदा आहे ? का कांहीं हातपाय हलविण्यास सवड आहे ?

देवबा—खेडेगांवांतील सृष्टीची शोभा अवर्णनीय असते. सहज कोणीकडेहि नजर टाका, डोळ्यांचें पारणेंच फिटतें ! सहज बागेंत फिरलां तरी मनाचें समाधान होईल.

दिनकरपंत—व्यक्ति तितक्या प्रकृति हेंच खरें आहे. कोणाला ती रहाणी आवडेल, कोणाला खेडेगांवां रहाणी आवडेल. हें ज्याच्या त्याच्या मनावर राहील.

देवबा—तें जरी खरें असलें तरी कांहीं गोष्टी तुम्ही कबूल केल्याच पाहिजेत. एक स्वच्छ हवापाणी. दुसरें सृष्टीचें सौन्दर्य. तिसरी गोष्ट, आमच्या येथील रहाणीमध्यें दुर्व्यसनें लागण्याच्या संधि कमी असतात. त्यांचीं साधनेंहि कमी असतात. त्यामुळें त्यांचा फैलावहि शहरांतल्या इतका होत नाहीं. आमच्या येथील हवापाण्याचा परिणाम तुमच्या भुकेवर झाला आहे कीं नाहीं ? येथें आल्यापासून दोन घांस जास्त खातां कीं नाहीं ?

दिनकरपंत—तें खरें आहे. तरी पण सध्यांच्या प्रगतीच्या काळांत खेडेगांवांत राहून चालणार कसें ? आयुष्याचा जास्तींत जास्ती फायदा करून घेतला पाहिजे. बरें येतों मी.

## ३. दानधर्म पद्धतीवर दोन विद्यार्थ्यांचा संवाद.

विठ्ठल--अरे महादेव, आज सकाळीं माझा अभ्यास अगदीं झाला नाहीं. मी आपल्याकडून पुष्कळ यत्न केला. परंतु घराभोंवतीं आज इतका गोंगाट झाला होता कीं, अभ्यासासाठीं मनाची एकाग्रता कांहीं केल्या होईना.

महादेव--कसलारे गोंगाट झाला होता ?

विठ्ठल--अरे आज पडला आदितवार. आमच्या घराजवळ एक श्रीमंत व्यापारी राहतो. दर रविवारीं गोरगरिबांना भिक्षा घालण्याचा त्याचा नियम आहे. भिक्षेकरी तरी इतके जुळतात व त्या सर्वांचा गोंगाट इतका होतो कीं, अभ्यास करणें कठिण होतें. भिक्षा अगोदर मिळावी म्हणून प्रत्येकजण धडपड करितो आणि दुसऱ्यास मागें सारतो. अशा रीतीनें ते भांडतात व ओरडतात.

महादेव--अरे, भिक्षेकऱ्यांमध्यें कितीतरी भिकारी दांडगे, शरीरानें धट्टे-कट्टे असतात. कांहीं तर बेमुर्वतखोर असतात. "तुम्ही भिक्षा कां मागतां?" असें जर विचारिलें तर "तो आमचा धंदा आहे" असें ते उत्तर देतात. तेव्हां अशा भिकाऱ्यांना भिक्षा कां घालावी ? व जरी घातली तरी त्याबद्दल पुण्य कसें मिळणार ?

विठ्ठल--तूं म्हणतोस तें खरें आहे. मलाहि तसेंच वाटतें. भिक्षा द्यावी, दान करावें, पण तें करितांना थोडासा पात्रापात्र विचार केला पाहिजे. आंधळ्या-पांगळ्या, दुबळ्या वगैरे लोकांना भिक्षा द्यावी. त्यानें पुण्य मिळेल. परंतु धंदे-वाल्या भिकाऱ्यांना भिक्षा देण्यानें आपण आळशीपणाला उत्तेजन मात्र देतों.

महादेव--आणि असे रिकामटेकडे, आळशी भिकारी आपल्या देशांत कितीतरी आहेत. आणि कितीतरी ते उर्मट आहेत ! त्यांना दात्यांबद्दल कांहीं पर्वा वाटत नाहीं. ते बेधडक त्यांचा अपमान करितात. आपली ही दानपद्धतीच सुधारली पाहिजे असें नाहीं का तुला वाटत ?

विठ्ठल--पाश्चात्य देशांतील विचारांचा आपल्यावर परिणाम झाल्याशिवाय कसा राहणार ? त्यांच्या लोकांत पहा, त्यांचीं दानमंडळें असतात. ह्या मंडळां-मार्फत लंगड्या-पांगळ्यांची व सर्व गोरगरीबांची व्यवस्था होते. वाटेल त्यानें उठावें आणि कांहीं काम न करितां खुशाल भिक्षा मागावी ! अशी स्थिति त्यांच्या-कडे नसते. तशीं मंडळें आपल्या इकडे स्थापावीं. आणि त्यांच्यामार्फत ह्या प्रश्नाची व्यवस्था व्हावी. आळशी भिकाऱ्यांना शिक्षा व्हावी.

## ४. इनॉक्यूलेशनसंबंधीं दोन गृहस्थांचा संवाद.

गोपाळराव--काय रामजीबुवा, कसें काय ? तुमच्या गांवचें पीकपाणी बरें आहे ना? अगदीं अबादीअबाद यंदा असेल, नाहीं का?

रामजी--होय पंत, तुमच्या आशीर्वादानें सर्व कांहीं ठीक आहे. पीकपाणी सुरेख आहे, ईश्वराची कृपा त्यांत आहे खरी. परंतु मध्येंच एक संकट उत्पन्न होतें कीं काय अशी भिती वाटते. पीकपाणी सुदैवानें चांगलें झालेलें देव सुखानें खाऊं देतो कीं नाहीं कुणास ठाऊक!

गोपाळराव--असें कां? तुम्हांला भिती आहे म्हणतां? कां, उंदीर पडूं लागले वाटतें?

रामजी--उंदीर मरताहेतच; परंतु परवां एक प्लेगची केसहि झाली. गांवांतील माणसें म्हणतात कीं, तो माणूस दुसरीकडून लागून आला होता. आणि आपल्या गांवाला तशी भीति अद्यापि नाहीं. उंदीर मरत आहेत ते थंडीनें मरत असतील.

गोपाळराव--हें पहा रामजी, तसें आपलें आपणांस फसविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हा प्राणाचा प्रश्न आहे. हें संकट आलें आहे असें समजून त्याच्यातरतुदीला लागणें हें शहाणपणाचें काम आहे. अगदीं गळ्याशीं येईतोंपर्यंत थांबण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

रामजी--तुम्ही ह्मणतां तें खरें. परंतु तरतूद तरी काय करावी? माझा तर पसारा फार मोठा आहे. त्यामुळें मी तर भांबावून गेलों आहें.

गोपाळराव--अहो, मी तुम्हांला एक उपाय सांगतों. ह्या प्लेगाचा प्रतिबंधक असा एक उपाय शोधून काढिला आहे. डॉक्टरजवळ एक प्रकारची लस असते. ती टोंचून घेतली म्हणजे प्लेगची कांहीं भीति नसते. हा प्लेगवर अगदीं उत्तम उपाय आहे.

रामजी—हें तुमच्या शिकलेल्या माणसांचें कांहीं तरी असतें झालें. अहो! मरण यावयाचें झालें म्हणजे तें तुमच्या ह्या लशीला थोडेंच भीक घालतें? मृत्यूपुढें कशाचेंहि चालत नाहीं. ईश्वरावर हवाला ठेवून रहावें म्हणतों, मग काय होईल तें होवो.

गोपाळराव—मृत्यु येणार म्हणून अगदींच हातपाय हलवूं नयेत कीं काय? मग मनुष्यानें प्रयत्न करूंच नये असें झालें. अहो, ही लस खरोखरीच फार उपयोगी आहे. ही फुकट मिळते व डॉक्टर लोक फुकट टोंचतात.

रामजी—पण हिची तरी खात्री काय?

गोपाळराव—खात्री म्हणजे! आमच्या गांवांत गेल्या वर्षी प्लेगच्या वेळीं ४००० माणसांना ही लस टोंचली. त्यांपैकीं एक माणूससुद्धां दगावला नाहीं. जीं माणसें मेलीं तीं सर्व न टोंचलेलीं होतीं. न टोंचलेलीं माणसें अगदीं निवडून काढिल्यासारखीं मरत होतीं!

रामजी—टोंचलेल्यांपैकीं कोणीहि दगावला नाहीं म्हणतां?

गोपाळराव—त्यांपैकीं २०-२५ माणसें आजारी पडलीं. परंतु तीं सर्व उठलीं.

रामजी—तुम्हीं अगदीं नवल सांगतां! कांहो, टोंचल्यापासून कांहीं त्रास होतो कां?

गोपाळराव—टोंचतांना कांहींच त्रास होत नाहीं. सुई टोंचल्यासारखा भास होतो. पुढें एक दिवस थोडासा ताप येतो. दंडावर कांहीं दिवस सुपारी येवढी गांठ येते. परंतु ती दुखत नाहीं! पुढें होणारा त्रास, खर्च, काळजी वगैरे टाळण्यासाठीं येवढा त्रास आपण सोसूं नये काय? शिवाय टोंचल्यावर रहाण्याची जागा कांहीं बदलावयास नको.

रामजी—वा, अलबत सोसला पाहिजे. तुमच्या म्हणण्याप्रमाणें मी आपलीं सर्व मुलेंमाणसें घेऊन येतों. तुमच्या गांवच्या दवाखान्यांत एवढी आमची टोंचण्याची व्यवस्था करा. माझ्या गांवांतील इतर माणसांचीं मनें वळविण्याचाहि मी प्रयत्न करितों.

## ५. पुढील शिक्षणासंबंधीं बाप व मुलगा ह्यांचा संवाद.

मुलगा—बाबा, आपल्या शेजारच्या फडणिसांचा मधू लवकरच आपल्या मामाकडे जाणार असें काल म्हणत होता. तो माझ्या बरोबर परवां पास झाला. पुढील अभ्यासासाठीं त्याच्या मामानें त्याला आपल्याकडे बोलाविलें आहे.

बाप—होय का! गोविंदराव त्याला पुढील अभ्यासासाठीं पाठविण्यास तयार झाले म्हणतोस?

मुलगा—त्यांच्या मनांतून त्यानें पुढें अभ्यासासाठीं जाऊं नये असेंच होतें. " झालें एवढें शिक्षण पुरे झालें; आतां आपला त्यानें कोणता तरी धंदा करावा " असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु त्याच्या मामानें फार आग्रह धरिला म्हणून त्यांचा नाइलाज झाला.

बाप—त्याच्या वडिलांचें म्हणणें व्यवहाराला धरून आहे. अरे, पुढचें शिक्षण म्हणजे फार खर्चाचें काम आहे. श्रीमंत माणसाशिवाय शिक्षणाचा फायदा दुसऱ्यास मिळणें कठीण आहे. शिवाय सध्यांचे दिवस फार चमत्कारिक आहेत. शिक्षणाला कांहीं मान नाहीं.

मुलगा—आपल्या ह्या गांवांत कितीतरी बी. ए. होऊन नोकरीशिवाय बसले आहेत. कित्येक वकिलांना तर विशेष म्हणण्यासारखें कांहीं मिळत नाहीं.

बाप—अरे, शिकलेल्यांची तर कींव करण्यासारखी स्थिति आहे. मोठी नोकरी मिळत नाहीं, आणि लहान नोकरी करणें अपमानाचें वाटतें! म्हणून कोणता तरी धंदा मुकर करून शिक्षणांत जीं वर्षें घालावयाचीं तींच वर्षें ह्या धंद्यांत घालविलीं म्हणजे दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे बघावयास नको!

मुलगा—पण बाबा, खरी विद्या ही आतां ह्यापुढें जो अभ्यास करावयाचा त्यापासूनच मिळावयाची. आतांपर्यंत नुसती तयारी आम्हीं केली, आणि आतां खऱ्या विद्येला आम्ही मुकणार!

बाप—विद्येला जगांत अगदींच मान नाहीं असें माझें म्हणणें नाहीं. परंतु ती खरी विद्या मिळविण्यास श्रम आणि पैसे किती खर्च होणार ह्याचा विचार कर. आणि उच्च विद्या जरी तूं मिळविलीस तरी दोन प्रहरच्या वेळेस ती तुझ्या उपयोगीं पडेल किंवा न पडेल ह्याची वानवाच! तेव्हां मी भितों आहें ह्या अनिश्चित स्थितीला. कायम खात्रीचा कांहीं जीवनाचा उद्योग करावा एवढेंच माझें म्हणणें!

मुलगा—बाबा, पण माझ्या बरोबरचीं सर्व मुलें पुढें जाणार, आणि मी येथल्या येथेंच!

बाप—ह्याबद्दल तुला कांहीं दिवस खंती वाटेल. अरे, त्या सर्वांची गोष्ट निराळी असेल. मधूच पहाना? त्याच्या घरची स्थिति आपल्या सारखीच असली तरी त्याच्या मामाचा त्याला आधार आहे. शिवाय गोविंदराव ( त्याचे वडील)

यांचें वय माझ्या इतकें नाहीं. तुम्ही कांहीं तरी धंदा करून आमच्या उपयोगीं पडून आम्हांला विश्रांति केव्हां देणार ? आम्ही तुमची वाट तरी कितीं दिवस पहावी ?

मुलगा—बाबा, तुमच्या म्हणण्याप्रमाणें मी पुढील शिक्षणाचा नाद सोडून कोणत्या तरी धंद्यांत पडण्याचें ठरवितों.

बाप—अरे, विद्याच मिळवावयाची असली तर धंदा करून सुद्धां मिळवितां येईल. इच्छा असेल तर मार्ग हा सुचतोच सुचतो.

## अभ्यास

१. खालीं कांहीं काल्पनिक आत्मचरित्राचे आराखडे दिले आहेत, ते पूर्ण लिहा.

नदी—माझा जन्म–उगम. डोंगरातील धबधबे. लहानसा प्रवाह. उपनद्या. मैदानावरील प्रवाह. संथ प्रवाह. तीरावरील सुपीक प्रदेश. कालवे व पाट. कांठावरील गांवें व शहरें. शहरांतील घाण. नावा व गलबतें. माझीं सुखें.

मेंढपाळाचा कुत्रा—आमचें लहानपण. संवयी. मेंढपाळाच्या खुणा व शब्द. प्रत्येक मेंढीची ओळख. मेंढपाळास जें हवें तें आणून देणें. मेंढ्या गोळा करणें. संकटें नाहींशीं करणें. रात्रीं पहारा करणें. मेंढ्यांशीं एकरूप, समरस होणें. मेंढ्यांना चारावयास नेणें. उघड्या हवेंतील सुखें.

मुंगी—आमच्या लहानपणाचीं सुखें. आमच्या संवयी. तोंडांत खाद्य घेणें. संग्रह करणें. उद्योगप्रियता. पुढच्या वाईट काळाची तरतूद करणें. आमच्या जाती.

हत्ती—जंगलांतील दिवस. कसा मी पकडला गेलों. नंतर माझे झालेले हाल. नंतर मला दिलेलें शिक्षण. नंतर मला दिलेलें काम. लांकडें ओढणें. नंतर मी राजाच्या हातीं गेलों. तेथील माझें चरित्र. माझें खाद्य. एकाद्या मिरवणुकीचें वर्णन.

२. खालील काल्पनिक संवाद लिहा.

| संवादव्यक्ति | संवादविषय |
| --- | --- |
| १. दोन विद्यार्थी | नाटकें पहावीं कीं नाहीं ? |
| | चहा प्यावा कीं नाहीं ? |
| २. दोन गृहस्थ. एक सुधारक, दुसरा पुराणमताभिमानी | स्त्रीशिक्षण |
| ३. दोन गृहस्थ. एक शिक्षक, दुसरा सद्‌गृहस्थ | धार्मिक शिक्षण असावें किंवा नाहीं ? |
| ४. दोन गृहस्थ | रेल्वे प्रवास चांगला किंवा मोटारप्रवास चांगला. |
| ५. दोन गृहस्थ | सत्याचा जय नेहमीं होतो किंवा नाहीं ? |
| ६. दोन गृहस्थ—( १ ) सुशिक्षित ( २ ) आशिक्षित | प्राथमिक शिक्षण व सक्ति |
| ७. दोन विद्यार्थी | परीक्षा असाव्या किंवा नाहीं ? |
| ८. दोन विद्यार्थी | बागेच्या उपयुक्ततेबद्दल |
| ९. कावळा व हंस | परस्परांच्या गुणदोषांवर |
| १०. दोन विद्यार्थी | क्रिकेट चांगलें का फुटबॉल चांगला ? |

## निबंधाचे विषय

### ३. कल्पनाविषयक

१. मोटार गाडी, रेल्वे डबा, बोट, पैसा, छत्री, हातांतील काठी, टोपी, भवानी तलवार, शिवरायी रुपया, मयूरासन, कोहिनूर, चष्मा ह्यांची कर्मकहाणी आत्मचरित्रपर लिहा.

२. वर्णन करा.

आदर्श गांव, आदर्श शाळा, आदर्श व्यक्ति.

३. शिवाजी न तानाजी } ह्या दोहोंचा सिंहगडच्या वेळचा संवाद लिहा.
सूर्याजी व तानाजी } ( कल्पनेनें )

राम व कौसल्या ह्यांचा वनवासास जाण्याच्या वेळचा संवाद लिहा.

४. मंगळ ह्या ग्रहावरील माणसाचें वर्णन कल्पनेनें करा.

इंद्रधनुष्य वापरणारा वीर ह्याचें वर्णन करा.

इंद्राचा दरबार—भीम ऐरावत घेऊन येतो त्याचें वर्णन करा.

५. वैकुंठ, कैलास, यमाचा दरबार ह्यांचें कल्पनिक वर्णन करा.

६. शिवाजीच्या दरबारांतील एका सरदाराला सद्य:कालीन परिस्थिति पाहून सुचलेले विचार लिहा.

७. सत्ययुगांतील महात्मा कलियुगांत उतरला आहे. त्याचे विचार लिहा.

८. तुह्मी हे तुह्मी नाहीं असें समजा; व तुह्मी कोण होऊं इच्छितां व तें कां ? हें लिहा.

९. तुह्मांस एकदम पुष्कळ संपत्ति मिळाली तर तुह्मी काय कराल ?

१०. सण, वाढदिवस व परीक्षा ह्या तीन गोष्टी एके दिवशीं आल्या आहेत. तुमचे विचार काय होतील ?

११. कवि आणि वनवासी फूल ह्यांचा कल्पनात्मक संवाद लिहा. ( रे. टिळक ह्यांच्या " वनवासी फूल " ह्या कवितेवरून. )

१२. जुन्या टोपीची कैफियत लिहा.

१३. चंद्रलोकावरची सफर लिहा.

१४. मी जर लक्षाधीश असतों तर काय केलें असतें तें लिहा.

१५. मुंबई पाहिल्यावर तुमचे काय विचार झाले ते लिहा.

## पाठ १२

# पत्रव्यवहार

उद्देश—दूरदेशीं, परप्रांतीं असलेल्या इष्टमित्रांशीं असलेलें मित्रत्व कायम ठेवण्याचें पत्रव्यवहार हें एक साधन आहे. समोर असलेल्या मित्राशीं आपण मोठ्या प्रेमळपणानें बोलूं शकतों. परंतु तसाच प्रेमळ-पणा समोर नसलेल्या मित्राशीं आपणांस दाखवितां येत नाहीं. हा प्रेमळपणा पत्राच्या साहाय्यानें दाखविणें शक्य असतें. ज्या दूरच्या प्रांतांत आपले इष्टमित्र राहतात, त्या प्रांताच्या परिस्थितीचें एकंदर वर्णन आपणांस पुस्तकाच्या साहाय्यानें मिळतें. परंतु त्यांत व्यक्तीचा संबंध नसल्यामुळें जिवंतपणा, आपलेपणा, प्रेमळपणा नसतो. पत्रलेखनांत ह्या सर्व गोष्टी आपोआप येतात. पत्रव्यवहारांत लेखक व वाचक ह्या दोहोंचाच संबंध आल्यामुळें त्यांत जो मनमोकळेपणा सांपडतो तो दुसऱ्या लेखनांत सांपडत नाहीं. पत्रव्यवहार वाचण्यांत फार गोडी लागते, ह्याचें कारण त्यांत अगदीं कपट नसतें. लिहिणारांस आपलें हृद्गत उघडें करणें पत्रांतच शक्य असतें.

**प्रकार**—पत्रव्यवहारांत खाजगी व सरकारी असे दोन प्रकार आहेत. त्यांत पुन्हां निमसरकारी अथवा निमखाजगी असा आणखी एक प्रकार पडण्यासारखा आहे. वर जे पत्रलेखनांत आढळून येणारे जिव्हाळा, मनमोकळेपणा, निष्कपटीपणा, निवेदनस्वातंत्र्य इत्यादि गुण सांगितले ते खाजगी पत्रव्यवहारांतच आढळून येतात. सरकारी पत्रव्यवहार हा नेहमीं औपचारिक स्वरूपाचा असतो. त्यामध्यें सेव्य-सेवकभाव पावलोपावलीं नजरेस पडतो. मनाचा मोकळेपणा आढळून येत नाहीं. खाजगी पत्रव्यवहार आप्तेष्ट, नातलग, मित्र ह्यांच्याशीं आपण

करितों. कधीं वडिलांस, तर कधीं लहानांस, कधीं त्रयस्थांस तर कधीं मित्रांस अशीं पत्रें आपण प्रसंगाप्रमाणें लिहीत असतों. सरकारी पत्र-व्यवहारांत वरिष्ठ-कनिष्ठ अधिकाऱ्यांस पत्रें लिहिण्याचा प्रसंग येतो. व्यावहारिक पत्रव्यवहार हा आणखी एक प्रकार आहे. हा पत्रव्यवहार व्यापाराविषयक अथवा देवघेव ह्या स्वरूपाचा असतो. प्रवासाच्या वर्णनाचीं पत्रें, आमंत्रण-पत्रिका, धार्मिक पत्रव्यवहार हे सर्व औपचारिक प्रकारांत येतात. पत्रलेखनांत मुख्य गोष्टी आहेत त्या ह्या--

१. पत्रारंभीं 'श्री' लिहून आपल्या इष्ट देवतेचें नांव लिहावें. उ०--श्रीगजाननप्रसन्न, इ.

२. ज्या स्थळाहून पत्र लिहावयाचें तें स्थळ. त्याच्याखालीं तारीख किंवा मिति, कांहीं वेळां तारीख व मिति ह्या दोन्ही लिहितात. हें वर उजव्या बाजूस लिहावें.

३. मायने--ज्याला पत्र लिहावयाचें त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला अनुलक्षून आरंभ करावा. हा एक शिष्टाचाराचा प्रकार आहे.

१. वडिलांस--तीर्थरूप राजमान्य राजेश्री--(नांव)

२. वडिलांप्रमाणें इतर आप्तांस--१. तीर्थस्वरूप राजमान्य राजेश्री--(नांव)

२. वडिलांचे सेवेशीं, कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार

३. अपरिचित मनुष्यास--१. राजमान्य राजेश्री--(नांव) कृ. सा. न. वि. वि.--

४. मित्रास-- मित्राचे सेवेशीं-- कृ. सा. न. वि. वि.

५. आपल्यापेक्षां वयानें लहान असणारास अनेक आशीर्वाद उपरी-(नांव)

४. मजकूर--मायना झाल्यानंतर मजकूर काय असेल तो लिहावा.

५. शेवट--पत्राच्या आरंभाप्रमाणें त्याचा शेवट ज्याला पत्र लिहावयाचें त्याच्या योग्यतेप्रमाणें करावा.

१. वडिलांस--कळावें, सेवेशीं श्रुत होय ही विज्ञापना.

२. लहानांस--कळावें, हे आशीर्वाद.

३. अपरिचित, मित्र वगैरे--कळावें, लोभ असावा ही विनंति.

६. पत्ता--स्पष्ट व सुवाच्य लिहावा. प्रथम पहिल्या ओळींत नांव, नंतर पेठ, घ. नं., नंतर ठिकाण, पोष्ट इ. इ.

उदा०- रा. रा. शिवराम अनंत मुळे,
यादोगोपाळ पेठ,
सातारा.

---

## पत्रव्यवहाराचे कांहीं नमुने खालीं लिहून दाखविले आहेत.

### भाडेचिठी

भाडेचिठी शके १८५० विभवनाम संवत्सरे मिति चैत्र शु॥ १२ रोज रविवार ता. १ एप्रिल १९२८ इसवी. ते दिवशीं—

| | |
|---|---|
| १. रामचंद्र गोविंद कोरडे, जात ब्राह्मण उमर वर्षे २९, धंदा नोकरी, राहणार सातारा. | लिहून घेणार |
| २. शंकर महादेव गोडबोले, जात ब्राह्मण, उमर वर्षे ३५, धंदा व्यापार, राहणार सातारा. | लिहून देणार |

भाडेचिठी दरमहा रुपये २५.

मुदत महिने अकरा.

कारणें भाडेचिठी लिहून देतों ऐसाजे—

सातार शहर येथील, शहर हद्दींतील पेठ सदाशिव येथील रस्त्यावरचे सिटी सर्वे नंबर १२७ चें घर तुमच्या वडिलार्जित मालकीचें आहे. सदर घर तुमच्या एकट्याचे वांटणीचें आहे. त्यांत दुसऱ्या कोणाचा हिसा नाहीं. त्याच्या चतुः-

सीमा खालीलप्रमाणें:—घर उत्तराभिमुखी खण ५ तिघई, एकमजली, त्याचे मागें तुमच्या कुसवाच्या पलीकडे म्युनिसिपालिटीची सार्वजनिक जागा, पूर्वेस भुईटे यांचें दुकान, उत्तरेस सडक, दक्षिणेस छापखाना, अशा आहेत. त्याची मोजणी दक्षिणोत्तर ६० व पूर्वपश्चिम ३० फूट आहे. क्षेत्रफळ १८०० चौ. फूट आहे. येणेंप्रमाणें घर आह्मीं तुह्मांपासून भाड्यानें ११ महिने मुदतीनें राहण्याकरितां व दुकानाकरितां घेतलें. तारीख १ एप्रिलपासून ११ महिने मुदतीनें दरमहा भाडें रु. २५ पंचवीस कबूल करून घेतलें आहे. तरी भाडें दहमहाचें दरमहा महिन्याच्या प्रत्येक ता. ५ पावेतों आह्मीं तुह्मांस देत जाऊं, व पावती घेऊं. तोंडी वसुलाविषयीं सबब सांगणार नाहीं. घरजागा झाडून स्वच्छ व दुरुस्त ठेवूं, घाण वगैरे करणार नाहीं. केल्यास नुकसान भरून देऊं. तुमचे विचाराशिवाय आह्मीं आपलेतर्फे जागा पोटभाड्यानें देणार नाहीं. घरपट्टी, पाणीपट्टी व इतर कर तुमचे तुह्मीं द्यावे.

ह्याप्रमाणें वहिवाट करीत गेलों तर भाडेचिठीचे ठरलेल्या मुदतीचे अखेर तावा तुमचे ताब्यांत हल्लींच्या स्थितींत करून देऊं. परंतु कोणतीहि शर्त मोडली तर व भाडें दोन महिने थकलें तर तुम्हीं मागाल त्यावेळीं घराचा कबजा ह्या भाडेचिठींतील मुदत पुरी होण्याची सबब न सांगतां तुमच्या स्वाधीन करूं. ही भाडेचिठी राजीखुषीनें व अक्कलहुशारीनें लिहून दिली. सही—तारीख मजकूर.

दस्तुर—

साक्ष सही

× ×

---

## प्रॉमिसरी नोट

राजमान्य राजेश्री दत्तात्रय महादेव सडेकर,

राहणार मुक्काम वेणावें, यांसी—

प्रॉमिसरी नोट लिहून देणार वाळा रावजी पाटील, राहणार वेणावें, लिहून देतों ऐसाजे कीं, मी तुमच्यापासून आज रोजीं रुपये दोनशें ( २०० ) आपले खाजगी देणें वारण्याकरितां घेतले आहेत. ते तुम्हीं मागाल त्या वेळीं देईन. कांहीं तक्रार सांगणार नाहीं. आपल्या रकमेस व्याज एकोत्र्याप्रमाणें देत जाईन.

नगर वाचनालय, सातारा


याप्रमाणें प्रॉमिसरी नोट मी लिहून दिली. मिति कार्तिक शु. ५ शके १८४९. ता....इसवी रोजीं

दस्तुर दादाजी वासुदेव राहणार सदर

तिकीट

त्यावर सही
अथवा अंगठा

---

## इनॉक्युलेशनबद्दल अर्ज

मेहेरबान कलेक्टरसाहेब बहादूर, जिल्हा सातारा,

यांचे हुजुरास.

मेहेरबानांस विनंति अर्ज असा कीं, आमचा गांव निगडी, ता. कराड, ह्या गांवांत नुकतांच प्लेगचा प्रादुर्भाव होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. रोज उंदीर मरताहेत. प्लेगविरुद्ध उत्तम उपाय म्हणजे स्थानत्याग, हें खरें आहे. तरी पण सध्यां झोंपड्या बांधून बाहेर राहण्यासारखी स्थिति नाहीं. गांवांतच राहण्याशिवाय लोकांपुढें दुसरा इलाज नाहीं. इनॉक्युलेशन करून घेऊन गांवांतच रहाण्याची लोकांची इच्छा आहे. इतर जे स्वच्छ रहाणीचे उपाय आहेत ते आम्हीं शक्य तोंवर अंमलांत आणूंच. तेव्हां आरोग्यखात्यामार्फत आमच्या गांवच्या लोकांना इनॉक्युलेशन करण्याविषयीं विनंति आहे. गेल्या प्लेगच्या दिवसांत अशीच व्यवस्था सरकारकडून करण्यांत आली होती. त्याबद्दल आम्हीं कृतज्ञ आहों. व्यवस्था लवकर व्हावी ही विनंति, मेहेरबानांस जाहीर व्हावें.

तारीख—

सह्या

---

## पाण्याची व्यवस्था होण्याबद्दल अर्ज

मेहेरबान प्रेसिडेंट, जिल्हा लोकल बोर्ड, सातारा,

यांचे हुजुरास.

आम्हीं खाली सही करणार, चिखली, ता. कराड येथील रहिवाशी, ह्यांचा विनंति अर्ज असा कीं, आमच्या गांवास सध्या पाण्याचें फार दुर्भिक्ष्य आहे. पाण्याची टंचाई असल्यामुळें लोकांचे फार हाल होत आहेत. सर्व लोकांना

एकच हेळ असल्यामुळें त्यावर फार गर्दी होते, व गर्दीमुळें पाण्याची जी स्वच्छता रहावयास पाहिजे ती रहात नाहीं. लोक त्याच्यांतच पाय बुडवितात. त्यांतच अज्ञपणानें भांडीं वगैरे घासतात. सूचना कितीहि दिल्या तरी त्याचा उपयोग होत नाहीं. ह्या गैरव्यवस्थेनें गांवांत नारूचा उपद्रव होण्याची भीति आहे. अशीच स्थिति जर फार दिवस राहिली तर कॉलऱ्याचा आजारहि उत्पन्न होण्याची धास्ती आहे. तेव्हां गांवच्या जवळच्या ओढ्यांत आणखी दोन हेळ काढून देण्याची व्यवस्था व्हावी. म्हणजे सर्व गांवची गैरसोय दूर होईल. आमच्या तालुक्याच्या वतीनें असलेल्या जिल्हा लोकलबोर्डचे मेंबर, ह्यांनीं वरील स्थिति समक्ष पाहिली आहे. मेहेरबानांस जाहीर व्हावें.

कळावें—तारीख

सह्या

---

## पोस्ट ऑफिस सुरू करण्याबद्दल अर्ज

मेहेरबान पोस्टमास्तर जनरल साहेब बहादूर, मुंबई,

यांचे हुजुरास.

आह्मी खालीं सह्या करणार, निगडी गांवचे रहिवासी, ह्यांचा विनंति अर्ज असा कीं, आमच्या गांवास पोष्ट ऑफीस नसल्यामुळें आह्मांस फार गैरसोय सोसावी लागत आहे. पोष्ट ऑफीस ह्या गांवाहून पांच मैलांवर आहे. टपाल रोजच्या रोज आह्मांस मिळू शकत नाहीं. आठवड्यांतून तीनच दिवस फक्त टपाल मिळण्याची व्यवस्था सध्यां आहे. जरूरीचीं पत्रें मिळण्यास फार विलंब लागतो. आमच्या गांवची टपालची आवकजावक रोजची बरीच असते. आमच्या गांवच्या आसपास व खुद्द आमच्या गांवास कपाशीचें उत्पन्न बरेंच होत असल्यामुळें मोसमांत कपाशीच्या व्यापाराची उलाढालहि बरीच होते. गांवांत ग्रामपंचायत, सॅनिटरी कमिटी, शाळा वगैरे सार्वजनिक संस्था आहेत. परंतु, पोष्ट ऑफिसच तेवढें नाहीं. तेव्हां आमच्या गांवची ही कायमची रसोय दूर करण्याविषयीं आम्हा सर्वांची आपणास विनंति आहे. पोष्ट मास्तरचें काम आमचे येथील शाळामास्तर करण्यास तयार आहेत. त्यांच्या जामिनकीबद्दल

रक्कम आह्मी गांवकरी देण्यास तयार आहों. पोष्टाची कमाई जर सरकारच्या अपेक्षेप्रमाणें न आली व त्यामुळें पोष्ट ऑफिस जर बंद झालें तर त्यावद्दल आह्मीं काहीं तक्रार करणार नाहीं. कळावें, मेहेरवानांस जाहीर व्हावें.

तारीख–

सह्या–

---

## व्यापारी मालाबद्दल

नारायण गोविंद आणि कंपनी,

पुस्तकाचे व्यापारी, सदाशिव पेठ, पुणें. तारीख १५ मार्च १९२८.

सा. न. वि. वि.–

आपण आमच्या दुकानचे कायमचे ग्राहक आहांत. नेहेमीं आपण आह्मांस उदार आश्रय देतच आहां तसा ह्यापुढें द्याल असा भरंवसा आहे. आमच्या संग्रहांत कांहीं नवीन व अत्यंत बहुमोल, नामांकित लेखकांच्या पुस्तकांची भर पडली आहे हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो.

१. नाट्यशास्त्रावर अप्रतिम ग्रंथ एक तज्ज्ञ प्रोफेसर यांजकडून मुद्दाम लिहवून घेतला आहे. त्यामध्यें आपल्या इकडील नाटकांचा सांगोपांग विचार करून एक ऐतिहासिक स्वरूपाची प्रस्तावना जोडली आहे. योग्य स्थळीं नामांकित नटांचे फोटोहि त्या त्या भूमिकेंत दिले आहेत. किंमत फार अल्प-रु. ३, पृष्ठें ५००.

२. विद्यार्थ्यांच्या उपयोगी एक कोश तयार करविला आहे.

३. "वाङ्मय-चर्चा" ह्या ग्रंथांत महाराष्ट्रांतील मुख्यमुख्य विद्वान् लोकांच्याकडून वाङ्मयाच्या प्रत्येक शाखेवर निबंध लिहवून घेतले आहेत. वाङ्मयाची सर्व बाजूंनीं चर्चा केलेली अन्यत्र क्वचितच सांपडेल. किं. रु. दोन, पृष्ठें ३००.

वरीलपैकीं जो ग्रंथ आपणांस हवा असेल तो लिहावा. कमिशन नेहेमींप्रमाणें.

सही.

---

## मित्रास पत्र–पावसाळ्यांतील एका दिवसाचें वर्णन

श्री

मुंबई,

हायस्कूल वसतिगृह.

तारीख

मित्राचे सेवेशीं, कृतानेक नमस्कार, विशेष–

मला येथें येऊन कांहींतरी १५ दिवस झाले. सर्व स्थिरस्थावर होऊन अभ्यासास सुरुवात झाली आहे. मी येथें प्रथमच आल्यामुळें मला मुंबईचा पाऊस माहीत नव्हता. पूर्वी भूगोलामध्यें मॉन्सूनवारे जून महिन्यांत येऊन पावसास सुरवात होते एवढेंच मी वाचलें होतें. परंतु येथें आतां त्याचा प्रत्यक्ष अनुभव येऊं लागला आहे. गेल्या सात आठ दिवसांत तर पावसाची सारखी झड लागल्यामुळें मला सारखें माझ्या खोलींत पावसानें डांबून टाकलें आहे. शाळेंत तेवढा कसाबसा जातों. जातांना वाटेंत निम्मासिम्मा भिजतोंच, तरी माझी छत्री आणि ओव्हरकोट आहेत.

मुख्यतः हा पाऊस जून महिन्यांत आरंभीं सुरू होतो आणि चार महिने टिकतो. पाऊस येतो तो एकदम जोरांत सर येते व जिकडे तिकडे पाणीच–पाणी होतें. व सर्व व्यवहार कांहीं मिनिटें तरी निदान बंद पडतो. ह्या पावसाचा उपयोग एवढाच कीं, हवेमधील जेवढे वाईट दोष असतात तेवढे सर्व नाहींसे होतात. पण उकडतें फार. कपडे दोन तीनदां बदलावे लागतात. असो; आणखी दोन तीन महिने हा त्रास भोगणें प्राप्त आहे. विशेष मजकूर पुढील पत्रीं.

आपला मित्र,

शिवराम.

———

## मित्रास पत्र-सर्कसचें वर्णन

श्री

सातारा,
यादोगोपाळ पेठ,
१-१-२८

मित्राचे सेवेशीं

कृतानेक नमस्कार विनंति विज्ञापना.

तुझें पत्र बरेच दिवसांत आलें नाहीं. सध्यां अभ्यासांत बराच गर्क झाला आहेस म्हणून फुरसत नाहींशी दिसते. आज तुला मुद्दाम पत्र लिहिण्याचें कारण म्हटलें ह्मणजे काल आह्मीं जो एक सर्कसचा खेळ पाहिला हें होय. तुला सर्कस पाहणें फार आवडतें तेव्हां तूं जर काल येथें आमच्यावरोवर असतास तर मजा झाली असती. असो; आतां त्या खेळाचें वर्णन मुद्दाम तुला लिहून पाठवीत आहें. माझ्यावरोवर येथील कांहीं स्नेही होते.

सर्कसचा तंबू एका भव्य, विस्तीर्ण अशा पटांगणावर मारिला होता. तंबूच्या बाहेर ब्यांड सारखा वाजत होता. आह्मीं तिकिटें काढून आंत जाऊन उंच अशा ठिकाणावर बसलों. बसण्यासाठीं उंच उंच लाकडांच्या पायऱ्यांसारखी व्यवस्था होती. मध्यें खुर्च्या होत्या. ग्यासचे दिवे पुष्कळ लावल्यामुळें उजेड पुष्कळ होता.

प्रथम सात आठ घोडे एकदम आले व एका वर्तुळांत एकामागें एक पळत सुटले. त्यांवर बसणारा कुशल होता. त्यानें बसण्याचे कितीतरी प्रकार दाखविले; एका पायावर उभा राहिला, एका घोड्यावर एक पाय व दुसऱ्या घोड्यावर दुसरा पाय, ह्या घोड्यावरून त्या घोड्यावर उड्या, मागून उडी, पुढून उडी, हवेंत उडी, उलटें बसणें, सुलटें बसणें असे पुष्कळ प्रकार दाखविले. विदूषकहि त्याप्रमाणें उड्या मारून लोकांना हंसें आणीत होता. मध्यंतरीं तो पडला पण विचाऱ्याला लागलें नाहीं. ह्यानंतर सायकलचें काम केलें. तारेवरून सायकल चालविण्याचें काम तर अप्रतिम झालें. तारेवरून सायकल चालतांना सर्व लोक अगदीं तटस्थ राहून पहात होते. मजा ही कीं तें काम एका १५ वर्षांच्या मुलानें केलें!

नंतर हत्तीचें काम झालें. एका स्टुलावर ज्या वेळीं तो बसला त्या वेळीं तो एका मोठ्या गणपतीसारखा दिसत होता. तो नुसता बसला एवढेंच नव्हे तर, त्यानें केटलींतील चहा कपांत ओतून कपांतील आपल्या सोंडेनें तोंडांत ओतला. सिंहाचें काम तर आश्चर्यकारक झालें. एका ताटांतील खाद्य सिंह, वाघ, घोडे, माकड, बोकड इतके विविध पशू खातांना पहतांना, पशूंच्या हिंस्र स्वभावावर मनुष्यानें मिळविलेला जो ताबा त्याबद्दल त्याची तारीफ करावीशी वाटते. मनुष्यानें आपल्या करामतीनें परस्पर स्वाभाविक वैरसुद्धां त्यांना विसरावयास लाविलें. असो; खेळ पाहून आह्मी रात्रीं परतलों. आणखीं गोष्टी पुष्कळ सांगण्या सारख्या आहेत. त्या पुन्हा केव्हांतरी लिहीन. क. लोभ असावा ही विनंति.

आपला,

शांताराम.

---

## शिष्यवृत्तिसंबंधीं अर्ज

इसलामपूर,

तारीख ४–१–१९२८.

मेहेरबान डायरेक्टर ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन साहेब बहादूर, पुणें,

यांचे हुजुरास

अर्जदार, बाळ मुकुंद मळवदे, राहाणार मु. इसलामपूर, याचा विनंति अर्ज असा कीं, मी गेल्या वर्षी व्ह. फा. ची परीक्षा येथील शाळेमधून पास झालों आणि मला शेंकडा ७५ मार्क मिळाले आहेत. माझी पुढें इंग्लिश शिकण्याची फार इच्छा आहे. परंतु घरची गरीबी असल्यामुळें साताऱ्यासारख्या शहरांत जाऊन राहून शिकण्याची सोय करितां येत नाहीं. शिक्षणाचा खर्च निभण्यासारखा नाहीं. गरीब व मागासल्या वर्गांतील विद्यार्थ्यांना सरकारांतून कांहीं मदत केली जाते असें समजतें. मी मागासलेल्या जातींपैकीं आहे. तेव्हां माझी गरीबीची स्थिति व परीक्षेंत मिळालेले मार्क ह्यांकडे पाहून मला कांहीं शिष्यवृत्तीच्या रूपानें मदत देण्याविषयीं विनंति आहे. माझ्या वर्तनाबद्दल व अभ्यासाबद्दल सोबत दाखले जोडिले आहेत. मेहेरबानांस जाहीर व्हावें. ता. ४-१-२८.

बाळ मुकुंद मळवदे.

---

## लहान भावास उपदेशाचें पत्र

श्री कऱ्हाड,

ता. १०-१-२८.

अनेक आशीर्वाद उपरी.

ति. बाबांचें पत्र आताच मिळालें. त्यामध्यें तुला सातारा येथील हायस्कूल-मध्यें ठेवण्याविषयीं त्यांनीं लिहिलें आहे. तेव्हां तूं लवकरच तिकडे जाशील. तूं जाण्यापूर्वी तुझ्याशीं समक्ष मला फार बोलावयाची इच्छा होती, परंतु तें कांहीं आतां शक्य नाहीं. म्हणून आज तुला मी मुद्दाम पत्र लिहीत आहें.

हायस्कूलमध्यें जाण्याची व त्यांतल्यात्यांत तेथील वसतिगृहांत रहाण्याची संधि तुला मिळाली हें फार चांगलें झालें. तुला पत्र लिहितांना मला माझ्या शाळेंतील दिवसांची फार आठवण होते. माझ्या वेळीं तेथें वसतिगृह नव्हतें त्यामुळें मला तेथें रहाण्याचा फायदा घेतां आला नाहीं. आतां तो तुझ्या वांट्यास येत आहे ह्यावरून तूं माझ्यापेक्षां सुखी आहेस. परंतु ह्या सुखाबरोबर तुझ्यावर जी जबाबदारी येऊन पडली आहे तिची मात्र तूं जाणीव ठेव. वसतिगृहांत पुष्कळ तऱ्हेचीं व निर-निराळ्या स्वभावांचीं मुलें असतात. तेव्हां मुख्य काळजी जी घ्यावयाची ती संगति निवडण्यासंबंधीं होय. एकदम कोणाशीं मैत्री करूं नये. कांहीं वेळ सर्वांकडे तटस्थपणानें पहात असावें. सर्वांची नीट परीक्षा आपल्या मताप्रमाणें झाली म्हणजे मग मैत्री संपादावी. वसतिगृहांत कित्येक श्रीमंत मुलें असावयाचीं कित्येक खुशालचेंडू असावयाचीं, कित्येक वाईट संवयीचीं असावयाचीं. असल्या मुलांशीं जर तूं संगत केलीस तर तुझा वेळ फुकट जाऊन अभ्यासाकडे दुर्लक्ष्य होईल. वसतिगृहावर देखरेख करण्यासाठीं शिक्षक असल्यामुळें वाईट मुलें फारशीं नसतीलच. तरी पण तुला आपली आधींच सूचना देतों.

अभ्यास नीट करीत जा. प्रत्येक विषयांत वर नंबर येईल अशी इच्छा धर. ह्याला म्हणजे फार अभ्यास करावा लागतो असें नाहीं. रोज नियमानें व पद्धत-शीर थोडा वेळ जरी अभ्यास केला तरी साधण्यासारखें आहे. नेहमीं खेळा-मध्यें भाग घेत जा. तुला तालिमीचा व आट्यापाट्याचा नाद आहेच. व्यायाम नेमानें घेतलास तरच तुझा अभ्यास हुशारीनें होईल. क्रिकेट, फुटबॉल हे

नवीन खेळहि खेळत जा. अभ्यास नीट करणें, व्यायाम वेळेवर घेणें, शिक्षकांस मान देणें, जेवण वेतानें करणें वगैरे गोष्टी जर तूं ध्यानांत ठेविल्यास तर तूं आपल्या शाळेंत चांगलें नांव मिळविशील, अशी मला खात्री आहे. कळावें ज्यास्त कांहीं लिहीत नाहीं, हे आशीर्वाद.

तुझा

**दादा.**

---

## सुटीमध्यें कोणतीं पुस्तकें वाचावीं याबद्दल विद्यार्थ्याचें शिक्षकास पत्र

श्री नामपूर,

तारीख २०—१—२८

कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार, विनंति विशेष—

आपला निरोप घेऊन जो निघालों तो येथें येऊन सुखरूप पोहोंचलों. वाटेंत प्रवासांत कांहीं फारसे हाल झाले नाहींत. इतर मित्रमंडळी बरोबर असल्यामुळें प्रवासांतील वेळ फार आनंदांत गेला. येथें सुटींतील दिवस आनंदांत जातीलसें वाटतें. आमचें गांव लहानसें टुमदार हवेशीर असें आहे. नोकरीवर असलेले आमचे चुलतेहि रजेवर येथें आले आहेत. मी सकाळीं आमच्या वडिलांबरोबर शेतांत जातों. तेथें बागेंत कांहीं थोडें काम करितों व संध्याकाळीं चुलत्यांच्याबरोबर फिरावयास जातों. फिरण्यामध्यें पुष्कळ विषयांसंबंधीं त्यांच्या कडून मला माहिती मिळते.

परंतु ह्या सुटीमध्यें अभ्यासाकडे दुर्लक्ष करून मला चालावयाचें नाहीं; कारण पुढें परीक्षा लवकरच यावयाची आहे. शाळेमध्यें असतांना इतर बाहेरचीं पुस्तकें वाचण्यास अगदीं सुद्धां वेळ मिळत नसे. आतां सुटींत पुष्कळ वेळ सांपडेलसें वाटतें. तेव्हां अभ्यासांत ज्यांचा उपयोग होईल अशीं बाहेरचीं इतर पुस्तकें मीं कोणतीं वाचावीं हें मला कळविण्याविषयीं आपणांस विनंति करीत आहें. त्याचप्रमाणें त्यांच्या वाचनाविषयींची दिशा जर आपण दाखविली तर मला फार उपयोग होईल. वाचन उगाच अद्वातद्वा होणार नाहीं.

इतिहासासंबंधीं मला विशेष आवड आहे हें आपणांस माहीत आहेच. तेव्हां त्या विषयावर ग्रंथसंग्रहापैकीं जर एकादें पुस्तक पाठविलें तर बरें होईल. प्रवासवर्णनापैकीं जर चांगलें असेल तर तेंहि पाठवावें. कादंबऱ्यांचें वाचन म्हणजे निव्वळ वेळेचा अपव्यय आहे असें सर्व म्हणतात, पण चांगल्या कादंबऱ्या वाचूं नयेत कीं काय ? चांगली उत्तम कादंबरी आपणांस पसंत असलेली अशी एखादी पाठवावी.

आपणांस तसदी देत आहें, परंतु आपणांस आम्ही अशी तसदी दिलेली फार आवडते असें मी पुष्कळ वेळां पाहिलें आहे. आणखी कांहीं उपयुक्त सूचना द्यालच. कळावें, सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

आपला,

लक्ष्मण.

---

## वाचिलेल्या पुस्तकाचा गोषवारा देणारें पत्र

श्री

पुणें, सदाशिव ३२५,

तारीख ४-६-२७.

मित्राचे सेवेशीं—

कृतानेक नमस्कार, विनंति विशेष.

मी नुकतेंच एक पुस्तक वाचून संपविलें. त्यावरून तुमची आठवण झाली. म्हणून मुद्दाम आज आपणांस पत्र लिहीत आहें. आपण ज्या वेळेस शाळेंत विद्यार्थी होतां त्या वेळेस आपणांस पुस्तकें वाचण्याचा नाद किती तरी होता ! नेहेमीं आपलें तुम्हांस पहावें तों तुम्ही लायब्ररींतच असावयाचे ! आतां तुम्हांस तितकासा वेळ सांपडत नसावासें दिसतें. पुस्तक-वाचनांत विशेष गोडी आहे खरी. आणि त्यांत एकाद्या पुस्तकानें तर मनाला विशेष आनंद होतो. मी जें नुकतेंच पुस्तक संपविलें तें एक अशाच प्रकारचें उत्तम पुस्तक आहे. "मोठ्या व्यक्तींचीं चरित्रें" ह्या पुस्तकांत पुष्कळ मोठ्या पुरुषांचीं चरित्रें दिलीं आहेत. नानाप्रकारच्या संकटांना तोंड देऊन ज्यांनीं आपला मार्ग काढिला व आपलें आयुष्य यशस्वी केलें त्यांचीं चरित्रें वाचतांना करमणूक होते एवढेंच नाहीं तर, मनाला चांगला बोधहि होतो. प्रयत्न, आशा,

चिकाटी, जोम, उत्साह या गुणांच्या योगानें आयुष्यांत एकदम कसा फेरबदल होतो हें चांगलेंच प्रत्ययास येतें; व त्या गुणांची मातब्बरीहि कळते. पुस्तकांत दिलेल्या बहुतेक व्यक्ती म्हणजे सर्व साधीं माणसें. ज्यांचे लहानपणीं फार हाल झालेले, गरीबींत दिवस गेलेले, ज्यांना शिक्षणहि फार न मिळालेलें व जें कांहीं शिक्षण मिळालें तें रस्त्याच्या कंदिलावर वाचण्यासारख्या दारिद्र्यांत मिळालेलें असेच सर्व लोक. अशी जरी त्या सर्वांची हलाखीची स्थिति होती तरी एक मात्र ठाम निश्चय आणि तो म्हणजे, अंगीकृत कार्य न सोडण्याबद्दलचा. कांहींनीं दिवसा काम करावें आणि रात्रीं शिक्षण करावें. कांहींनीं फावल्या वेळांत दुसऱ्याचे कावाडकष्ट करून रोजमुरा मिळवावा. ज्या वेळांत इतर सुखवस्तु मुलें मजा मारितात, गप्पा ठोकितात, झोंपा काढितात, तो वेळ यांनीं सत्कारणीं लावावा. अशा स्थितींत त्यांनीं केवळ आपल्या पायांवर उभें राहून डोकें वर काढिलें येवढेंच नव्हे तर ते समाजास, राष्ट्रास ललामभूत होऊन आदर्श झाले आहेत. अशा महात्म्यांचीं चरित्रें वाचून मनावर मानवी प्रयत्नाची महती बिंबल्याशिवाय कशी राहील ? हें पुस्तक मी नुकतेंच संपविलें. तेव्हां त्याच्याविषयीं मुद्दाम लिहिलें आहे. आणखी एकादें पुस्तक असलेंच आढळलें तर सुचवावें. कळावें लोभ असावा ही विनंति.

आपला—शांताराम.

---

## वर्तमानपत्रास रिपोर्ट

श्री

मु. शिपोशी,
ता. २६-२-२८.

रा. रा. संपादक, ज्ञानप्रकाश, पुणें, यांसी

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष.—

आपल्या सर्वमान्य पत्राच्या फेब्रुवारी ता. २४ च्या अंकांत आमच्या गांवांत जो कांहीं दिवसांपूर्वीं भयंकर प्रकार झाला त्याविषयींची हकीकत आली होती. परंतु त्यांत बरीच विसंगतता दिसून येते. तेव्हां खरी हकीकत काय झाली हें समजावें म्हणून आज आपणांकडे मुद्दाम लिहून पाठवीत आहें. ती आपण आपल्या पत्रांत छापाल अशी आशा आहे. तो प्रकार जेथें घडला तेथें आह्मीं हजर होतों त्यापेक्षां ह्याच्या सत्यतेबद्दल दुसरें प्रमाण नको.

नगर वाचनालय
संगणकीकृत


ज्या माणसानें आत्महत्या केली तो कोंडाप्पा हा स्वभावानें मूळचा फार शांत, साधा, फार कधीं वडवड न करणारा असा मनुष्य होता. व ह्या त्याच्या स्वभावामुळें तो गांवामध्यें वहुतेक लोकांना प्रिय झाला होता. व्यवहारासंबंधीं त्याचा आणि पुष्कळांचा संबंध येई; परंतु त्याचें आणि कोणाचेंहि कधीं वितुष्ट आलें नाहीं. त्याचा व्यापारहि अलीकडे भरभराटीस आल्यासारखा दिसत असे. परंतु कांहीं दिवसांपासून ह्या त्याच्या स्वभावांत व वागणुकींत फरक पडत असलेला लोकांच्या नजरेस येऊं लागला होता. पूर्वींप्रमाणें तो मन मोकळें करून कोणाशीं वोलत नसे. तेव्हां व्यापारांत कांहीं तरी जबर ठोकर लागली असावी असा सर्वांचा समज झाला. त्याशिवाय त्याच्या स्वभावांत इतका फरक पडावयाचा नाहीं. असा क्रम चालला असतां तालुक्याचे पोलीस इन्स्पेक्टरसाहेव दोन पोलीसशिपायांसह झडतीचें व पकडवारंट घेऊन आल्याचा गांवांत गेल्या सोमवारीं बोभाटा झाला व तो त्याच्या कानीं गेला असावा. लगेच त्यानें आपल्या घरांत जाऊन सर्व दारें लावून घेतलीं आणि वंदुकीची गोळी आपणांवर रोंखून आपली आत्महत्या केली. वंदुकीचे आवाज बाहेर ऐकूं आल्याबरोबर लोक एकदम धांवले. त्यांनीं दारें फोडून ज्या खोलींत तो होता त्या खोलींत आपला शिरकाव करून घेतला. पहातात तों काय ? जवळच त्याचें प्रेत पडलेलें. त्याच्याजवळ त्याची वंदुक—ती त्यानें कोठून पैदा केली कोणास ठाऊक—पोलीस तेथें होतेच. त्यांनीं पंचनामा वगैरे केला. इतरहि व्यवस्था लवकरच लाविली. त्याच्या व्यापारांत लागलेल्या ठोकरी-मुळेंच त्यानें आपली आत्महत्या करून घेतली हें खास. क. लो. अ. ही विनंति.

आपला—तेथें समक्ष हजर असलेला.

---

## परीक्षेनंतर आपण काय करणार ह्याविषयीं वडिलांस पत्र

तीर्थरूप राजमान्य राजेश्री वळवंत गंगाधर काळे, वडिलांचे शेवेसीं.

कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विशेष.

आपलें तारीख १० चें पत्र पावलें. तें पुनःपुनः वाचून त्यावर मी पुष्कळ विचार केला. परीक्षा पसार झाल्यानंतर मी काय करणार ह्याविषयीं जी आपण विचारणा केली आहे, तिचें उत्तर बरोबर देण्यास मी कितपत पात्र आहें

ह्याची मला शंका आहे. आपण माझ्यापुढें दोन्हीहि मार्ग ठेविले आहेत. एक पुढें कॉलेजमध्यें जाण्याचा किंवा दुसरा कांहीं तरी धंदा सुरू करण्याचा. ह्या दोन्हींपैकीं कोणता स्वीकारावा ह्याचा निकाल करणें मला कठीण होऊं लागलें आहे.

कॉलेजमध्यें जाऊन पुढचा अभ्यासक्रम पुरा करावा अशी माझी फार इच्छा आहे. सध्यां आहे तेवढेंच शिक्षण भावी आयुष्यांत पुरेसें पडणार नाहीं हें उघड आहे. शिवाय प्रत्येक विद्यार्थ्यानें एकदां तरी–निदान कांहीं दिवस–कॉलेजच्या शिक्षणाचा फायदा घ्यावा हें अवश्य आहे. कॉलेजच्या शिक्षणानें दृष्टी दूरावते. आकुंचित वृत्ति नाहींशा होतात. शील चांगलें बनतें. स्नेह जो संपादिला जातो तो कायमचा टिकतो. जुन्याजुन्या वाङ्मयांत जी संस्कृति सांठवून ठेविली आहे तिची ओळख पटते, असे पुष्कळ फायदे आहेत. परंतु पुस्तकांबद्दलची आवड, वाचनाची अभिरुची, ज्ञानाची लालसा वगैरे ज्या गोष्टींची कॉलेजांत अपेक्षा असते त्यांपैकीं मजजवळ एकहि नाहीं. शिवाय ज्या ज्या मित्रांशीं माझें बोलणें झालें त्यांच्यापुढेंहि कॉलेजची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर "पुढें काय करावें" हा प्रश्न दत्त म्हणून उभा असतो; व त्याचें त्यांना उत्तर देतां येत नाहीं. सुशिक्षितांमध्यें दिवसेंदिवस जास्तच बेकारी माजत चालली आहे. जितकें जास्त शिक्षण तितकी जास्त नाउमेद. कोणत्याहि खात्यांत नोकरी मिळणें शक्य नाहीं.

अशी परिस्थिति असतांना कांहींतरी स्वतंत्र धंदा सुरू करून आपल्या पायावर आतांपासून उभें रहाण्यास शिकावें असें माझ्या मनानें घेतलें आहे. आपला जोम, उत्साह, बुद्धि, चिकाटी त्या धंद्यांतच दाखवावी व यश संपादिण्याचा प्रयत्न करावा. लहान आरंभ करून वरील गुणांनीं पुढें आलेले पुष्कळ व्यापारी आहेत. त्यासाठीं कोठें तरी दुकानांत उमेदवारी करावी म्हणतों. आपल्या ओळखीनें कोठें तरी तशी व्यवस्था करावी. मी माझें मत कळविलें आहे. त्याचा विचार होऊन पुनः उत्तरीं कळवावें. क. सेवेशीं श्रुत होय ही विज्ञापना.

आपला

**रामचंद्र.**

# अभ्यास

खालील पत्रें लिहा:—

वडिलांस:—१. शाळेच्या वसतिगृहांत व्यवस्था कशी असते त्याजबद्दल. २. महिन्याचे खर्चाचे पैसे पाठविण्याबद्दल. ३. अभ्यास कसा चालला आहे, प्रकृति कशी आहे ह्याबद्दल. ४. शाळेची परीक्षा किंवा तपासणी झाल्याबद्दल.

धाकट्या भावास:—१. त्याच्यासाठीं चांगलें पुस्तक, चांगला खेळ पाठविण्याबद्दल. २. आपल्या संमेलनाचें अगर दुसऱ्या प्रसंगाचें वर्णन. ३. परीक्षेला जर बसत असेल तर त्याला योग्य सूचना देणें. ४. अभ्यासांत हलगर्जीपणा केल्याबद्दल निर्भर्त्सना करणें.

मित्रास:—१. एकाद्या सहलीचें वर्णन. २. सुटींत येण्याबद्दल एकाद्या मित्रानें दिलेलें आमंत्रण स्वीकारणें अथवा न स्वीकारण्याबद्दलचीं कारणें. ३. रस्त्यांत, शहरांत झालेल्या अपघाताचें वर्णन. ४. मित्रानें जर वाचनीय पुस्तक पाठविलें असेल तर त्याचे आभार मानणें व तें वाचण्याची दिशा विचारणें. ५. आपल्या शाळेचें, शाळेंतील मित्रांचें, शिक्षकांचें वर्णन. ६. आपल्या लहान भावाच्या अभ्यासाकडे, प्रकृतीकडे लक्ष देण्याविषयीं विनंति. ७ परीक्षा झाल्यानंतर पुढील अभ्यासक्रम नक्की करण्याविषयीं विचारविनिमय.

औपचारिक:—१. भोजनाचें आमंत्रण, लग्नादिकार्याबद्दल, समारंभास हजर राहण्याबद्दल आमंत्रण. २. आमंत्रणाबद्दल आभार मानणें, तें स्वीकारितां येत नसल्याबद्दल दिलगिरी.

व्यावहारिक:—१. कांहीं तरी माल पाठविण्याबद्दल दुकानदारास. २. पुस्तक पाठविण्याबद्दल किंवा एकाद्या पुस्तकाची विचारणा, त्याची किंमत, कर्ता इ. ३. पुस्तक आल्यानंतर आभार. ४. जाहिरातीला उत्तर म्हणून. १. प्रॉमिसरी नोट. २. खंडचिठ्ठी, कर्जरोखा, खरेदीखत.

 कुळकर्णी कृ.पां.

निमसरकारीः—१. नोकरी देण्याबद्दल अर्ज. २. नोकरी दिल्याबद्दल आभार. ३. रजा मागण्याबद्दल. ४. वरच्या जागेबद्दल मागणी.

शिक्षकासः—१. शाळेंत प्रवेश मिळण्याबद्दल. २. वसतिगृहांत प्रवेश मिळण्याबद्दल. ३. रजा देण्याबद्दल. ४. परीक्षेची माहिती विचारण्याबद्दल. ५. शिष्यवृत्ति, नादारी देण्याबद्दल. ६. परीक्षेनंतर पुढील अभ्यासाची दिशा दाखविण्याबद्दल. ७. सुट्टीमध्यें कांहीं महत्त्वाची गोष्ट असली तर त्याबद्दल.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
वाचनालय सातारा भवानी पेठ
८५७२९
भाजा २०४

